म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. नं.
REFBK-0003022

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळीची पुस्तकमाला.
पुस्तक ९४ वें.

वा.नं.३८८

# हिंदु स्त्रियांची कायदेशीर दुर्दशा.

लेखक
श्रीयुत कृष्णाजी केशव गोखले.

[ द्वितीयावृत्ति. ]

3022
REFBK-0003022

प्रकाशक
मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी,
गिरगांव, मुंबई.

किं. ०-१०-०. ]

सर्व हक्क स्वाधीन.

[ जुलई १९२२.

Printed and Published by D. R. Mitra at the Manoranjan Press, 3, Sandhurst Road, Girgaon, Bombay.

# अनुक्रमणिका


१. उपोद्घात. ... ... .... .... ... ... ... १–४
२. प्रकरण १ लें. हिंदुलॉ ही काय वस्तु आहे ? ... ... ... .... १
३. प्रकरण २ रें. एकत्र कुटुंब. ... ... ... .... ... ७
४. प्रकरण ३ रें. कुमारिका. ... ... ... ... ... ... १२
५. प्रकरण ४ थें. सुवासिनी. ... ... ... ... ... .... १९
६. प्रकरण ५ वें. विधवा. ... ... ... ... ... ... २६
७. प्रकरण ६ वें. विधवाधन. ... ... ... ... ... ... ३३
८. प्रकरण ७ वें. दत्तक घेण्याचा हक्क. ... .... ... ... ... ३९
९. प्रकरण ८ वें. स्त्रीधनाचा घोंपळा. .... ... ... ... ... ४५
१०. प्रकरण ९ वें. पीनलकोड. ... ... ... .... ... ... ५१
११. उपसंहार. ... ... ... ... ... ... ... ५७

# प्रस्तावना.

हिंदु स्त्रियांची सर्वांगीण उन्नति व्हावी या हेतूनें पाव शतक श्रम करीत असलेल्या मासिक मनोरंजनानें प्रस्तुतची लेखमाला क्रमशः प्रसिद्ध करावी हें त्याच्या ब्रीदाला साजेसेंच होतें; आणि श्रीयुत काशीनाथपंत मित्र यांचा अकालीं मृत्यु न होता तर ही लेखमाला एकदमच पुस्तकरूपानें प्रसिद्ध करून आपलें वार्षिक बक्षिस–पुस्तक ह्मणून ती देण्याचें त्यांनीं निश्चितहि केलें होतें. एकदम बक्षिसपुस्तक ह्मणून दिली गेली असती तर कदाचित्, ती कादंबरी नव्हे म्हणून, तिचा अव्हेर होण्याचा जो कांहीं वाचकांच्या ठायीं संभव होता तो प्रस्तुतच्या योजनेनें नाहींसा झाला, हें एकपरी बरेंच झालें. कारण ही लेखमाला क्रमशः येत असल्यामुळें तिनें अनेक वाचकांचें ज्यास्ती लक्ष्य वेधल्याचें आम्हांस समजलें आहे. एका हिंदी स्त्री–लेखकानें तर टाइम्स ऑफ् इंडिआमध्यें मुद्दाम पत्र लिहून या लेखमालेच्या मुळें आपले स्वतःचे डोळे हिंदु स्त्रियांच्या कायदेशीर दुर्दशेकडे स्पष्टपणें वेधले गेले, याबद्दल प्रस्तुत लेखकाचे हिंदी स्त्रियांच्या वतीनें आभारहि मानले आहेत.

हिंदु स्त्रियांची ही अशी दुर्दशा आहे तरी कोणती? व ती कायदेशीर आहे म्हणजे तरी काय? असे प्रश्न सामान्यतः स्त्रीवाचकांच्या मनांत पहिल्यानें उभे राहणें साहजिक आहे. कित्येक जणी तर याहूनहि पुढें जाऊन, व यदृच्छेनें आपल्या स्वतःच्या अनुभवाला जी सौख्यदायक स्थिति आली आहे तिजवरून आपला अभिप्राय बनवून, हिंदुस्तानांत तर केवळ "स्त्रियांचा स्वर्ग" आहे असें म्हणण्यास मागें घेणार नाहींत. अशा अनेक वाचकांनीं पूर्वग्रह बाजूला ठेवून स्वच्छ मोकळ्या मनानें प्रस्तुतची लेखमाला लक्ष्यपूर्वक वाचावी, अशी आमची त्यांनां अत्यंत आग्रहाची विनंती आहे, व सदरील प्रश्नांचीं भरपूर उत्तरें येथें त्यांनां मिळतील, अशी आमची खात्री आहे. पूर्वजन्मींच्या सुकृतामुळें म्हणा, किंवा यदृच्छेनें म्हणा, आपली स्वतःची प्राणयात्रा अथवा जीवनक्रम जरी इतका सौख्यदायक आहे, कीं, तो आपणाला स्वर्गतुल्य वाटतो आहे, तरी पति-राजांची मर्जी कोणत्यातरी कारणानें कां होईना, पण जर एकदां खप्पा झाली तर आपली हक्काची–म्हणजे कायदेशीर–अवस्था किती कष्टमय आहे याची जाणीव या लेखमालेनें स्त्री–वाचकांनां होण्यास हरकत पडणार नाहीं. दुसऱ्यानें केवळ मर्जीखातर जें आपणास बक्षीस दिलें तें आपलें नव्हे, जें आपणास कायद्यानें दिलेलें आहे तेवढेंच काय तें आपलें खरोखरीचें आहे, हें तत्त्व एकदां नीटपणें उमजलें म्हणजे हिंदु कायद्याप्रमाणें आपली योग्यता केवळ गोठ्यांतल्या गुरांइतकीच आहे ही कटु भावना पूर्णपणें जागृत होईल, व त्या भरांत "स्त्रियांचा स्वर्ग" इतर कोठें नसून तो हिंदुसमाजांत खास आहे असे उद्गार अन्य अर्थानें कैकजणींच्या तोंडांतून निघण्याचा संभव आहे अशी आम्हाला भीति वाटते; म्हणून तशा प्रकारची चूक आपल्या हातून घडूं न देण्याची सावधगिरी ठेवून हिंदुकायदा सुधारण्याचा प्रयत्न स्त्रियांनीं रीतसर करावा, अशी त्यांनां आग्रहपूर्वक शिफारस करून ही प्रस्तावना पुरी करतों.

कृ. के. गोखले.

# उपाद्घात.

प्रस्तुत पुस्तकाचा उद्देश, हल्लीं सरकार दरबारांत जो हिंदुलोकांसंबंधानें इस्टेटीच्या वारशाबद्दल कायदा चालू आहे त्या कायद्याप्रमाणें स्त्रीजातीचे हल्लीं हक्क काय आहेत त्याची माहिती सुशिक्षित स्त्रियांनां करून द्यावी, असा आहे. घरेंदारें, जमिनी-मळे वगैरे 'स्थावर' मिळकत, आणि रोख रुपये, नोटी, सोन्यारुप्याचे व जवाहिर मोतीं वगैरेंचे मोलवान् जिन्नस, व गाड्याघोडीं सामानसुमान वगैरे 'जंगम' माल, ह्या दोन्ही प्रकारांचा इस्टेटीमध्यें अंतर्भाव होतो. या दोन्ही प्रकारच्या इस्टेटी ह्मणजे स्थावर व जंगम—मिळून विचार करूनच एखाद्या मनुष्याच्या ऐपतीची कल्पना करीत असतात. ह्या इस्टेटी एका गृहस्थाजवळ असल्या ह्मणजे तो त्या (१) आपल्या हयातींत पाहिजे त्याला दान देतो, गहाण टाकतो किंवा विकतो; अथवा (२) आपल्या पश्चात् त्यांची अमुक प्रकारें विल्हेवाट लागावी असें आपल्या मृत्युपत्रांत लिहून ठेवतो. किंवा तिसरा प्रकार असा आहे, कीं, जर त्यानें आपल्या हयातींत इस्टेट कोणाला देऊन टाकली नाहीं, आणि तिजबद्दल आपलें मृत्युपत्रहि केलें नाहीं, तर ती त्याची इस्टेट त्याचे जे कायद्यानें वारस असतील त्यांनां आपल्या ताब्यांत घेण्याचा अधिकार प्राप्त होतो. असे त्याचे वारस कोणकोण आहेत, त्यांपैकीं कोणी कोणी ती इस्टेट वांटून घ्यावयाची, आणि ती कोणच्या प्रमाणानें एकमेकांत वांटून घ्यावयाची याविषयीं सर्व हिंदु लोकांनां लागू असणारा असा कांहीं कायदा आहे त्याप्रमाणें वारस लोक वांटणी करून घेतात, किंवा त्यांच्यांत तंटे उत्पन्न झाल्यास कोर्टें त्या कायद्याप्रमाणें वांटणी करून देतात. त्यासंबंधाचा जो कायदा हल्लीं चालू आहे त्याला 'हिंदुलॉ' असें ह्मणतात. मराठीमध्यें त्याला 'हिंदुधर्मशास्त्र' असें ह्मणतात पण तें नांव बरोबर नाहीं. कारण धर्मशास्त्र ह्मणजे धर्माविषयींचें शास्त्र असाहि अर्थ सहज होऊं शकतो. ह्मणून प्रस्तुतच्या लेखमालेमध्यें हिंदुधर्मशास्त्र अथवा हिंदु इस्टेटीचा कायदा असें न ह्मणतां आटोपसर असें 'हिंदुलॉ' हेंच नांव वापरलें आहे. लॉ ह्मणजे कायदा.

प्रस्तुत लेखमालेमध्यें इस्टेटीसंबंधानें हिंदु स्त्रियांनां हिंदु लॉनें काय हक्क दिले आहेत ते स्पष्ट करून सांगण्याचा जरी हेतु आहे, तरी वाचकांनां अगोदर सूचना देऊन टाकणें अत्यंत जरूर आहे, कीं, हिंदु लॉचें सर्वांगपरिपूर्ण असें विवरण करीत बसण्याचा आमचा मुख्य हेतु नाहीं. एखादें कायद्याचें पुस्तक लिहावें असा हेतु मुळींच नसून, हिंदु लॉमध्यें हल्लीं सर्वसाधारणपणें स्त्रियांनां आपल्या आईबापांच्या अगर नवऱ्याच्या इस्टेटीवर काय काय हक्क दिले आहेत त्याबद्दल स्थूलपणें विवेचन करून त्याविषयीं ज्या अनेक भ्रामक व चुकीच्या समजुती हिंदु समाजामध्यें प्रचलित आहेत त्यांतल्या ढोबळ चुका सुशिक्षित स्त्रियांच्या नजरेस स्पष्टपणें आणण्याचा प्रयत्न करावा, एवढाच आमचा हेतु आहे.

दुसरा हेतु असा आहे, कीं, हिंदु लॉप्रमाणेंच दुसऱ्या धर्माच्या लोकांचे ह्मणजे मुसलमान, पारशी, खिस्ती वगैरे धर्मीयांमधले जे कायदे आहेत त्या त्या कायद्यांमध्यें विवक्षित प्रसंगीं स्त्रियांनां काय काय हक्क आहेत ते थोडक्यांत सांगून त्यांची हिंदु लॉमधील स्त्रियांच्या हक्कांशीं तुलना करून कोणाची पद्धति सरस किंवा निरस आहे त्याचेंहि थोडक्यांत दिग्दर्शन करावें.

हे दोन्हीहि हेतु फारच त्रोटकपणें या लेखमालेंत साध्य झालेले दिसून येतील, ही गोष्ट आह्माला प्रथमतःच प्रांजलपणें कबूल करणें भाग आहे; कारण हिंदु लॉचें प्रस्तुतचें स्वरूप असें कांहीं विशाळ व चमत्कारिक आहे, कीं, त्याचें वर्णन करणें हें मुद्दां हल्लींसारख्या छोटेखानी लेखमालेमध्यें केवळ अशक्य आहे. ह्मणून आगाऊच सांगून टाकणें बरें, कीं, हिंदु लॉवर इंग्रजींत व

संस्कृतांत जे असंख्य मोठमोठे ग्रंथ आहेत त्यांच्याशीं कोणत्याहि प्रकारें स्पर्धा करण्याचा येथें प्रयत्नदेखील करण्यांत येणार नाहीं. आमचा हेतु अत्यंत छोटेखानी प्रमाणावर आहे, आणि तो एवढाच, कीं, पुरुष व स्त्री या उभयतांचे एकमेकांसंबंधानें जे हक्क आहेत ते हिंदु लॉमध्यें कोणत्या पायावर उभारलेले आहेत, आणि त्यांच्यामध्यें मूलभूत अशी कल्पना कोणती दिसत आहे त्याचें थोडक्यांत स्पष्टीकरण करावें. त्यापेक्षां जास्त तपशीलवार माहिती ज्यांनां पाहिजे असेल त्यांनीं थोरले ग्रंथ पहावे. अथवा त्याहिपेक्षां चांगला मार्ग ह्मटला तर हिंदु लॉमध्यें वाकबगार अशा तज्ज्ञ माणसांकडे जावें.

ज्याप्रमाणें प्रत्येक पुरुषाला आत्मज्ञान होणें अत्यंत जरूर आहे, त्याप्रमाणें प्रत्येक स्त्रीलाहि आत्मज्ञान होणें जरूर आहे. मी कोण आहें, बापाच्या घरीं माझा हक्क काय, पतीच्या घरीं मी गेल्यावर तेथेंहि माझे हक्क काय आणि माझीं कर्तव्य कर्मे काय हें प्रत्येक स्त्रीनें नीटपणें समजून घेणें हें तिला अत्यंत महत्त्वाचें आहे. ज्याप्रमाणें समुद्रांतून प्रवास करणाऱ्या प्रत्येक नावाड्याला आपण निघालों कोठून, आतां आहोंत कोठें, तेथपर्यंतचा पल्ला अजून किती दूर आहे वगैरे गोष्टींचें बिनचूक ज्ञान असणें फार जरूर आहे त्याचप्रमाणें प्रत्येक स्त्रीला संसारसमुद्राच्या अफाट पाण्यांतून मार्ग क्रमीत असतांना आपल्या खऱ्या स्थितीविषयीं यथार्थ ज्ञान असणें जरूर आहे. या आत्मस्थितीच्या ज्ञानावांचून संसारसमुद्रांत प्रवास करण्यास निघणें ह्मणजे केवळ नशिबावर हवाला टाकून मागचापुढचा विचार न करतां व आपत्ति व संकटें यांचा प्रतीकार करण्याकरितां आपणाजवळ कांहीं साधनें न बाळगतां प्रवासाला सुरुवात करण्यासारखे धोक्याचें आहे. सुदैवानें संकटें नच उत्पन्न झालीं तरच तो प्रवास सुखकर होणार हें उघड आहे.

पण याहिपेक्षां जास्ती बलवत्तर असें दुसरें एक कारण आहे. हल्लींच्या हिंदु लॉप्रमाणें आपली स्थिति खरोखरी कशी आहे हें समजण्यापेक्षांहि ती कायदेशीर स्थिति समाधानकारक नसल्यास ती कोणच्या बाबतींत समाधानकारक नाहीं, तिच्यांत कोणचे फरक केले ह्मणजे ती दुरुस्त होईल, व ते फरक कसे घडवून आणतां येण्यासारखे आहेत, या प्रश्नांचा ऊहापोह प्रस्तुतची लेखमाला वाचल्यापासून आमच्या स्त्रीवाचकांच्या मनामध्यें होऊं लागण्यासारखा आहे.

आजपर्यंत—ह्मणजे इंग्रजसरकारचें राज्य सुरू झाल्यापासून हिंदु लॉमध्यें योग्य त्या सुधारणा घडवून आणण्याचा मार्गच अगदीं खुंटल्याप्रमाणें स्थिति होती; कारण होतां होईल तों सरकार हिंदु लॉमध्यें ढवळाढवळ करणार नाहीं असें आश्वासन इंग्रजसरकारानें अनेक वेळां दिलेलें असल्यामुळें, कोर्टाचें काम, अमुक बाबतींत हिंदु लॉ काय ह्मणतो या प्रश्नाचें उत्तर काढून त्याप्रमाणें निकाल करावा, इतकेंच होतें. कायदा धडधडीत जरी अन्यायाचा दिसत असला तरी तो आहे तसा चालविण्याचें काम कोर्टाकडे असतें, आणि तो बदलण्याचें काम कायदे कौन्सिलांकडेसच फक्त असतें; पण वर सांगितलेल्या आश्वासनामुळें कायदेकौन्सिलांचा कायदे सुधारण्याचा अधिकार या हिंदुलॉच्या बाबतींत अगदीं नष्ट झाला होता. कोर्टाच्या नजरेला कायद्याच्या खांचाखोंचा आल्या ह्मणजे त्या त्यांनीं स्पष्टपणें उघडकीला आणाव्या, व त्यावरून ऊहापोह होऊन कायदेकौन्सिलांमध्यें त्या कायद्यांत योग्य त्या सुधारणा पास व्हाव्या अशी जी नेहमीं कायद्यामध्यें सुधारणा करण्याची पद्धति असते ती पद्धति या आमच्या हिंदु लॉच्या बाबतींत केवळ अशक्य झाली होती. याचा परिणाम असा झाला होता, कीं, कोर्ट व कौन्सिलें या दोन चक्रांपैकीं एक चक्र अगदीं मोडल्यासारखें स्वस्थ पडून राहिलें, व प्रसंगविशेषीं तें काम शब्दांची कमी अधिक ओढाताण करून कोर्टांसच ह्मणजे दुसऱ्या चक्रासच करावें लागत असे; परंतु कितीहि ओढाताण जरी केली तरी फार तर बारीकसारीक फेरफार घडवून आणणें कोर्टाकडून साध्य होई, आणि महत्त्वाच्या प्रसंगीं कोर्टांनीं केवळ हात टेंकून नाइलाजानें "असा असा कायदा हिंदु लॉचा आहे. तो आह्मांला बरा वाटो वा न वाटो, आहे तसा चालविण्याचें आमचें काम आहे" असें ह्मणून डोळे मिटून हिंदु लॉप्रमाणें निकाल देणें कोर्टांना भाग पडत असे.

परंतु हें मोडकेंतोडकें चक्र लौकरच दुरुस्त होऊन आपलें काम नीट रीतीनें करूं लागणार अशीं सुचिन्हें दिसूं लागलीं आहेत. अलीकडे अलीकडे पंजमजार्ज बादशाहा यांनीं ऑगस्ट १९१७ मध्यें जो जाहिरनामा प्रसिद्ध केला त्याच्या अन्वयें हिंदी लोकांच्या हातीं पुष्कळ नवीन अधिकार येणार आहेत, आणि विशेषेंकरून कायदे करण्याच्या बाबतींत तरी त्या अपेक्षा लौकरच सफळ होतील अशी खात्री बाळगण्यास बलवत्तर आधार आहे. त्या कायदेकौन्सिलांमध्यें अशी सुधारणा होण्याचा रंग दिसूं लागला आहे, कीं, कांहीं सोंवळया बाबतींत तरी निदान आमच्या हिंदी लोकांच्या मताप्रमाणें कायद्यामध्यें सुधारणा घडून येण्यास सरकारकडून फारसा अडथळा येणार नाहीं. त्या सोंवळयां बाबींमध्यें हिंदुलॉ ह्मणजे मिळकतीच्या वारशासंबंधानें प्रचलित हिंदु कायदा ह्याचा अंतर्भाव होण्यास हरकत येणार नाहीं, व त्यामुळें हिंदुलॉमध्यें तफावत करण्याचें मुख्य चक्र जें आजपर्यंत मोडून पडल्यासारखें झालें होतें तें दुरुस्त होऊन आपलें काम करूं लागण्यास हरकत नाहीं. हिंदीलोकांच्या मताप्रमाणें हे कायदे बदलणें अगर न बदलणें हें अत:पर फक्त हिंदी लोकांच्याच मर्जीची गोष्ट होणार आहे. इंग्रज सरकार परकी लोकांचें असल्यामुळें त्यांनां आमच्या हिंदु चालीरीतीचें स्वारस्य व हद्दत नीटपणें लक्ष्यांत येणें अशक्य आहे ह्मणून त्यांनीं आमच्या हिंदुलॉमध्यें ढवळाढवळ करूं नये, अशी हिंदुलोकांची जी साहजिक इच्छा होती तिला मान देण्याकरितांच सरकारानेंहि आपण ढवळाढवळ न करण्याचीं अभिवचनें दिलीं होतीं, पण आतां जर कायदेकौन्सिलें पूर्णपणें हिंदी लोकांच्या ताब्यांत त्या बाबतीपुर्ती आलीं तर त्या आश्वासनांचें अत:पर कारणच संपून गेलें असें होईल. अर्थात् हिंदुलॉमध्यें इष्ट ते फेरफार करून घेण्यास हिंदी कायदेकौन्सिलें मुखत्यार आहेत असें होईल व त्यांनीं हिंदुलॉमध्यें घडवलेल्या फेरफारांनां कायद्यांचें स्वरूप येऊन त्यांच्याप्रमाणें खटल्याचे निकाल देणें कोर्टांनां भाग पडेल.

आजपर्यंत कायदे दुरुस्त करण्याचें काम जें अशक्य होऊन बसलें होतें तें आतां शक्य झालें असल्यामुळें कायदा कोठें बिघडला आहे व त्याच्या सुधारणेकरतां काय केलें पाहिजे हा विचार आतां फार महत्त्वाचा झाला आहे. घर दुरुस्त करणारे सुतार, लोहार, गवंडी व इंजिनीअर आजपर्यंत झोंपीं गेले होते—अथवा त्यांनां हुकुम देऊन दुरुस्ती करण्याचें मना केलें होतें; पण आतां त्यांची झोंप अथवा ती मनाई संपून गेली आहे, व ते लोक काम करण्याला तयार झाले आहेत. अशा वेळीं आपण आपल्या घरांत कोठें मोडलेंतोडलें आहे, नवीन काय बांधावयाला पाहिजे आहे, फार जीर्ण झाल्यामुळें अजीबात पाडून काय टाकलें पाहिजे वगैरे प्रश्नांचा विचार करून निकाल लावण्यास कंबर बांधली पाहिजे. अर्थात् हिंदु लॉची जर आतां दुरुस्ती होणार आहे तर हिंदु स्त्रियांनींहि त्यांच्या नजरेप्रमाणें ज्या दुरुस्त्या इष्ट व अवश्य असतील त्या सुचविणें हें त्यांचें काम आहे, आणि दुरुस्ती नीट प्रकारें सुचवितां यावी याकरितां अगोदर इमारत कशी आहे, तिचे निरनिराळे भाग काय आहेत, त्यांतले मोडकळीस कोणते येताहेत व नवीनच कोणतें काय सोईचें बांधलें पाहिजे, या विषयाचा नीट सांगोपांग विचार करण्यास नको काय ? आजपर्यंत हा विचार करण्याचें तादृश कारण नव्हतें; कारण कितीहि जरी दोष दिसून आले, व कितीहि जरी सुधारणा अवश्य वाटल्या तरी तीं कामें करणारी मंडळीच मुळीं हाताशीं नव्हती, आणि ह्मणून दुरुस्त्या सुचविणें व्यर्थ होत असे; पण आतां जर तसें नाहीं तर स्त्रियांनीं हिंदु लॉची संपूर्ण माहिती, निदान आपल्या हक्कांपुरती तरी करून घेऊन आपल्याला सोईस्कर होतील अशा सुधारणा व मोडतोडीच्या दुरुस्त्या सुचविणें फार जरूर आहे. ह्मणून या वेळीं ही लेखमाला सुशिक्षित स्त्रियांनीं लक्षपूर्वक वाचणें व त्यांतल्या हरतऱ्हेच्या प्रश्नांचा विचार करणें हें अंगाबाहेर न टाकतां जरूर केलें पाहिजे हें उघड आहे.

या दोन कारणांहून देखील बलवत्तर आणि अत्यंत महत्त्वाचें असें आणखीहि एक कारण आहे. तें लक्ष्यांत नीटपणें बिंबवून घेतलें ह्मणजे आजच्या प्रसंगीं स्त्रियांनीं हिंदु लॉची माहिती कां करून घेतलीच पाहिजे तें त्यांनां स्पष्टपणें समजून येईल.

आपण अशी कल्पना करूंया, कीं, आपणाला ज्या इमारतीची दुरुस्ती व डागडुजी करावीशी वाटते आहे, व जिच्याकरितां इंजिनीयर वगैरे लोक बोलावून आणले आहेत ती इमारत आपली एकट्याच्या मालकीची नाहीं. तिच्यामध्यें निरनिराळे असे जे अनेक भाग किंवा मजले व दालनें आहेत तीं निरनिराळ्या मालकांच्या मालकीचीं आहेत, व त्या मालकांचे हितसंबंध कांहीं अंशीं एकमेकांच्या विरुद्ध आहेत. त्या मालकांपैकीं प्रत्येकाला आपापल्या भागाची दुरुस्ती करवून आपापली सोय वाढवून घ्यावयाची इच्छा आहे. अशा वेळीं ज्या त्या मालकानें आपल्या भागाची दुरुस्ती करण्याकरितां आपल्याकडे किती इमारत आहे, आपल्या शेजारचे भाग कोणाकडे आहेत, त्या भागांचा आपल्या स्वतःकडे असलेल्या दालनाशीं कसा संबंध आहे हें जरी नुसतें समजून घेतलें तरी तेवढ्यानें त्याचें काम संपणार नाहीं. आपल्या मालकीच्या भागांत काय दुरुस्ती केली म्हणजे आपला भाग आपणाला ज्यास्त सुखावह करतां येईल एवढेंहि पाहून त्याचें भागणार नाहीं. त्याला त्याच्यापुढें आणखी अशी खबरदारी घ्यावी लागेल कीं, शेजारचा अगर वरचा अथवा आपल्या खालच्या तळमजल्याचा मालक ज्या वेळीं त्याच्या भागाची दुरुस्ती करण्याला सुरवात करील त्या वेळीं तो लबाडीनें आपल्या भागांतला कांहीं भाग त्याच्या भागांत सामील करून घेणार नाहीं, अगर त्याच्या मोरीचें सांडपाणी आपल्या भिंतीला त्रास देण्यासारखें सोडणार नाहीं. किंवा इतर तऱ्हेनें आपणाला तो उपसर्ग लावणार नाहीं. ही खबरदारी जर त्यानें डोळ्यांत तेल घालून हुशारपणें घेतली नाहीं तर त्याचें ठिकठिकाणीं नुकसान होण्याचा फार संभव राहील, हें उघड आहे.

यावरून वाचकांच्या लक्ष्यांत आलें असेलच, [illegible] हिंदु लॉची दुरुस्ती करणारें चक्र हें एकदा सुरू [illegible] जे त्याला गति देणारा जसा भेटेल तसें [illegible] बंऊं लागेल. हिंदु लॉची इमारत निवळ [illegible] अगर निवळ स्त्रियांच्या मालकीची नसून तीमध्यें निरनिराळ्या दालनांची मालकी [illegible] मुलगे, मुली, सुवासिनी स्त्रिया, विधवा [illegible]या, पारकीं पोर, आंधळे, पांगळे, महारोगी वगैरे पंगु हिंदुलोक अशा अनेक वर्गांकडे आहे. त्या निरनिराळ्या वर्गांना सदहू इमारतीमध्यें गैरसोई भासत आहेत व त्या काढून टाकण्याचा मार्ग आतां मोकळा झाल्यामुळें प्रत्येक वर्ग आपापल्या सोयी वाढवून घेण्याचा आटोकाट प्रयत्न केल्याशिवाय रहाणार नाहीं, आणि तसा प्रयत्न करतांना आपल्या सोई होत असल्या तर दुसऱ्यांच्या भागावर किंवा हक्कावर अतिक्रमण झालें तरी स्वार्थामुळें तो तिकडे काणाडोळा करणारच. इतकेंच नव्हे, 'एकाचा जो फायदा तो दुसऱ्याचा तोटा' हा न्याय सार्वत्रिक असल्यामुळें कोणालाहि आपला फायदा करून घेण्याचा प्रयत्न करणें ह्मणजे शेजाऱ्याचें नुकसान करण्यास प्रवृत्त होण्याखेरीज गत्यंतरच नसणार. स्पष्ट शब्दांत सांगावयाचें तर असें ह्मणतां येईल, कीं, स्त्रियांचे हक्क हिंदुलोमध्यें वाढवावयाचे असतील तर त्या मानानें पुरुषांचे हक्क कमी झालेच पाहिजेत, व पुरुषांचे वाढावयाचे असल्यास स्त्रियांचे कमी झालेच पाहिजेत. अशी अन्योन्यसंबंधी जेथें परिस्थिति आहे तेथें स्त्रियांनीं जर आपले हक्क काय आहेत, दुसऱ्याचेहि काय आहेत, आपण काय सुधारणा मागतों आहोंत, दुसरे काय काय मागताहेत याकडे नीट सावधपणें लक्ष दिलें नाहीं, तर भोळ्या मालकाप्रमाणें त्यांची स्थिति होऊन त्यांच्या हक्कांची आणखी वाढ होण्याऐवजीं छाटाछाटच होण्याची त्यांनीं अपेक्षा धरावी हें बरें!

यावरून हें उघड आहे, कीं, नवीन कायदेकौन्सिलें हें जणू काय एक प्रकारचें दोनधारी हत्यार आहे. स्त्रिया जर त्याचा नीट उपयोग करण्यास शिकल्या नाहींत तर त्या हत्यारापासून त्यांनां फायदा होण्याच्या ऐवजीं त्यांच्या आजपर्यंत असलेल्या हक्कांमध्येंच छाटाछाट केली जाईल. ही भीति टाळण्याकरितां स्त्रियांनीं इतःपर हिंदु लॉ ह्मणजे काय आहे त्यांची चांगली माहिती करून घेणें व आपले हक्क जाणण्याकरितां दुसऱ्यावर अवलंबून न रहातां आपली आपणच काळजी घेणें हें अतिशय जरूर आहे हें कोणीहि सांगेल. कारण श्री रामदासांनीं ह्मटलेंच आहे कीं,

"जो दुसऱ्यावरी विश्वासला।
त्याचा कार्यभाग बुडाला।"

# हिंदु स्त्रियांची कायदेशीर दुर्दशा !!

प्रकारण पहिलें.

## हिंदु लॉ ही काय वस्तु आहे ?

प्रथमदर्शनीं कोणालाहि साहजिकपणें असें वाटेल, कीं, हिंदु लॉ ह्मणजे, हिंदु लोकांच्या इस्टेटीची विल्हेवाट त्यांच्या मृत्यूनंतर कोणच्या नियमांप्रमाणें होते ते नियम ज्यांत स्पष्टपणें नमूद केलेले आहेत, असा एखादा ग्रंथ उपलब्ध असेल; आणि इंग्रज सरकारानें त्या नियमांत ढवळाढवळ न करण्याचें अभिवचन दिलें आहे त्या अर्थी, तो ग्रंथ इंग्रजांचें राज्य सुरू होण्याच्या पूर्वीचा असला पाहिजे, ह्मणून अर्थात् तो ग्रंथ संस्कृतामध्यें लिहिलेला असेल. आणि त्या तसल्या ग्रंथाची नीटपणें माहिती करून आपण घेतली ह्मणजे आपणाला हिंदु लॉची पूर्ण माहिती झाली असें वाटणें अगदीं साहजिक आहे.

परंतु ही समजूत पुष्कळ अंशीं चुकीची आहे. आजकालच्या हिंदु लोकांमध्यें चालू असलेले इस्टेटीचे कायदे अथवा नियम जर कोठें एके ठिकाणीं लिहिलेले सांपडणें शक्य असेल तर तें कोणच्याहि संस्कृत ग्रंथांत तर नाहींच, पण कोणच्याहि मराठी ग्रंथांत देखील नाहीं. त्याकरितां आपणाला इंग्रजी ग्रंथांकडेच धांव घेतल्याशिवाय गत्यंतर नाहीं. हिंदु लोकांच्या इस्टेटीचे कायदे, आणि ते पुरातन काळापासून चालत आलेले, आणि त्यांत इंग्रज सरकारानें ढवळाढवळ न करण्याचें अभिवचन दिलेलें, अशा परिस्थितींत सदरहू कायदे एखाद्या संस्कृत अगर मराठी ग्रंथांत न सांपडतां केवळ इंग्रजी ग्रंथांत सांपडावेत हा एक अर्वाचीन काळचा विलक्षण प्रभाव आहे यांत संशय नाहीं; आणि विशेष आश्चर्याची गोष्ट ही आहे, कीं, त्याबद्दल इंग्रज सरकार यत्किंचित् देखील जबाबदार नाहीं, एवढेंच नव्हे तर कोणीच जबाबदार नाहीं !

इंग्रज सरकारचें राज्य इकडे सुरू झाल्यावर त्यांनीं आपल्या नव्या प्रजेला वैषम्य वाटूं नये आणि त्यांच्यांत संतोष रहावा ह्याकरितां जाहीर केलें, कीं, आह्मी तुमचा धर्म व तुमच्या चालीरीती आणि कायदेकानू यांमध्यें ढवळाढवळ करणार नाहीं, पूर्वींप्रमाणेंच आह्मी न्याय देणारे न्यायाधीश नेमून त्यांजकडून तुमच्याच कायद्यांनां अनुसरून कज्जांचे निकाल देत जाऊं. हे जाहीरनामे प्रसिद्ध झाल्यावर प्रजेला संतोष वाटला, हें उघडच आहे. पुढें न्यायकोर्टें स्थापन झालीं त्यांवर अर्थात्च मोठमोठे न्यायाधीश इंग्लिशलोक नेमण्यांत आले. इंग्लिशन्यायाधीशांनीं हिंदुलोकांच्या पूर्वींच्या कायद्यांप्रमाणें न्याय द्यावयाचा खरा, पण पूर्वींचे कायदे कसकसे आहेत त्याची त्यांनां माहिती कोठून असणार ? अर्थातच त्या कायद्यांचें एखादें पुस्तक असतें तर त्याचा इंग्रजीमध्यें तर्जुमा एखाद्या दुभाष्याकडून सरकारानें करून घेतला असता; पण येथें अडचण अशी येऊन पडली, कीं, मराठींत किंवा संस्कृतांत कायद्यांचें असें—एका ठिकाणीं सर्व कायदे लिहिलेलें असें पुस्तक नव्हतें. छापण्याची कला त्या काळीं अस्तित्वांत नसल्यामुळें हस्तलिखित पोथ्या वगैरे ठिकठिकाणीं होत्या त्यांचें अवलोकन करून रामशास्त्री प्रभुण्यासारखे विख्यात न्यायाधीश पेशवाईमध्यें न्याय करीत असत. त्या साऱ्या पोथ्या जमा करून त्या सर्वांचीं भाषांतरें करणें ह्मणजे फार मेहनतीचें व कालक्षेपाचें काम होतें, तें होईपर्यंत चालू असलेल्या खटल्यांचे निकाल तहकूब कसे ठेवावे अशी अडचण येऊन पडली. निकाल तर झटपट झाले पाहिजे होते, व तेहि पूर्वापारच्या न्यायाच्या तत्वांनां धरूनच

व्हावयाला पाहिजे होते, आणि इंग्लिश न्यायाधीशांनां कायदे तर माहीत नाहींत! ह्या अडचणींतून पार पडण्याकरितां सरकारानें एक युक्ति काढली. सदर दिवाणी अदालत ह्मणजे मुंबई-शहरीं स्थापिलेलें जें मुख्य न्यायाचें कोर्ट त्यांतील इंग्लिश न्यायाधीशांच्या मदतीला कांहीं हिंदी शास्त्रीपंडित मदतनीस ह्मणून द्यावे, व त्यांच्या सल्ल्यानें दाव्यांचे निकाल अदालतीनें करावे. वादाचा प्रश्न पुढें आला आणि त्यांत कायदा काय आहे याची माहिती साहेबांनां नसली, ह्मणजे तो प्रश्न त्या पंडितांकडे पाठवावा, त्यांनीं विचार करून लेखी उत्तर द्यावें, आपल्या उत्तराच्या समर्थनाकरितां जुन्या ग्रंथांतलीं आधारभूत वचनेंहि दाखल करावीं, आणि त्यांचें भाषांतर दुभाष्यांनीं करून यूरोपियन न्यायाधीशांनां समजावून सांगावें, व त्याप्रमाणें कायदा समजून घेऊन यूरोपियन न्यायाधीशांनीं दाव्याचा निकाल करावा, व प्रस्तुत खटल्यांतले प्रश्न व त्यांचीं उत्तरें व आधारभूत वचनें पुढें उपयोगीं पडावीं ह्मणून संग्रहीं ठेवावीं, असा द्राविडी प्राणायाम सुरू झाला!

परंतु एवढ्यानेंच संपलें नाहीं. शास्त्रीपंडितांनीं जे निकाल द्यावयाचे ते तरी एखाददुसऱ्या संस्कृत ग्रंथाच्या आधारें द्यावयाचे असते तर तें काम त्यांनीं सहज केलें असतें. हिंदुलोकांच्याप्रमाणें मुसलमानी लोकांचेहि निकाल त्यांच्या मौलवी लोकांच्या सल्ल्याप्रमाणें करण्याची व्यवस्था झाली होती, आणि त्यांचें धर्मपुस्तक कुराण आणि त्यावरची एखादुसरी टीका एवढींच त्यांचीं महत्त्वाचीं कायद्याचीं पुस्तकें असल्यामुळें मुसलमानी लोकांचें काम लौकरच नीट सुसंगत होत चाललें, पण आह्मां हिंदु लोकांचें सारेंच चमत्कारिक! नुसत्या जुन्या संस्कृत ग्रंथांची आमची यादीच कितीतरी मोठी व्हावयाला लागली. आमचे धर्मशास्त्राचे ग्रंथ इतके पुष्कळ आणि इतके विस्तृत आहेत, कीं, त्यांची पुर्ती नांवनिशी देण्याचा प्रयत्न न करितां मुख्य मुख्य ग्रंथांची यादी येथें देणें ठीक होईल:—

चारहि वेद (ऋग्, यजुः, साम व अथर्व), वेदांगें, उपनिषदें, स्मृतिसूत्रें, **धर्मसूत्रें** (गौतम, बौधायन, आपस्तंब, वसिष्ठ व विष्णु यांनीं कृत, त्याचप्रमाणें हारीत, हिरण्यकेशिन्, उशनस्, काश्यप, शंख.); स्मृतींमध्यें **मनुस्मृति, याज्ञवल्क्यस्मृति, नारदस्मृति व पराशरस्मृति** व आणखी सुमारें ५० (बृहस्पति, कात्यायन, अंगिरस, अत्रि, दक्ष, देवल, प्रजापति, यम, लिखित, व्यास वगैरे); नंतर या स्मृतींवरील नाना ग्रंथकारांच्या टीका असंख्य आहेत त्यापैकीं कांहींचीं नांवें:—**मेधातिथि, धारेश्वर, श्रीकार, कुल्लुकभट्ट** वगैरे मनुस्मृतीवरील टीका याज्ञवल्क्य स्मृतीवरील मुख्य टीकाकार विज्ञानेश्वर यानें केलेली **मिताक्षरा**, नतर **विश्वरूपा**; अपरार्क वगैरे; नंतर विज्ञानेश्वराची मिताक्षरा ज्यास्ती स्पष्ट करण्याकरितां लिहिलेल्या अधिक टीका, बाळंभट्टी, **सुबोधिनी** (विश्वेश्वरभट्टकृत), ह्यानंतर निरनिराळे निबंधग्रंथ ह्मणजे कायद्यांचें एके ठिकाणीं ग्रथन करणारे ग्रंथः—**व्यवहारमयूख** (नीलकंठकृत,) **कल्पतरु** (लक्ष्मीधरकृत), **विवादरत्नाकर** (चंडेश्वरकृत), **विवादचिंतामणि** (वाचस्पति मिश्रकृत), **दायभाग** (जीमूतवाहनकृत), **वीरमित्रोदय** (रघुनंदनकृत), **दत्तकमीमांसा** (नंदपंडितकृत), **दत्तकचंद्रिका** (कुबेरकृत), **धर्मसिंधु व निर्णयसिंधु**, हे इतके जुने ग्रंथ आहेत, आणि त्यांत आणखी सगळीं पुराणें व उपपुराणेंसुद्धां.

येणेंप्रमाणें शेंकडों संस्कृत ग्रंथ पाहिल्यावांचून प्रश्नाचा निकाल लावणें बरोबर झालें नसतें. हे सारे ग्रंथ एकाच काळीं लिहिलेले नसून त्यांतील सर्वांत जुने ह्मणजे 'चारहि वेद हे सुमारें तीनचार हजार वर्षांपूर्वीं लिहिलेले, तर सर्वांत अर्वाचीन व्यवहारमयूख व वीरमित्रोदय हे सुमारें तीनचारशें वर्षांचे जुने ह्मणजे सुमारें सन १६०० ते १७०० ह्मणजे श्रीशिवाजीमहाराजांच्या सुमारास लिहिलेले आहेत असा अंदाज आहे.

पण येवढ्या ग्रंथांचें पारायण करूनहि शास्त्र्यांचें काम संपत नसे. कारण या सर्व ग्रंथांवर आपली छाप ठेवणारा असा एक नवीनच भाग अलीकडे निर्माण झाला त्याचें नांव कलिवर्ज. त्याचा अर्थ असा, कीं, वरील संस्कृत ग्रंथांत पुरातन काळाला योग्य असे जरी सर्व कायदे असले तरी हल्लींच्या पापमय कलियुगांत ते सारेच काय कामाचे? अर्थात् त्यांपैकीं जे भाग कलियुगांत वर्ज करणें जरूर दिसले तेवढे सर्व भाग एकत्र करून त्याला 'कलिवर्ज' असें नांव दिलें, व त्यामुळें कलीमध्यें त्या त्या गोष्टी वर्ज असें ठरलें. उदाहरणार्थ, नियोगाची पद्धति जरी स्मृतींमध्यें सांगितली आहे तरी ती कलिवर्जांपैकीं आहे.

एवढ्यानेंहि संपलें नाहीं. वर लिहिलेल्या यादींतील ग्रंथ आणि कलिवर्ज एवढे पाहून झाल्यानंतर लोकांमध्यें चालरीत किंवा रूढि काय आहे तीहि पहाणें सर्वांत महत्त्वाचें होतें; कारण "शास्त्रात् रूढिर्बलीयसी" ह्मणजे धर्मशास्त्राच्या ग्रंथांत कांहींहि जरी लिहिलें असेल आणि त्याच्या उलट व्यवहार जर लोकांमध्यें रूढ असेल तर शास्त्रें बाजूला ठेवून रूढीप्रमाणेंच निकाल दिला पाहिजे, असा आपल्या लोकांत पुरातनकाळचा नियम आहे. इतकेंच नव्हे तर वरील ग्रंथकारांनीं तरी आपापल्या ग्रंथांत फक्त त्या त्या काळीं जे प्रकार रूढ होते तेवढेच लिहून ठेवलेले आहेत अशी सर्वांची दृढ समजूत आहे. एवंच काय, वरील ग्रंथ, कलिवर्ज आणि रूढि यांनां पाहून निकाल करावे लागत असत.

अशा प्रकारच्या क्रमांतून गेल्यानंतर जे निकाल देण्यांत येत ते पुढें दाखल्याकरितां दप्तरीं ठेवून देत, व पुनः तसलाच खटला कोर्टांत आला ह्मणजे शास्त्रीपंडितांकडे प्रश्न न पाठवितां पूर्वींच्या दाखल्यावरूनच यूरोपियन न्यायाधीश निकाल देत. एकदां ज्या प्रश्नाचें उत्तर कोर्टांतून मिळालें तोच प्रश्न पुनः बहुशः कोणी कोर्टांत नेत नाहींत; कारण निकाल काय मिळणार हें बहुतेक निश्चितच झालेलें असतें, ह्मणून लोक विनाकारण सरकारदरबारच्या खर्चाच्या पेंचांत पडत नाहींत; पण या जनप्रवृत्तीमुळें कोर्टांवरहि अशी जबाबदारी येऊन पडते, कीं, आपल्या निकालांमध्यें न्यायाच्या तत्वांची परंपरा सोडली जाऊं नये. अमुक प्रश्नाचा जर एकदां अमुक निकाल दिलेला असला तर पुनः कधीं तोच किंवा तसलाच प्रश्न पुढें आला तर त्याचाहि तसलाच निकाल दिला पाहिजे. नाहीं तर कोर्टांवर कोणाचा भरंवसा न रहातां सारेंच अशाश्वत होऊन जाईल. हें तत्त्व वस्तुतः बरोबर आहे, पण त्याचा एक परिणाम असा विलक्षण होतो, कीं, आपण एकदां दिलेला निकाल चुकीचा दिला असें जरी पुढें कधीं कोर्टाच्या नजरेस आलें तरी न्यायपरंपरा कायम राखण्याकरितां पुनः तसला प्रश्न आल्या वेळीं कोर्टाला ती चूक दुरुस्त न करतां पूर्वींप्रमाणेंच निकाल देण्याचा अत्यंत मोह उत्पन्न होतो; आणि तो मोह दूर सारण्याचें मनांत आलेंच तर आमचा पूर्वींचा निकाल चुकीचा होता, त्याचीं कारणें अमुकअमुक होतीं, सबब आम्ही आतां पूर्वींच्याच्या उलट असा निकाल देत आहों असें प्रांजलपणें कबूल करणें भाग पडतें. ह्मणून होतांहोईल तोंवर पूर्वीं दिलेल्या निकालाविरुद्ध कोर्ट स्वतः कधीं निकाल देत नसतें.

यावरून हें स्पष्ट होईल, कीं, अव्वल इंग्रजींत हिंदु लॉच्या प्रश्नाचे निकाल देण्याची सुरुवात झाली ती निवळ मनुयाज्ञवल्क्य वगैरे जुन्या ग्रंथांप्रमाणें नव्हती, निवळ कलिवर्जांप्रमाणें नव्हती, व निवळ रूढीवरहि तिचा पाया नव्हता; तर त्या तिहींचें एक मिश्रण करून जें काय कोडबोळें तयार होई, तें कोडबोळें जर यूरोपियन न्यायाधीशांच्या पसंतीला उतरलें तर त्या कोडबोळ्याप्रमाणें निकाल होई. आतां न्यायाधीशांच्या पसंतीचा प्रश्न कोठून उत्पन्न झाला असें कोणी विचारील; पण त्यानें असा विचार करावा, कीं, न्यायाधीशालाच जो निकाल पटत नसेल असा निकाल तो कसा देईल? न्यायाधीशानें आपली नापसंती व्यक्त केली, कीं, पंडितांकडे तोच

प्रश्न पुनः विचाराकरितां जाई, आणि पंडितांनां असंख्य संस्कृत ग्रंथांतून आणखी कांहीं वचनें काढून पुनः साहेबांनां पसंत पडेल असें कोडबोळें बनवणें अशक्य नव्हतें. हें जरी खरें तरी हें नवें कोडबोळें पंडितांनां आणि सर्वसाधारण हिंदुसमाजालाहि पटण्यासारखें असावें लागे,हेंहि उघड आहे. एवंच काय, अर्वाचीन हिंदु लॉ ह्मणजे काय तर वर लिहिलेले ग्रंथ, कलिवर्ज, रूढि, साहेबांची पसंती आणि हिंदु पंडितांची व समाजाची पसंती इतक्यांच्या मिळून मिश्रणाचें जें कोडबोळें बनलें जाई अशा अनेक कोडबोळ्यांचा संग्रह! अर्थातच प्रत्येक निकाल इंग्रजींत असल्यामुळें प्रत्येक कोडबोळें इंग्रजी भाषेंतच असे, ह्मणून संग्रहहि इंग्रजींतच! आणि ह्मणूनच अर्वाचीन हिंदु लॉ संस्कृतांत अगर मराटींत* नसून केवळ इंग्रजींत आहे!!

पुढें ही व्यवस्था पुष्कळ वर्षें चालून इंग्रजींत असलेले कोर्टांतले दाखले पुष्कळ जमले, कांहीं स्मृतींचीं भाषांतरेंहि इंग्रजींत झालीं, व यूरोपिअन जज्जांनां बऱ्याच दिवसांच्या सहवासानें हिंदु लॉहि बहुतेक सर्व समजून गेला. अर्थात् शास्त्रीपंडितांनां कोर्टानें रजा देऊन टाकली. जर कदाचित् एखादा अगदीं नवा असा प्रश्न कोर्टापुढें आला तर वकील लोकांनीं जुन्या संस्कृत ग्रंथांतले त्या संबंधाचे आपापले आधार कोर्टापुढें सादर करावे, व त्यांचें भाषांतर कोर्टास समजून सांगावें, दोघांहि वकिलांनीं त्या आधारांविषयीं कोर्टासमोर वादविवाद करावा,आणि कोर्टाच्या नजरेला जें बरोबर, व रूढीला व कायद्याला अनुसरून आहेसें दिसेल त्याप्रमाणें कोर्टानें न्याय द्यावा अशी पद्धति तेव्हांपासून आजपर्यंत चालू आहे, व यापुढेंहि त्याच पद्धतीवर वहिवाट चालणारी आहे, आणि हळुहळू इंग्रजींतला हिंदु लॉ वाढत चाललेला आहे!

येणेंप्रमाणें अर्वाचीन हिंदु लॉची जरी वाढ होत चालली, तरी दुसऱ्या कांहीं कारणांनीं हिंदु लॉची छाटाछाटहि होत चालली! तोहि प्रकार असाच मौजेचा आहे. ज्यांचे त्यांनां कायदे कायम ठेवावयाचें अभिवचन इंग्रज सरकारनें दिलें खरें, पण पुढें अनेक अडचणी उत्पन्न होत चालल्या.उदाहरणार्थ, फौजदारी कायदाच घ्या. हिंदूनें चोरी केली तर हिंदु लॉप्रमाणें त्याला अमुक शिक्षा दिली, पण मुसलमानानें तशीच चोरी केली तर त्याला मुसलमानी कायद्याप्रमाणें निराळीच शिक्षा देणें भाग पडूं लागलें; ह्मणजे चोरी करणाराला इंग्रजी राज्यांत एकच कायदा नसून त्या चोराच्या धर्माप्रमाणें त्याचा कायदा असें चमत्कारिक होऊं लागलें! ब्राह्मणाच्या विहिरीला महार शिवला तर हिंदु लॉप्रमाणें त्याला शिक्षा करावी, पण तोच मुसलमानाच्या विहिरीला शिवला तर मुसलमानी धर्माप्रमाणें शिक्षा मुळींच नाहीं! अशा अडचणींमुळें इंग्रजसरकारानें असा विचार केला, कीं, गुन्हे अपराध वगैरे फौजदारी बाबतींविषयीं आपण एक नवीनच कायदा विलायतेंतल्या नियमांप्रमाणें करावा व तो सरसहा हिंदु, मुसलमान, पारशी, खिस्ती, यहुदी वगैरे झाडून सर्व प्रजेला लागू करावा. त्याप्रमाणें त्यांनीं आपला पीनलकोड नांवाचा फौजदारी कायदा सुरू केला, आणि फौजदारी गुन्ह्यांपुरती हिंदु लॉची छाटाछाट केली. पुढें गुन्ह्यांची चौकशी कशी व्हावी, पुरावा केव्हां व कसा घ्यावा, आरोपीचें ह्मणणें केव्हां ऐकावें वगैरे संबंधानेंहि एक नवीन 'कोड' केलें, व तें सर्व प्रजेला लागू केलें व त्या संबंधापुरती हिंदु लॉमध्यें छाटाछाट केली. नंतर पुराव्याचाहि नवीन कायदा करून आणखी छाटाछाट केली. कराराचाहि नवीन कायदा करावा लागला. कारण रामा व कृष्णा

---

* प. वा. रा. सा. मंडलिक यांनीं हिंदु लॉचें एक पुस्तक तयार केलें, पण तें केवळ इंग्रजी निकालांचें मराठी भाषांतरच मुख्यतः आहे, आणि त्याचीहि अलीकडे २५।३० वर्षांत कोणी नवी आवृत्ति काढण्याची तसदी घेतलेली नाहीं.

ह्यांमध्यें एखादा दिवाणी तंटा निघाला तर दोघांनां हिंदुलॉ लावणें ठीक होतें; पण रामा व हुसेन यांमध्यें तंटा लागला तर कायदा हिंदु लावावा कीं महमदी अशी अडचण पडूं लागली. रामानें आपली जमीन हुसेनला दिली तर कागदपत्र करावयाचे ते कोणत्या कायद्याप्रमाणें ? आणि पारशी व मुसलमान ह्यांमधले दस्तैवज करावयाचे तर कोणत्या कायद्याप्रमाणें ? वगैरे हजारों प्रश्नांमुळें सर्व प्रजेला सररहा लागू पडतील असे नवे कायदे करून लावणें भागच आलें, व तितक्यापुरता हिंदु लॉ संपुष्टांत येत चालला.

ह्या पद्धतीमुळें वर ज्यांची यादी दिली आहे त्या संस्कृत ग्रंथांतले पुष्कळसे भाग आतां निरुपयोगी बनल्यासारखे झाले आहेत; पण एवढ्यानेंच संपलें नाहीं.कांहीं बाबतींत निवळ दयादृष्टीनें प्रेरित होऊन इंग्रज सरकारानें हिंदु लॉचे कांहीं भाग जाणूनबुजून रद्द करून टाकले. पति मृत झाला असतां स्त्रीनें सती जावें असें हिंदु लॉ ह्मणतो, व स्त्रीला फार पुण्य लागत असल्यामुळें स्त्रीनें सती जावें असा उपदेश अथवा आग्रह करणारा मनुष्यहि थोडेंसें पुण्य गांठीं बांधतो, अशी हिंदूंची भाविक श्रद्धा व रूढिहि होती;पण इंग्रज सरकारला हा सारा प्रकार रानटी व अघोरी वाटला, आणि स्त्रियांची खरोखरी इच्छा नसतांना त्यांजवर सती जाण्याविषयीं जबरी होते असा बोभाटाहि त्यांच्या कानीं आला ह्मणून केवळ स्त्रियांनां असल्या जुलमांतून सोडविण्याकरितां त्यांनीं तेवढा हिंदु लॉ छाटून काढला व असें फर्माविलें, कीं, जर एखादी स्त्री सती जात आहे असें आढळून येईल तर तिला पकडून आत्महत्येच्या प्रयत्नाबद्दल तिला शिक्षा करावी, व तिला उत्तेजन देणारांनां मदतगार ह्मणून शिक्षा करावी ! त्या दयेच्या कामापुरतें सरकारानें आपलें अभिवचन साफ मोडून टाकलें, आणि स्त्रियांवर उपकाराचें ओझें करून ठेवलें. कारण, त्यामुळें नातेवाइकांची गुप्त किंवा उघड जबरी नाहींशी झाली. जी मनापासून सती जाऊं इच्छीत असेल तिला खुशाल विहिरींत उडी घ्यावयाला कोण हरकत करू शकेल ? ती हजार जणांची नजर चुकवून सती जाईलच.

आणखीहि अशीं वचनभंगाचीं उदाहरणें सांगण्यासारखीं आहेत. हिंदु लोकांच्या जुन्या संस्कृत ग्रंथांत धर्मभ्रष्ट अथवा धर्मच्युत होणें हा फार मोठा अपराध समजण्यांत येई. एखाद्यानें हिंदुत्व सोडून महमदी किंवा इतर धर्म स्वीकारला तर त्याला पतित ह्मणजे "पडलेला अथवा जवळजवळ मृत " असें मानावें व त्याची सर्व इस्टेट त्याच्या वारसांनीं घ्यावी असा कायदा असे; पण धर्ममतें मानणें वा न मानणें ही ज्याच्या त्याच्या श्रद्धेची अथवा मनोभावनेची बाब आहे, त्यामुळें कोणाचेंहि नुकसान होणें रास्त नाहीं असें इंग्रज सरकारानें ठरवून १८५० सालीं तेवढ्यापुरता हिंदु लॉ रद्द करून असा कायदा केला,कीं, धर्म बदलण्यामुळें कोणीहि आपली इस्टेट गमावण्यास पात्र होणार नाहीं. त्याचप्रमाणें विधवापुनर्विवाहाचा वगैरे दुसरे कांहीं कायदे झालेले आहेत.

ह्या अनेक प्रकारांनीं मूळच्या हिंदु लॉमध्यें विलक्षण फरक होऊन गेले आहेत. आपण एखाद्या सोनारदादाजवळ आपली सोन्याचीं कडीं दिलीं आणि त्यानें घरीं नेऊन तीं विस्तवांत घालून आटवून कांब केली. पुनः ती कांब वाढवून लांब केली,वांकविली, पुनः तुकडे पाडले, तार ओढली, कांहीं लहानसहान तुकडे आपल्या घरीं टाकून गुपचिप ठेविले व बाकीच्या सोन्याची एक छानदार गळ्यांत घालावयाची सरी करून आपणाकडे आणली तर ती आपल्याच कड्यांची आहे हें आपणाला ओळखूंहि येणें कठिण जातें. त्याप्रमाणें आमचा मूळचा संस्कृत ग्रंथांतला हिंदुलॉ वर सांगितलेल्या अनेक कृतींनीं इतका बदलून गेला आहे,। कीं, त्याच्या मूळच्या स्वरूपांतलें फारच थोडें आतां शिल्लक उरलेलें आहे. त्यांतले पुष्कळसे भाग काढून टाकले आहेत, कांहीं भाग नवीन करून घातले आहेत, आणि एकंदर पुष्कळ ठिकाणीं नवीन

नवीन कल्पनांची त्यावर पाश्चात्य पद्धतीची छटा दिली गेली आहे. हें जरी खरें आहे तरी सोनाराकडून परत आलेल्या दागिन्यांत मूळचें आपण दिलेलें सोनें जसें कायम असतें त्याप्रमाणें आमच्या शिल्लक राहिलेल्या अर्वाचीन हिंदु लॉचा गाभा अजून अस्सल हिंदुच आहे मूळचें दिलेलें सोनें जर अस्सल असेल तर परत येणारी सरीहि अस्सल सोन्याची असेल–फार तर सोनारानें मिसळ केली असल्यास तेवढीच ती हिणकस ठरेल हें उघड आहे.

येथपर्यंतच्या विवेचनावरून अर्वाचीन हिंदु लॉ ह्मणजे काय वस्तु बनलेली आहे याची वाचकांनां बरीचशी कल्पना होईल.त्यामध्यें कायदे कौन्सिलानें योग्य वाटेल तो फेरफार करण्याचा उपक्रम वर सांगितल्याप्रमाणें कांहीं वेळां केलेलाच आहे. आणि आतां इतःपर कायदेकौन्सिलांत जर हिंदी लोकांचाच बहुतेक भरणा व्हावयाचा आहे तर नवीन कायदे कौन्सिलें पूर्वीची परंपरा कायम ठेवून त्यांनां वाटतील तसतसे फेरफार करतील यांत शंका नाहीं. अर्थात् हे नवे फेरफार आपापल्या हिताचे व्हावे–निदान आपलें त्यांपासून नुकसान तरी होऊं नये–अशी खबरदारी प्रत्येक वर्गानें घेतली पाहिजे. हल्लीं हिंदु लॉचा जो कांहीं थोडासा भाग अवशिष्ट राहिला आहे त्याचा संबंध फक्त हिंदु पुरुष, स्त्रिया व मुलें यांच्याशींच येत असतो.हिंदु कुटुंबांतल्या माणसांनीं इस्टेट कशी वांटून घ्यावी, हिंदु पुरुषांचे हक्क काय, हिंदु स्त्रीचे हक्क काय इतक्या बाबी साधारणपणें हल्लींच्या हिंदु लॉमध्यें येतात. अर्थात् मुख्य वाद स्त्री व पुरुष या दोन वर्गांमध्येंच शिल्लक राहिला आहे. आणि आतां पुढें जी सुधारणा किंवा बदल व्हावयाचे ते मुख्यत्वेंकरून या दोघांच्या हितसंबंधाविषयींचेच असणार, ह्मणून इतःपर हिंदु स्त्रियांनीं आपल्या हक्कांनां जपण्याकरितां आणि ते हक्क वाढवून घेण्याकरितां शक्य तितकें सावध असणें अत्यंत जरूर आहे. प्रत्येक सुशिक्षित स्त्रीवर तर ही जबाबदारी विशेषच पडत आहे. त्यांनां नजर आली असून जर त्या डोळेझांक करतील तर आपल्या जातीशीं बेइमानपणा केल्याचा दोष त्यांजवर पुढें उत्पन्न होणाऱ्या सुशिक्षित स्त्रिया खात्रीनेंच लादतील हें त्यांनीं लक्ष्यांत ठेवावें.

आणखीहि एका कारणामुळें सुशिक्षित स्त्रियांनीं आतां हुशारीनें राहिलें पाहिजे. आजपर्यंत असें होत असे, कीं, स्त्रीजातीच्या हक्कांची वाढ करण्याचें–निदान त्यांतले कमी होण्याला प्रतिबंध करण्याचें–काम पुष्कळ अंशीं यूरोपियन न्यायाधीशांनीं आपल्या अंगावर घेतल्यासारखें त्यांचें वर्तन असे. हिंदु लॉमध्यें प्रस्तुत काळीं जी कांहीं थोडीशी सवलत स्त्रियांनां आहे ती पुष्कळ अंशीं यूरोपियन् न्यायाधीशांच्या सहानुभूतीचें फळ आहे. त्यांनीं जर स्त्रियांविषयीं सतत एकसारखी सहानुभूति दाखविली नसती तर स्त्रियांची कायदेशीर स्थिति हल्लींपेक्षांहि भयंकर झाली असती. यामुळें असा प्रकार झाला आहे, कीं, जेव्हां स्त्रियांच्या हक्कांचें संरक्षण करणारें असें कोणी स्त्रीमंडळ नव्हतें अशा मागच्या शंभर वर्षांच्या काळांत यूरोपियन न्यायाधीश हे तें काम करण्याला स्वयंसेवक म्हणून सदोदित तयार असत, व त्यामुळें स्त्रिया स्वतः अगदीं अज्ञानी असूनहि त्यांचें संरक्षण यूरोपियन् न्यायाधीशांच्या हातून होत आलें आहे. हिंदु पुरुषांच्या हल्ल्यांपासून हिंदु स्त्रियांचें संरक्षण यूरोपियन् पुरुषांनीं केलें ही गोष्ट हिंदु पुरुषांनां जेवढी लज्जास्पद आहे तेवढीच ती यूरोपियन न्यायाधीशांनां भूषणावह आहे.

परंतु आतां नव्या मन्वंतरामध्यें स्त्रियांच्या हक्कांचें संरक्षण व संवर्धन करणारे हे स्वयंसेवक रखवालदार स्त्रियांनां नाहींसे होणार आहेत. आजपर्यंत जुन्या ग्रंथांतील वचनांचा अर्थ लावून त्याची ओढाताण करतां येत असे,व तें काम केवळ जज्जांच्या कलाप्रमाणें होत असे. कायदेकौंसिलें त्या बाबतींत अगदीं हात घालीत नसत, म्हणून जज्ज लोक म्हणतील ती पूर्व दिशा असा साधारणपणें प्रकार असे; पण ही त्यांच्या हातांतली शक्ति इतःपर नाहींशी होणार. कारण कायदेकौंसिलें आपलें काम

करण्यास प्रारंभ करणार. जज्जांनीं केलेली ओढाताण जर कायदेकौंसिलांत नापसंत झाली तर यद्दिशीं तेथें कायदा पास होऊन जज्जांचे हात चटकन् बांधले जातील. कारण कायद्याविरुद्ध जज्जाला जातां येतच नाहीं. अर्थात् आतां स्त्रियांचें वालीपण यूरोपियन जज्जांकडे राहणें शक्य नाहीं. तें आतां कायदेकौंसिलांकडेसच फक्त येणार, आणि तेथें तर हिंदु पुरुषांचाच भरणा ज्यास्ती असणार! म्हणून स्त्रियांनीं आतां अशी तजवीज ठेवली पाहिजे, कीं, कायदेकौंसिलांत आपल्या वतीनें भांडणारे पुष्कळ लोक हजर असतील. पण स्त्रियाच जर स्वस्थ घोरत राहतील तर त्यांच्या हक्काची तेथें काळजी कोण घेणार? असाहि संभव आहे, कीं, यूरोपियन जज्जांनीं शंभर वर्षांत जें त्यांच्याकरितां करून ठेवलें आहे, तें कायदेकौंसिल पांचदहा वर्षांत हाणून देखील पाडूं शकेल!

यूरोपियन न्यायाधीशांप्रमाणेंच यूरोपियन गवर्नर्स व त्यांच्याबरोबरचे कौन्सिलांतले इतर यूरोपियन अधिकारी पुरुष ह्यांचेहि आमच्या हिंदुस्त्रियांनीं आभार मानले पाहिजेत. हिंदुपुरुषांच्या कोलाहलाला भीक न घालतां कैक प्रसंगीं त्यांनीं हिंदुस्त्रियांच्या संरक्षणाकरितां निंदा व शिव्या यांचा वर्षावहि सोसण्यास मागें पुढें पाहिलें नाहीं. सती बंद करणें, विधवा—पुनर्विवाहाचा कायदा करणें, आणि अगदीं अलीकडचें उदाहरण ह्मणजे संमतिवयाचा कायदा पास करणें या व अशा अनेक प्रसंगीं हिंदुपुरुषांपैकीं रथी, महारथी, अतिरथी ह्मणविणारांनीं हरतऱ्हेनें उलटे प्रयत्न केले, स्त्रियांचा कैवार घेणारे जे मूठभर हिंदुपुरुष होते त्यांच्या अंगावर दगडधोंड्यांचा वर्षावहि करण्यास कमी केलें नाहीं, पण त्या त्या प्रसंगीं केवळ यूरोपियन गवर्नर जनरल व कौन्सिलर लोकांनीं धीर धरून ते ते कायदे पास करून टाकले. पण आतां त्यांच्याहि हातांतली ती 'कर्तुमकर्तुं अन्यथा कर्तुं'ची शक्ति नाहींशी होणार आहे; कारण इतःपर कायदेकौन्सिलांत गवर्नरनें हजर देखील रहावयाचें नाहीं असें ठरलें आहे! ह्मणजे आजपर्यंत स्त्रियांच्या बाजूची सहानुभूति धरून काम करणारा हाहि संरक्षक वर्ग नष्ट होणार आहे. हे दोन्हीहि बुलडॉग्, ह्मणजे इमानी सशक्त कुत्रे जवळ होते तोंवर स्त्रिया झोंप घेत होत्या तरी फारसें बावगें नव्हतें. पण आतां गवर्नर्स व न्यायाधीश असे दोघेहि पहारेकरी नाहींसे होऊन स्त्रियांना केवळ हिंदुपुरुषांनीं भरलेल्या अशा कायदेकौन्सिलांच्या हातीं दिल्यासारखें झालें आहे. आजपर्यंतचा राग, [illegible] स्त्रियांवर काढण्याचा तेथें प्रयत्न होणारच नाहीं [illegible] अर्थात् स्त्रियांनीं आपली आपण [illegible] ठेवली पाहिजे! त्या कामीं फक्त कांहीं सुधारणा[illegible] पुरुषांचें त्यांना मनापासून साहाय्य मिळेल हें जरी खरें, तरी मुख्य बोजा ज्याचा त्यानेंच उठवला पाहिजे, हें उघड आहे. ह्मणून आम्ही पुनः एकवार ह्मणतों, "स्त्रियांनो, जाग्या व्हा, उठा, आणि कामाला लागा!"

---

## प्रकरण दुसरें.

# एकत्र कुटुंब.

हिंदु लॉ ह्मणजे काय ह्याची यथार्थ कल्पना येण्याकरितां पहिल्यानें एकत्र किंवा अविभक्त कुटुंब ह्मणजे काय तें नीटपणें समजून घेतलें पाहिजे. कारण कोणत्याहि विशिष्ट प्रसंगीं हिंदु लॉचे नियम काय आहेत हा प्रश्न तें कुटुंब विभक्त आहे कीं एकत्र आहे या प्रश्नाच्या उत्तरावर पुष्कळसा अवलंबून असतो. कुटुंब एकत्र असलें ह्मणजे एखाद्या स्त्रीचे जे हक व कर्तव्यें असतात त्यापेक्षां भिन्न हक्क व कर्तव्यें तें कुटुंब विभक्त असलें ह्मणजे असतात. ह्मणून एकत्र कुटुंब ह्मणजे काय, तें विभक्त कसें होतें व पुनः त्या विभक्ताचें अविभक्त कसें बनतें, हा सर्व प्रकार नीट ध्यानांत ठेवला पाहिजे.

आपण अशी कल्पना करूंया, कीं, माधवराव सळनिटकर नांवाचे एक गृहस्थ आहेत. त्यांची वृद्ध मातुःश्री, सुशील पत्नी, तिघे मुलगे, त्या तिघांच्या बायका, चौघी मुली व चार नातू व पांच नाती अशी मंडळी एका कुटुंबांत नांदत आहेत. वडिलोपार्जित घर आणि शेतीहि पुष्कळ आहे, शिवाय व्यापारधंद्याकरितांहि ठिकठिकाणीं माधवरावांनीं दुकानें ठेविलीं आहेत. हा सर्व कारभार माधवराव आपल्या तिघां मुलांच्या मदतीनें चालवितात. बाहेरून दाणागोटा जो काय येईल त्याची व्यवस्था सौ. पार्वतीबाई आपल्या सासुबाईच्या सल्ल्याप्रमाणें व आपल्या सुनांच्या मदतीनें उत्तम प्रकारें चालवीत असतात. घरांत आलेल्या जिनसांची उधळमाधळ न झाल्यामुळें कुटुंबाला दिवसेंदिवस भरभराट चढत जाऊन तें फार डौलदार व गर्भश्रीमंत असें दिसूं लागलें आहे. बाहेर पुरुषमंडळी व घरांत बायकामंडळी आपापल्या परीनें जिवापाड झटत असल्यामुळें ही उत्तम स्थिति आपल्या कुटुंबा[illegible]आली आहे असें खुद्द माधवराव [illegible] कबूल करीत आहेत.

[illegible]धवरावांच्या थोरल्या मुलाला—ह्मणजे गणपतराव व सरस्वतीबाई यांनां मुळींच मूलबाळ झालें नाहीं. दुसरा मुलगा रामचंद्र याला ह्मणजे सीताबाईला फक्त पांच मुलीच झाल्या आहेत, आणि तिसरा कृष्णराव याला ह्मणजे राधाबाईला मात्र चौघे मुलगे झाले आहेत. चौघी मुली माधवरावांनां आहेत त्यांपैकीं दोघींचीं लग्नें झालीं आहेत व दोघींची अजून व्हावयाचीं आहेत.

आतां ही सर्व हकीगत वाचल्यानंतर एखाद्याला असें वाटेल, कीं, एकमेकांच्या हाडामासांतून उत्पन्न झालेली, किंवा लग्नाच्या योगानें या कुटुंबांत पूर्णपणें सामील झालेली, अशी ही सर्व मंडळी मिळून हें एकत्र कुटुंब बनलेलें असावें. पण या भरभराटीला या सर्वांनींच जरी पराकाष्ठेची मदत केली आहे तरी हिंदु लॉ सर्वांनां सारखें मानीत नाहीं. हिंदु लॉ पहिला मोठा ढोबळ भेद हा करतो, कीं, या कुटुंबांतल्या फक्त पुरुषांनांच तो एकत्र कुटुंबाचे घटक असें मानतो व सर्व स्त्रियांनां अत्यंत दुय्यम प्रतीचा दर्जा देतो. हिंदु लॉच्या दृष्टीनें एकत्र कुटुंबाचे घटक फक्त माधवराव, त्यांचे तिघे मुलगे, व चौघे नातू एवढे सातच होत. जिनें सर्वांहून अधिक वर्षें या कुटुंबाकरितां श्रम केले आहेत त्या वृद्ध मातुःश्रीला, माधवरावांच्या खुद्द पत्नीला, तिघीहि सुनांनां, माधवरावांच्या चौघीहि मुलींनां व पांचहि नातींनां त्यांच्या केवळ स्त्रीत्वामुळें या एकत्र कुटुंबांत फक्त आश्रिताइतकाच हलका दर्जा आहे, असें हिंदु लॉ कंठरवानें सांगतो. ह्मणजे पुरुष व स्त्री या तत्त्वावर मुख्य भेद प्रथम असा केला, कीं, पुरुष तेवढे सारे मालक व स्त्रिया तेवढ्या साऱ्या केवळ आश्रित! आश्रितांच्या स्थितींतून त्या कधींहि वरच्या वर्गांत ह्मणजे मालकांच्या वर्गांत जाऊं शकत नाहींत. त्या जन्मतांना जशा आश्रित तशाच मरतांनाहि आश्रितच राहतात! अशी स्थिति असल्यामुळें मुलगी जन्मली ह्मणजे साऱ्यांचीं तोंडें आंबट होत असतात तें वाजवी नव्हे असें कोण ह्मणेल?

एवंच एकत्र कुटुंब ह्मणजे त्या कुटुंबांत जन्मलेले फक्त पुरुषच ही गोष्ट पक्की लक्ष्यांत ठेवावी. या पुरुषांपैकीं जो मृत्यु पावेल तो निघून जाईल, त्याप्रमाणें या कुटुंबांत जो नवीन जन्मून येईल, तो घटक बनेल. मागच्या पिढींतलीं मरत जातात, व पुढच्या पिढींत नवीन जन्मतात याप्रमाणें हें रहाटगाडगें चाललेलें असतें. कोणत्याहि वेळीं पाहिलें तर जे पुरुष हयात असतील ते तेवढे मालक व सर्व स्त्रिया आश्रित हा नियम अगदीं अबाधित चालावयाचा, त्याला अपवाद ह्मणून एकहि कधीं असावयाचा नाहीं. आज मितीला वर लिहिलेले आठ पुरुष—ह्मणजे त्यांतले चार नातू जरी दहा वर्षांच्या आंतले आहेत तरी ते देखील—मालक आहेत, व स्त्रियांनीं जरी कैक तपें खस्ता खाल्लेल्या असल्या तरी त्या सर्व फक्त आश्रितच आहेत, व त्या अखेरपर्यंत तशाच रहाणार.

यूरोपियन् व हिंदी हा भेद जसा आमच्या राजकारणांत नेहमीं कायम दिसतो—यूरोपियनांचा शेवटचा पगार आणि हिंद्यांचा सर्वांत उच्च पगार जसा साधारणतः सारखा असतो व हिंदी काळा माणूस कधींहि युरोपियन्सच्या उच्च दर्जाच्या यादींत शिरत नाहीं, त्याचप्रमाणें हिंदु लॉहि स्त्री व पुरुष यांत निरंतरचा भेद करतो. एखादा हिंदी गृहस्थ विलायतेंत जाऊन मोठाल्या परीक्षा देऊन यूरोपियन् मंडळींत कदाचित् शिरूं शकतो, सिविल सर्विससारख्या उच्च पदवीची प्राप्ति करून घेऊं शकतो, इतकी राजकारणांत सवलत तरी आहे; पण हिंदु लॉमध्यें अशी सवलत यत्किंचित् देखील नाहीं. स्त्रीनें कितीहि पराक्रम केलेले असोत, ती विलायतेला जाऊन येवो कीं आणखी कांहीं करो, ती हिंदु एकत्र कुटुंबांत आश्रिताच्याहून वरच्या पदवीला कधींहि चढावयाची नाहीं! चंद्र जसा सदोदित परप्रकाशित असावयाचा त्याप्रमाणें तिनें कितीहि जरी कर्तृत्व दाखविलें असलें; तरी तीं नवऱ्याच्या अगर मुलाच्या प्रकाशानेंच प्रकाशित होऊं शकेल. नवरा किंवा मुलगा नसला, कीं, तिला प्रकाश कधींच मिळणार नाहीं, हें निर्विवाद आहे!

येणेंप्रमाणें ठरून गेलें, कीं, एकत्र कुटुंब ह्मणजे फक्त पुरुष, तेच फक्त सहभागीदार. आठ जण आज सहभागीदार आहेत, त्यांची संख्या सालोसाल मृत्यूनें कमी होईल व जन्मानें वाढेल. कोणच्याहि दिवशीं सहभागीदार किती हें ठरवावयाचें झाल्यास पुरुषांची गणती केली ह्मणजे संपलें. उद्यां माधवराव व परवां दोन नातू निवर्तले तर सहभागीदार पांचच राहतील, तेरवां आणखी एखादा नातू जन्मला तर पांचांचे सहा होतील, पण एखादी नात जन्मली तर पांचचे पांचच कायम! स्त्रियांचा हिशोब सहभागीदारांत मुळींच नाहीं!

आणखी पंचवीस वर्षें गेलीं व तोंवर जर हें एकत्र कुटुंब कायम असेल तर त्यावेळीं जे पुरुष असतील ते सारे सहभागीदार असें मानावयाचें, व तेच काय ते सर्व इस्टेटीचे मालक. ह्याप्रमाणें नवे मालकपुरुष जन्मावयाचे व जुने मरावयाचे, असा हा प्रकार तें कुटुंब एकत्र आहे तोंवर निरंतर अबाधित चालावयाचा.

एवढ्या विवेचनावरून हिंदु एकत्र कुटुंब ह्मणजे काय तें चांगलें लक्ष्यांत येईल. आतां आपण ह्या एकत्र कुटुंबाचें विभक्त कुटुंब कसें होतें तें पाहूं.

माधवराव होते तोंवर घरांत धुसफुस हळुहळू झाली तरी ती फारशी बाहेर पडत नसे. पण ते वृद्ध झाल्यामुळें हळुहळू वडील बंधु गणपतराव यांजकडे प्रमुखपणा आला. पार्वतीबाईहि देवधर्माकडे व माधवरावांच्या सेवेशुश्रूषेकडे सारें लक्ष घालूं लागल्या, व अलीकडे त्यांना दगदगहि होईनाशी झाली. अर्थात् घरांत प्रमुखपण सरस्वतीबाईकडे आलें. पण मासरा व सासूबाई यांची सर भाऊजी व जाऊबाईनां कशी येणार? अर्थात् त्रिवर्ग वधूंमध्यें व तिघी जावांमध्यें उघडउघड तंटे होऊं लागले.

सरूबाईनां मूलबाळ नाहीं ह्मणून त्या सदा दुर्मुखलेल्याच. सीताबाईनां फक्त मुलीच, त्यांचा ओढा आपल्या लेंकींची भरती करण्याकडे. येऊनजाऊन राधाबाईनां मुलगे असल्यामुळें आपल्या मुलांनां सारें रहावें, जितकें घराबाहेर गेलें तितकें आपल्या मुलांनां कमी झालें, असा विचार त्यांचा असणार! अर्थात् तिघी जावांचीं तोंडें उलट दिशेला व्हावयाचींच!

तिघे बंधूहि तसेच. गणपतराव ह्मणणार माझें काय आहे? मी कशाला खपूं? रामभाऊ खपणार, पण जांवयांची व लेंकींची धन करणार! खरी संसाराची कळकळ फक्त कृष्णरावांनां, अर्थात् जबाबदारी सर्व त्यांजवर! या असल्या व दुसऱ्याहि नानाप्रकारच्या कारणांमुळें सहभागीदारांचीं ह्मणजे पुरुषांचीं मनें ज्या दिवशीं एकमेकांविषयीं पुरीं आंबतील त्या दिवसापासून एकत्राचें विभक्त कुटुंब होऊं लागणार. दरम्यान बायांबायांमध्यें कितीहि जरी बेबनाव आला तरी जोंवर पुरुष

तिकडे लक्ष देत नाहींत तोंवर एकत्रपणा कायम. उघडच आहे. मालक जोंवर एकमेकांशीं नीट राहूं इच्छित आहेत तोंवर आश्रितांनीं कितीहि तोंडें आंबट केलीं तरी त्याची किंमत मुळींच नाहीं. अर्थात् स्त्रियांच्या हातीं एकत्राचें विभक्त बनविण्याचा अधिकार प्रत्यक्ष असा मुळींच नाहीं. त्यांनीं जेव्हां आपल्या पतिराजांची अथवा चिरंजीवांची खात्री करून घ्यावी व त्यांनां विभक्तपणा मागण्याला उभें करावें, तेव्हांच काय तें होणार! आणि स्त्रियांनां दुसरा मार्ग नसल्यामुळें ह्या अप्रत्यक्ष युक्तीचा त्या पुरता अवलंबहि करतात. "दादाचें बळ वहिनीला माहीत!" हें सुप्रसिद्धच आहे; आणि पुरुषहि विभक्तपणाची स्वतःला किती जरी आतुरता असली तरी त्या दोषाचें खापर स्त्रियांच्या माथ्यावर फोडण्यास नेहमीं तयार असतात. "काय हो करावें, बायकांच्या भांडणांनीं नाइलाज झाला ह्मणून आम्ही विभक्त झालों!" हें त्यांचें पालुपद कोणाला माहीत नाहीं?

जेमतेम आजीबाई व माधवराव व पार्वतीबाई यांचा जोंपर्यंत दरारा घरांत होता तोंवर बाह्यतः एकत्रपणा कायम राहिला. पण दोन महिन्यांच्या अंतरानें तीं तिन्ही पिकलेलीं पानें गळून पडलीं आणि त्याबरोबर तोंपर्यंत धुमसत असलेला अग्नि प्रज्वलित होऊन त्याचे लोळ बाहेर दिसूं लागले. एकमेकांचें पटेनासें झालें, अर्थात् एके ठिकाणीं राहून एकमेकांचे घांस मोजीत रहाण्यापेक्षां विभक्त अथवा वेगळें व्हावें असा विचार सर्वांनां पसंत पडला, आणि सरकारदरबार न करतां शेजारपाजारचीं दोन भलीं व दोन तीन बुरीं अशीं माणसें पंच ह्मणून नेमण्यांत येऊन एकदांच्या वांटण्या झाल्या. आणि जेथें माधवरावांचें असें एक हिंदु कुटुंब होतें त्यांत फूट होऊन तिघां लेंकांचीं ह्मणजे गणपत, रामचंद्र व कृष्णराव यांचीं अशीं तीन विभक्त कुटुंबें बनून गेलीं. सर्व इस्टेटीचे तीन सारखे भाग करून प्रत्येकानें एकएक भाग उचलला, त्याची किंमत एकएक लक्ष रुपये झाली असें आपण समजूं.

येणेंप्रमाणें एकाचीं तीन कुटुंबें झालीं. एकत्रपणा नाहींसा होऊन विभक्तपणा उत्पन्न झाला. यानंतर कोणाला असें वाटेल, कीं, एकत्रपणा जर एकदां मोडला तर आतां तो पुनः या कुटुंबांत उत्पन्न व्हावयाचा नाहीं, आणि एकत्रपणाच्या अडचणीपासून या तिन्ही कुटुंबांतल्या स्त्रिया कायमच्या मोकळ्या झाल्या; परंतु ही अगदीं चुकीची समजूत आहे. ती कशी तें पहाः—

गणपतराव, रामचंद्र आणि कृष्णराव अशीं तीन कुटुंबें उत्पन्न झालीं खरीं, पण यांतलीं फक्त पहिलीं दोनच खरोखर विभक्त अशीं आहेत. कृष्णराव याला चार मुलगे झालेले आहेत हें वाचकांनां माहीत आहे. कृष्णराव हा जरी आपल्या भावांपासून विभक्त झाला तरी तो आणि त्याचे चार मुलगे अशा पांच पुरुषांचें तत्क्षणींच एक नवीन एकत्र कुटुम्ब उत्पन्न झालें! अर्थात् कृष्णराव आणि त्याचे चार मुलगे असे पांच जण या नव्या एकत्र कुटुंबाचे मालक होऊन बिचारी राधाबाईहि पूर्वीप्रमाणेंच या एकत्र कुटुंबांत फक्त आश्रित अशी बनून राहिली! तिच्या आश्रितपणांत फरक फारसा—नव्हे, यत्किंचित् देखील—झाला नाहीं. अंतर एवढेंच झालें, कीं, पूर्वींच्या एकत्र कुटुम्बांत ती जी नवरा, दीर व पुत्र यांजवर आश्रित होती ती आतां इतःपर आपला नवरा व पुत्र यांचीच फक्त आश्रित बनली. कृष्णरावांनां बंधूपासून तिनें वेगळें काढलें, पण यापासून तिचा फायदा तादृश झाला नाहीं. मालकांची मात्र घडामोड झाली, ती आश्रितची आश्रितच राहिली! त्याचप्रमाणें गणपतराव हे जरी बंधूंपासून विभक्त झाले, तरी त्यांच्याबरोबर सरूबाई कांहीं मालक बनू शकल्या नाहींत. ते कायते एकटे मालक, सरूबाई आश्रितच्या आश्रितच. त्याचप्रमाणें रामचंद्रपंत एकटे मालक आणि सीताबाई व त्यांच्या पांच मुली मिळून सहाहि जणी आश्रितच राहिल्या. विभक्तपणा करून घेण्यापासून त्यांचे आश्रयदाते बदलले इतकाच फरक झाला. उद्यां जर कर्मधर्मसंयोगानें गणपत-

रावांनां व रामचंद्रपंतांनां मुलगे झाले तर ते सहभागीदार बनून आणखी आपापल्या कुटुम्बांत मालक होतील; पण सरूबाई व सीताबाई या निरंतरच्या आश्रितच राहणार, यांत शंका नाहीं. हें पक्कें लक्ष्यांत ठेवावें!

येथवर केलेल्या विवेचनावरून हें उघड होईल, कीं, हिंदू लॉला विभक्त कुटुम्बाचें अत्यंत वावडें आहे! विभक्त कुटुम्ब कोठेंहि असूं नये असा त्याचा फार कटाक्ष आहे. आपल्या गणपतरावांनां व रामचंद्रपंतांनां जर मुलगे असले तर मुळच्या माधवरावांच्या एकंदर कुटुंबाचीं जीं तीन वेगळीं शकलें विभक्तपणानें होतील तीं तिन्ही पुनः एकत्र कुटुम्बेंच होणार हें उघड आहे. सुरूच्या झाडाच्या कितीहि जरी फांद्या काढल्या तरी प्रत्येक फांदी जशी सुरूच्या झाडासारखीच तंतोतंत निघते—किंवा नदींतलें पाणी एका घागरींतून घरीं आणून पाहिलें तरी जसें नदींतल्या पाण्याचे व घागरींतल्या पाण्याचे गुणदोष तंतोतंत सारखेच असतात, तद्वत्च एका एकत्र कुटुंबाचीं जरी अनेक कुटुंबें वेगळीं करून काढलीं, तरी हीं दूर काढलेलीं कुटुंबें (जरी एकमेकांपासून वेगळीं असलीं तरी तीं) आपापल्याशीं सगळीं एकत्रच कुटुंबें असतात!

वरील विवेचनावरून स्पष्ट होईल, कीं, एकदां जरी एकत्रपणा मोडून टाकला तरी एकत्र स्वरूपाचा नायनाट कधींच होत नाहीं. एकत्र फुटून क्षणभर विभक्त बनण्याचाच अवकाश, तों लगेच हिंदु लॉ त्या प्रत्येक कुटुंबावर आपला एकत्रपणाचा छाप मारतो. अर्थात् हिंदु लॉला विभक्तपणा अत्यंत वावडा आहे, त्याला तो क्षणभरहि सहवत नाहीं, हें उघड झालें!

येथें कांहीं वाचक असा प्रश्न करतील, कीं, "हें कायहो तुह्मीं सांगतां? 'आजपासून आह्मी विभक्त झालों, आजपर्यंत एकत्र होतों पण पटेनासें झालें ह्मणून आह्मी आतां विभक्त होऊन स्वतंत्र बनलों,' असें पुष्कळ लोक ह्मणतांना आह्मी ऐकतों तें सारें खोटेंच काय?" या प्रश्नाचें उत्तर सोपें आहे. तें असें, कीं, बंधुबंधू आपापसांत जे एकत्र होते ते आजपासून एकमेकांपासून वेगळे—अर्थात् ज्याचे ते स्वतंत्र—झाले, ही गोष्ट खरी. आतां इतःपर एका भावानें दुसऱ्याची पर्वा करण्याचें कारण राहिलें नाहीं, हेंहि खरें. येणेंप्रमाणें प्रत्येक भावाचा फायदा झाला. आतां त्याचा तो मालक—फार तर त्याचे प्रत्यक्ष मुलगे त्याच्याबरोबर मालक आहेत हेंहि खरें. अर्थात् विभक्त झाल्यापासून त्यांचा तितका फायदा झाला हें जरी खरें, तरी प्रत्येक जण आपल्या मुलांसह पुनः नवीन एकत्र कुटुंब बनवून राहतो, हेंहि खोटें नव्हे! आणि स्त्रियांच्या दृष्टीनें तर त्यांच्या स्थितींत फरक इतकाच झाला, कीं, नवीन एकत्र कुटुंबांत त्यांचे पतिराज व मुलगे एवढेच मालक होऊन राहिले खरे, पण त्या स्वतः पूर्वीप्रमाणें आश्रिताच्या आश्रितच राहिल्या. दीर तेवढे मात्र आश्रयस्थानांतून निघून गेले, आतां आश्रयस्थानीं फक्त नवरा व पुत्र एवढेच राहिले. आश्रितापासून मालकीकडे त्यांची प्रगति झाली नाहीं इतकेंच नव्हे तर ती, अगदीं थोडे अपवाद वगळले तर, कधींच हिंदु लॉमध्यें होत नाहीं.

यानंतर असा प्रश्न उत्पन्न होतो, कीं, जर हिंदु लॉला विभक्त कुटुंबच अशक्य आहे, तर मग विभक्त विभक्त ह्मणतात त्याचा अर्थ काय? एका एकत्र कुटुंबापासून जर अनेक एकत्रच कुटुंबें उत्पन्न होतात असें तुह्मी म्हणतां, तर मग विभक्त कुटुंबें राहिलीं कोठें, किंबहुना तीं उत्पन्नच कशीं व्हावीं?

प्रश्न अगदीं बरोबर आहे. कारण एकत्र कीं विभक्त हा प्रश्न आपण नेहमीं ऐकतों खरा. इतकेंच नव्हे तर मागें एके ठिकाणीं आह्मी देखील असें स्पष्ट म्हटलें आहे, कीं, "विशिष्ट प्रसंगीं हिंदु लॉचे नियम काय आहेत हा प्रश्न तें कुटुंब विभक्त आहे कीं एकत्र आहे, ह्या प्रश्नाच्या उत्तरावर पुष्कळसा अवलंबून असतो." ह्मणून आतां त्या प्रश्नाचें उत्तर देणें जरूर आहे.

एकत्र किंवा विभक्त हा प्रश्न पुरुषांनां कसा महत्त्वाचा आहे हें पूर्वी सांगितलेंच आहे. स्त्रीच्या संबंधानें बहुशः सर्व कुटुंबें एकत्रच असतात. स्त्रीच्या दृष्टीनें विभक्त केव्हां म्हणावें? तर ज्या एकत्र कुटुंबांत फक्त एकच पुरुष, आणि तोहि त्या स्त्रीचा प्रत्यक्ष पति, मालक असतो, व दुसरे कोणीहि पुरुष, ह्मणजे तिचे सावत्र अगर सख्खे मुलगे हयात नसतात--ह्मणजे केवळ फक्त नवरा एकटाच मालक असतो--अशा वेळीं त्या स्त्रीच्या संबंधानें तें कुटुंब पाहिजे तर विभक्त ह्मणावें. पण एकटा मुलगा जर मालक असेल आणि त्याची बायको ह्मणजे सूनबाई जर हयात असतील तर त्या आईच्या दृष्टीनें तें कुटुंब विभक्त नसून एकत्रच समजलें पाहिजे, आणि अर्थात् अशा एकत्र कुटुम्बांत ती आई फक्त आश्रितच होय यांत शंका नाहीं.

ज्या वेळीं फक्त नवराच काय तो एकटा मालक असेल व तोहि मृत झाला--ह्मणजे पुरुषमालकांपैकीं सर्व नष्ट झाले, व शेवटीं फक्त जिचा पति नष्ट झाला, अशा केवळ एकाच स्त्रीला निवळ आश्रितापेक्षां थोडासा उच्च दर्जा प्राप्त होतो; पण तोहि पूर्ण मालकीचा दर्जा नव्हे. उदाहरणार्थ, एखादा यूरोपियन अधिकारी रजेवर गेला व त्याच्या जागेवर काम करण्याला दुसरा कोणीहि यूरोपियन माणूस उपलब्ध नाहीं, अशा वेळीं त्या यूरोपियनची जागा आपल्याकडच्या एखाद्या हिंदी माणसाला कांहीं काळपर्यंत देण्यांत येत असते आणि असा प्रकार झाला ह्मणजे आपले लोक खूप टीका करीत असतात. परंतु स्त्रियांच्यासंबंधानें आपला हिंदु लॉ अगदीं तस्सेंच किंबहुना त्याहूनहि वाईट वर्तन करीत असतो, ही गोष्ट आम्हां टीकाकाराच्या ध्यानांत कधींहि येत नाहीं. पुरुष तेवढे सारे सहभागीदार किंवा मालक. हे सगळे सहभागीदार पुरुष नष्ट झाले ह्मणजे, नाइलाजास्तव, शेवटच्या पुरुषाच्या विधवेला इस्टेट मिळणार. सान्या पुरुषभागीदारांपैकीं जो शेवटीं शिल्लक राहील व तो जेव्हां मृत्यु पावेल तेव्हां त्याच्या विधवेला, ( अथवा त्याची विधवा कोणी नसली तर त्याच्या विधवा आईला ) अशा फक्त एका विधवा स्त्रीला, पुरुषमालकांप्रमाणें सर्व इस्टेट उपभोगण्याचा हक्क हिंदु लॉनें मिळतो! अर्थात् सगळे पुरुष नष्ट झाले म्हणजेच फक्त केवळ नाइलाजास्तव एकाच विधवा स्त्रीला ही उच्च दर्जाची लायकी प्राप्त होते! बरें, ती तरी अगदीं पुरुषाप्रमाणें पूर्ण मालकी प्राप्त होते काय? छे छे, नांव देखील घेऊं नका. अशा अखेरच्या एका विधवेनें जेमतेम इस्टेटीचा उपभोग आपल्या हयातींत घ्यावा, आणि आपल्या नवऱ्याचे जे दूरचे पुरुष वारस कोठें असतील त्यांच्या हातीं सबंध इस्टेट देतां येईल अशा तऱ्हेनें त्या विधवेनें आपलें वर्तन ठेवावें इतकाच तिचा हक्क आहे. एवंच काय, तर त्या एकत्र कुटुंबांतले सगळे पुरुष संपले तर शेवटच्याच्या विधवेनें ती इस्टेट भावाबंदांच्या घरांत नेऊन द्यावी, एवढाच तिचा अधिकार आहे. या कुटुंबांतल्या कितीहि जरी स्त्रिया असल्या तरी त्यांनां फक्त आश्रितांप्रमाणें वागवून हिंदु लॉ ती सारी इष्टेट पूर्वी केव्हां तरी विभक्त होऊन दूर झालेल्या घराण्यांतल्या पुरुषांच्या स्वाधीन करतो; पण, एक अपवाद शिवाय करून, कधींहि ती इष्टेट स्त्रियांच्या हातीं जाऊं द्यावयाची नाहीं असा विलक्षण बाणा हिंदु लॉचा आहे! ही गोष्ट किती तरी आश्चर्यकारक नव्हे काय? हा अपवाद कोणचा तें पुढें योग्य वेळीं समजेल.

प्रकरण तिसरें.

## कुमारिका.

मागील प्रकरणांत हिंदु लॉमध्यें जिकडेतिकडे पसरून राहिलेलें असें जें एकत्र कुटुंब त्याचें विवेचन केलें, आणि एकत्रपणा नाहींसा कसा होतो, व थोडा वेळ नाहींसा झाल्यासारखा होऊन नंतर पुनः

तोच एकत्रपणा कसा उत्पन्न होतो हेंहि दाखविलें. त्यावरून वाचकांच्या पूर्णपणें ध्यानांत आलें असेल, कीं, एकत्र कुटुंब असणें ही आपल्या हिंदु लॉची जणूं काय शाश्वतची स्थिति आहे, व केवळ विभक्त अशी स्थिति फारच क्वचित् प्रसंगीं दृष्टीस पडणारी आहे. अर्थात् साधारणपणें सर्वत्र सांपडणारी जी एकत्रपणाची स्थिति तीमध्यें हिंदु लॉच्या दृष्टीनें स्त्रियांची स्थिति कशी काय असते त्याचें विवेचन करणें जरूर आहे. हें विवेचन संपलें ह्मणजे मग कधीं काळीं व क्वचित् प्रसंगीं आढळून येणाऱ्या विभक्त कुटुंबामध्यें स्त्रियांची स्थिति कशी असते तिचें वर्णन करूं. प्रस्तुतच्या प्रकरणांत फक्त एकत्र कुटुंबांतल्या स्त्रियांच्या कायदेशीर स्थितीचें आपणास वर्णन करावयाचें आहे.

‘ कायदेशीर स्थिति ’ ह्मणजे काय तें अगोदर प्रथमतः नीट सांगितलें पाहिजे. प्रत्येक मनुष्याला इतर सभोंवतालच्या माणसांशीं गुण्यागोविंदानें रहावयाचें असतें. अशा रहाण्यामध्यें त्याला सुख व्हावें व विनाकारण तंटेबखेडे उत्पन्न होऊं नयेत हें फार इष्ट असतें. ह्मणून त्याला कोणी त्रास देऊं नये अशी जशी त्याची इच्छा असते, त्याचप्रमाणें त्यानेंहि इतरांच्या वाटेस न जाण्याची खबरदारी घेतली पाहिजे, हें उघड आहे. त्याच्या वाटेस लोकांनीं जाऊं नये हा जसा त्याचा हक्क आहे त्याप्रमाणें त्यानेंहि दुसऱ्याला उपसर्ग लावूं नये अशी त्याजवर जबाबदारी टाकणें जरूर आहे. याप्रमाणें त्याचे जे हक्क आहेत व त्याजवर ज्या जबाबदाऱ्या आहेत त्या दोहोंची बेरीज ह्मणजे त्या माणसाची ‘ कायदेशीर स्थिति ’ होय. व्यवहारांत जसें देवाण घेवाण हमेशा चालू असतें तसें कायद्याच्या दृष्टीनें एक प्रकारचें देवाण घेवाण चालू असतें. आपणाला जें लोकांपासून मिळण्याचें असतें, तो आपला हक्क, व आपणाला जें लोकांना द्यावयाचें असतें तें आपलें कर्तव्य किंवा जबाबदारी. इंग्रजीमध्यें ह्या दोहोंना अनुक्रमें rights and duties असें ह्मणतात. आपले हक्क कोणचे आहेत व आपणावर जबाबदाऱ्या काय आहेत ( किंवा आपलीं कर्तव्यकर्में काय आहेत ) हें मनुष्यानें नेहमीं समजून घेतलें पाहिजे. हक्क व जबाबदारी या दोहोंची सांगड मनांत घातली ह्मणजे आपली कायदेशीर स्थिति आपणाला समजली असें म्हणण्यास हरकत नाहीं.

तर मग आतां हिंदु लॉप्रमाणें एखाद्या स्त्रीची कायदेशीर स्थिति काय आहे—म्हणजे तिचे हक्क काय आहेत व तिच्या जबाबदाऱ्या काय आहेत—तें आपणाला प्रस्तुतच्या प्रकरणांत पहावयाचें आहे. सोयीस्तव आपण या विषयाचे तीन भाग पाडूं. पहिल्या भागांत स्त्रीच्या जन्मापासून तिचें लग्न होईपर्यंतचा म्हणजे तिच्या कुमारिकास्थितीचा ऊहापोह करूं. दुसऱ्या भागांत विवाहापासून तों तिच्या मृत्यूपर्यंतची स्थिति—म्हणजे तिच्या सुवासिनीपणच्या स्थितीचा ऊहापोह करूं; व तिसऱ्या भागांत जर दुर्दैवानें तिचा पति मृत होऊन ती मागें राहिली तर त्या काळचा म्हणजे तिच्या विधवापणच्या स्थितीचा ऊहापोह करूं. या तिन्ही भागांचें यथार्थ रीतीनें विवरण केलें म्हणजे कांहीं किरकोळ महत्त्वाच्या बाबी राहिल्या तर त्यांचा ऊहापोह नंतरच्या प्रकरणांत करणें सोईचें होईल. पण बहुत करून सर्व विशेष महत्त्वाच्या बाबी कुमारिका, सुवासिनी व विधवा या तीन प्रकरणांत संपून जातील असें वाटतें.

माधवराव, त्यांचे तीन मुलगे, दोन अविवाहित मुली, रामचंद्रपंतांच्या पांच अविवाहित मुली व कृष्णरावांचे पांच मुलगे असें कुटुंब एकत्र ठिकाणीं नांदतें आहे. त्यांत एकंदर दोन व पांच मिळून सात कुमारिका आहेत. त्यांपैकीं रामभाऊंची थोरली मुलगी साळू हीच आपण उदाहरणार्थ पुढें आणूं ह्मणजे झालें. ह्या साळूचे जे काय कायदेशीर हक्क असतील व तिजवर ज्या काय कायदेशीर जबाबदाऱ्या असतील त्या सर्वांची मिळून तिची ‘ कायदेशीर स्थिति ’ होय. आतां साळूचे हक्क काय आहेत? पहिला तिचा हक्क असा आहे, कीं,

मुसलमानी कायद्यानें तिला अन्नवस्त्र व लग्नखर्च मिळतोच, पण आणखी एकंदर इष्टेटीचा १/८ इतका भाग मिळतो. पारशी कायद्यानेंहि अन्नवस्त्र व लग्नखर्च मिळून मुलाच्या निम्यानें इस्टेटहि मिळते. इंडिअन् सक्सेशन् ॲक्ट ह्मणजे इंग्रजसरकारानें केलेल्या वारसाच्या कायद्यानें तर अन्नवस्त्र व लग्नखर्च मिळून मुलाच्या बरोबरीनें ह्मणजे निमेनिम इस्टेट मिळते, ह्मणजे ही स्त्री व तो पुरुष असा लिंगभेद न होतां दोन्ही त्या आईबापांचीं लेंकरें या नात्यानें दोघांनां समसमान वांटणी केली जाते.

अशा स्थितींत हिंदु लॉ सरस आहे कीं निरस आहे याचा सहज विचार करतां येईल! "देवा, मला स्त्रीच्याच जन्माला घालायची असेल तर निदान हिंदुत्वांत तरी जन्म देऊं नकोस" अशी प्रार्थना देवाजवळ पुढला जन्म घेण्याच्या वेळीं कोणीं केल्यास दोष कोणाचा?

परंतु कोणी आह्माला विचारतील, कीं, "हें सारें खरें कसें हो? आम्ही तर ऐकलें आहे, कीं, आपल्यामध्यें कधींकधीं मुलगीहि बापाच्या सर्व इस्टेटीची वारस होते, तें खोटें काय?"

ह्यावर उत्तर असें आहे, कीं, हें तुम्ही ऐकलेलें कांहीं अंशीं खरें आहे. मुलगी—मग ती कुमारिका असो वा सुवासिनी असो, किंबहुना ती विधवा झालेली असो—तरी ती क्वचित् प्रसंगीं आपल्या बापाच्या सर्व इस्टेटीची वारस होते, ही गोष्ट खरी आहे; पण तो प्रसंग कोणचा हें मात्र पहाण्यासारखें आहे. आपल्या वरील उदाहरणांत ह्मणजे आई, बाप, मुलगा, मुलगी अशीं चारच माणसें ज्या कुटुंबांत आहेत त्या ठिकाणीं, मुलगी केव्हां वारस होईल? तर ज्या वेळीं तिच्या आईबापांचा व भावाचाहि पुरा नायनाट होईल तेव्हां! आईबाप व भाऊ हीं तिन्ही माणसें मरून तिच्याशिवाय त्या कुटुंबांतलें कोणीच शिल्लक राहिलें नसेल त्या प्रसंगीं मात्र ही कन्या सर्व इस्टेटीची मालक होईल! अशा तऱ्हेनें साऱ्या कुटुंबाचा नायनाट होऊन आपणाकडे इस्टेट येण्यापेक्षां "देवा, माझ्या भावाला उदंड आयुष्य दे, व संततिहि भरपूर असूं दे" अशी देवाची विनवणी कोणची बहीण करणार नाहीं?

आणखी एक गोष्ट लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. ती ही, कीं, भावावांचून जी बहीण राहील अशा साऱ्याच बहिणींनां वारसा येत नसतो. उदाहरणार्थ, आपल्या माधवरावांच्या थोरल्या घराण्यांत आपण असें कल्पूंया, कीं, माधवराव व रामचंद्रराव यांच्याप्रमाणें गणपतराव् व कृष्णराव यांनांहि कांहीं मुली आहेत. यांपैकीं सगळे पुरुष-मालक मृत झाले—ह्मणजे बाप व तिघे लेक मिळून चौघेहि पुरुष आणि कृष्णरावांचे पांचहि मुलगे मृत झाले व आतां फक्त मुली तेवढ्या राहिल्या आहेत अशी आपण कल्पना करूं. अशा स्थितींत त्या चौघांहि पुरुषांच्या मुली, ह्मणजे माधवरावांच्या चार, गणपतराव व कृष्णराव यांच्या मिळून दोन आणि रामभाऊच्या पांच मिळून अकराजणी लेंकी वारस होतील काय? मुळींच नाहीं. फक्त जो भागीदार पुरुष सर्व पुरुषांमध्यें अगदीं शेवटीं मृत्यु पावेल त्याच्या मात्र मुलींनां सर्व इस्टेट मिळेल. अशी कल्पना करा, कीं, सर्वांत शेवटीं कृष्णराव मेला तर ती सारी इस्टेट फक्त एकट्या कृष्णरावांच्या लेंकीला मिळेल. याचा अर्थ असा, कीं, त्या एकत्र कुटुंबांतले सारे पुरुष जर मयत झाले, तर मग जो शेवटीं मेला त्या पुरुषाच्या फक्त मुलीला काय ती इस्टेट मिळणार! सगळ्या घराचा नायनाट झाल्यावांचून कधींहि लेंकीला वारसा येऊं शकत नाहीं, हें पक्कें लक्ष्यांत ठेवावें.

यावरून हिंदु लॉ मुलींनां किती चमत्कारिक प्रसंगीं, अत्यंत नाइलाजास्तव, कसा वारसा देतो तें लक्ष्यांत येईल. अर्थात् असे नाइलाजाचे प्रसंग फारच क्वचित् येत असल्यामुळें सार्वत्रिक नियम प्रथमतः सांगितला तसाच खरा आहे. तो असा, कीं, हिंदु लॉप्रमाणें कुमारिकेचे हक्क कोणचे तर फक्त अन्नवस्त्र, व मालकांच्या मर्जीप्रमाणें लग्नाकरितां

तिच्या पोटाला पुरेसें अन्न व अंगभर वस्त्र तिला एकत्र कुटुंबाकडून अवश्य मिळालें पाहिजे. एवढें तिला देण्याला जर गणपतराव अथवा कृष्णराव अथवा कोणीहि अनमान करूं ह्मणतील तर त्यांचें चालावयाचें नाहीं. कोर्टांत त्यांच्यावर फिर्याद करून साळूला तें त्यांजपासून हक्कानें प्राप्त करून घेतां येईल. साळूचा दुसरा हक्क असा आहे, कीं, एकत्र कुटुंबाकडून तिच्या लग्नाचा खर्च झाला पाहिजे. तो खर्च किती केला पाहिजे ह्याविषयीं एकत्र कुटुंबाचे मालक ह्मणजे पुरुषमंडळी पूर्णपणें मुखत्यार आहे. त्यांची साळू फार आवडती असली तर त्यांनीं दहा हजार रुपये कर्ज काढून तिचें लग्न करावें, किंवा ती नावडती असली तर तिजकरितां एक पांच दहा रुपये खर्च करून तिला त्यांनीं खुशाल उजवून टाकावी. कर्ज काढूं नका असें जसें कोणी मालकांनां सांगूं शकणार नाहीं तसेंच अमुक खर्च केलाच पाहिजे असेंहि कोणी त्यांनां सांगूं शकणार नाहीं. माधवरावांनीं आपल्या स्वतःच्या लेकीच्या लग्नाला दहा हजार रुपये लावले, पण साळूला जरी दहा खर्च न करितां उलट पांचशें रुपये घेऊन एखाद्या ह्मातार्‍याच्या पदरीं बांधावयाची ह्मटली तरी तें चालेल. चार लोक हंसतील कदाचित्, पण माधवरावांनां कोर्टांतून तसें न करण्याबद्दल हुकूम मिळणार नाहीं. सीताबाईनां जर हें पसंत नसेल तर पतिराजांच्या मागें भुणभुण लावून त्यांनीं इलाज करून पहावा. पण अशी कल्पना करा, कीं, रामचंद्रपंत वारल्यावर हा प्रश्न निघाला आहे, तर सीताबाई कांहीं एक करूं शकणार नाहींत! आणि रामचंद्रपंत असतांनाहि सर्व त्यांच्या ह्मणजे बापाच्या हातांत असणार हें उघड आहे. रामचंद्रपंतच जर उद्यां एखाद्या ह्मातार्‍याला साळू देऊन टाकूं लागले तर सीताबाई व साळू यांनां गप बसण्याखेरीज दुसरा इलाज नाहीं; कारण हरिभाऊ आपटे यांनीं आपल्या 'मी' नांवाच्या कादंबरींत ह्मटल्याप्रमाणें 'बाबारे, आह्मी घरांत बांधलेलीं मुकीं जनावरें' असें जें ताईनें आपलें स्वतःचें वर्णन केलें आहे तें अगदीं अक्षरशः खरें आहे. आईबापांच्या अंतःकरणांत परमेश्वरानें प्रेम उत्पन्न केलेलें असतें त्यामुळें सहसा आईबाप आपल्या पोटच्या गोळ्याचें असें बलिदान करूं इच्छीत नाहींत, हा भाग निराळा; ती त्यांची मुलींवर केवळ मेहरबानी आहे. पण कायदा मात्र अत्यंत निर्घृण आहे, व तो आईबापांनां अथवा एकत्र कुटुम्बांतल्या पुरुषमालकांनां कुमारिकांवर सर्वस्वी अरेरावीची सत्ता गाजविण्याची सररहा मुभा देतो हें लक्ष्यांत धरण्यासारखें आहे. साळूच्या ऐवजीं जर हाच शाळिग्राम असता तर मात्र तो एकदम मालक बनला असता, इतकें जमीनअस्मानाचें अंतर नुसत्या लिंगभेदानें कायदा घडवून आणतो!!

एवंच काय कीं, कुमारिकेला एकत्र कुटुंबामध्यें फक्त अन्नवस्त्र व लग्न करण्याकरितां देतील ती रक्कम एवढेंच मिळण्याचा काय तो हक्क आहे. सुदैवानें तिजवर जबाबदारी मात्र फारशी नाहीं. तिनें मर्जीप्रमाणें घरांत काम करावें अथवा पाहिजे तितका हुतुतू घालावा, त्याबद्दल ती मुखत्यार आहे. ती घरांत आहे तोंवर तिला अन्नवस्त्र द्यावें व आपणाला योग्य वाटेल त्या वेळीं योग्य वाटेल तितका खर्च करून तिचें लग्न करावें व तिला हांकलून लावावी एवढाच काय तो तिच्याबद्दलचा एकत्र कुटुंबावर बोजा असतो. एका सुप्रसिद्ध लेखकानें विनोदानें ह्मटलें आहे, कीं, 'कुमारिकेचा लग्नविधि ह्मणजे तिच्या जन्मदात्या वराण्यांतला तिचा अंत्यविधि'! हें विधान एका दृष्टीनें अगदीं खरें आहे.

ह्या बाबतींत हिंदु लॉ इतर कायद्यांच्या तुलनेनें कितपत सरस अथवा निरस ठरतो तेंहि येथें सांगणें जरूर आहे. आपण असें उदाहरण घेऊंया, कीं, एक गृहस्थ, त्याची बायको, एक मुलगी व एक मुलगा मिळून चार इसमांचें एक कुटुंब आहे. अशा स्थितींत हिंदु लॉप्रमाणें यांच्या मुलीला काय मिळतें? तर फक्त अन्नवस्त्र व लग्नाचा खर्च. बाकी सर्व इस्टेट कायद्यानें मुलाकडे ह्मणजे तिच्या भावाकडे जाते.

कमीजास्ती रक्कम, एवढेंच होत. यापेक्षां ज्यास्त मिळणें हें फक्त मालकाच्या मेहेरबानगीवर असणार. पण मेहेरबानगी ह्मणजे कांहीं हक्क नव्हे !

या लग्नाच्या खर्चाबद्दल देखील बापावर सक्ती चालत नाहीं, हें वर सांगितलेंच आहे. ती केवळ त्याची मेहेरबानी आहे. तो जर पुष्कळ इस्टेट असून लेंकीला एक पैहि लग्नाकरितां देणार नाहीं तर त्याजवर तिचा दावा चालणार नाहीं. मद्रास हायकोर्टांत असा एक चमत्कारिक दावा आला, कीं, बाप लेंकीचें लग्न करीत नाहीं असें पाहून आईनें कर्ज काढून लेंकीचें लग्न लावलें, व पुढें ती खर्चाची रक्कम मिळण्याकरितां आईनें बापावर दावा केला! बाप ह्मणाला, मी लेंकीचें लग्न करण्याला कायद्यानें बांधलेला नाहीं, अर्थात् मी ते पैसे देत नाहीं! हायकोर्टानें त्याचें ह्मणणें कबूल करून आईचा ह्मणजे त्याच्या बायकोचा दावा रद्द केला ! ! (२६मद्रास ५०५)

हा असा निकाल देण्यांत मद्रास हायकोर्टानें चूक केली असें प्रथमदर्शनीं वाटण्याचा संभव आहे. कारण "मी लेंकीचें लग्न करण्याला कायद्यानें बांधलेला नाहीं" असें बापाचें ह्मणणें वाजवी ह्मणजे कायदेशीर आहे असें हायकोर्टानें ठरविलें असल्यास तें चूक आहे असें कोणाला पहिल्यानें वाटेल. पण त्यांत मुळींच चूक नाहीं. मुलीचें लग्न आपल्या मर्जीप्रमाणें पाहिजे त्याप्रमाणें करण्याचा बापाचा फक्त 'हक्क' आहे. पण तें त्याचें 'कर्तव्यकर्म' आहे असें कोठेंहि सांगितलेलें नाहीं ! तिच्या लग्नाकरितां त्यानें खटपट केलीच पाहिजे अथवा त्यानें आपल्या इस्टेटींतला अमुक भाग खर्च केला पाहिजे अशी त्याजवर जबाबदारी मुळींच नाहीं. तो कदाचित् एका आवडत्या मुलीच्या लग्नाला दहा हजार खर्चील तर दुसऱ्या नावडत्या मुलीच्या लग्नाला पैदेखील देणार नाहीं. अशा वेळीं ती नावडती मुलगी त्याजवर असा दावा कोर्टांत लावूं शकेल काय, कीं, "तूं माझा बाप आहेस ह्मणून तूं माझ्या लग्नाकरितां इतके इतके रुपये खर्च केलेच पाहिजेस, अथवा तूं माझ्या लग्नाकरितां इतकी खटपट केलीच पाहिजेस?" अर्थात् असा तिचा दावा मुळींच चालणार नाहीं. असा जर तिनें दावा आणला तर कोर्ट तो दावा एकदम रद्द करील, व तिला एवढेंच सांगेल, कीं, "बाई ग, त्यानें तुझ्या लग्नाची खटपट व खर्च करावा अशी आम्ही त्याला शिफारस करूं; पण आम्ही त्याला तसा हुकूम करूं शकत नाहीं. त्यानें तुझ्या लग्नाकरितां तुला पांच पैसे द्यावेत असा देखील आह्माला हुकूम करतां येत नाहीं !"

आजकाल असा कायदा फक्त आमचा हिंदु लॉचाच आहे असेंहि ह्मणतां येत नाहीं. कारण पारशी अगर मुसलमान अगर खिस्ती बापावर देखील मुलीची लग्नखर्चाविषयीं जबरी चालत नाहीं. याचें कारण असें, कीं, त्या कायद्यांप्रमाणें बाप अगदीं पूर्ण मालक असतो. त्याच्यावर सज्ञान झालेल्या पुत्राचाहि हक्क नसतो, तर मग सज्ञान झालेल्या कन्येचा हक्क कसा चालणार? यावरून हें उघड आहे, कीं, मुलगी अज्ञान आहे तोंवरच तिला अन्नवस्त्र देण्याचा तिचा बोजा बापावर कोणत्याहि कायद्याप्रमाणें बसतो, लग्नाचा बोजा बसत नाहीं, आणि ती सज्ञान झाल्यावर अन्नवस्त्रहि देण्याचा बोजा बापावर बसत नाहीं.

अंतर एवढेंच आहे, कीं, इतर कायद्यांप्रमाणें मुलगा व मुलगी या उभयतांना समान हक्क असतात. निदान मुलीला कांहीं तरी विवक्षित भाग मिळतो. पण हिंदु लॉप्रमाणें मुलीला अज्ञानपणाच्या अन्नवस्त्रापेक्षां ज्यास्त कधींच मिळण्याचा बोजा कायदेशीर नाहीं.

अलीकडे कांहींकांहीं निकाल युरोपियन न्यायाधीशांनीं स्त्रियांच्या तर्फेचे केले आहेत. त्यांतलें एक उदाहरण प्रस्तुत प्रसंगीं देण्यासारखें आहे. अशी कल्पना करा, कीं, दोघे भाऊ एकत्र आहेत, आणि थोरला भाऊ मॅनेजर ह्मणजे कर्ता आहे, त्यानें आपल्या मुलींचीं लग्नें करण्याकरितां कर्ज काढलें आहे. या कर्जाचा बोजा आपणावर पडूं

नये अशी धाकट्या भावाची तक्रार आहे. तो भाऊ ह्मणतो, कीं, "लग्न करणेंच मुळीं जरूर नव्हतें आणि ह्मणून त्या कर्जाला सर्व इस्टेट जबाबदार नाहीं." अशा तक्रारीला हायकोर्टानें एकदां असें उत्तर दिलें आहे, कीं, ही तक्रार बरोबर आहे! पण पुढें पुनः तोच प्रश्न हायकोर्टापुढें आला तेव्हां हायकोर्टानें असा उलट ठराव दिला, कीं, "लग्न करण्याचें बापाचें कर्तव्य नसेल; पण जर त्यानें योग्य खर्च करण्याकरितां कर्ज काढलें आहे तर तें त्यानें गैरवाजवी केलें असें आह्मी ह्मणू शकत नाहीं. (आणि मॅनेजरनें फाजील खर्च केला कीं नाहीं, हा फार बारीक प्रश्नहि हायकोर्ट मॅनेजरवरच सोंपवितें, भलताच फाजील केला असला तर कदाचित् हायकोर्ट हात घालील) ह्मणून आह्मी असें ठरवितों, कीं, मुलीच्या लग्नाचा खर्च करण्याकरितां काढलेलें कर्ज सर्व एकत्र कुटुंबानेंच सोसलें पाहिजे, तें फक्त त्या मुलीच्या बापावरच लादतां येत नाहीं."

यावरून हें उघड आहे, कीं, बापावर जरी हायकोर्ट लग्न कर असा हुकूमनामा करीत नाहीं, तरी त्यानें जर खर्च करावयाचें मनांत आणलें तर हायकोर्ट त्याला मदत करण्यास तयार असतें, एवढेंच.

आतां आणखी एका गोष्टीचा विचार करूं.

हिंदुधर्माप्रमाणें प्रत्येक मनुष्याला सोळा संस्कार अवश्य आहेत असें मानतात, त्यांपैकीं विवाह अथवा लग्न हा अत्यंत महत्त्वाचा संस्कार समजला जातो. हे सोळा संस्कार बहुतेक पुरुषांनांच लागू आहेत. स्त्रियांनां ते फारसे लागू नाहींत. संस्कार ह्याचा अर्थ शुद्ध करणारा विधि. "हिंदु लॉप्रमाणें विवाह हा अत्यंत महत्त्वाचा संस्कार आहे. त्याच्यामुळें पुरुष व स्त्री यांनां शुद्धि मिळते. पाश्चात्य कल्पनेप्रमाणें विवाह हा संस्कार नसून फक्त करार ह्मणजे ठराव आहे. एखाद्या पुरुषानें लग्न करणें ह्मणजे आपणाला शुद्ध करून घेण्याचा विधि करणें असें हिंदुधर्म किंवा हिंदु लॉ मानतो, पण पाश्चात्य आणि सुधारलेल्या अर्वाचीन मताप्रमाणें लग्न ह्मणजे एखाद्या पुरुषानें एखाद्या स्त्रीशीं जन्मभर संसार करण्याचा ठराव अथवा करार करणें एवढाच अर्थ आहे. हिंदु कल्पनेप्रमाणें लग्नाचा संस्कार पूर्ण होण्यास तो पुरुष अथवा स्त्री पक्क वयाचीं ह्मणजे बाळपण संपलेलीं अशीं असण्याचें कारण नाहीं. उभयतांच्या अज्ञानपणामध्येंहि विवाहाचा संस्कार अज्ञानी मुलांनां होऊं शकतो. अर्थात् त्या अशा संस्काराला त्या मुलाची किंवा त्या मुलीची कबुली असण्याची मुळींच जरूरी नाहीं (कारण अज्ञान मुलांनां कबुली देतां येणें शक्यच नसतें.)

पाश्चात्य अथवा अर्वाचीन मताप्रमाणें विवाह हा केवळ करार असल्यामुळें दोघां अज्ञानांचें लग्न होणें कायद्यानेंच अशक्य ठरतें; कारण एखाद्या साध्या कराराला देखील जर दोन्ही मंडळी सज्ञान व जाणती असल्याशिवाय शक्यता नाहीं, तर जो करार इतका महत्त्वाचा, कीं, एकदां केला ह्मणजे जन्मभर टिकणार त्या कराराच्या वेळीं स्त्री किंवा पुरुष अज्ञानी असून कसें चालणार? अर्थात् दोघेंहि सज्ञान असल्यावांचून लग्न शक्यच होत नाहीं; परंतु हिंदु लॉप्रमाणें सज्ञानपण जरूर नाहीं, इतकेंच नव्हे तर, मुलगी जाणती होऊन आपलें हिताहित समजूं लागण्याच्या पूर्वींच तिचें लग्न लावून तिला संस्कृत करून टाकावी अशी शास्त्राज्ञा फार आग्रहाची आहे.

"हिंदुधर्मामध्यें विवाह ह्मणजे संस्कार आहे. विलायती लोकांप्रमाणें करार नव्हे!" असें उपहासपूर्वक ह्मटलेलें आपण पुष्कळ वेळां ऐकतों पण ह्याचा अर्थ स्त्रियांनां किती भयंकर आहे ह्याची त्यांनां कोणी फोड करून सांगत नाहींत ही फार दुर्दैवाची गोष्ट आहे. आमची अशी खात्री आहे, कीं, तो भयंकर अर्थ जों जों आमच्या स्त्रीवर्गाच्या ध्यानांत येऊं लागेल तों तों स्त्रियांच्या अंगावर शहारे येऊं लागून "आह्माला हा तुमचा संस्कार नको. आह्माला आपला केवळ करारच पसंत आहे" असें

आग्रहानें त्या ह्मणूं लागतील. आतां हा भयंकर अर्थ कोणचा तें सांगूं.

विवाह हा संस्कार असल्यामुळें स्त्रीची संमति मुळींच लागत नाहीं. आईबापांनीं गळयांत दावें बांधून मुलीला ज्याच्यापुढें उभी करावी तो तिचा पति. आपलें लग्न होतें आहे, लग्नाचा अर्थ काय, वगैरे गोष्टी जरी तिला समजत नसल्या तरी कांहीं हरकत नाहीं. तिला जो पुढें कधीं आवडणें शक्य नाहीं अशाशीं जरी तिचें लग्न लागलें तरी तें तिजवर कायदा जबरीनें बांधणारच. इतकेंच नव्हे तर शारदा नाटकांत ह्मटल्याप्रमाणें अंतर्पाट काढल्यावर "बघुनि त्या भयंकर भूता फोडिली तिनें किंकाळी" अशी जरी तिची भीषण स्थिति झालेली असली तरी ती त्याची बायको बनली ती बनलीच !

हें असें होण्याचें कारण मुख्य हें आहे, कीं, लग्नाचा विधि हा मुळांतच मुलीचा बाप व त्याचा जांवई या दोघांमध्यें व्हावयाचा असतो. एखाद्या चांगल्या ब्राह्मणाला ज्याप्रमाणें आपण दक्षिणा देतों, किंवा गाई, वस्त्रें, भूमि, रत्नें, वगैरे दान देतों, त्याप्रमाणें बाप आपल्या कन्येचें दान करतो, व जांवई तें दान घेतो. अर्थात् हा सारा व्यवहार फक्त सासरेजांवयांमध्यें व्हावयाचा. त्यांत मुलीचा संबंध नाहीं. गाई, वस्त्रें, भूमि, रत्नें वगैरे दान देतांना ज्याप्रमाणें आपण त्या पदार्थाला कांहींएक विचारीत नाहीं, त्याचप्रमाणें कन्यादानाच्या वेळींहि कन्येला विचारण्याचें कारण नाहीं ! आणि जांवईहि आपणाला संस्कार घडावा एवढ्याच हेतूनें ती कन्या ग्रहण करीत असतो; पण ह्या सासरेजांवयांच्या व्यवहारांत बिचाऱ्या कन्येच्या सुखसमाधानाची होळी होण्याचा कैक वेळां तरी प्रसंग येतो. हिंदु रीतिरिवाज असे कांहीं विलक्षण कडक आहेत, कीं, या संस्काराच्या बाबतींत धडधडीत जरी घोड्याएवढी चूक झाली, किंवा कोणी लुच्चेगिरीनें चूक घडवून आणली, तरी जो एकदां विवाह झाला तो झाला, तो कधींहि पुनः परत फिरावयाचा नाहीं, असा निर्बंध आहे. चांगला सुस्वरूप मुलगा प्रथमतः दाखवून लग्नाच्या गर्दीमध्यें आयत्या वेळीं लटपट करून जरी दांत पडलेला थेरडा आणून नवऱ्यामुलीपुढें उभा केला, आणि भटजींनीं मंगळाष्टकें ह्मणून सावधान लावलें ह्मणजे तें लग्न ब्रह्मलिखित झालें ! ब्राह्मण ह्मणून बहाणा करून एका सोनारानें एका ब्राह्मण मुलीशीं लग्न लावलें असें उदाहरण पांचसहा वर्षांपूर्वीं खुद्द पुण्यांत घडून आलें, तरी देखील ती मुलगी त्या सोनाराची बायको झाली ती झालीच ! मुलगी रडून आकांत करीत असूनहि जर तिच्या आईनें किंवा बापानें तिचें सावधान लावलें तरी तें जन्माचें सावधानच ! इतकेंच नव्हे तर या सावधान शब्दांचा व त्यानंतर लगेच होणाऱ्या सप्तपदीचा असा विलक्षण प्रभाव आहे, कीं, आईबापांनां न विचारतां एखाद्या तिऱ्हाईतानें, ह्मणजे भाऊ बहीण, काकी, मामी, मावशी, मामा वगैरे कोणीहि, किंबहुना एखाद्या नुसत्या ओळखीच्या गृहस्थानें, जर त्या मुलीचें कोणाशीं सावधान लावलें, आणि मागाहून, त्या मुलीच्या आईबापांनीं किंवा इतर जिव्हाळयाच्या माणसांनीं किती जरी हातपाय आपटले व धाय मोकलली तरी जें एकदां सावधान झालें तें निरंतरचें सावधानच ! तुम्ही पाहिजे तर ज्यानें लबाडी केली असेल त्याच्यावर फौजदारी खटला करून त्याला मॅजिस्ट्रेटाकडून शिक्षा करवा, पण जें एकदां सूत्र तिच्या गळयाला लागलें त्यांतून तिची सुटका करूं ह्मणाल तर तें होणें नाहीं. तो ह्मातारा असो, रोगी असो, परजातीचा असो, महामूर्खशिरोमणी असो, वा कांहींहि असो, तो तिचा नवरा आणि ती त्याची बायको, हे शब्द दगडावर लिहिल्यासारखे त्या घटकेपासून झाले!

उलटपक्षीं एखाद्या पुरुषाला फसवून त्याच्या गळयांत जर एखादी रोगी, नकटी, परजातीची अथवा ओंगळ मुलगी बांधली तर तो चटकन् तिला फेंकून देतो, परजातीची असल्यास एखादें लहानसें प्रायश्चित्त घेतो, आणि मोकळा होऊन

पुनः लग्नाला नवरा मुलगा तयार बनतो! उघडच आहे. त्याला दाही दिशा सदोदित अगदीं मोकळ्या आहेत, त्याला बंधन ह्मणून कुठेंच आणि कशाचेंच नाहीं. पण बिचाऱ्या स्त्रीला सारें बंधनच, मोकळीक अशी कुठेंच नाहीं!

"इतके भयंकर परिणाम ज्या संस्काराचे व्हावयाचे तो संस्कार आमच्यावर करण्यापूर्वी आह्माला सज्ञान तरी होऊंद्या, आमचा आह्मी नीट विचार करून काय तें ठरवूं, तुह्मी वडील माणसें आह्माला फक्त नीट सल्लामसलत द्या, आणि मग आमचें लग्न होऊंद्या. तुह्मांला जर एखाद्याला दान करून पदरीं पुण्य बांधून घ्यावयाचें असेल तर गाई, भूमि, रत्नें वगैरे मर्जीस येतील तितकीं द्या, पण आह्मां कोमल मुलींची अशी होळी करूं नका, एवढी आमच्यावर मेहरबानी करा." अशी जर स्त्रियांनीं पदर पसरून विनवणी केली तर त्यांत त्यांचा काय दोष आहे?

वास्तविक पाहिलें तर हिंदुधर्मांतील मूळांतली विवाहाची कल्पना अत्यंत रम्य आहे. हिंदु लॉचा कायदा असें सांगतो, कीं, लग्नविधीमध्यें खरा विधायक भाग हा मंगलाष्टकें ह्मणण्याचा नसून सावधान झाल्यानंतर नवरा व बायको या उभयतांनीं एकमेकांचा हात धरून देवब्राह्मणाच्या समक्ष सप्तपदी करणें, ह्मणजे सात पावलें चालून जाणें हा होय. आजपासून आह्मीं उभयतांनीं एकमेकांच्या हातांत हात घालून, एक विचारानें संसार करण्याला सुरुवात केली आहे त्याला देवब्राह्मण, इष्टमित्र इत्यादिकांनीं साक्षीभूत रहावें, असा मूळचा विधायक विधि आहे. अर्थात् उभयतांनीं संसार थाटण्याचा निश्चय करण्याइतकी त्या उभयतांच्या मेंदूला प्रगल्भता आलेली असल्यावांचून त्यांच्या हातून असला विधि करविणें ह्मणजे त्या विधीची निव्वळ थट्टा करण्यासारखें आहे. एकंदर सर्व विधि, त्यानंतरचा स्थालीपाक, वगैरे गोष्टी पाहिल्या ह्मणजे नवरा व नवरी दोघेंहि सज्ञान झालेलीं असलींच पाहिजेत असा अर्थ कोणीहि सहज काढील, आणि त्याप्रमाणें पूर्वी रूढिहि असली पाहिजे. मध्यंतरीं कांहींतरी कारणांमुळें हळुहळू सज्ञानपणाची अट नाहींशी होऊन 'अष्टवर्षा भवेत् कन्या' वगैरे समजुती प्रचलित झाल्या—आणि त्यामुळेंच मागें सांगितलेले वेडेवांकडे प्रसंग मुलींवर ओढून येणें शक्य झालें. या इतिहासपरंपरेचा नीट विचार करून हल्लींच्या काळीं स्त्रियांनीं जर 'पूर्वीच्या ऋषींच्या पद्धतीप्रमाणें सज्ञान झाल्याशिवाय आमचा विवाह करणें कायदेशीर नाहीं' असा आग्रह धरला तर तो गैरवाजवी आहे असें कां ह्मणावें?

मुली पाहिजे तर असेंहि ह्मणतील, कीं, "तुम्ही आम्हाला जन्म दिलात, लहानाच्या मोठ्या केल्यात, आणि आतां आमचें दान करून तुम्ही कन्यादानाचें पुण्य पदरीं बांधूं पहातां, त्यालाहि आमची हरकत नाहीं. पण आमच्या पसंतीच्या माणसाला तुम्ही आमचें दान करा एवढें तरी आमचें ऐका. तें जर तुम्ही ऐकत नसाल तर मात्र आत्मसंरक्षणाकरितां आम्हांला तुम्हां आईबापांशीं भांडण करावें लागेल, त्याला आमचा नाइलाज होईल!"

---

प्रकरण चौथें.

## सुवासिनी.

आपल्या माधवरावांच्या कुटुंबांत सुवासिनी हल्लीं फक्त चौघी आहेत. ह्मणजे पार्वतीबाई, सरूबाई, सीताबाई व राधाबाई. या चौघीजणी आपापल्या माहेरीं लग्नापूर्वी कुमारिका होत्या त्या वेळीं त्यांचे हक्क काय होते ते मागील प्रकरणीं आलेच आहेत. लग्नाच्या दिवसापासून त्या जणूं काय आपआपल्या आईबापांच्या घरीं मृत होऊन आपल्या सासरीं जन्माला आल्या आहेत अशी हिंदु लॉमध्यें कल्पना करण्यास हरकत नाहीं.

या चौघी जणी ह्मणजे केवळ घरांतल्या मालकिणी, यांच्या हातीं घरांतली सारी व्यवस्था. गृहदेवता असें यांनां आदरानें म्हणतांना आपण पुष्कळदां ऐकतों. "गृहिणी गृहमुच्यते" (गृह ह्मणजे काय ? तर गृहिणी हीच घर!) "गृहं तु गृहिणीहीनं कांतारादतिरिच्यते" ह्मणजे "ह्या गृहिणी जर गृहांतून नाहींशा झाल्या तर तें गृह घोर अरण्यापेक्षांहि भयाण होतें." अशींहि वाक्यें आपण नेहमीं ऐकतों. नुसतीं कानानें ऐकतों इतकेंच नव्हे तर आपल्या डोळयांनांहि तसलाच प्रत्यय पदोपदीं येतो. जेव्हां पार्वतीबाई आपल्या तिघी सुनांनां बरोबर घेऊन ज्येष्ठाच्या महिन्यांत लग्नसराईत अक्षतींमध्यें किंवा इतर मंगल प्रसंगीं उंची भरजरी वस्त्रें नेसून शालूंचे फलकावे मारीत मिरवत असतात त्या वेळीं कोण त्यांचा थाट असतो! नखशिखांत त्या सोनें मोतीं हिरे वगैरेंच्या आभरणांनीं जणूं काय भरलेल्या असतात. पतिराजांची ऐश्वर्यसमृद्धि दाखविण्याचें उत्तम साधन जर कोठें असेल तर त्याच्या या चालत्या बोलत्या जणूं काय जाहिरातीच होत. जशा त्या संपत्तीच्या बाबतींत उपयोगीं पडतात तशा किंवा त्याहिपेक्षां ज्यास्ती उपयोगी संततीच्याहि बाबतींत त्या पडतात. घराण्यामध्यें पुढें जे पुरुष मालक उत्पन्न व्हावयाचे ते सारे या गृहिणींवांचून होणें शक्य नाहीं. अशा तऱ्हेनें गृहलक्ष्मी, गृहदेवता, वगैरे बहुमानसूचक नांवांनीं संबोधिलेल्या स्त्रिया, ज्या ठिकाणीं फक्त सगळीं पुरुषरत्नें उत्पन्न होतात अशा रत्नांच्या अमोल खाणीच होत, हें सर्वजण क्वचित् प्रसंगीं मोकळया मनानें कबूल करीत असतात.

अर्थात् इतक्या उच्च प्रतीचा ज्यांचा अधिकार त्या सुवासिनी स्त्रियांनां हिंदु लॉनें पुष्कळच उच्च पदवी दिली असली पाहिजे हें कोणीहि अनुमान करील. उघडच आहे. मुलींनां विशेष हक्क दिले नाहींत हें एक प्रकारें ठीकच झालें; कारण मुली काय खातारू आणि उडतारू! चार दिवस रहावयाच्या, खावयाच्या प्यावयाच्या अन् एक दिवशीं भुर्रर्र करून आपापल्या सासरीं उडून जावयाच्या, त्यांचा आपणाला काय उपयोग ? आपल्याला खऱ्या उपयोगी ह्मणजे आपल्याइथच्या सासुरवासणी अर्थात् हिंदु लॉनें त्यांनां पुष्कळच उच्च स्थिति दिली असली पाहिजे, हें उघड होतें, व तें बरोबरहि आहे!

वाचक हो, वरीलप्रमाणें तुह्मी अनुमान कराल, पण आह्मी तुह्माला एकदम सांगून टाकतों, कीं, हें तुमचें अनुमान अगदीं सपशेल चुकीचें आहे!! तुमची अगदीं खात्री असूं द्या, कीं; हा तुमचा गोड तर्क अत्यंत खोटा ठरणार आहे! तुमचा विश्वास आमच्या सांगण्यावर एकदम बसणार नाहीं, त्यांत तुमचा दोष नाहीं. पण मी तरी काय करूं ? माझा अगदीं नाइलाज आहे. पण खरा प्रकार तुह्माला नीट समजून सांगणें जर आमचें काम आहे तर तें केलेंच पाहिजे.

खरी गोष्ट अशी आहे, कीं, तुह्मी वरती जो थाटमाट डोळयांनीं पाहिलात तो केवळ पतिराजांच्या व इतर पुरुष मालकांच्या केवळ मेहेरबानगीचेंच फळ होय! पतिराजांची मर्जी जोंवर आपल्या गृहदेवतांवर संतुष्ट आहे तोंवरच हें त्यांचें सारें ऐश्वर्य त्या स्त्रियांजवळ टिकेल. मर्जी खप्पा झाली, त्यांची मेहरबानगी संपली, कीं, तत्क्षणींच त्यांचें सारें ऐश्वर्य संपलें. ज्याप्रमाणें भक्त मानील तोंवरच दगडाची मूर्ति ही देव असते, व भक्त मानीनासा झाला, कीं, ती निवळ फत्तर बनून तो उकिरड्यावर फेंकला जातो, तद्वत् या साऱ्या गृहदेवतांची अगदीं तंतोतंत स्थिति आहे. नवऱ्यांची मर्जी आहे तोंवर त्या वस्त्राभरणांनीं फुलून निघतील, घरांत अन्नपूर्णेप्रमाणें चमकतील, सारें कांहीं करतील— फार काय खुद्द आपल्या पतिराजांवरहि आपला गोडसा अंमल चालवतील. पण हें सारें त्यांची मर्जी आहे तोंवरच! ती जर नाहींशी झाली तर त्यांचे हाल कुत्रादेखील खाईनासा होईल.

आज पार्वतीबाई एवढ्या दिमाखानें घरांत अधिकार चालवतांना दिसताहेत खऱ्या, त्यांच्या

तेथी सुनाहि त्यांच्याचप्रमाणें घरांत चमकताहेत खऱ्या, पण अशी कल्पना करा, कीं, उद्यां कांहीं कारणामुळें त्यांतली एखादी नवऱ्याच्या मर्जीतून उतरली. गणपतरावांच्या मनानें घेतलें, कीं, आपल्या बायकोला मुलगा होत नाहीं, तर आपण तिला टाकून द्यावी, आणि दुसरी बायको करावी. त्याचप्रमाणें रामभाऊंनां वाटलें, कीं, आपल्या बायकोला फक्त मुलीच होतात ह्मणून तिला टाकावी आणि दुसरी करावी; आणि कृष्णरावांनां वाटलें, कीं, आपली बायको फारच काळी आणि खडबडीत आहे ह्मणून आपणहि आपली टाकून द्यावी व दोघां थोरल्या बंधूंचा कित्ता गिरवून एक नवी छानदार बायको करून आणावी! येणेंप्रमाणें जर तिघांनीं विचार केला तर त्यांनां नको ह्मणण्याची कोणाचीहि प्राज्ञा नाहीं. हे तिघेहि ताबडतोब नवीन लग्न करून तीन नवीन गृहदेवता आपल्या घरांत आणून तेथें त्यांची प्रतिष्ठापना करून टाकतील!!! पूर्वी जे दागदागिने व शेलेशालू त्यांच्या अंगावर झळकत होते ते सारे यंदांच्या लग्नसराईंत नवीन चनवलेल्या गृहदेवतांच्या अंगावर झळकूं लागतील, व त्या नवीन गृहिणी घरांत कारभार करूं लागलेल्या आपणाला दिसतील!

तुह्मांला आह्मांला माधवरावांच्या घरामध्यें नवीन गृहदेवता दिसतील हें तुह्मांआह्मांला ठीकच आहे. पूर्वीच्यांच्या जागीं नव्या वहिनी, काकू वगैरे आल्या तर तुमचें आमचें थोडेंच नुकसान व्हावयाचें आहे! गणपतराव, रामभाऊ, कृष्णराव यांप्रमाणें आपणहि या नव्या गृहदेवतांच्या भजनीं लागूं! कारण आतां आपली डाळ त्या घरांत शिजवून घ्यावयाची असेल तर आपण मावळलेल्या सूर्याला विसरून नवीनच उगवलेल्या सूर्याला अर्घ्य दिले पाहिजेत हें उघड आहे, आणि तुमच्या आमच्याप्रमाणें आसपासचें सारें जगहि तसेंच वागून गणपतराव वगैरे पुरुषांची व त्यांच्या नव्या बायकांची मर्जी संपादन करण्याची खटपट सुरू करणार ह्यांत संशय नाहीं.

पण त्या बिचाऱ्या पूर्वीच्या, निर्माल्याप्रमाणें फेंकून दिलेल्या, स्त्रियांची काय वाट झाली आहे तें आपण घटकाभर नीटपणें पाहूंया. पूर्वी घरांत ज्या अधिकारावर झळकत होत्या त्या आतां पदच्युत होऊन केरसुणीसारख्या मागील दारीं एका पडवींत बसून अश्रु गाळीत असतांना चला आम्ही तुह्मांला दाखवतों! आपल्या यजमानांनीं आपणाला विनाकारण टाकूं नये, व दुसऱ्या स्त्रिया आणून आपल्या जाग्यावर बसवूं नयेत, ह्मणून त्या बिचाऱ्यांनीं व त्यांच्या तर्फेनें त्यांच्या आईबापांनीं व भावावहिणींनीं पराकाष्ठेची शर्थ करून टाकली. त्यांनीं आपल्या पतिराजांच्या पुढें लोटांगणें घालून सहस्रशः अपराध कबूल करून क्षमा मागण्याची शिकस्त केली. त्यांच्या भावाबंदांनीं नानातऱ्हेनें पदर पसरले. पण त्या सगळ्याचा यत्किंचित्हि उपयोग झाला नाहीं. जों जों त्यांनीं व त्यांच्या कैवाऱ्यांनीं त्यांच्याकरितां रदबदली केली तों तों पतिराजांचा पुनः लग्न करण्याचा निश्चय दुणावत गेला, आणि पहिल्या बायकोबद्दल मन विटत गेलें. जगांत कोणीहि त्यांच्या मदतीला धांवून त्यांनां संकटमुक्त करूं शकले नाहींत. याचें कारण काय? तर एकच, कीं, हिंदु लॉनें पुरुषांना असा पूर्ण अधिकार देऊन टाकला आहे, कीं, पुरुषांनीं केवळ आपल्या मर्जीप्रमाणें अनेक बायका खुशाल कराव्या!

पहिल्या लग्नाच्या वेळीं त्यांनीं अनेकदां देवांब्राह्मणांसमोर व अग्नीसमोर शपथा घेतल्या होत्या, कीं, "आमरण आपण उभयतां संसार थाटून राहूं." पण ती सारी निवळ फसवेगिरी होती! आमरण याचा अर्थ "मला मृत्यु येईपर्यंत" असा नसून "माझ्या मर्जीला मृत्यु येईपर्यंत म्हणजे माझी मर्जी संपेपर्यंतच तूं न् मी मिळून संसार करूं!" असा होता. हा अर्थ जर स्त्रियांनां प्रथमतःच कोणी नीट समजावून सांगेल तर बिचाऱ्यांची फसवणूक तरी होणार नाहीं. एवंच काय, तर दुसरें लग्न करणें वा न करणें हें हिंदु लॉप्रमाणें सर्वस्वी पुरुषाच्या केवळ मर्जीवरच

ठेवलेलें आहे ! अमुक एक कारण दाखविल्या-वांचून त्यानें पुन: लग्न करूं नये असा निर्बंध त्याजवर मुळींच नाहीं. केवळ सुलतानी अधिकार ! मला दुसरें लग्न करावयाचें आहे एवढें त्याच्या मनांत ठरलें ह्मणजे त्या सुलतानाला दाही दिशा मोकळ्या आहेत !

या बाबतींत हिंदु लॉची इतर कायद्यांशीं आतां आपण तुलना करूंया. मुसलमानी कायदा असें सांगतों, कीं, पुरुषानें एकावेळीं चारांपेक्षां ज्यास्ती बायका करूं नयेत. चारांतली एखादी मरेल तर तिची जागा भरून काढण्याकरितां नवीन करावी, पण एकाच वेळीं एका मुसलमान गृहस्थाला चारांपेक्षां ज्यास्ती बायका करण्याची कायद्यानें बंदी आहे. पारशी कायद्याप्रमाणें एकीपेक्षां ज्यास्ती बायका करण्याची साफ बंदी आहे.तसेंच ख्रिस्ती कायद्यानेंहि एकच बायको करतां येते. इतकेंच नव्हे तर, पारशी व ख्रिस्ती कायद्यांप्रमाणें एकाहून जर ज्यास्ती बायका केल्या, व मुसलमानानें चारांहून ज्यास्त केल्या, तर त्या पुरुषाला गुन्हेगार ठरवून मॅजिस्ट्रेटाकडून शिक्षा केली जाते असा कडक कायदा आहे; आमच्या हिंदु लॉ-प्रमाणें मात्र येथून तेथून रान मोकळें आहे ! पण तें फक्त पुरुषांनांच हो! त्यांनीं एकामागून एक दहा लग्नें करावीं, एकदम एका दिवशीं पाहिजे तर दहावीस करावींत, आडकाठी ह्मणून कुठें आणि कशाचीच नाहीं. बंगालमध्यें तर कुलीन ब्राह्मण ह्मणून एक जात आहे त्यांतील पुरुष खरोखरच शेंपन्नास बायका करतात, व कदाचित् आपणाला त्यांची नीट आठवण राहणार नाहीं या भीतीनें ते एक वही घालून त्यांत आपल्या सगळ्या बायकांची नांवनिशी वगैरे नोंदून ठेवीत असतात ! प्रख्यात राजकारणपटु सुरेंद्रनाथ बानर्जी हे या कुलीन ब्राह्मणांपैकींच जातीनें आहेत—मात्र त्यांनीं या बाबतींत हिंदु लॉच्या आज्ञेचा अवमान करून फक्त एकच स्त्री केली आहे हा त्यांनीं आपल्या स्त्रीवर मोठा उपकार केलेला आहे. असो.

पतिराजांनीं आपल्या मर्जीनुरूप दुसरें लग्न केलें तें होऊन गेलें, पण निदान पहिल्या टाकून दिलेल्या गृहदेवतेच्या मानमरातबाची काय व्यवस्था हिंदु लॉनें केली आहे ? कांहीं कारणामुळें मर्जीतून उतरलेल्या घोड्याला आपण आपल्या तबेल्यांतून जरी कमी करतों, तरी त्याला आपण निदान पांजरपोळांत तरी पाठवतों, व तेथें त्याच्या पोटाची व्यवस्था लावतों. त्याप्रमाणें पदच्युत केलेल्या आपल्या बायकोची काय व्यवस्था लाव-ण्याचें हल्लींच्या हिंदु लॉनें पुरुषाला भाग पाडलें आहे ?

नवी बायको केली ह्मणजे पहिलीच्या अंगावरचे दागदागिने एकदम काढून घेण्याची पुरुषाला पूर्ण मुभा आहे. कारण ते दागिने तिच्या मालकीचे नसून ते केवळ नवऱ्याच्या मालकीचे ! त्यानें आपल्या स्वतःच्या मर्जीखातर तिला ते नुसते वापरण्याकरितां दिलेले असतात असें हिंदु लॉ म्हणतो. अर्थात् नवऱ्यानें आपले दागिने काढून घेऊन आपल्या नव्या बायकोला ते घालावयाला दिले तर हात कोण धरणार ? त्याचप्रमाणें मोलवान् वस्त्रेंहि फक्त वापरावयाला दिलेलीं, तींहि काढून घेण्यास हरकत नाहींच.

दागिन्यांपैकीं फक्त एकच दागिना नवरा तिच्या-पासून हिसकावूं शकत नाहीं. तो कोणता ह्मणाल तर मणिमंगळसूत्र ! खुशी काळी पोत तिनें आणावी, आणि खुशाल ती आपल्या गळ्यांत आपलें सौभाग्यचिन्ह ह्मणून बांधून ठेवावी !

यानंतर आणखी तिला काय पाहिजे ? पति-राजांचीच नामर्जी झालेली. तेव्हां अर्थात् आतां त्यांची संगत सोबत संपलीच. त्याच्या खोलींत पाय ठेवण्याची सोयच उरली नाहीं. माजघरांत, मागील-दारीं, सोप्यांत कुठें तरी पडावें, घरांत कोणी सहानुभूति दाखविली तर त्याच्याशीं चार अश्रु गाळावे—पण टाकून दिलेल्या बायकोशीं सहानुभूति तरी कोण दाखविणार ? जो तो नवीन 'बाईसाहे-बांच्या मर्जीप्रमाणें वागूं लागणार !—अर्थात् घरांत

चार कामें करावीत व गोळाभर अन्न डोळ्यांतल्या अश्रूंशीं भिजवून खावें, एवढीच तिची व्यवस्था इल्लीं हिंदु लॉमध्यें आहे!

अशा तऱ्हेनें जेथें आपण फुलें वेंचलीं तेथें गोंवऱ्या लावावयाला कशाला रहा? हालअपेष्टा इथें कशाला सोशीत बसा? आपल्या देखत आपला नवरा दुसऱ्या बायकोशीं थट्टामस्करी व सुखोपभोग करतांना आपल्याच्यानें पहावत नाहीं तर येथून चार पावलें दूर, आपल्या माहेरीं किंवा एखाद्या आईबहिणीच्याकडे जाऊन, कसाबसा काळ कंठावा, असा विचार त्या स्त्रीच्या मनांत आला तर त्यांत आश्चर्य आहे काय? पण येथें नवरोजीपंतांच्या परवानगीची अडचण हिंदु लॉनें घालून ठेवलीच आहे! दुसरीकडे जाऊन रहावयाचें ह्मणजे पोटाचें ओझें तर दुसऱ्यावर घालावयाचें नाहीं! जें आपलें आहे तें आपल्याला हक्कानें पतिराजांकडून मिळावयाला हक्क आहे का? छे छे, तोहि नाहीं! पतिराज कायदेशीरपणें असें ह्मणू शकतात, कीं, माझ्या घरींच पडून राहिलें पाहिजे, आणि मी गोळाभर अन्न देईन तेवढेंच खाऊन असलें पाहिजे. "मला पूर्वी एक घोडी आवडत होती पण पुढें दुसरी चांगली दिसल्यामुळें मी तिला आपल्या घरीं आणून ठेवली आहे. पण म्हणून माझी पहिली घोडी मी आपल्या घरांतून बाहेर जाऊं देईन काय? तिच्या गळ्यांतली लगाम जी एकदां माझ्या हातीं आली ती कायमचीच आली!" तद्वत्‌च जिचें मीं एकदां पाणिग्रहण केलें तें कायमचेंच. मी पाहिजे तर दुसरीचेंहि पाणिग्रहण करीन व केलेंहि आहे. पण म्हणून पहिली निघून जाईल काय? छे छे, तिचा गळा जो एकदां माझ्या गळ्याशीं गोंवला तो कायमचाच!" हिंदु लॉ हा सारा अधिकार नवऱ्याला बिनदिक्कत देतो. कायदा असें स्पष्ट म्हणतो, कीं, नवऱ्यानें दुसरी बायको केली तर तेवढ्यावरून तिला त्याचें घर सोडून जाण्याचा हक्क नाहीं. इतकेंच काय, त्यानें जरी दहा पण्यांगना ठेवल्या तरी, तो हिंदु पुरुषाचा नैसर्गिक हक्कच आहे, त्याबद्दल बायकोनें त्रागा करण्याचें यत्किंचित्‌हि कारण नाहीं! हिंदु लॉ या बाबतींत फक्त एवढीच सवलत—मोठ्या मेहरबानीनें—तिला देतो, कीं, अशा ज्या काय विश्वयोषिता त्याला ठेवावयाच्या असतील त्या त्यानें फक्त हिंदु धर्मांतल्याच स्त्री घरांत आणून ठेवाव्या. मुसलमानीण किंवा इतर परधर्मांतली घरांत जर तो आणून ठेवील, तर मात्र बायकोनें त्या घरांतून बाहेर निघून जावें, आणि नवऱ्यानें तिला तेथें पोटगी पोंचवावी!

परंतु जर नवऱ्याकडून पोटगी पाहिजे असेल तर बायकोनें नवऱ्याच्या घरींच राहिलें पाहिजे. मग तेथें कितीहि सवती असोत, कितीहि त्याच्या स्वधर्मीय रखेल्या असोत, तिचा कितीहि अपमान होवो, तो सर्व गिळून बायकोनें तेथेंच डोकें टेंकून राहिलें पाहिजे. तरच तिला नवऱ्यापासून हक्कानें गोळाभर पोटगी मिळेल असा स्पष्ट हिंदु लॉ आहे!

या बाबतींत इतर धर्मांचे कायदे कसे आहेत ते पाहूं. खिस्ती व पारशी कायदा असें सांगतो, कीं, जर नवऱ्यानें एकदा लग्न केलेल्या स्त्रीच्या विरुद्ध आचरण केलें—ह्मणजे दुसऱ्यानें लग्न केलें तर तो गुन्हेगार ठरवून मॅजिस्ट्रेट त्याला शिक्षा करील. जर तो रखेल्या ठेवील, किंवा इतर कोणाहि परक्या स्त्रीशीं त्याचा संबंध आहे असें शाबीत होईल, तर बायकोनें एकदम त्या आपल्या नवऱ्यापासून दूर जावें, व त्याच्यापासून हक्कानें आपल्या दर्जाप्रमाणें अन्नवस्त्राकरितां रक्कम मिळवून घ्यावी. "मी चार सवती आणून घरांत ठेवीन, चार रखेल्या ठेवीन, आणि इतरहि पाहिजे त्या स्त्रीशीं बदफैली करीन; पण तूं माझी लग्नाची बायको असल्यामुळें तूं माझ्याजवळ राहिलेंच पाहिजेस, तरच मी तुला गोळाभर अन्न घालीन, माझ्या घरांतून जाशील, तर मी पैहि तुला देणार नाहीं!" असें निर्लज्जपणाचें सडेतोड भाषण हिंदु नवऱ्याशिवाय दुसऱ्या कोणत्याहि नवऱ्याला करतां येत नाहीं!

एवंच काय, लग्न झाल्याबरोबर हिंदु स्त्री आपल्या नवऱ्याची अर्धांगी, सहधर्मचारिणी वगैरे केवळ नांवाला मात्र बनते. तत्त्वतः पाहूं जाल तर "तूं फक्त गोळाभर अन्नाची हक्कदारीण, व तोहि गोळा माझ्या घरांतून बाहेर जाऊन मागशील तर मी देणार नाहीं" अशी बढाई मिरविण्याचा हिंदु लॉनें नवऱ्याला पूर्ण हक्क दिलेला आहे!

या बाबतींत खरा न्यायाचा कायदा असा असला पाहिजे, कीं, लग्न झाल्याबरोबर स्त्री व पुरुष ह्मणजे जर एक जीव होतो असें मानावयाचें —निदान संसारांतले ते दोघे भागीदार असें जर मानावयाचें, तर, दोघांचाहि त्या संसारावर सारखाच हक्क असला पाहिजे. एकानें दुसऱ्या भागीदाराला, मर्जीस येईल त्यावेळीं, एकदम बेलाशक हांकून द्यावें, ह्मणजे अत्यंत मोठा अन्याय होय. भागीदार घेतांना तुह्मी पाहिजे तितका विचार करा, पण एकदां भागीदार घेतल्यावर त्याला काढून टाकतां येऊं नये. काढून टाकावयाचा जर झाला तर त्या वेळेपर्यंतचा संसाराचा हिशोब करून त्याचा त्याला निम्मा हिस्सा दिल्याशिवाय काढण्यास कायद्याचा प्रतिबंध असला पाहिजे. आणखी हा भागीदारी मोडण्याचा हक्क योग्य कारणाशिवाय बजावतां येऊं नये असाहि निर्बंध पाहिजे. "माझी आज मर्जी अशी लागते आहे, कीं, तुला हाकलून लावावा" एवढ्याच सबबीवर त्याला हाकलून लावणें किती बरें अन्यायाचें आहे?

या बाबतींत मुसलमानी कायदा हिंदु लॉपेक्षां पुष्कळ अंशीं न्यायी आहे. लग्नाच्या वेळीं प्रत्येक मुसलमान गृहस्थ आपल्या वधूशीं चार लोकांच्या देखत असा करार करतो, कीं, मी जर केव्हांहि तुला काढून टाकण्याचें मनांत आणलें तर अमुक एक रक्कम मी अगोदर तुला रोख देईन तेव्हां मग तुला काढीन. तशी रक्कम जर मुसलमान आपल्या बिबीला न देईल तर तो तिला काढूं शकत नाहीं. या ठराविक रकमेला 'मेहर' असें नांव आहे. मेहर जर दिला नाहीं तर लग्न मोडतच नाहीं. आमच्या हिंदु लॉमध्यें पुरुषांना सारीच मोकळीक! "आज मी तुला हाकलून देतों. फार तर तूं पोटगी मागशील ना? कांहीं हरकत नाहीं. महिन्याच्या चारपांच रुपड्या तुझ्या अंगावर फेंकून देईन ह्मणजे संपलें." असले निर्लज्जपणाचे उद्गार एकटा हिंदु नवराच काढूं शकतो!

आणखीहि एक गोष्ट ध्यानांत घेण्यासारखी आहे. भागीदारी जर मोडतां येते तर ती फक्त एकाच भागीदाराला कां मोडतां यावी? दुसऱ्या भागीदारालाहि ती मोडतां कां येऊं नये? नवऱ्यानें हवा तो दुष्टपणा करावा, आणि बायकोनें मात्र तोंड दाबून लाथाबुक्क्यांचा मार सोशीत रहावें, तिला मी निघून जातें असें ह्मणतां येऊं नये, हा न्याय कोठला?

या सगळ्या हालअपेष्टांनां कंटाळून जाऊन कोणीहि स्त्री सहज असें ह्मणूं लागेल, कीं, "मला तुमच्या या यातनाहि नकोत, अन् मी इथें त्या सोसायला रहातहि नाहीं. फार तर तुमच्या भाकरीच्या चतकोर तुकड्याकरितां येवढं तुमचं मिंधं होऊन राह्यचं ना? पण मला त्या तुकड्याचीहि जरूर नाहीं. माझीं आईबापें, भाऊबहीण कोणी-तरी मला खुषीनें सांभाळतील. कुठेंहि चार कामें उचललीं तर टीचभर पोटाची खळी सहज नीट अन्नानें भरून निघेल." असे निर्वाणीचे शब्द बोलून जर एखादी हिंदु स्त्री आपल्या नवऱ्याचें घर सोडून दुसरीकडे जाऊन राहिली, अथवा आपल्या खुद्द माहेरच्यांच्याकडे जाऊन राहिली तर हिंदु लॉ तसें तरी तिला सुखानें करूं देतो काय?

छे छे, असा देखील निर्वाणीचा मार्ग तिला मोकळा नाहीं. "मी जरी दुसऱ्या बायकोशीं लग्न लावलें आहे तरी देखील, मी तुला माझ्या घरांतून बाहेर जाऊं देणार नाहीं. तूं माझ्याशीं एकदां लग्न लावलेंस, सबब तूं जन्माची माझी झालीस, तूं नेहमीं माझ्या घरीं राहिलेंच पाहिजेस." असें हिंदु नवरा कायदेशीरपणानें ह्मणूं शकतो. इतकेंच नव्हे, तर बायको जर दुसरीकडे जाऊन राहिली असली

त्तर तिला आपल्या कबजांत आणण्याकरितां ती ज्या माणसाच्या घरीं राहिली असेल त्याच्यावर "suit for possession of wife म्हणजे बायकोचा ताबा मिळविण्याकरितां दावाहि करूं शकतो. शूद्र वगैरे लोकांत तर नवऱ्यानें आपल्याबरोबर पांचदहा लट्ठलठ्ठ माणसें घेऊन बायकोच्या गांवीं जावें, व तिला कोठें तरी पकडून उचलबांगडी करून आपल्या घरीं घेऊन यावें, असा केवळ पशूसारखा प्रकार दृष्टीस पडतो. त्या पशुप्रकाराचीच सुधारलेली नक्कल म्हणून हा वर सांगितलेला बायकोचा कब्जा मागण्याचा दावा चालत असे. पण अलिकडे इंग्रजसरकारानें स्त्रियांवर दया करून हे असले लांछनास्पद दावे आपल्या कोर्टांत घेण्याचें बंद केलें आहे !

परंतु, एवढ्यानेंच त्या स्त्रीच्या हालअपेष्टा संपल्या असें ह्मणतां येणार नाहीं. नवऱ्याच्या हातीं आपल्या बायकोला छळण्याचें आणखी एक फार दांडगें हत्यार कायद्यानें ठेवलें आहे,व तें असें विलक्षण प्रकारचें आहे, कीं, तें तिच्या काळजाचें पाणीच करून टाकतें. एखादी स्त्री नवऱ्याच्या छळाला त्रासून वैतागून असें ह्मणेल, कीं, "मला तुमची चतकोर भाकरी नको, घर नको, दार नको. तुह्मी तें सारें घेऊन खुशाल नव्या बायकोशीं किंवा तुमच्या मनाला येईल तिच्याशीं मौजा मारीत बसा. मी चालती होतें. तुमच्याजवळ मी अन्नाचाहि गोळा मागणार नाहीं. माझ्या पोटाला गोळा आईबहिणीच्याकडे मी खपून मिळवीन. पण निदान माझ्या पोटचा गोळा तरी माझा मला नेऊं द्याल?"

"छे छे छे, पोरें जरी तुझ्या पोटांतून उत्पन्न झालीं असलीं, व जरी तूं त्यांनां अंगावरचें दूध पाजून गुटगुटीत केलीं असलींस, तरी त्यांजवर तुझा हक्क यत्किंचित्‌हि नाहीं ! मी त्यांचा बाप, तेव्हां अर्थात् सारीं पोरें माझींच ! एकहि पोर तुझें नव्हे–एकूणएक सगळीं माझीं एकट्याचीं. शेवटचें लहान जरी अजून तुझ्या अंगावर पीत आहे तरी त्यावर देखील सगळा हक्क माझा ! ! तूं नुसती नेसत्या लुगड्यानिशीं माझ्या घरांतून चालती हो; इस्टेट, चीजवस्त, मुलेंबाळें सारीं माझीं एकट्याचीं !"

याप्रमाणें ह्मणण्याचा पुरुषाला कायद्यानें पूर्ण हक्क आहे, हा केवढा अन्याय ! बिचारी आई आपल्या तान्हुल्याला सोडून कशी जाईल ? पण न जावें, तर घरांतला अनाचार व हालअपेष्टा डोळ्यांनीं पाहवत नाहींत. कोर्टाकडे जाऊन दाद मागावी तर कायदा ह्मणतो, कीं, नवरा ह्मणतो तें सारें कायदेशीर आहे ! !

हे असले अमानुष कायदे बदलून घ्यावयाला नकोत काय ? पाश्चात्य देशांतल्या स्त्रियांनीं ते अंशतः तरी बदलून घेतले आहेत. तेथें आतां असा कायदा आहे,कीं, जरी बाप हा मुलांचा मालक आहे तरी त्यानें नेहमीं अशी व्यवस्था केली पाहिजे,कीं, आईची आणि तिच्या पोटच्या मुलांची पांचसात दिवसांनीं तरी तास दोन तास भेट व्हावी, त्या वेळीं मायलेकरांच्यामध्यें कोणाचीहि आडकाठी असूं नये–वगैरे.

वास्तविक ह्मटलें तर बापानें आणि आईनें जशी इस्टेट वांटून घेणें वाजवी आहे त्याचप्रमाणें, आईच्या हृदयाला अत्यंत प्रिय असणारीं अशीं मुलेंहि वांटून घेणें वाजवी नव्हे काय ? निदान धाकटीं मुलें तरी आईला मिळणें वाजवी नाहीं असें कां ह्मणावें ? इंग्लंड वगैरे पाश्चात्य देशांतहि जर अजून कायद्यांत वरचेवर सुधारणा होत असते, तर या बाबतींत आमच्या हिंदु स्त्रियांनांहि त्या सुधारलेल्या कायद्यांचा फायदा कां मिळूं नये ?

असो. एवंच काय, तर सुवासिनी. स्त्रियांची अशी केविलवाणी स्थिति आहे. आज तुह्माला त्या "माझा नवरा, माझा संसार, माझीं मुलेंबाळें, माझे दागिने" असें ह्मणत गृहलक्ष्मीप्रमाणें शोभतांना दिसताहेत खऱ्या, पण त्यांत त्यांचें खरें कायदेशीर हक्काचें असें काय आहे हें आतां तुह्माला समजलें आहे ! गोळाभर अन्न

आणि नेसावयाला वस्त्र याशिवाय काडीभर देखील त्यांचा कायदेशीर हक्क नाहीं, प्रत्यक्ष पोटच्या पोरावर देखील हक्क नाहीं !!

अर्थात् बाकीचें हल्लींचें सारें वैभव केवळ नवऱ्याच्या सुलतानी मर्जीवर अवलंबून आहे! ती मर्जी खप्पा व्हावयाला अमुकएक कारण झालें पाहिजे असें मुळींच नाहीं. यजमानांच्या अगदीं निर्मळ मर्जीवर हें सारें गाडें चालणार, असा हा भयंकर कायदा आहे.

ज्या स्त्रियांना आज सुदैवानें ऐश्वर्य उपभोगण्यास मिळतें आहे त्यांनीं लक्ष्यांत ठेवावें, कीं, हें सारें निवळ अळवाच्या पानावर मोत्यांप्रमाणें दिसणाऱ्या जळबिंदुसारखें असून तें पतिराजांच्या मर्जीवरच फक्त अवलंबून आहे! अर्थात् हा असला जुलमी सुलतानी कायदा बदलून आपल्यापेक्षां कमनशीबी असलेल्या भगिनींना सबड करणें व त्याकरितां झटणें हें त्यांचें कर्तव्यकर्म नव्हे काय ? तुमची स्थिति आज जरी भयंकर नाहीं तरी ती केवळ तुमच्या सुदैवानेंच थोडीशी चांगली आहे. तुमचा हक्क असा कांहींएक नाहीं. तुमच्या आयांबहिणींच्या लक्ष्यांत पूर्वापारपासून ही आपली स्त्रियांची विलक्षण वाईट स्थिति येऊन चुकलेली आहे. पूर्वापारपासून स्त्रियांच्या तोंडीं असलेल्या या बाबतींतल्या म्हणी पहा म्हणजे तुमची खात्री होईल:—

"साप म्हणूं नये बापडा, अन् नवरा म्हणूं नये आपला!" "होऊं नये कुणाचा चाकर, अन् होऊं नये कुणाची बायको!"

ह्या व असल्याच अर्थाच्या इतर म्हणी स्त्रियांच्या अंतःकरणाला पीळ पडल्यावांचून त्यांच्या तोंडीं आल्या असतील काय? आणि त्यांची सत्यता जर त्यांच्या अनुभवाला पटत नसती तर, त्या म्हणी इतकीं युगें चालू राहिल्या असत्या काय? अलबत नाहीं! पण इतकेंहि असून स्त्रिया लग्नाच्या जुखाडाखालीं आपली मान अडकवून घेतात, आणि आपल्या लेंकींच्या मानाहि अडकवून टाकण्याचा हव्यास धरतात, याचें तुम्हाला आश्चर्य वाटेल. पण तसें वाटण्याचें कारण नाहीं. कारण ह्या अन्यायाचा प्रतिकार कसा करावा ह्याची आजपर्यंत अज्ञानामुळें त्यांना मुळींच माहिती नव्हती. हल्लींच्या काळांतल्या शिकलेल्या स्त्रियांनीं मात्र आतां आपणावरची ही सर्व जबाबदारी ओळखून कायदे सुधारून घेण्याकरितां कंबर बांधली पाहिजे.

---

प्रकरण पांचवें.

## विधवा.

सुवासिनींची कायदेशीर स्थिति जरी भयंकर आहे तरी त्या आपल्या पतिराजांना नाना प्रकारें संतुष्ट करून त्यांच्यापासून आपणाला पाहिजे त्या गोष्टी मिळवूं शकतात; हातापायां पडून, अबोला धरून, रागावून, रुसून, आदळआपट करून आणि घरांत नासधूस करून कां होईना, पण योग्य वेळीं योग्य हिकमत लढवून त्या आपली प्रत्यक्ष स्थिति (कायदेशीर स्थिति नव्हे हो!) शक्य तितकी चांगली करून घेऊं शकतात. कैक इतर स्त्रियांना हीं शस्त्रास्त्रें इतक्या उत्तम रीतीनें वापरतां येतात, कीं, त्या आपल्या पतिराजांना आपल्या अगदीं मुठींत आणून ठेवतात; आणखी कांहीं जहांबाज अशा असतात, कीं, त्यांचे नवरे त्यांच्या ताटाखालचीं मांजरेंदेखील बनून राहतात!

पण ज्या बिचाऱ्या स्त्रिया या सर्व युक्त्या लढवितां येण्याच्या पलिकडे गेल्या—ज्यांचे पतिराजच मुळीं ह्या जगांतून नाहींसे झाले—त्या स्त्रियांची स्थिति काय वर्णावी? हिंदु विधवांची

स्थिति वर्णन करतांकरतां आजपर्यंत शेंकडों लेखण्या शिणून बोथट झाल्या आहेत, अशा स्थितींत आमची लेखणी आणखी ज्यास्ती काय वर्णन करणार ? हिंदुविधवा ह्मणजे "करुणस्य मूर्तिरथवा शरीरिणी" ह्मणजे करुणरसाची जणूं काय प्रत्यक्ष मूर्तिच असते असें ह्मटलें आहे तें अगदीं खरें आहे.

हिंदु एकत्र कुटुंबांत मालक काय ते पुरुष, स्त्रिया फक्त आश्रित, हा मंत्र आतां वाचकांनां पाठ झालाच असेल; परंतु पुरुषांच्या मागें दडून त्यांच्या स्त्रियांनां आपली स्थिति कांहीं तरी सुधारून घेतां येते; पण जिचा पति नष्ट झाला तिनें कोणाच्या मागें दडावें ? स्वतः आपण मालक नाहीं, ज्याच्या जिवावर उड्या मारण्याची आशा होती तो तर परलोकीं गेला, कायद्यानें कांहीं मिळेल कीं काय तें पाहावें तर तें कांहीं चिन्ह ठीक दिसत नाहीं, अशी अत्यंत चमत्कारिक त्यांची स्थिति होते.

आपण उदाहरणार्थ घेतलेल्या कुटुंबामध्यें तिघीजणी सुना वावरतांना आपण पाहिल्या होत्या. त्या प्रत्येकीवर वैधव्याचा प्रसंग आला आहे अशी आपण कल्पना करून प्रत्येकीची स्थिति पाहूं, ह्मणजे आपणाला विधवांची कायदेशीर स्थिति पुष्कळशी ध्यानांत येईल.

थोरली सून सरस्वतीबाई इजला मूलबाळ मुळींच नाहीं. गणपतराव वारल्याबरोबर त्यांची सर्व मालकी त्यांचे दोघे बंधु रामचंद्र आणि कृष्णराव व कृष्णरावांचे चौघे मुलगे या सहा पुरुषांकडे गेली. (माधवरावांच्या मृत्यूनंतर हे तिघे बंधु अजून एकत्र आहेत अशा समजुतीवर आम्ही हें सांगत आहों हें लक्ष्यांत ठेवावें). पूर्वी जे गणपतराव मालक इतर पुरुषांबरोबर होते ते मृत होतांच बाकीचे सहा पुरुषच काय ते मालक राहिले. सरूबाईची स्थिति आतां फक्त ह्या सहा मालकांकडून अन्नवस्त्र घेण्याची ! सगळ्यांहून वडील मालकाची बायको म्हणून त्यांच्या हातीं घरांत जो अप्रत्यक्ष अधिकार होता तो एकदम जाऊन, त्या फक्त आतां यःकश्चित् अन्नवस्त्र मागणाऱ्या आश्रित बनल्या. त्यांनां आतां दत्तक घेण्याचा हक्क नाहीं. कारण गणपतरावांच्या मृत्यूच्या क्षणींच त्यांची मालकी इतर सहभागीदारांकडे जाऊन बसली, आणि कायद्याचा असा एक विलक्षण नियम आहे, कीं, एकदां मालकी दुसरीकडे जाऊन बसली म्हणजे दत्तक घेतां येत नाहीं. सरूबाईनां दत्तकहि घेतां येत नाहीं, आणि अन्नवस्त्राशिवाय ज्यास्ती काडीचा हक्कहि नाहीं. त्यांनीं नवऱ्याच्या घरांत रहावें एवढा एक विशेष हक्क मेहेरबानगीनें कायद्यानें त्यांनां दिला आहे. घरांत रहावें, जावा सांगतील तें काम करावें, आणि गोळाभर अन्न त्या घालतील तसें व तितकें खावें. झालें.

सीताबाई जर दुर्दैवानें विधवा झाल्या तर त्यांचीहि स्थिति अगदीं तंतोतंत वर सांगितल्याप्रमाणेंच होणार. त्यांच्या हालअपेष्टा एवढ्यानेंच संपणार नाहींत. कारण सरूबाईप्रमाणें त्या मोकळ्या नसून त्यांच्या गळ्यांत आणखी पांच पोरी असणार. सरूबाईप्रमाणें त्यांनां निरिच्छपणा करण्याला वावच नाहीं. पांच पोरींचीं लग्नें एकत्र कुटुम्बानें केलीं पाहिजेत अशी पुरुषमालकांवर जबाबदारी आहे खरी, पण अमुकच रक्कम दर लग्नाला खर्च केली पाहिजे अशी त्यांजवर मुळींच जबाबदारी कायदा टाकीत नाहीं. रामभाऊंनीं आपल्या हयातींत वांटणी करून घेतली असती तर त्यांच्या वांट्याला लाख रुपयेपर्यंत इस्टेट आली असती हें आपण मागें पाहिलेंच आहे. तशी त्यांनीं वांटणी केली असती तर आज त्यांच्या पांचहि अविवाहित मुलींनां, ते लाख रुपये खर्चून, त्या उत्तम स्थळें मिळवूं शकल्या असत्या. पण ते एकत्रांतच वारले त्याबरोबर सर्व इस्टेट इतरांकडे गेली. मुली फक्त आश्रितच राहिल्या. आतां त्यांच्या लग्नांकरितां योग्य रकमा खर्च करण्याकरितां तोंड वेंगाडण्याचा प्रसंग बिचाऱ्या सीताबाईवर दर वेळीं येणार, आणि दर वेळीं त्या पुरुषमालकांच्या कपाळाला आंठ्या पडणार ! सीताबाईला इतका त्रास होणार, कीं, ह्या

पोरी मला नसत्या झाल्या तर मी सरूबाईसारखी स्वस्थ 'हरिहरि' ह्मणत तरी पडून राहिलें असतें, असें त्यांनां कैकदां वांटणार. पण पोटच्या लेंकी धडधडीत डोळ्यांपुढें दिसत असून स्वस्थ कसें बसवणार? मनींची इच्छा पुष्कळ, कीं, लेंकी चांगल्या ठिकाणीं पडाव्या, पण तसें होण्याला हातांत पैसा वा अधिकार नाम शून्य! जेमतेम दीरापुतण्याच्या हातापायां पडून कशींबशीं स्थळें मिळून पोरी उजवल्या जाईपर्यंत आणि त्यांचीं न्हाणें, गर्भाधानें, गर्भारपणें, बाळंतपणें होईपर्यंत, सीताबाईंनां नको हा जीव असें कैकदां होऊन गेलें असल्यास आश्चर्य यत्किंचित्‌हि नाहीं. इतकें सगळें करून अखेरीला सरूबाईप्रमाणें स्वत:ला अन्नवस्त्र मिळविलें, कीं, एकदांचे गंगेंत घोडे न्हाले! एकंदरींत इत्यर्थ हाच, कीं, एकत्र कुटुंबांत ज्याला फक्त मुलीच आहेत तो अत्यंत असुखी. मुली असण्यापेक्षां मुळीं त्या न झालेल्या फार उत्तम.

आतां आपण सरूबाई व सीताबाई यांनां सोडून राधाबाईच्यावर वैधव्याचा प्रसंग आला तर काय स्थिति होईल त्याचा विचार करूं. कृष्णराव जरी मृत झाले तरी राधाबाईंनां चार मुलगे झालेले असल्यामुळें त्यांच्या स्थितींत तितकी हलाखी येत नाहीं; कारण प्रत्यक्ष त्यांचेच मुलगे अजून मालक आहेत. पूर्वी नवऱ्याच्या मागें दडून जें काम त्यांनां करतां येत होतें तें यापुढें मुलांच्या मागें दडून करतां येईल. मुलगे जरी अज्ञान असले तरी ते स्वत:सिद्ध मालक आहेत. ते सज्ञान होऊन उद्यां जरी आपल्या बायकांच्या नादानें राहूं लागले तरी किती झालें तरी राधाबाई त्यांच्या मातु:श्री आहेत हें ते विसरणार नाहींत अशी आशा असते. वास्तविक पाहिलें तर कृष्णराव असतांना त्या जशा निवळ आश्रित होत्या त्याप्रमाणें त्यांच्या मागेंहि त्या निव्वळ आश्रितच असणार हें दुसऱ्या दृष्टीनें खरेंच आहे.

वरील विवेचनावरून हें उघड होईल, कीं, सरूबाईसीताबाईच्यापेक्षां राधाबाईची वैधव्यस्थिति—त्यांनां मुलगे असल्यामुळें—पुष्कळ बरी असणार. नवरा असतांना त्यानें बंधूंपासून विभक्तपणा करून न घेतल्याबद्दल पहिल्या दोघींनां जसा पश्चात्ताप करावा लागला तसा राधाबाईला करावा लागणार नाहीं; कारण अजूनहि मुलांनां पुढें करून तिला विभक्तपणा करून घेतां येईल. त्या दोघांनीं विभक्तपणा करून न घेतल्यामुळें त्यांच्या बायकांचें जितकें नुकसान झालें तितका नफा राधाबाईच्या मुलांचा झाला. भावांनीं वांटण्या केल्या असत्या तर कृष्णरावाला जेथें फक्त एकच लाख रुपये आले असते तेथें आतां कृष्णराव—दोघे बंधु अविभक्त मेल्यामुळें—एकदम तिन्ही लक्षांचा मालक बनला; आणि जबाबदारी फक्त काय ती दोन विधवांनां अन्नवस्त्र देण्याची, आणि सीताबाईच्या पांचहि मुलींचीं लग्नं करण्याची, एवढीच कृष्णरावावर राहिली. अशा तऱ्हेनें कृष्णरावांची चैन झाली खरी, पण बिचाऱ्या सरूबाईला तर एक लाखापासून निवळ धुळीला मिळावें लागलें, व सीताबाईची तर त्याहूनहि वाईट स्थिति झाली. असा विषम परिणाम होणें न्यायाचें कसें ह्मणतां येईल?

यावरून हें उघड आहे, कीं, ज्या सुवासिनी स्त्रीला आपल्या खऱ्या हिताची काळजी घ्यावयाची असेल—अथवा दुष्ट पण स्पष्ट शब्दांत सांगावयाचें ह्मणजे,—जर कदाचित् दुर्दैवानें आपल्यावर वैधव्य आलें तर आपल्याला भाकरीच्या चतकोर तुकड्याकरितां आपल्या दीरांवर अवलंबून रहावयाला नको अशी तरतूद करून घ्यावयाची असेल, तर त्या सुवासिनीनें आपल्या पतिराजांचा पिच्छा पुरवून त्यांनां त्यांच्या बंधूंपासून विभक्त करून टाकावें यासारखा दुसरा उत्तम मार्ग नाहीं. तिला पतिनिधनानंतर पारतंत्र्य नको असण्याबद्दल लोक तिला हंसतील, ती भावाभावांत तंटे लावण्याला उद्युक्त झाली आहे असें तिला दूषण मिळेल, हें जरी खरें असलें, तरी त्या सऱ्याकडे तिनें आपल्या व आपल्या मुलीच्या स्वार्थाकरितां अगदीं दुर्लक्ष्य

केलें पाहिजे. इतर सर्व जगाला परतंत्रता नको; स्वतंत्रता हवी. ती मात्र प्रशंसनीय. आजपर्यंत सर्व कवींनीं स्वातंत्र्याचे जे एवढे पोवाडे गाइले ते सारे रास्त. पण बिचाऱ्या विधवेला मात्र ते लागू नाहींत असें कसें ह्मणतां येईल?

दुसरी एक गोष्ट लक्ष्यांत घेण्याजोगी आहे, ती ही कीं, भावांभावांमध्यें विभक्तपणा घडवून आणणें ह्मणजे त्यांच्यामध्यें वैमनस्यें उत्पन्न करणें, असा मुळीं अर्थ करणेंच चुकीचें आहे. मनांत वैमनस्य न आणतांदेखील विभक्तपणा करून ठेवतां येतो. स्त्रियांनीं वैमनस्यें आणलीं नाहींत तर भाऊभाऊ निरंतर बंधुप्रेमानें अगदीं एकत्र राहतील असें थोडेंच आहे? आणखी शिवाय असेंहि आहे, कीं, एका जागीं जेवणखाण, रहाणें, बसणें, उठणें, उद्योगधंदा, व्यापारवगैरेमध्यें यत्किंचित्‌हि तफावत न होऊं देतां, बंधूंनीं एकमेकांपासून विभक्तपणा करून ठेवण्याला कायदेशीर मार्ग आहेत. फार काय, घरांत भावांशिवाय तिसऱ्या इसमाला न कळवितांहि विभक्तपणा आणून ठेवतां येतो. असें असतां विभक्तपणा न करतां गाफील राहावें, व आपल्यामागें आपल्या बायकोला दीरांच्या लाथा खावयाला भाग पाडावें, यांत तरी काय पुरुषार्थ आहे?

परंतु, सुशिक्षित स्त्रियांनीं व स्त्रियांच्या कैवाऱ्यांनीं ह्यापेक्षांहि पुढें पाऊल टाकून मुळीं हा दुष्ट कायदाच बदलून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. एकत्र कुटुंब असलें ह्मणजे पुरुषाच्या मागें त्याच्या विवाहित स्त्रीला व तिच्या मुलींनां आपल्या नवऱ्याच्या व बापाच्या जागीं उभें रहातां येऊं नये हें आश्चर्य आहे. आणखी एक आश्चर्याची गोष्ट अशी आहे, कीं, हा असा विलक्षण कायदा बंगाल प्रांतांतल्या हिंदुलोकांत नाहीं. तेहि हिंदु, त्यांनांहि हिंदु लॉच लागतो; पण त्यांच्याकडे विज्ञानेश्वरानें केलेल्या मिताक्षरा नांवाच्या टीकाग्रंथाचें महत्त्व मानीत नसून, जीमूतवाहनानें केलेल्या दायभाग नांवाच्या टीकाग्रंथाप्रमाणें सर्व हिंदु लॉ चालतो; आणि त्या बाबतींत दायभागाचा असा कायदा ठरून गेला आहे, कीं "एकत्र कुटुंबांतले पुरुष वारले तरी त्यांचा वारसा त्यांच्या भावांकडे न जातां तो त्यांच्या विधवांकडे जातो." आपल्या माधवरावांचें कुटुम्ब जर मूळचें कलकत्त्याकडे रहाणारें असतें, तर दायभाग त्यांनां लागून गणपतराव यांची इस्टेट त्यांच्यामागें सरस्वतीबाईकडे व रामचंद्रपंताच्या मागें त्यांची इस्टेट सीताबाईकडेसच आली असती. जमीनजुमला, घरदार, सोनें, चांदी, नाणें, रोकड, डागदागिने, वस्त्रपात्र, भांडींकुंडीं—सामानसुमान या साऱ्याला या स्त्रिया वारस झाल्या असत्या. इतकेंच नव्हे तर यजमानांनीं आपल्या हयातींत विभक्तपणा करून घ्यावा असें टमणें त्यांच्या पाठीशीं लावीत बसण्याचीहि त्या स्त्रियांनां जरूरी पडली नसती; कारण दायभागाचा हिंदु लॉ असा आहे, कीं, पतीच्या पश्चात् त्याच्या विधवेला देखील वांटणी करून घेण्याचा हक्क आहे. त्यावरून हें उघड आहे, कीं, मिताक्षरेप्रमाणें जी विधवा स्त्रियांची भयंकर स्थिति होते तशी आजमितीला देखील बंगालमधल्या दायभागांतल्या स्त्रियांची होत नाहीं!

दोन्हीहि जर हिंदु लॉच आहेत, तर मिताक्षरेचा कायदा ह्या बाबतींत बदलून दायभागाप्रमाणें तो विधवा स्त्रियांनां सोईचा करणें हें सुशिक्षित स्त्रियांचें पहिलें कर्तव्य होय. प्रत्येकीनें नवऱ्याच्या मागें लागण्यापेक्षां कायद्यांतच एकदांचा बदल करून टाकला ह्मणजे संपलें!

येथें एक इशारत मात्र देणें जरूर आहे. दायभागांत सांगितलेली सगळीच व्यवस्था आह्मांला मान्य आहे असें समजूं नये. जी व्यवस्था न्यायाची दिसली ती हल्लीं दायभागामध्यें सररहा चालू आहे असें आढळून आल्यामुळें, आह्मीं या बाबतींत ती व्यवस्था उचलण्याची शिफारस केली आहे, इतकेंच. उदाहरणार्थ, दायभागाप्रमाणें मुलींनां पूर्ण मालकी कधींच प्राप्त होत नाहीं. त्यांच्याकडे इस्टेट गेली असूनहि तिचा त्यांनीं केवळ निवह

-स्त्रीप्रमाणें अर्धवट उपभोग घ्यावा असें जीमूतवाहनाचें सांगणें आहे, तें आह्मांला पसंत नाहीं. त्या बाबतींत मिताक्षरेचें सांगणें असें आहे, कीं, मुलगी, बहीण वगैरे माहेरवासिनी स्त्रियांकडे जेव्हां इस्टेट जाते तेव्हां त्यांनां पूर्ण मालकी प्राप्त होते, हें मिताक्षरेचें सांगणें आह्मांला मान्य आहे. आमचा मुख्य उद्देश—ह्मणजे स्त्रियांनां अन्याय न होतां समता मिळावी—त्या उद्देशाची जेथें सिद्धि होईल तो ग्रंथकार त्या बाबतीपुरता आह्मी मान्य करणार हें उघड आहे. असो.

इतर धर्मांच्या कायद्यामध्यें विधवेवर कोणत्याहि तऱ्हेचे निर्बंध नाहींत. नवऱ्याच्या इस्टेटींतला जो भाग विधवेला मिळतो त्याची ती अगदीं एखाद्या पुरुषाप्रमाणें पूर्ण मालकीण असते. अगोदर स्त्रीला कांहीं द्यावयाचें नाहीं, आणि जें काय थोडेंसें केवळ नाइलाजानें विधवेच्या हातीं द्यावयाचें त्यावर आणखी कैक निर्बंध घालून ठेवावयाचे, ही सैतानी तोड फक्त हल्लींच्या हिंदु लॉमध्येंच आहे ! खिस्ती व मुसलमानी धर्मांतल्या स्त्रियांच्या हातीं इस्टेटीवर पूर्ण मालकी दिल्यामुळें त्या उच्छृंखल झाल्या, व हिंदु स्त्रियांच्या हातीं बंधिस्त मालकी दिल्यामुळें त्या अगदीं उत्तम राहिल्या, असा प्रकार आह्मांला तरी निदान मुळींच दिसत नाहीं.

येथपर्यंत सामान्यतः दर्शविलें, कीं, एकत्र कुटुंबांतील विधवेला फक्त अन्नवस्त्राशिवाय कांहींहि मिळूं शकत नाहीं. पण अन्नवस्त्र अन्नवस्त्र ह्मणजे तरी खरोखरी काय पदार्थ आहे तें आतां पाहूं.

अन्नवस्त्र ह्याची व्याख्या करणें फार कठीण आहे. ज्या नवऱ्याला दरमहा प्राति आठदहा रुपये शाळामास्तरकीवर मिळत असतात अशाच्या बायकोला सुवासिनीपणांत देखील मुलाबाळांच्या संसारांत काबाडकष्ट अहोरात्र करून जेमतेम पोटभर अन्न आणि अंगभर वस्त्र मिळण्याची मारामार! असले दोघे भाऊ शाळामास्तर असले, आणि त्यांतला एक मयत झाला, तर त्याच्या विधवेला दिराकडून अन्नवस्त्र त्याच बेतानें मिळत असणार, हें उघड आहे. पण जेथें आपल्या उदाहरणांतल्या कुटुंबांतल्याप्रमाणें नवऱ्याच्या वांटणीला एक लक्ष रुपये आले असते, अशा ठिकाणीं गणपतरावांसारख्यांच्या विधवेला तरी हिंदु लॉ किती रक्कम अन्नवस्त्रादाखल देतो ?

पण त्याच्याहि अगोदर दुसरा एक प्रश्न तितकाच महत्त्वाचा सांगावयाचा आहे. विधवेनें कालक्रमणा कशी करावी हें धर्मग्रंथांत ठिकठिकाणीं सांगितलेलें आहे. अर्थात् विधवेला अन्नवस्त्र जितकें कमी देण्यास भाग पडेल तितकें पडावें, अशी तिच्याविरुद्ध इच्छा धरणारांकडून कांहीं विलक्षण युक्त्या लढविण्यांत आल्या. कांहीं खऱ्यांनीं असें तर्कशास्त्र लढवलें, कीं, विधवेनें जर एक वेळच जेवून रहावयाचें आहे, आणि इतर तऱ्हेनें संन्यस्त वृत्ति धारण करावयाची आहे, तर तिला अन्नवस्त्राची रक्कम फारच थोडी दिली ह्मणजे पुरे! दोन पांढरीं पातळें किंवा तांबडीं लुगडीं दिलीं कीं वस्त्र संपलें, आणि दोनचार शेर भुईमुगाचे दाणे, आणि वऱ्याचे अथवा साधे तांदुळ घेण्यापुरते पैसे दरमहिन्याला दिले, कीं, अन्नहि भरपूर झालें !! परंतु हायकोर्टानें हा भयंकर कोटिक्रम हाणून पाडला. त्यानें असें ठरविलें, कीं, विधवेनें संन्यस्त रहावें ही फक्त धार्मिक शिफारस आहे, कायद्याची अनुज्ञा नव्हे, आणि ह्मणूनच ती शिफारस तिजवर जबरदस्तीनें लादतां येत नाहीं. अशा प्रकारें हायकोर्टानेंच परस्पर कान उपटले ह्मणून बिचाऱ्या विधवांवरचा निरंतर उपाशीं रहाण्याचा प्रसंग टळला !

दुसरा प्रसंग तर ह्याहूनहि बहारीचा आहे. एका खटल्यांत, अशी हकीगत झाली—श्रीमंत बाजीराव साहेब पेशवे यांच्या पदरचे एक सुभेदार रामचंद्रपंत नांवाचे होते. त्यांनीं दोन स्त्रिया केल्या होत्या व दोघींनांहि पुत्रसंतति झाली होती. त्यांनीं आपल्या मृत्युपत्रांत असें लिहून ठेविलें होतें, कीं, 'माझी वडील स्त्री व तिचा मुलगा, आणि धाकटी स्त्री व तिचे मुलगे यांनीं सर्वांनीं गुण्या-

गोविंदानें रहावें, व आमच्या पश्चात् सर्वांनीं आमचे वडील चिरंजीव नारायणराव यांस आमचे जागीं मानून कुटुंबाचा कारभार चालू ठेवावा. माझी सर्व इस्टेट मी चि. नारायण यास देत आहें. त्यानें तीमधून आपल्या दोघां मातांची सर्व सोय करून द्यावी, त्यांचा योग्यप्रकारें मानमरातब ठेवावा, आपल्या धाकट्या बंधूंचें पुत्रवत् पालन करावें, व आमच्या सर्व पदरच्या माणसांची योग्य व्यवस्था लावावी. आमचा हेतु इतकाच आहे, कीं, सर्वांनीं आमचे पश्चात् सलोख्यानें रहावें. जरकदाचित् आमच्या द्वितीय कुटुंबाच्या चिरंजिवांचें चि. नारायणराव यांशीं पटलें नाहीं तर, नाइलाजास्तव त्यांनीं निराळें व्हावें. आणि त्यांनां चि. नारायणराव यांनीं मौजे क्ष व ज्ञ या दोन गांवांचा सर्व वसूल आपण जमा करून त्या उभयतां बंधूंनां सालोसाल द्यावा, आणि प्रत्येकास रु. पंचवीस हजार आमच्या इस्टेटीपैकीं द्यावे' वगैरे वगैरे.

अर्थात् जगाच्या रहाटीप्रमाणें वडील चिरंजीव नारायणराव यांचा कारभार त्यांची सावत्र आई रमाबाई व तिचे दोघे पुत्र यांच्या मनास आला नाहीं, आणि तंटे सुरू झाले. अखेरीस नाइलाजानें रमाबाईनीं आपल्या सावत्र मुलावर अन्नवस्त्राचा दावा केला. त्यांत त्यांनीं मागच्या सहा वर्षांमध्यें न दिलेली अन्नवस्त्राची रक्कम, व पुढें दरमहा पोटगी, द्यावी अशी मागणी केली. पहिल्या कोर्टानें दरमहा तीनशें रुपये, व सहा वर्षांची रक्कम एकवीस हजार रुपये, अशी देवविली. हायकोर्टाकडे अपील झालें त्यांत दरमहा फक्त रु. दोनशें व रक्कम रु. १४४०० एवढीच देवविली; परंतु नारायणराव यांनीं विलायतेस प्रिव्ही कौन्सिलकडे त्यावर अपील केलें. त्यांत त्यांची एक तक्रार अशी होती, कीं, "रमाबाईला जर मजपासून पोटगी पाहिजे असेल तर ती माझ्या घराच्या बाहेर राहण्यास जाऊन तिला कधींहि मिळणार नाहीं. तिनें आमच्या घरीं येऊन रहावें, ह्मणजे आमच्या घरांत आह्मी तिच्या पोटगीची योग्य व्यवस्था करूं!"

अशीच तक्रार मुंबई हायकोर्टापुढें दुसऱ्या एका दाव्यांत करण्यांत आली असतां त्या वेळचे हायकोर्टांतले अति प्रख्यात जज्ज जस्टिस वेस्ट यांनीं ती तक्रार मान्य केली होती. पुण्यांतल्या रंगो विनायक देव नांवाच्या गृहस्थावर त्यांची भावजय यमुनाबाई इनें असाच पोटगीचा दावा आणला असतां अवल को[र्टा]नें तो देवविला असून, हायकोर्टापुढें वरप्रमाणें तक्रार केली होती, कीं, आमच्या घरीं राहिल्यावांचून तिला पोटगी मिळणार नाहीं. हायकोर्टानें ठराव दिला, कीं, "ही तक्रार अगदीं वाजवी आहे. यमुनाबाई जर आपल्या माहेरीं राहते आहे तर तिला दीरांकडून पोटगी मिळणें कायदेशीर नाहीं. हे दीर गरीब व्यापारी आहेत त्यांजवर पोटगीच्या पैशाचा बोजा टाकणें ठीक नाहीं. यमुनाबाईला पोटगी पाहिजे असल्यास तिनें त्यांच्या घरीं जावें आणि पोटाला घ्यावें!"

या निकालावरून धीर येऊन धुळ्याकडच्या दुसऱ्या एका कस्तुरीबाई नांवाच्या स्त्रीच्या दाव्यांतहि दीरांनीं तशीच तक्रार केली, कीं, विधवा आमच्या घरीं येऊन राहिल्याशिवाय तिला अन्नवस्त्र मिळणार नाहीं. या वेळीं तर जस्टिस पिन्ही यांनीं विलक्षण निकाल लिहून ठेवला आहे. त्यांनीं त्यांत असें ह्मटलें आहे, कीं, "जावेशीं पटत नाहीं एवढ्याचकरितां वादी कस्तुरीबाई आपल्या दीरांच्या घरीं राहूं इच्छीत नाहीं हें अगदीं बरोबर नाहीं. पूर्वेकडील सर्व देशांत विलायतेंतल्याप्रमाणें स्त्रियांनां स्वतंत्रता नसते. विलायतेमध्यें स्त्रियांनां स्वतंत्र रहाण्याचें शिक्षण दिलेलें असतें. पण उलट पक्षीं हिंदु स्त्रीसारखी परतंत्र स्त्री जगांत दुसरीकडे कोठेंहि सांपडणार नाहीं. अर्थात् हिंदु विधवा स्त्री तर ज्यास्तच परतंत्र असली पाहिजे, अशीं अनेक वचनें ग्रंथांत आहेत. तिनें आपल्या नवऱ्याच्या घरीं रहावें, व त्याच्या कह्यांत असावें. घरांत इतर कोणी वडील माणूस नसलें तर तिनें आपल्याच पुत्राच्या कह्यांत रहावें, तिनें फक्त एकच वस्त्र

नेसावें, फक्त एकच वेळ भोजन करावें, आणि आपलें सर्व आयुष्य दुःखांत घालवावें. अशा परिस्थितींत असें जर कोणी ह्मणूं लागेल, कीं, नवरा मेल्यावर आपल्या मर्जीस येईल त्या ठिकाणीं जाऊन राहून तेथें तिनें दीरांपासून पोटगीकरितां पैसा मागावा, व तो त्यांनीं तिला तेथें पोंचवावा, तर हें हिंदु लॉच्या विचारसरणीच्या अगदीं विरुद्ध आहे. असा तिला अधिकार देणें ह्मणजे अत्यंत परतंत्रतेपासून तिला एकदम अत्यंत स्वतंत्र केल्यासारखें होईल!" वगैरे (इं.लॉ.रि.३ मुंबई ३७८.)

अशा प्रकारें विधवा स्त्रीला आणखीहि परतंत्र करण्याचा घाट हिंदु दीरांनीं घातला होता, आणि प्रथम सांगितलेल्या दाव्यांत तो घाट साधूनहि गेला. त्याचा अर्थ असा झाला असता, कीं, दीरांनीं तिच्या नवऱ्याची सगळी इस्टेट घ्यावी, आणि तिनें फक्त त्यांच्याच घरांत राहून काबाडकष्ट केल्यास एक वेळचें जेवण व नेसण्यास एक वस्त्र दिरांकडून तिला मिळेल. ती जर माहेरीं जाईल तर मात्र कांहींएक मिळणार नाहीं!

परंतु परमेश्वराच्या मनांत इतका निर्घृणपणा करावयाचा नव्हता! प्रिव्ही कौन्सिलकडे जें पेशव्यांच्या सुभेदाराच्या चिरंजीवांनीं अपील नेलें होतें तेथें प्रिव्हीकौन्सिलनें असा खणखणीत निकाल दिला, कीं, "विधवेनें आपल्या मर्जीस येईल तेथें पण नीतियुक्तपणें रहावें, व तेथें तिला योग्य पोटगी मिळालीच पाहिजे. जोंपर्यंत तिचें दुर्वर्तन नाहीं तोंपर्यंत हवें तेथें रहाण्याचा तिला हक्क आहे!"

ह्या निकालाप्रमाणें बिचाऱ्या कस्तुरीबाई व रमाबाई यांनां पृथक् राहूनहि पोटगी मिळाली, आणि दीरांच्या घरीं भांडीं खरवडण्यापासून त्यांची मुक्तता झाली. दुर्दैवी यमुनाबाई मात्र मधल्यामधें अगोदर उलट निकाल होऊन फसली गेली!

आतां आपण पोटगीच्या रकमेकडे वळूं. ह्याबद्दल असा ठराव झाला आहे, कीं, किती रक्कम दरमहा द्यावी तें त्या कुटुंबाच्या स्थितिगतीवर, आणि विधवेच्या नवऱ्याच्या इभ्रतीवर, अवलंबून आहे. नवरा हयात असतांना त्यानें ज्या स्थितींत आपल्या बायकोला ठेविली असती तितकी सुस्थिति जरी नाहीं, तरी त्या मानानें नीट स्थितींत रहातां येईल अशी रक्कम दिली पाहिजे. मात्र एवढें ठरलें आहे, कीं, नवऱ्यानें वांटणी करून घेतली असती तर जें त्याच्या वांटणीला दरसाल आलें असतें त्यापेक्षां ज्यास्त रक्कम विधवेला मिळणार नाहीं, आणि त्या उत्पन्नाच्या एकतृतीयांशाहून फारशी कमीहि रक्कम कोर्टानें देऊं नये. ह्या दोन इयत्तांच्या दरम्यान योग्य ती रक्कम कोर्टानें ठरवावी. ह्यांत अशी सुधारणा होणें जरूर आहे, कीं, नवऱ्याच्या हिश्शाच्या वार्षिक उत्पन्नाइतकी कोर्टानें रक्कम अवश्य द्यावी, व विशेष कारण असल्यावांचून त्यांत कमी करूं नये. जर नवऱ्याची इस्टेट त्याच्या बायकोच्या तोंडून तुह्मीं काढून घेणार, तर निदान तिच्या हयातीमध्यें तरी तिचें सारें उत्पन्न तुह्मी तिला दिलें पाहिजे.

दुसरा एक असा नियम आहे, कीं, त्या विधवेला जर तिच्या माहेरचें किंवा इतर कुठलें वार्षिक उत्पन्न असेल तर पोटगीच्या रकमेंतून तें वजा करावें, ह्मणजे, पोटगीची रक्कम तितकी कमी द्यावी. हा धडधडीत अन्याय आहे. तिला माहेरचें उत्पन्न असलें ह्मणून तुम्ही तिला तितकें कमी द्यावें, आणि माहेरचें पोटभर असलें ह्मणजे तिच्या नवऱ्याच्या उत्पन्नापैकीं मुळींच कांहीं तिला देऊं नये, याचा अर्थ असा होतो, कीं, जणूं काय विधवेच्या हातीं ज्यास्ती पैसा गेला तर तो सत्कारणीं लावण्याची तिला अक्कल नाहीं! अजून नवीन तऱ्हेचे खटले येऊं लागले नाहींत. पण पुढें जेव्हां असें दिसूं लागेल, कीं, एखादी विधवा स्त्री डॉक्टरीण किंवा मास्तरीण बनून उदरनिर्वाह करूं लागेल, किंवा पुष्कळ पैसा मिळवूं लागेल, त्या वेळीं तिनें जर दीरांजवळ पोटगी मागितली, तर दीर साफ उत्तर देणार, कीं, तूं खूप पैसे मिळवितें आहेस, आतां तुला आम्ही पोटगी मुळींच देणार नाहीं! तिलाहि अशा उत्तराला सडेतोड प्रत्युत्तर देतां येणार नाहीं असें

नाहीं. आमच्या मतें प्रस्तुतचा हा निर्बंध अगदीं अन्यायाचा आहे. तो, कायदा बदलून, काढून टाकण्याची खटपट सुशिक्षित स्त्रियांनीं अगदीं अवश्य केली पाहिजे.

अशा आणखी कांहीं किरकोळ सुधारणा करून घेणें जरूर आहे. उदाहरणार्थ, असा एक निकाल आहे, कीं, नवऱ्यानें जर आपल्या मृत्युपत्रांत असें लिहून ठेवलें असेल, कीं, तिनें माझ्या घराच्या आंतच राहावें, व बाहेर गेल्यास तिला पोटगी देऊं नये, तर मग ती शर्त तिनें विशेष कारण असल्या-वांचून मोडूं नये. याचा अर्थ असा, कीं, जें ह्मणणें वीरांच्या तोंडीं चालत नाहीं असें प्रिव्ही कौन्सिलनें ठरविलें आहे, तेंच ह्मणणें नवऱ्याच्या मृत्युपत्रांत असलें ह्मणजे मात्र ब्रह्मलिखित ठरतें! तिनें अयोग्य कारणाकरितां बाहेर राहूं नये हा नियम नवऱ्याच्या मृत्युपत्रांतील शर्तीलाहि लागला पाहिजे.

एवंच काय, तर सारी इस्टेट हातची जाऊन फक्त पोटगीच्या अल्प तुकड्यावर संतुष्ट रहावें लागतें अशी आज विधवेची कायदेशीर स्थिति आहे. हल्लींची वहिवाट अशी आहे, कीं, पोटगीची रक्कम कोर्टांतून देखील फारच अपुरी ठरून मिळते. एका गृहस्थाची सर्व इस्टेट चाळीस हजार असून देखील, हायकोर्टानें त्याच्या विधवेस पोटगी फक्त दरमहा चाळीसच रुपये देवविली! ह्मणजे चाळीस हजार जर चार टक्यानें व्याजीं लावले असते तर दरमहा १३३ रु. आले असते, तरी विधवेला फक्त ४० च! जेथें सर्व मालकी पुरुषांची, आणि स्त्रिया ह्या फक्त आश्रित, अशी सररहा समजूत आहे, तेथें त्या स्त्रिया विधवा झाल्यावर त्यांना त्यांचें सर्व उत्पन्न पोटगी ह्मणून द्यावें अशी प्रवृत्ति कोठून असावी?

अर्थात् स्त्रियांनीं खटपट करून आपणाला आश्रितापासून मालकाच्या दर्जास चढवण्याची तजवीज केली पाहिजे. ह्मणजे पहिल्यानें निदान सर्व उत्पन्न तरी पोटगीदाखल देण्यास कोर्टें तयार होतील.

अखेर सगळ्याचा इत्यर्थ असा निघतो, कीं, स्त्रीच्यामागें पोटगी हा शब्द जणूं काय हात धुवून लागला आहे. कुमारीला काय मिळणार, तर पोटगी! सुवासिनीला काय मिळणार, तर पोटगी! विधवेला काय मिळणार, तर केवळ पोटगीच!' मिळून जिकडेतिकडे

पोटगी! पोटगी!! पोटगी!!!

---

प्रकरण सहावें.

## विधवाधन!

येथपर्यंत स्त्रियांची सर्वसाधारण कायदेशीर स्थिति थोडक्यांत वर्णन केली. वास्तविक पाहिलें तर कुमारिका, सुवासिनी, व विधवा अशा तिन्ही स्थितींचें वर्णन केलें ह्मणजे सर्व भाग आटोपला असें एका दृष्टीनें ह्मणण्यास हरकत नाहीं. तथापि आणखीहि कांहीं किरकोळ किंवा नैमित्तिक बाबींचें विवेचन करणें जरूर आहे.

प्रथमतः त्या बाबी कोणत्या हें अगोदर स्पष्टपणें सांगणें अवश्य आहे. कारण त्या बाबींच्या वेळीं स्त्रियांच्या हातीं विशेष हक्क असतात असें भास-विण्याचा कांहीं प्रतिपक्षाकडून प्रयत्न होण्याचा संभव आहे. पहिली बाब ही, कीं, ज्या वेळीं कांहीं विशेष कारणांमुळें विधवास्त्रीच्या हातीं सर्व इस्टेट येत असते त्या वेळीं तिला पुष्कळच ज्यास्त अधिकार प्राप्त होत असतात. ह्मणजे ज्यास्त स्पष्ट शब्दांत सांगावयाचें तर, ज्या वेळीं पुरुष मालक कोणी हयात नसल्यामुळें एखाद्या विधवेच्या हातीं इस्टेट येते, व तिच्या मृत्यूपर्यंत ती इस्टेट तिच्यापासून जात नाहीं त्या वेळीं, तिची कायदे-शीर स्थिति काय असते? दुसरी बाब म्हणजे स्त्रीळा

दत्तक घेण्याचा अधिकार असतो त्या वेळीं; आणि तिसरी बाब अशी, कीं, हिंदु लॉमध्यें स्त्रीधन म्हणून मोटें विवेचन केलेलें असतें त्यासंबंधीं खरी स्थिति काय आहे?

प्रस्तुत प्रकरणांत आपण पहिल्या बाबीचा विचार करूं. इंग्रजी पुस्तकांमध्यें या बाबीला "Woman's estate in property inherited from males" ह्मणजे "पुरुषांपासून वारशाच्या हक्कानें जी मिळकत एखाद्या स्त्रीकडे येते त्या वेळीं त्या मिळकतीवर तिचा किती अधिकार असतो तो" असें नांव देतात. आमच्या मुंबईइलाख्यांत अगदीं क्वचित् प्रसंगीं पुरुषापासून स्त्रीला इस्टेट मिळत असते, हें मागें सांगितलेंच आहे. ते क्वचित् प्रसंग ह्मणजे सर्व पुरुष—मालक नष्ट झाले असतां शेवटच्या पुरुष—मालकाच्याच फक्त मुलीला अथवा त्याच्या बहिणीला इस्टेट मिळत असते ते होत. त्या प्रसंगीं मुलगी अथवा बहीण या नात्यानें जी इस्टेट एखाद्या स्त्रीच्या हातीं येते त्या इस्टेटीवर तिची बहुतेक पूर्ण मालकी असते, हें कबूल करणें भाग आहे. त्या इस्टेटीची हवी तशी वासलात लावण्याचा मुलीला अथवा त्या बहिणीला हक्क असतो. "बहुतेक पूर्ण" ह्मणण्याचें कारण इतकेंच, कीं, सदरहू इस्टेटीसंबंधानें देखील तिचे पतिराज आपल्या नवरेपणाच्या सार्वत्रिक अधिकाराच्यामुळें तिजवर ताबा चालवूं शकतात असा कायदा आहे. पण नवऱ्यावांचून इतर कोणाचाहि तिजवर त्या इस्टेटीसंबंधानें ताबा नसतो हें खरें आहे. मात्र मुलीला अथवा बहिणीला इस्टेट येण्याचे प्रसंगच फार विरळा असतात हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे.

दुसरी गोष्ट अशी लक्ष्यांत ठेवली पाहिजे, कीं, ही जी विशेष सवलत मुलीला अथवा बहिणीला दिली आहे ती फक्त मुंबईइलाख्यापुर्तीच आहे. बंगालमधल्या मुलींनां व बहिणींनां ती सवलत मुळींच नाहीं. मुंबईइलाख्याशिवाय बाकी कुठेंच हिंदुलॉनें ती सवलत त्यांनां ठेवलेली नाहीं.

ह्मणून पुरुषांकडून वारशानें इस्टेट मिळते ती फक्त विधवेलाच मिळते—किंवा सुवासिनी मुलीला अथवा बहिणीला जरी मिळाली तरी मुंबईशिवाय करून तिचे अधिकार विधवेप्रमाणेंच असतात. यामुळें सदर्हू प्रकारच्या इस्टेटीला अर्धवट स्त्रीधन असें कोठें कोठें ह्मणतात; तसें न ह्मणतां अशा इस्टेटीला "विधवाधन" ह्मणजे Widow's estate असें नांव देणें सयुक्तिक होईल असें आम्हाला वाटतें.

हें विधवाधन एखाद्या विधवेच्या हातीं येतें तरी केव्हां, तें आतां पाहूं.

मागें सांगितलें आहेच, कीं, एखाद्या एकत्र कुटुंबांतील सगळे पुरुष—मालक मरून गेले ह्मणजे शेवटीं नष्ट झालेल्या पुरुषाच्या विधवेला—अथवा तिच्या अभावीं त्याच्या विधवा आईला, किंवा तिच्या अभावीं विधवा सुनेला—अशा एखाद्या विधवा स्त्रीला—सर्व इस्टेट प्राप्त होत असते. आपल्या माधवराव पळनिटकर यांच्या उदाहरणार्थ घेतलेल्या कुटुंबांत जर आपण कल्पिलें, कीं, एखाद्या इन्फ्लुएंझाच्या किंवा प्लेगच्या साथींत सारे पुरुष—मालक एकदम अगर एकामागून एक मृत झाले तर, जो शेवटीं मेला त्याच्या विधवेला, किंवा विधवा आईला, ती सारी तीन लक्षांची इस्टेट—घरेंदारें, शेतेंमळे वाड्यावगीचे, दागदागिनें वगैरे—प्राप्त होईल. आपण अशी कल्पना करूं, कीं, कृष्णराव, रामचंद्रराव, व कृष्णरावांचे सर्व मुलगे मेल्यानंतर शेवटीं गणपतराव मरण पावले. तर मग ती सारी तीन लक्षांची इस्टेट सरूबाईच्या हातीं येईल. ती इस्टेट त्यांनीं घ्यावी, जन्मभर तिचा उपभोग घ्यावा, आणि आपल्या मृत्यूनंतर ती सर्व इस्टेट आपल्याच घराण्यांतल्या दुसऱ्या कोणी विधवा हयात असल्यास त्यांनीं त्यांच्यानंतर उपभोगावी, व नंतर ती इस्टेट माधवरावांच्या दूरच्या घराण्यामध्यें, ह्मणजे, माधवरावांपासून कैक वर्षांमागें विभक्त होऊन कोंकणांत राहात असलेल्या पळनिटकरघराण्यांतील पुरुषांकडे ती इस्टेट जाईल; किंवा सरूबाईनीं कोणाला तरी

दत्तक घेऊन ती सर्व इस्टेट एकदम त्या दत्तक मुलाला द्यावी, व आपण फक्त अन्नवस्त्र घेत रहावें.

ह्मणजे हें उघड झालें, कीं, सगळे पुरुष–मालक झाडून नष्ट झाल्याशिवाय विधवेच्या हातीं कधींच अशी सारी इस्टेट येत नसते. आतां अशी इस्टेट कपिलाषष्ठीसारख्या अत्यंत क्वचित् प्रसंगीं आली असतां देखील सरूबाईंचे त्या इस्टेटीवर किती हक्क आहेत तें पाहूं.

हिंदुलॉ या बाबतींत अत्यंत विलक्षण आहे. स्त्रीच्या हातीं अशी कधींच इस्टेट द्यावयाची नाहीं, तिला फक्त पोटगी काय ती द्यावयाची, असा त्या लॉचा जणूं काय बाणा आहे. पण मध्यंतरी कांहीं कारणानें जणूं काय हिंदुलॉला हुक्की आली, कीं, स्त्रीच्या हातीं एकदां इस्टेट जाते असें ठरवावें; आणि आश्चर्य हें, कीं, त्या हुक्कीच्या वेळीं एखाद्या योग्य व सत्पात्र स्त्रीच्या हातीं इस्टेट देण्याऐवजीं, केवळ विधवेच्या हातीं सर्व इस्टेट देण्याचें त्यानें ठरविलें! हा हिंदुलॉचा अप्रयोजकपणा पाहून आह्मांला एका सोडतीमध्यें विलक्षणपणें झालेल्या बक्षिसांच्या निकालाची आठवण होते. त्या सोडतीमध्यें नाना तऱ्हेच्या जिनसा बक्षिसांकरितां ठेवलेल्या असतांहि, दोन्ही डोळ्यांनीं आंधळ्याला उत्तम सोनेरी चष्मा, बहिऱ्याला ग्रामोफोन, व पांगळ्याला डायमंड लेदरचे बूट, आणि टक्कल पडून डोक्याचा बिलियर्डबॉल बनलेल्याला हस्तीदंती फणी, अशा जिनसा वांटणीला आल्या! त्याचप्रमाणें स्त्रीला सर्व इस्टेट देतांना ती नेमकी विधवेला देण्याचें हिंदुलॉनें ठरविलें, ही योजना तशीच हास्यास्पद झाली आहे. सासूबाईंनीं आल्यागेल्याच्या देखत "मुली, फडताळांत लाडू जिलबी घिवर आहेत ते घेऊन खा" ह्मणावें, पण दुसरीकडे तिजवर डोळे वटारून "खबरदार हात लावशील तर" असें जसें ह्मणावें तसाच प्रस्तुतचा प्रकार होय! बिचाऱ्या विधवेला सर्व इस्टेट एका हातानें द्यावी, व त्याच्या अगोदर तिची सुखोपभोगाची शक्यता नष्ट करून टाकलेली आहे हें जणूं काय आपल्या लक्ष्यांतच नाहीं, असें हिंदुलॉनें ह्मटल्यासारखा हा सारा प्रकार नव्हे काय? ती बिचारी जोंपर्यंत सुखोपभोगसमर्थ होती तोंपर्यंत तिचे हातपाय बांधून निवळ चालू पोटगीवर तिला ठेविली, आणि आतां तिचें खाण्यापिण्याचें तोंड नाहींसें झाल्यावर पंचपक्वान्नांचें ताट तिच्यापुढें ठेवून "बये, खुशाल पोट भरून जेव हो" असें ह्मणणें हास्यास्पद नव्हे काय?

तें कसेंहि असलें तरी, असल्या विधवेच्या हातीं सगळी इस्टेट दिली आहे खरी. अशा स्थितींत तिचे अधिकार काय आहेत ते पाहूं. अशा प्रसंगीं पहिली मुख्य अट विधवेवर अशी लादलेली आहे, कीं, तिनें फक्त त्या इस्टेटीचें सालोसाल जें उत्पन्न येईल त्या सर्वांचा उपभोग घ्यावा. परंतु त्या इस्टेटीपैकीं यत्किंचित्हि भाग विकूं नये किंवा कोणाला दान, बक्षीस वगैरे देऊं नये. जशी दूध खाण्यासाठीं म्हैस दिली ह्मणजे फक्त दूध खावें, आणि ती भाकड झाली ह्मणजे पुनः मालकाची मालकाला परत द्यावी असें असतें, तसेंच येथें आहे. तुझ्या घराण्यांतले सारे पुरुषमालक नष्ट झाले तेव्हां शेवटच्या मालकाची तूं विधवा ह्मणून तूं मालक झालीस, तरी पण, तूं आपल्या हयातीपर्यंत फक्त उत्पन्न तेवढें खा, येवढीच तुझी मालकी. तूं गाड्याघोडीं वापर, मळे बागबगीचे यांतून मौजेनें हिंडूनफिरून फळें खा, फुलांचा वास घे, त्यांच्या माळा करून देवाला घाल, दागदागिने सर्व वापर, जें सर्व कांहीं उत्पन्न होईल तें सारें खुशाल भोग. अट येवढीच, कीं, मूळ इस्टेट जशीच्यातशीच कायम ठेव. ती कोणाकरितां? तर तुझ्या पुरुषांच्या दूरच्या नात्याच्या पुरुषांकरितां! तूं तुझ्या पुरुषाची लग्नाची बायको, अर्धांगी, सहधर्मचारिणी खरी, पण तूं फक्त उत्पन्न खा, आणि जे दूरचे पुरुष ते मात्र सारी इस्टेट तिचे खुशाल मालक बनून खातील!

या हिंदुलॉच्या विलक्षण अटीचा परिणाम एवढाच होतो, कीं, ते जे मागून मालक होणारे पुरुष असतात ते एव्हांपासूनच त्या विधवेकडे डोळे

वटारून पाहूं लागतात. त्या पुरुषांनां हिंदुलॉमध्यें उत्तराधिकारी ह्मणजे विधवेच्या मरणोत्तरचे अधिकारी असें नांव आहे; पण ते बहुशः तिच्या उत्तरकार्यांचीच मार्गप्रतीक्षा करीत रहाणारे असे बनतात ! इतकेंच नव्हे तर "ही विधवा नीट रीतीनें उपभोग घेत नाहीं, इस्टेटीची नासधूस करीत आहे," अशी हांकाटी करीत कोर्टाकडून तिला ताकिदी देण्याकरितां दावे करीत असतात. या उत्तराधिकारी पुरुषांनीं आजपर्यंत विधवाधनाविरुद्ध ( ह्मणजे विधवेच्या हातीं सर्व इस्टेट आली असतां तिचे जे हक्क असतात त्यांविरुद्ध ) नाना तऱ्हेच्या खटपटी केल्या; पण त्यांतल्या बहुतेकांनां यश आलें नाहीं. पहिला घाट त्यांनीं असा घातला होता, कीं, विधवेनें विधवाधनाचा चोख हिशोब ठेविला पाहिजे. पण कोर्टानें ठरविलें, कीं, विधवा ही इस्टेटीची मालकीण आहे, तिनें हिशोब ठेवावा असें तिला फर्मावणारे तुह्मीं कोण ? ती कांहीं तुमच्याकरितां ट्रस्टी देखील नव्हे. अर्थात् उत्पन्नाची ती पाहिजे तशी विल्हेवाट करील. दुसरा घाट असा घातला, कीं, विधवेचें दुर्वर्तन आहे असें ह्मणून तिच्या हातून इस्टेट काढून घ्यावी. पण कोर्टानें ठरविलें, कीं, एखादा मालक दुर्वर्तनी निघाला तरी जसा तो इस्टेटीला अपात्र होत नाहीं तोच नियम विधवा मालक असतांना लागला पाहिजे. अर्थात् विधवेच्या वर्तनावर खोटेनाटे आरोप आणण्याचें एकदम बंद झालें. मात्र सदहू विधवेनें जर धडधडीत पुनर्विवाहच लावला तर पुनर्विवाहाच्या विशेष कायद्यांत सांगितल्याप्रमाणें ती त्या दिवशीं मृत झाली असें समजलें जाईल, व तिच्या उत्तराधिकाऱ्यांनां एकदम ती सर्व इस्टेट मिळेल. परंतु धडधडीत दुर्वर्तन जरी शाबीत झालें, ह्मणजे तिला व्यभिचारानें एखादें मूलबाळ होऊन जरी त्याचें उजळ माथ्यानें ती संगोपन करीत असली तरी, तिच्या हातून इस्टेट काढून घेतां येत नाहीं !

तिनें मालक या नात्यानें सारीं कृत्यें करावीं. सरकारानें किंवा म्युनिसिपालिटीनें तिच्या इस्टेटींतला कांहीं भाग सार्वजनिक कामाकरितां घेतला व त्याबद्दल तिला एकदम ठोक रक्कम दिली तर त्या रकमेवर उत्तराधिकाऱ्याचा हक्क नाहीं, असेंहि ठरलें आहे. तिनें बांध घालावे, धरणें बांधावीं, इमारतीची दुरुस्ती करावी अगर नवीन इमारती बांधाव्या, बागा, मळे तयार करावे, अगर वाटेल तें--पुरुषमालक करील तसें—वर्तन करावें; फक्त इस्टेट विकूं नये, नासधूस करूं नये, उध्वस्त करूं नये, असें ठरलें आहे.

परंतु योग्य उपभोग तो कोणचा व नासधूस ह्मणजे कोणची हा तंटा वारंवार उत्पन्न होणारच. उत्तराधिकाऱ्यांनीं डोळ्यांत तेल घालून बघत रहावें आणि वरचेवर कोर्टाकडे धांवावें आणि त्या विधवामालकिणीनें त्यांनां धाब्यावर बसवावें, असे प्रकार हंमेष चालू असतात. एका मोठ्या बाबतींत उत्तराधिकाऱ्यांनां यश मिळालें ती बाब अशी, कीं, विधवेची नियंत्रित मालकी नुसत्या स्थावर मिळकतीबद्दल नसून जंगम मिळकतीवरहि तितकीच नियंत्रित आहे. ह्मणजे पूर्वीच्या पुरुषमालकाच्या वेळच्या लाख रुपयांच्या प्रामिसरी नोटी असल्या तर विधवेनें फक्त त्यांचें व्याज येईल तें खावें, पण नोटी कायम ठेवल्याच पाहिजेत; दागिने वापरावे, पण ते कायम ठेवावे.

यानंतर मोठा प्रश्न असा निघाला, कीं, उत्पन्न फार येत असलें व तें जर विधवेनें सालोसाल खर्चून न टाकतां शिल्लक टाकलें तर त्यावर मालकी कोणाची ? तिनें शिल्लक टाकलीच पाहिजे असें जरी नाहीं, तरी पण यंदांची शिल्लक तिला चार वर्षांनीं खर्च करावयाला हरकत आहे कीं कसें ? कीं, जी एकदा शिल्लक पडली ती कायमचीच शिल्लक समजावयाची ?

या बाबतींत हिंदुलॉची नेहमींची स्त्रियांविषयींची संकुचित किंवा अन्यायाची दृष्टि पुढें होऊन तिनें जय मिळविला. होतां होईल तोंवर स्त्रिया या अज्ञानी आहेत, त्यांनां इस्टेट देण्याचें कारण नाहीं,पूर्ण मालकी देण्याचें तर मुळींच कारण नाहीं,

असें जें नेहमींचें रडगाणें तेंच येथेंहि लागू ठरलें. विधवेनें आपल्या विधवाधनांतून कांहीं शिल्लक टाकण्याची जरुरी नाहीं हें जरी खरें, तरी जर तिनें शिल्लक टाकली, आणि त्या शिलकींतून कांहीं मिळकत खरेदी घेतली, तर हिंदुलॉ पुढें येऊन आपली नेहमींची अन्यायाची छाप त्या इस्टेटी-वर टाकून असें ठरवितो, कीं, ती इस्टेट थोरल्या इस्टेटीमध्यें दाखल झाली ! अर्थात् ही नवीन घेतलेली मिळकतहि त्या विधवेनें उत्तराधिकाऱ्यां-करितां कायम ठेवली पाहिजे ! मात्र मोठ्या मिनतवारीनें हिंदुलॉनें असें ठरविलें आहे, कीं, सदर्हू इस्टेट पूर्वींच्या इस्टेटींत सामील करण्याची नाहीं अशा तऱ्हेचें वर्तन किंवा अशी भाषा जर त्या विधवेनें वापरली असेल तर मात्र ती नवीन इस्टेट त्या विधवेच्या पूर्ण मालकीची समजावी ! हिंदुलॉ पहिल्याप्रथम ती इस्टेट उत्तराधिकाऱ्यां-करितांच खरेदी घेतली असें गृहीत धरील. पण जर विधवेची तशी इच्छा नाहीं असें विधवेनें शाबीत केलें, तर मात्र तिच्या पूर्ण मालकीची ती ठरेल. ह्मणजे प्रथमत: अनुमान विधवेच्या विरुद्ध करावयाचें, व पुराव्याचा बोजा तिच्या अंगावर टाकावयाचा, असा हा उलटा न्याय आहे !

आमच्या मतें हा धडधडीत अन्याय आहे. जर तिला शिल्लक टाकणें भाग नाहीं तर तिनें सर्व खर्चून टाकलें असें मानून, तिच्या शिलकीवर उत्तराधिकाऱ्यांनीं मुळींच डोळा ठेवूं नये, असें ठरविलें पाहिजे होतें. तिची इच्छा उत्तराधिका-ऱ्यांचा फायदा करण्याची आहे असें मानणें म्हणजे मेंढीची इच्छा लांडग्याचा फायदा करण्याची आहे, असें समजण्यासारखें हास्यास्पद आहे. तिची जर खरोखर इच्छा उत्तराधिकाऱ्यांचा फायदा करण्याची असेल तर ती मिळकत आपल्या मृत्यूपर्यंत कोणाला ह्मणजे तिच्या इष्टमित्राला वगैरे देऊन टाकणार नाहीं; तिच्या मृत्यूनंतर ती उत्तराधिकाऱ्यांनीं घ्यावी. पण प्रथमपासूनच त्या मिळकतीवर डोळा ठेवावा हें न्याय्य कसें ह्मणतां येईल ?

एका खटल्याची हकीगत अशी होती, कीं, विधवेनें आपल्या विधवाधनाच्या शिलकेंतून कांहीं नवीन जमीन विकत घेतली, व ती आपली स्वत:ची मिळकत असें सांगून आपल्याच मुलीला बक्षीस दिली. उत्तराधिकाऱ्यांनीं दावा आणला, कीं, सदर्हू जमीन मुलीच्या मालकीची नाहीं असें ठर-वावें, आणि विधवेच्या मृत्यूनंतर ती आह्माला मिळावी. हायकोर्टानें असा निकाल दिला, कीं, ज्या अर्थीं ती जमीन शिलकीच्या पैशांतून घेतलेली आहे, व विधवेनें आपली ह्मणून लेंकीला दिली आहे, त्या अर्थीं ती अलबत लेंकीची झाली. पण उत्तराधिकाऱ्यांनीं प्रिव्हीकौन्सिलकडे अपील केलें आणि तेथें हायकोर्टाचा निकाल फिरला, व असें ठरलें, कीं, "एकंदर हकीगतीवरून त्या विध-वेचा प्रथम हेतु असा होता, कीं, जमीन सर्व मिळकतींत सामील करावी ! कारण काय ? तर जमीन १८५७ सालीं खरेदी घेतली, आणि सोळा वर्षें गेल्यावर १८७३ मध्यें लेंकीला दिली. आणखी कारण असें, कीं, ती जमीन थोरल्या इस्टेटीला फार सोयीची आहे, सबब थोरल्या इस्टेटीची सोय करण्याचा विधवेचा हेतु असावा ! व तिसरें कारण असें, कीं, बक्षीस देणें ह्मणजे विधवेनें स्वतः उप-भोग घेणें असें होत नसून केवळ उत्तराधिका-ऱ्यांच्या हातून इस्टेट काढून आपल्या खुद्द वार-साला ह्मणजे लेंकीला जमीन देण्याचा हेतु स्पष्ट दिसतो, तो आह्मी चालूं देत नाहीं !" पहा काय चमत्कार आहे तो! धडधडीत शिलकेंतून घेतलेली जमीन स्वतःची ह्मणून लेंकीला दिली, तरी ह्मणे ती जमीन अखेरीला उत्तराधिकाऱ्यांचीच !

दुसऱ्या एका खटल्यांत बाबू नवकुमार मलिक याच्या इस्टेटीचें उत्पन्न ह्मणून रोख दोन लक्ष एकुणनव्वद हजार रुपये त्याची विधवा बदाम कुमारी हिच्या हातीं साध्या करन्सी नोटांनीं मिळाले. ते तसे बिनव्याजी न ठेवतां तिनें प्रॉमिसरी नोटी विकत घेऊन व्याजीं लावले. पुढें वीस वर्षें व्याजाचा उपभोग घेऊन तिनें त्या नोटा आपल्या मुलीचा

मुलग्या याला देण्याकरितां ॲडव्होकेट–जनरल-जवळ दिल्या. त्या तरी तिच्या इच्छेप्रमाणें तिच्या नातवाला मिळणें वाजवी होतें. पण उत्तराधिकाऱ्यानें हरकत घेतली, कीं, या नोटा आमच्या समजल्या पाहिजेत. येथें उत्तराधिकारी कोणी पुरुष नसून सौदामिनी नांवाची नवकुमार मलिकची दुसरी एक मुलगीच होती. सुदैवानें हायकोर्टांत व प्रिव्ही कौन्सिलांतहि बदामकुमारीच्याच ह्मणंजे तिच्या लेंकीच्या मुलाच्या तर्फेचा निकाल झाला.

आह्मी ह्मणतों त्याप्रमाणें प्रथमतः कोर्टानें अनुमान करावें. ह्मणजे विधवेनें शिलकेंतून घेतलेली इस्टेट फक्त तिचीच समजावी. असें अनुमान करावें, असें मद्रास हायकोर्टाचें देखील ह्मणणें दुसऱ्या एका खटल्यांत पडलें. तेथें न्यायमूर्ति सर भाष्यम् आयंगार यांनीं ठरविलें, कीं, जो मनुष्य नवीन इस्टेट आपल्या स्वतःच्या पैशानें विकत घेतो त्याचा हेतु ती इस्टेट आपणा स्वतःकरितांच ठेवून घ्यावयाचा असतो हें ढळढळीत तत्त्व विधवेला देखील लागू असलें पाहिजे. ह्मणून पार्वती अम्मा नांवाच्या विधवेनें आपल्या उत्पन्नाच्या पैशांतून जी इस्टेट घेतली ती तिची स्वतःचीच झाली असून तिच्या उत्तराधिकाऱ्यांकरितां तिनें ती घेतली नाहीं असें आह्मीं ठरवून खालच्या कोर्टाचा हुकूम फिरवितों. ( इं. लॉ. रि. २५ मद्रास, ३५१ ). ही विचारसरणी कलकत्ता हायकोर्टालाहि तत्त्वतः पटल्याचें त्यांनीं एके ठिकाणीं कबूल केलें आहे; तरीहि पण पूर्वीची निकालपरंपरा कायम राखण्याची जबाबदारी त्यांजवर असल्यामुळें तेथें निकाल उफराट्या विचारसरणीप्रमाणेंच झाला. अशा स्थितींत स्त्रियांनीं कायद्यामध्येंच सरळ विचारसरणी गोंवून घेण्याची खटपट करावयाला नको काय ?

आणखीहि एक असाच अन्याय दुसऱ्या एका बाबतींत होत आहे. हल्लीं असा विलक्षण कायदा आहे, कीं, विधवेनें आपली शिलकेची रक्कम आपल्या हातानें कोणास देण्यास जरी हरकत नाहीं तरी तिला ती रक्कम आपल्या मृत्युपत्रानें मात्र कोणास देतां येत नाहीं ! ह्मणजे तिनें जर "माझ्या लेंकीला मी ही माझी शिल्लक देणार होतें, पण ती येथें हजर नसल्यामुळें मला तिच्या स्वाधीन ती रक्कम करतां आली नाहीं. पण माझा आतां घटकेचा भरंवसा नसल्यामुळें मी असें लिहून ठेवतें, कीं, ही सारी रक्कम माझ्या पश्चात् माझ्या लेंकीला द्यावी " असें लिहून ठेवलें तर तें चालत नाहीं ! ह्मणजे जें प्रत्यक्ष विधवेला आपल्या हयातींत करतां येतें तें तिला मृत्युपत्रानें करतां येत नाहीं !

हाहि निर्बंध अन्यायाचा आहे. मी परलोकीं जाण्यापूर्वीं जें स्वतः देऊन टाकूं शकतों तेंच मी आपल्या मृत्युपत्रानें कां देऊन टाकूं शकूं नये ? पुढें होणारें उत्पन्न मी देऊं ह्मणेन तर चालूं नये, हें रास्त आहे. पण माझ्या हयातींतलें, माझ्या प्रत्यक्ष हातीं येऊन पडलेलें, असें उत्पन्न मीं आपल्या हातानें दिलें तर चालतें, पण मीं तें माझ्या पश्चात् माझ्या लेंकीला द्या ह्मटलें तर चालत नाहीं, हें विलक्षण आहे !

याप्रमाणें आणखीहि कांहीं दोष दाखवितां येतील. पण हें प्रकरण फार लांबवण्यांत अर्थ नाहीं. कारण अगोदर विधवाधन शंभर विधवांपैकीं एखाद दुसरीच्याच नशीबांत असणार ! तेंहि पूर्वीं सांगितल्याप्रमाणें खाण्याची शक्ति आधीं काढून टाकली असल्यानंतर मागाहून पंचपक्वान्नांचें ताट तिच्यापुढें ठेविल्यासारखें या बाबतींत आहे ! इतकें असूनहि विधवेचे घास मोजण्यास उत्तराधिकारी डोळ्यांत तेल घालून टपत रहाणारच. अशा स्थितींत त्या बाबतींत जरी सुधारणा करणें जरूर आहे तरी एकंदरींतच त्यांत फारसा तथ्यांश नाहीं ! दुसऱ्या पुष्कळ सुधारणा आधीं करण्यासारख्या आहेत.

सदरहू कपिलाषष्ठीच्या योगाप्रमाणें आमच्या माहितींतल्या एका विधवेला विधवाधन प्राप्त झालें असतां, तिला तिच्या उत्तराधिकाऱ्यांकडून इतका त्रास हरघडी होऊं लागला, कीं, ती एके दिवशीं वैतागून जाऊन संतापानें ह्मणाली "पुरुषासारखे

लांब दाढीमिशावाले तुम्ही पुरुष, आपणाला मोठे पराक्रमी ह्मणवतां, तर बाहेर कुठं पराक्रम करून कां दाखवीत नाहीं ? जगांत पुरुषपणा दाखवायला काय तुह्मांला थोडा वाव आहे ? तो सारा धंदा सोडून, माझ्या हातीं कायद्यानं जें काय थोडंसं दिलं आहे तिकडे टक लावून बसतां, आणि नसत्या भानगडी रोज उपस्थित करून वकिलांची भर करतां, यांत तुह्मांला मोठा पुरुषार्थ कसा वाटतो कोण जाणे !"

हिंदुस्तानांतल्या पुरुषांनीं बायकांनां त्रास देण्याशिवाय दुसरे कोठें कितीसे पराक्रम केले आहेत ?

---

प्रकरण सातवें.

## दत्तक घेण्याचा हक्क !

वास्तविक ह्मटलें ह्मणजे दत्तकाचा प्रसंग येणें ह्रा मुळीं दुर्दैवाचाच खेळ आहे. जिला स्वतःची पुत्रसंतति झाली नाहीं व होण्याची आशाहि राहिली नाहीं, तिच्यावरच दत्तक घेण्याचा प्रसंग ओढवणार. त्यामुळें दत्तकासंबंधानें सर्व स्त्रीजातीला हिंदुलॉनें विशेष हक्क दिले आहेत असें ह्मणणेंच रास्त नाहीं. शंभर स्त्रिया घेतल्या तर त्यांतल्या दहांनां तरी त्या हक्काची बजावणी करण्याची पाळी येईल कीं नाहीं याचा वानवाच आहे. तरी पण या संकटप्राय बाबतीमध्यें तरी हिंदुलॉनें स्त्रीजातीला किती हक्क दिले आहेत, व त्यांतले किती कमी झाले आहेत, तें आतां थोडक्यांत पाहूं.

'पुरुष व स्त्री या उभयतांनीं विवाह करून पुत्रप्राप्तीची पुष्कळ दिवस अपेक्षा करून ती निष्फळ झाली ह्मणजे मग, दत्तक पुत्र निर्माण करण्याचा विचार सुरू होतो. औरस पुत्र उत्पन्न करण्याच्या कामापैकीं बहुतेक भाग परमेश्वरानें जसा स्त्रियांकडे दिला आहे, तसाच दत्तक पुत्र उत्पन्न करण्याचा बहुतेक बोजा कायद्यानेंहि स्त्रियांकडे सोंपविणें अगदीं न्यायाचें झालें असतें. पण जेथें औरस पुत्र उत्पन्न करण्याचें काम परमेश्वरानें स्त्रियांकडे दिल्याबद्दलच पुरुषांचा परमेश्वरावर जणूं काय राग झालेला असावासें दिसतें, तेथें ती परमेश्वराची चूक दत्तकाच्या बाबतींत तरी दुरुस्त करण्याचें पुरुषांनीं, व त्यांनींच घडविलेल्या हिंदुलॉनें, ठरवावें हें आश्चर्यकारक नव्हेच ! हिंदुलॉ स्पष्ट असें सांगतो, कीं, दत्तक पुत्र बनविण्याचा अधिकार फक्त पुरुषाचा, त्यांत त्यानें आपल्या स्त्रीचा विचार घेण्याचें कारण मुळींच नाहीं. त्याच्या मनास येईल तो मुलगा त्यानें खुशाल दत्तक घ्यावा ! इतकेंच काय, हिंदुलॉ स्पष्ट आणखी असें सांगतो, कीं, अमुक मुलगा दत्तक घ्यावयाचा नाहीं असा जरी बायकोचा आग्रह असला, व ती जरी त्याबद्दल अत्यंत निषेध करीत असली, तरी तिला लाथेनें दूर सारून नवऱ्यानें आपला आग्रह अमलांत आणावा ! जणूं काय मुलगा फक्त बापालाच व्हावयाचा, आणि आईला मुळींच नव्हे ! याचा अर्थ असा, कीं, बाप एकटा इस्टेटीचा मालक असतांना जेव्हां त्याला दुसरा कोणी पुरुषमालक उत्पन्न करावयाचा असतो त्या वेळीं एकट्या पुरुषानें आपल्या मर्जीप्रमाणें वागावें, व आईनें निमूटपणें त्या नव्या पुरुषभागीदाराला मान्य करावा ! पुढेंमागें तो मुलगाच एकटा मालक होणार हें धडधडीत दिसत असतें. कारण बापाचा वृद्धापकाळ झाल्यावांचून, अथवा तो मृत्युशय्येवर पडलेला असल्यावांचून, कोणी कधीं दत्तक घेत नसतो हें उघड आहे. आणि या दत्तकपुत्राच्या हातीं सारी सत्ता जाऊन अन्नवस्त्राकरितां त्याच्या तोंडाकडे आपणाला पहावें लागणार, असें असूनहि त्याला उत्पन्न करण्याच्या वेळीं आईला कांहींएक हक्क नाहीं !

आणखी एक मौज पहा. ज्याप्रमाणें पुरुषाला मुलगा प्रिय असतो त्याप्रमाणें स्त्रीला मुलगी प्रिय

असते. हा जात्यभिमान रास्तच आहे. अपत्य झालें नाहीं ह्मणजे पुरुषाला जशी पुत्राची लालसा होते तशी स्त्रीलाहि कन्येची होणें साहजिकच आहे. ही गोष्ट ओळखून पूर्वीच्या ऋषींनीं पुत्राप्रमाणें कन्याहि दत्तक घ्यावी, अशी आज्ञा लिहून ठेवली आहे. पण स्त्रीला सर्व तऱ्हेनें दाबून टाकावयाची हाच जेथें मुख्य हेतु, तेथें बिचाऱ्या ऋषींनांहि पुरुषांनीं धाब्यावर बसविलें आहे. कन्यादानाचें पुण्य पदरीं बांधून घेण्याकरितां हपापलेले बाप आपल्या बायकोच्या पोटच्या कन्येचें मात्र आपल्या मर्जीप्रमाणें दान करून टाकण्याचा अधिकार बळकावतात; पण कन्यादानाकरितां कन्या दत्तक घ्या आणि मलाहि संतुष्ट करा असें जरी बायको ह्मणत असली तरी तिचें कोण चालूं देतो ? अर्थात् पुरुषांनीं आपलाच हेका चालविल्यामुळें ऋषींची आज्ञा बाजूला राहून, कन्या दत्तक घेण्याची रूढि देखील नामशेष झाली, व आतां तर हिंदुलॉमध्यें कन्या दत्तक घेण्याचा प्रश्न फक्त वेश्यांपुरताच लागू आहे, असें ठरलें आहे ! वेश्यांवर सत्ता चालविणारा जर कोणी पुरुष असता तर त्यांचाहि हा हक्क असाच नाहींसा झाला असता ! केवळ त्या स्वयंसिद्ध असल्यामुळेंच तो अजून कायम राहिलासा दिसतो !

वास्तविक कायदा असा पाहिजे, कीं, दत्तक पुत्र आणि दत्तक मुलगी उत्पन्न करण्याचा अधिकार दोघांनीं एकमेकांच्या विचारानें बजवावा. फार तर मुलाच्या वेळीं बापाच्या मताला ज्यास्त मान द्यावा, आणि मुलीच्या वेळीं आईच्या मताला ज्यास्त मान मिळावा. पण सारा अधिकार माझाच व तू निवळ माझी आश्रित हीच जेथें भावना, तेथें न्यायाचा विचार कोण लक्ष्यांत आणतो ?

पतिराज हयात असेपर्यंतचा येथवर विचार झाला. त्यांच्या पश्चात् त्यांच्या विधवेला तरी कायदा दत्तक घेण्याची पूर्ण मोकळीक देतो काय ? तिला अर्धांगी ह्मणावयाला मात्र तयारी, पण तें अर्धें अंग मागें राहिलें तर त्याला योग्य वाटेल तसा दत्तक घेण्याचा अधिकार मुळींच नाहीं. पतिराजांनीं मरतांना जे हुकुम दिले असतील ते तर अलबत तिनें पाळलेच पाहिजेत. त्यांच्याबाहेर काडीमात्र देखील जाण्याचा तिला हक्क नाहीं.

क़ायद्याची मेहेरबानगी एवढीच आहे, कीं, पतींच्या निधनानंतर त्यांना पुत्र उत्पन्न करण्याचा अधिकार त्यांच्या भावाला किंवा बापाला वगैरे कोणा पुरुषाला न देतां, तो त्यांच्या अर्धांगीला मात्र दिलेला आहे. पण येथेंहि तो जणूं काय अत्यंत नाखुशीनें, केवळ नाइलाजास्तवच, दिला आहे असें उघड होतें. कारण सर्वसाधारण हिंदुलॉ असा आहे, क़ीं, जर नवऱ्यानें आपल्या बायकोला स्पष्टपणें तसा अधिकार देऊन नंतर परलोकाची वाट धरली असेल तरच त्या अर्धांगीला दत्तक घेतां येतो. या वचनाचा निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळा अर्थ करण्यांत आला आहे, व त्यामुळें प्रत्येक इलाख्याचा कायदा भिन्नभिन्न आहे. बंगाल व बनारसमध्यें असें ठरलें आहे, कीं, नवऱ्याची स्पष्ट आज्ञा नसेल तर विधवेला दत्तकच घेतां येत नाहीं. मद्रास वगैरे द्रविड देशांत असें ठरलें आहे, कीं, नवऱ्याची अनुज्ञा नसली तर विधवेनें नवऱ्याच्या सर्व सपिंड भाऊबंदांच्या परवानगीवांचून दत्तक घेऊं नये. आमच्या महाराष्ट्रांत असें ठरलें आहे, कीं, नवऱ्याची जरी स्पष्ट अनुज्ञा नसली तरी ती केवळ हयगयीनें द्यावयाची राहिली असें मानून अनुज्ञा आहेच असें समजावें. पण जेथें एकत्र कुटुंब असेल व दत्तकामुळें दीरापुतण्यांचें नुकसान होणार असेल तेथें त्या दीरांपुतण्यांची स्पष्ट परवानगी असल्यावांचून तिनें दत्तक घेऊं नये ! या शेवटल्या अटीचा अर्थ असा होतो, कीं, मेंढीनें लांडग्याकडून परवानगी मिळवावी तेव्हां पुढें पाऊल टाकावें ! दत्तक घेतल्यामुळें बंधूची इस्टेट गिळंकृत केलेली पुनः ओकावी लागण्याचा ज्या दीरांवर प्रसंग येणार त्या दीरांकडे विधवेनें दत्तकाची परवानगी मागण्यास जावें हें किती विलक्षण आहे, याचा

विचार करावा ! या सगळ्यांच्याहि वर कडी मिथिल प्रांताच्या हिंदुलॉनें केली आहे. कारण तेथें असें ठरलें आहे, कीं, नवऱ्यानें स्पष्ट परवानगी दिलेली असली तरी देखील विधवेला दत्तक घेण्याचा हक्क नाहीं, तो हक्क फक्त खाविंद नवरोजीपंतांचाच आहे ! !

अशा स्थितींत हें आणखी उघडच आहे, कीं, सर्व हिंदुस्तानभर एकमतानें असा कायदा आहे, कीं, जेथें नवऱ्यानें दत्तक घेण्याची स्त्रीला बंदी करून ठेविली असेल तेथें तर तिला दत्तक घेतां येणारच नाहीं ! त्याचप्रमाणें एकदा जरी परवानगी दिली तरी ती अगदीं ब्रह्मलिखित झाली असें समजूं नये, कारण दत्तविधान घडून येईपर्यंत ती परवानगी पाहिजे तेव्हां परत घेण्याचा सररहा अधिकार हिंदुलॉनें नवऱ्याला राखून ठेवलेला आहे.

पण एवढ्यानेंच बिचाऱ्या विधवेचें नष्टचर्य संपतें असें नाहीं. नवऱ्याकडून आपण लेखी आज्ञा मिळविली आहे एवढ्यावर ती जर अवलंबून राहील तर तिला खड्ड्यांत पडण्याचे आणखी कितीतरी प्रसंग आहेत. कारण असा एक कायद्याचा विचित्र नियम आहे,कीं, इस्टेट एकदां तिऱ्हाइताच्या हातीं पडली ( ह्मणजे प्रत्यक्षपणें नव्हे हो, नुसती कायद्याच्या दृष्टीनें ) ह्मणजे लगेच विधवेचा दत्तक घेण्याचा हक्क नष्ट होतो, मग नवऱ्यानें जरी सतरा आज्ञा दिल्या असल्या तरी नवऱ्याचेंहि चालेनासें होतें ! कारण नवऱ्यापेक्षां इतर भाऊबंदांच्या हितसंबंधाला धक्का लागतो, ह्मणून नवऱ्याची स्पष्ट आज्ञा देखील ते धाब्यावर बसवूं शकतात ! हे प्रसंग अनेक आहेत ते येथें सांगत बसणें केवळ अशक्य आहे, ह्मणून तो प्रयत्न सोडून आपल्या मुख्य हेतूकडे वळावें हें ठीक आहे.

विधवेनें दत्तक घेऊं नये असा दूरच्या भावा बंदांचा नेहमीं इरादा असणारच. यामुळें ते अनेक तऱ्हांनीं तिला बंदी करण्याला प्रयत्न करीत असतात; इतकेंच नव्हे, तर तिनें आपल्या नवऱ्याच्या आज्ञेप्रमाणें अत्यंत प्रामाणिकपणानें जरी दत्तक घेतला असला तरी तो दत्तक रद्द करून घेण्याकडे तिचे पुरुष–भाऊबंद आपलें तनमनधन खर्ची घालीत असतात. ज्या दत्तविधानावरून बरीचशी इस्टेटीची उलटापालट होणारी असते असलें दत्तविधान दोनचार कोर्टांत शहानिशा झाल्यावांचून कायम होणें केवळ अशक्य झालें आहे. या शहानिशेमध्यें इस्टेटीचा मुख्य मालक जो त्या विधवेचा पति, त्याच्या इच्छेला कोणीच महत्त्व देत नाहीं, मग त्या विधवेच्या इच्छेची तर केवळ पायमल्लीच होत असेल यांत आश्चर्य काय? जोंपर्यंत लढण्याला द्रव्यसामर्थ्य आहे तोंपर्यंत लढण्याला कायदेशीर कारणें उकरून काढण्यांत भाऊबंद व त्यांचे वकील शिकस्त करीत असतात. यामुळें दत्तकप्रकरणाला भयंकर फाजील महत्त्व येऊन बसलें आहे. स्त्रियांनीं याहि बाबतींत पुढाकार घेऊन स्त्रीजातीची अशी मायमल्ली होण्याला आळा घातला पाहिजे. मात्र हें काम कोर्टांत दावे मांडून होणारें नसून कायदेकौन्सिलांकडून न्यायाचे कायदेच करून घेण्यानें फक्त होणारें आहे.

स्त्रियांच्या हक्कांची या दत्तकाच्या बाबतीमध्यें हल्लीं जी भयंकर पायमल्ली होत असते ती चुकविण्याला हल्लींच्याच कायद्यांत कांहीं मार्ग आहेत; पण त्यांची स्त्रियांना जरूरीच्या वेळीं कोणी नक्की माहिती लागूं देत नाहीं. यामुळें हल्लींच्या कायद्यांतच कांहीं युक्त्याप्रयुक्त्या त्यांच्या हिताच्या असूनहि ऐन वेळीं स्त्रियांना त्यांचा उपयोग करून घेतां येत नाहीं. माझी अशी खात्री आहे, कीं, त्या युक्त्यांची जर विधवांना बरोबर माहिती कोणीं दिली असती तर, आपणाला त्रास देणाऱ्या उत्तराधिकाऱ्यांपासून कांहीं अंशीं तरी त्यांना स्वतःचा बचाव करून घेतां आला असता; आणि दत्तविधान एकदां केलें ह्मणजे, तो दत्तक मुलगा मात्र पूर्ण मालक, आणि त्याला या नव्या घराण्यांत जन्म दिलेली त्याची दत्तक आई तेवढी चतकोर भाकरीची मालक, असा जो शोचनीय प्रकार हमेशा घडून येतो, तो सहज टाळतां आला असता. त्या युक्त्या आतां थोडक्यांत सांगूं.

पहिली युक्ति अशी आहे, कीं, विधवांच्या हातीं या बाबतींत सत्याग्रह करण्याची कायद्यानें सवलत ठेविली आहे. नवरा फार तर दत्तक घ्यावा अशी आज्ञा करून जाईल, आणि त्याचे भाऊबंद फार तर दत्तक लौकर घ्या, दत्तक लौकर घ्या, अशी तोंडानें हाकाटी करतील. पण दत्तक घ्यावयाचा कीं नाहीं हें पूर्णपणें विधवेच्या हातीं आहे. नवऱ्यानें आज्ञा दिली ह्मणजे विधवेनें ती तावडतोब पाळलीच पाहिजे, असें नाहीं. तिला योग्य वाटेल त्याच वेळीं ती अमलांत आणण्याचा तिचा हक्क आहे. तूं आजच दत्तविधान कर अशी फार तर त्या दत्तक होणाराच्या बापानें सल्ला द्यावी, पण विधवेनें दत्तक घेतलाच पाहिजे अशी तिच्यावर जबरदस्ती कोणाचीच चालत नाहीं. जेथें विधवेच्या हातीं मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें सर्व इस्टेट आलेली असते तेथें ती तशीच राहूं देणें हें तिच्या फार फायद्याचें असतें. अशा वेळीं दत्तक जितक्या उशीरां ती घेईल तितकें तिचें महत्त्व वाढणारें असतें, व जितक्या लवकर घेईल तितकें तें कमी होणारें असतें. नवऱ्यानें किती बरी सल्ला देण्याकरितां ट्रस्टी अगर सल्लामसलतदार नेमले असले तरी, आपणावर ते जबरी करूं शकत नाहींत हें तिनें पक्कें लक्ष्यांत ठेवावें. कोणी विशेष त्रास देऊं लागले तर "मला साफ दत्तकच घ्यावयाचा नाहीं" असें स्पष्ट सांगून टाकलें ह्मणजे त्यांचा त्रास कमी होईल. ट्रस्टीमंडळी विशेषच हट्टी व आडदांड असली तर, एखाद्या फौजदारी कोर्टाकडे दाद मागितली तर सहज मिळण्यासारखी आहे. नवऱ्यानें दिलेल्या परवानगीला इतर लोक कोणीहि जुमानीत नाहींत हें त्यांच्या वर्तनावरून उघडच होतें. पण त्या परवानगीबरहुकुम विधवेवर मात्र ते तावदारक्या झाडीत असतात, कीं, तूं दत्तक घेतलाच पाहिजेस, नाहीं तर आह्मी असें करूं तसें करूं, यंव करूं त्यंव करूं. पण हा धाकदपटशा अगदीं फुकट आहे. विधवेवर दत्तकाच्या बाबतींत कायद्याची जबरी मुळींच नाहीं. तिच्या मर्जीस येईल तेव्हां तिनें दत्तक घ्यावा असें कायदा ह्मणतो. याप्रमाणें जर विधवा बाई ठाम उत्तर देऊं लागेल, तर तिजवर तावदारक्या झाडणारेहि चांगले नरम येतील. पण हा कायदा तिला माहीत नसल्यामुळें ती बिचारी गाय होऊन त्यांच्या हुकुमाप्रमाणें एकाद्या शेंबड्या पोराला दत्तक घेते, आणि त्याचा परिणाम असा होतो, कीं, तिचे सर्व अधिकार नष्ट होऊन तें शेंबडें पोर इस्टेटीचें मालक, ट्रस्टी हे त्याचे व्यवस्थापक, आणि बिचारी दत्तक घेणारी आई मात्र चतकोर भाकरीची धनी बनते !

दुसरी युक्ति त्याहूनहि चांगली आहे. नवऱ्यानें अमुक मुलगा तूं दत्तक घे अशी आज्ञा केली आहे अशी आपण कल्पना करूं. अशा वेळीं त्या मुलाशिवाय दुसऱ्या मुलाला तिला दत्तक घेतां येत नाहीं, हें खरें आहे. कारण नवऱ्यानें जशी परवानगी दिली असेल तेवढीच तिची मर्यादा असते. 'नारायणाला घे' असें सांगितलें असतां 'लक्ष्मणाला' तिला घेतां येत नाहीं. पण नारायणाला मात्र तिनें दत्तक घेतलाच पाहिजे असें नाहीं. त्याचप्रमाणें, नारायणाला दत्तक घेतांना त्याच्याशीं किंवा त्याच्या जनक बापाशीं पाहिजे तसे करार करून घेतां येत नाहींत असेंहि नाहीं. तसे करार करून ठेवण्याची हिंदुलॉनें विधवेला मुभा ठेविली आहे. उघडच आहे, कीं, नारायणाच्या जनक बापाला अशी फार इच्छा असणार, कीं, आपल्या मुलाला त्या बाईनें दत्तक घेऊन सर्व इस्टेटीचा धनी करावा; पण 'घोड्याला नदीवर नेणें जरी कदाचित् तुमच्या स्वाधीन असलें तरी त्याला जबरीनें पाणी पिण्याला लावावयाचें तरी तुमच्या हातीं नाहीं,' अशी जी एक इंग्रजींत ह्मण आहे ती येथें चांगली लागू पडते. मी मुळीं कोणालाच दत्तक घेत नाहीं असा धाक त्या विधवेनें घालूं द्या, कीं, नारायणाचा जनक बाप चटदिशीं नरम येतो व गयांवयां करूं लागतो. असा तो गयांवयां करूं लागला, कीं, विधवेच्या हातीं तो आला असें

समजावें, आणि मग तिला आपणाला पाहिजे त्या शर्ती त्या बापाकडून लिहून घेतां येतात. अशा ऱ्या शर्ती दत्तकाचा जनक बाप त्या विधवेशीं कबूल करील, त्या पुढें त्या दत्तक मुलाला पाळणें कायद्यानें भाग आहे असें ठरलें आहे. दत्तक घेण्याचा मुलगा जर अगोदरच सज्ञान असेल तर हा करार खुद्द त्याच्याशींच करून घ्यावा ह्मणजे ज्यास्त चांगलें, आणि तो करार रजिस्टरहि करून घ्यावा ह्मणजे अगदीं पक्का होईल.

त्या शर्ती तरी कोणत्या प्रकारच्या घालतां येतील? थोडक्यांत सांगावयाचें तर असें ह्मणतां येईल, कीं, दत्तक मुलाचे हक्क अगदीं नष्ट मात्र करून टाकतां येणार नाहींत, पण त्या इयत्तेपर्यंत विधवेला पाहिजे त्या शर्ती खुशाल घालतां येतील. 'मी हयात आहें तोंपर्यंत मी सारी व्यवस्था पाहीन, तोंपर्यंत तुला मी अमुक रक्कम दरमहा खर्चाला देईन त्यांत तूं संतुष्ट राहिलें पाहिजें, माझ्या पश्चात् मात्र तूं सगळा मालक होशील' अशी शर्त खुशाल घालतां येईल. पण 'मी आहें तोंपर्यंत पाहिजे त्याला पाहिजे तितकी इस्टेट मी देऊन टाकीन आणि शिल्लक राहील तर ती तूं घे' असें मात्र ह्मणणें चालावयाचें नाहीं. कारण सगळीच इस्टेट जर विधवेनें आपल्या हयातींत देऊन टाकली तर दत्तकाला फायदा काय? परंतु 'मी माझ्या लेंकीला निम्मी इस्टेट देईन आणि बाकीच्याचा तूं मालक होशील' असें ह्मटलें तर चालेल. एकंदरींत काय, चार निःपक्षपाती माणसांनां योग्य वाटतील अशा कोणच्याहि शर्ती कायदेशीर ठरतील.

याप्रमाणें विधवेला शर्ती घालतां येतात व दत्तक मुलाच्या जनक बापानें त्या शर्ती कबूल करून दत्तविधान केलेलें असल्यास त्या शर्तींनीं तो दत्तक मुलगा बांधला जातो, असा कायदा ठरला. त्यासंबंधाची हकीगत मजेदार आहे. रंगास्वामी ऐयर नांवाच्या गृहस्थानें आपली बायको विशालाक्षी इजला एका पांच वर्षांच्या शिवराम नांवाच्या मुलाला दत्तक घेण्याची आज्ञा केली होती. त्याप्रमाणें नवऱ्याच्या पश्चात् विशालाक्षीनें शिवराम याला दत्तक घेतला, पण दत्तकाच्या पूर्वी त्याचा जनक बाप शिवराम ऐय्या याच्याशीं असा करारनामा करून घेतला, कीं, "आज मीं तुझा मुलगा दत्तक घेत असल्यामुळें तो माझ्या सर्व इस्टेटीचा वारस होणार आहे. त्यानें माझा सांभाळ करावा. यदाकदाचित् त्याचें व माझें न जुळल्यास आमच्या इस्टेटीपैकीं अमुकअमुक जमिनी ह्मणजे अजमासें निम्मी इस्टेट-जिचें उत्पन्न दरसाल दहा हजार रुपये येतें-तिचा मी माझ्या हयातींत उपभोग घेईन; व माझ्या पश्चात् मात्र त्यांचा उपभोग तूं घ्यावास." असा करार मुलाचा बाप शिवराम ऐय्या यानें करून तो रजिस्टर करून दिल्यामुळेंच विशालाक्षी ही दत्तविधान करण्यास कबूल झाली होती.

पुढें, नेहमीं ठरल्याप्रमाणें, दत्तकाचें व विशालाक्षीचें नीटसें पटेना. ह्मणून दत्तक अजून अज्ञान असतांहि त्याचा जनक बाप शिवराम ऐय्या यानें त्याच्याकडून विशालाक्षीवर दावा करविला, व त्यांत मागणी केली, कीं, विशालाक्षीच्या ताब्यांतल्या निम्म्या इस्टेटी तिजकडून काढून माझ्या ताब्यांत द्याव्या! मुलगा अजून अज्ञानच होता. जनक बापानें स्वतः अगोदर करार लिहून विशालाक्षीची कशीतरी समजूत घालून तिच्याकडून दत्तविधान करून घेतलें, आणि पुढें आपणच आपल्या कराराविरुद्ध दावा लावावयाला तयार झाला, हा त्याचा किती नीचपणा पहा! ज्या आईच्या मांडीवर आपला मुलगा दिला, त्याच आईच्या डोक्यावर मुलाच्या नांवानें लाथा झाडावयाला त्या नीचाला यत्किंचित्हि शरम वाटली नाहीं!

या दाव्यांत प्रथमच्या कोर्टांत असा ठराव झाला, कीं, बापानें लिहून दिलेल्या करारनाम्यावरून दत्तक मुलगा बांधला जात नाहीं, सबब विशालाक्षीकडून सगळ्या जमिनी हिसकावून घ्याव्या. विशालाक्षीनें हायकोर्टांत अपील केलें. तेथें हि सर सुब्रह्मण्य ऐय्यर चीफ जस्टिस व दुसरे एक

युरोपियन जज–जस्टिस् वेन्सन्–यांनां असें वाटलें, कीं, एकदा दत्तविधान झालें ह्मणजे तो मुलगा जणूं काय औरस मुलगा बनला, आणि तसा तो बनल्यावर त्याच्यापासून निम्मी इस्टेट विधवेला कशी ठेवण्याचा हक्क प्राप्त होणार? या व दुसऱ्या अनेक विचारांनीं त्या दोघां जज्जांच्या मनांत संदेह उत्पन्न झाला. परंतु आपणच एकदम निकाल न करतां त्यांनीं तो खटला पूर्ण विचाराकरितां फुलबेंचाकडे पाठवून आपला अभिप्राय त्या विधवेच्या विरुद्ध आहे, असा शेराहि मारून ठेवला.

पुढें, फुलबेंचांत तिघे जज्ज बसले. त्यांत जस्टिस् वेन्सन् मात्र पूर्वींच्यांतले असून दोन निराळेच आणखी जज होते. त्या तिघांपुढें पुनः वकिलांच्या तकरारी झाल्या आणि जस्टिस् वेन्सन् यांनीं प्रांजलपणें कबूल केलें, कीं, आपला पूर्वींचा अभिप्राय त्या नवीन तकरारी ऐकल्यावरून बदलून गेला. त्या दुसऱ्या दोघां जज्जांचाहि तसाच अभिप्राय पडून तिघांहि जज्जांनीं एकमतानें निकाल दिला, कीं, शिवराम ऐय्या यानें दत्तविधानाच्या पूर्वीं विशालाक्षीशीं जो करार केला तो अगदीं रास्त असून, अशा करारानें दत्तक मुलगाहि बांधला जातो! अर्थात् विशालाक्षीच्या ह्मणण्याप्रमाणें निम्मी इस्टेट तिच्यां हयातीपर्यंत तिच्याच जवळ राहावयाची, असें ठरून विशालाक्षीनें जय मिळविला! ( इं. लॉ. रि. २७ मद्रास, ५७७. )

याच अर्थाचा ठराव मुंबई हायकोर्टानें मुंबईचे सुप्रसिद्ध जगन्नाथ शंकर शेटजी यांच्या घराण्यांतील एका दत्तविधानासंबंधानें दिलेला होता त्याची मद्रास हायकोर्टानें पसंती लिहून ठेवली आहे. यावरून आतां हें उघड आहे, कीं, विधवेनें दत्तक घेण्यापूर्वीं आत्मसंरक्षणाकरितां योग्य असे करारमदार भावी दत्तकपुत्राशीं नीटपणें करून घ्यावे, आणि तसे करून मिळेपर्यंत दत्तविधानच करण्याचें साफ नाकारावें! नाक दाबल्याशिवाय तोंड उघडत नाहीं! आणि नाक दाबण्याचें जर आपल्या हातीं आहे तर आत्मसंरक्षणाकरितां तें दाबल्याशिवाय कधींहि राहूं नये! पुढेंमागें मुलगा आपणाशीं भांडला नाहीं तर आईला भांडावयाची हौस थोडीच आहे? पण जर जनक घराण्यांतल्या माणसांच्या चिथावणीनें तो आपणास त्रास देऊं लागला, तर त्याची शेंडी आगाऊच आपल्या हातीं घट्ट आणून ठेवलेली असावी!

ह्या कायद्याचा पेंच माहीत नसल्यामुळें कितीक तरी बिचाऱ्या विधवास्त्रिया विनाकारण नाडल्या जातात! आधींच बिचाऱ्यांवर देवानें आग पाखडलेली असते, त्यांत आणखी पैशाच्या लोभानें शिवराम ऐय्यासारखे नीच जनकबाप त्यांच्या हात धुवून पाठीस लागतात! या वेळीं माझ्या डोळ्यांपुढें एका महात्म्याच्या दीन विधवा स्त्रीची मूर्ति स्पष्ट उभी राहत आहे! असा करार करून घेण्याची तिला कोणीं सल्ला वेळींच न दिल्यामुळें कितीतरी त्या सुशील स्त्रीचे धिंडवडे झाले! या पुस्तकानें एखाद्या दीन स्त्रीला जरी थोडासा उपयोग झाला तरी माझ्या श्रमाचें सार्थक झालें असें मी मानीन!

स्त्रियांनां दत्तक घेण्याची जी कायद्यानें मुभा ठेवलेली आहे तिला 'हक्क' ह्मणणें हें एका दृष्टीनें फार चमत्कारिक आहे. दत्तक घेतल्याबरोबर विधवेच्या हातची सर्व इस्टेट जाऊन दत्तकमुलगा मालक व ती निवळ पोटगीची धनीण होते. अशा स्थितींत दत्तक घेणें ह्मणजे आपलें स्वातंत्र्य गमावून आपणाला नवीन मालक उत्पन्न करणें होय. गाईनें रानांत स्वच्छंदानें चरत न हिंडतां आपल्या गळ्यांत दावें बांधणारा गुराखी उत्पन्न करणें याला त्या गाईचा 'हक्क' ह्मणणें, ह्मणजे कैद्याला त्याच्या पायांत बेड्या घालून घेण्याचा 'हक्क' कायद्यानें दिला आहे, असें ह्मणण्यासारखें हास्यास्पद नव्हे काय?

---

प्रकरण आठवें.

## स्त्रीधनाचा भोंपळा !

आज आपल्या महाराष्ट्रीयांमध्यें स्त्रीधन ह्मणून स्त्रियांच्या मालकीची अशी कांहीं तरी इस्टेट असते काय, हा प्रश्न जर वाचकांनीं आपल्या मनाला विचारला तर उत्तर काय येईल? मला वाटतें, कीं, स्त्रीधनाच्या नांवानें अगदीं भोंपळयाएवढें पूज्य असतें असेंच उत्तर बहुतकरून सर्वांकडून येईल. नवऱ्याला बापानें दिलेला हुंडा ह्मणजे वरदक्षिणा. ह्मणून अर्थात्च त्या रकमेवर मालकी फक्त त्याचीच. लग्नांतला बुडीत खर्च तर बुडीतच झाला. सालंकृत जरी कन्यादान केलेलें असलें तरी तें सारेंच दान जांवयाला दिलें असल्यामुळें ते सर्व दागिने नवऱ्याचेच ! येणेंप्रमाणें माहेरच्या देणगीचा विचार झाला. नवऱ्यानें अंगावर घातलेले दागिने तर चोळूनचाळून त्याचेच, ते त्यानें आपल्या मर्जीखातर तिला चार दिवस घालावयाला दिलेले, ते वाटेल तेव्हां त्यानें परत काढून घ्यावे, अशी स्थिति सासरच्या इथली. मग स्त्रीधन असें कोठें राहिलें ? प्रस्तुत लेखकाला अशीं कैक उदाहरणें माहीत आहेत, कीं, ज्या स्त्रीच्या लग्नांत बापानें दहा हजार रुपये खर्च केले, व जिची वरात हत्तीवरून निघाली, तीच स्त्री पुढें विधवा झाल्याबरोबर तिची अन्नान्नदशा होऊन केवळ आपल्या माहेरीं भावांच्या घरीं तरी तिनें भावजयींचे ठोसरे खात डोकें देऊन रहावें, किंवा पोटाची खळी भरण्याकरितां लोकांच्या घरीं पोळया भाजावयाला रहावें, याशिवाय त्या स्त्रीला तिसरा मार्ग राहिला नाहीं ! अशा स्थितींत, हिंदुलॉप्रमाणें प्रत्येक स्त्रीला स्त्रीधन ह्मणून कांहीं तरी रक्कम दिलेली असते, व तें स्त्रीधन तिच्या पश्चात् कोणाकडे जातें याबद्दल हिंदुलॉमध्यें मोठें प्रकरण असून, त्यांत पुष्कळ विवेचन केलेलें आहे, असें प्रतिपादन करणें, ह्मणजे स्त्रियांची निवळ फसवणूक करणें होय हें कोणीहि सांगेल. रोजचा अनुभव जर अत्यंत कडू आहे तर तुमच्या कायद्याच्या पुस्तकांत कोरडें विवेचन असून उपयोग काय ?

स्त्रीधन ह्मणजे "ज्या धनावर स्त्रीचा पूर्ण हक्क असतो, व जें धन तिजपासून तिच्या नवऱ्यालाहि तिच्या इच्छेविरुद्ध घेतां येत नाहीं एवढेंच स्त्रीधन समजावें" अशी जर आपण स्त्रीधनाची व्याख्या केली तर हिंदुलॉमध्यें जीं अनेक स्त्रीधनें सांगितलेलीं आहेत त्यांपैकीं कदाचित् कोणचेंहि अगदीं शिल्लक रहाणार नाहीं. कारण नाना प्रकारचीं स्त्रीधनें सांगून, आणि हीं स्त्रीधनें फक्त त्या स्त्रीच्याच मालकीचीं आहेत असें सांगून झाल्यावर, शेवटीं असा एक मोठा शेरा मारून ठेवलेला आहे, कीं, फारच अडचणीच्या प्रसंगीं नवऱ्यानें आपल्या बायकोचें स्त्रीधन देखील हिरावून घ्यावें—म्हणजे त्या वेळीं तिची परवानगी नसली तरी देखील तें त्यानें हिरावून घ्यावें. असा फारच अडचणीचा प्रसंग कोणता हें ठरविण्याचाहि अधिकार नवऱ्याचाच ! त्यानें फार अडचण आली आहे असें ह्मटलें, कीं, अडचण आहेच असें ठरलें, आणि मग त्यानें खुशाल तिचें स्त्रीधन लुवाडावें, त्याविषयीं तिची तकरार चालावयाची नाहीं, असें हिंदुलॉ ह्मणतो. जणूं काय, खरोखरीची मोठी अडचण आली असतां त्याला मदत करण्याचें सोडून आपल्या स्त्रीधनाची काळजी घेत रहाण्याइतकी बायको मूर्ख आहे असें कायदा मानतो !

या शेवटच्या नवऱ्याच्या अधिकारामुळें स्त्रीधनाविषयींचें अगोदर केलेलें वर्णन व्यर्थ होऊन गेलें हें उघड आहे. एका तापकरी श्रीमंत गृहस्थानें वैद्यराजांची फार विनवणी केली, कीं, "मला काकडी खायची फार वांच्छा झाली आहे." त्यावर वैद्यबोवांनीं सांगितलें "ठीक आहे, उत्तम लुसलुशीत बारीक कांटे असलेली काकडी आणावी, ती चाकूनें छानदार सोलावी, नंतर तिच्या बारीकबारीक फोडी कराव्या, त्या थोड्याशा पिळून काढाव्या, नंतर त्यांना किंचित् सैंधवमीठ, ओलें तिखट आणि किंचित् हिंग लावावा, आणि अखेरीला अशी रसभरित काकडी तयार झाल्यावर ती वैद्यबोवांनांच खायला द्यावी !" हा वैद्यबोवांचा सल्ला ऐकून त्या तापकऱ्याला जें वाटलें तेंच स्त्रीजातीला हिंदुलॉच्या वर सांगितलेल्या नियमा-

वरून वाटेल, यांत संशय नाहीं. दारूपायीं आपली सारी इस्टेट घालविली, आतां दारूला पैसा नाहीं, आणि प्यावयाची तर फार तल्लफ आली आहे, अशा अत्यंत अडचणीच्या प्रसंगीं नवऱ्यानें खुशाल बायकोचें स्त्रीधन हिसकावून घ्यावें, असा हा हिंदुलॉचा न्याय आहे!

आतां अगोदर आपण हिंदुलॉमधले स्त्रीधनाचे सारे प्रकार सांगूं.

१ **यौतक स्त्रीधन**—ह्मणजे लग्नाच्या वेळीं स्त्रीला जे जिन्नस लोकांनीं बक्षीस दिले असतील ते. यामध्यें दोन प्रकार आहेत. पहिल्या प्रकाराचें नांव

(अ) आध्यग्निक असें आहे. याचा अर्थ विवाहाच्या प्रसंगीं होम चालला असतां ज्या देणग्या अग्नीसमोर तिला इष्टमित्रांनीं दिल्या त्या सर्व.

(ब) अध्यावहनिक स्त्रीधन, ह्मणजे वरातीच्या समारंभाच्या प्रसंगीं मिळालेल्या सर्व देणग्या.

२ **अयौतक स्त्रीधन**—ह्मणजे विवाहाशिवाय इतर प्रसंगीं मिळालेल्या देणग्या. मग त्या कोणाकडूनहि मिळालेल्या असोत. यांमध्येंहि अनेक प्रकार आहेत.

(अ) आन्वदेयिक, ह्मणजे विवाहसमारंभ पुरा झाल्यानंतर स्त्रीच्या किंवा तिच्या नवऱ्याच्या इष्टमित्रांनीं तिला दिलेल्या देणग्या.

(ब) आधिवेदनिक, ह्मणजे नवऱ्यानें दुसरें लग्न करण्याच्या कारणामुळें पहिलीचें सांत्वन करण्याकरितां तिला दिलेली देणगी.

याप्रमाणें जुन्या ग्रंथांत यौतक व अयौतक असे दोन प्रकार असून त्या प्रत्येकांत आणखी दोन-दोन पोटभेद आहेत. परंतु एवढ्यानें संपलें नाहीं. आणखीहि स्त्रीधनाचे दोन प्रकार ग्रंथांत सांपडतात ते येणेंप्रमाणें:—

३ **सौदयिक स्त्रीधन आणि ४ शुल्क स्त्रीधन.** यांपैकीं सौदयिक याचा अर्थ असा आहे, कीं, 'पति अथवा त्याचे नातलग अथवा तिचे नातलग यांनीं प्रेमानें दिलेल्या देणग्या.' शुल्क याचा प्रथमतः अर्थ असा होता, कीं, मुलगी विकल्याबद्दल बापाला जी रक्कम मिळाली ती. असें शुल्क घेण्याविषयीं शास्त्रांत पुष्कळ ठिकाणीं तीव्र निषेध केलेला आहे. पण डॉ. सर रामकृष्ण भांडारकर यांनीं आपल्या संस्कृत दुसऱ्या पुस्तकांत वाक्य घातलें आहेच, कीं, कन्येचें शुल्क घेऊं नये असा शास्त्राचा निषेध असून देखील कांहीं उदरंभरी ब्राह्मण कन्येला विकून शुल्क पटकावतातच! पुढें जसजसा विक्रीची रक्कम घेण्याचा क्रम कमी होत चालला तसतसा त्या शुल्काला निराळा अर्थ पालटून मिळाला. ह्मणजे बापानें शुल्क घ्यावें, पण ती रक्कम आपल्याच लेकीला देणगी ह्मणून द्यावी, असा प्रकार सुरू झाला. यावरून शुल्क याचा अर्थ असा होऊं लागला, कीं, स्त्री लग्नाला कबूल झाल्याबद्दल तिला तिच्या भावीपतीनें दिलेली रक्कम! हाच अर्थ आणखी पुढें बदलत आणि वाढतहि गेला आहे. कन्या विकण्यापेक्षां तिचें दान करणें जसें श्रेयस्कर ठरलें तसा शुल्काचा अर्थ असा झाला, कीं, बापानें रक्कम घ्यावी, पण ती त्यानें मुलीला स्त्रीधन ह्मणून द्यावी. कात्यायनानें तर फारच विस्तृत अर्थ केला आहे तो असा, कीं, घरामध्यें बायको कामें करते, सामानसुमानाची नीट काळजी घेते, गाड्याघोडीं संभाळते, गुरांच्या धारा काढते, भांडीं घासते त्या सर्व मेहनतीबद्दल नवरा जे दागदागिने तिला देतो ते सारे शुल्क!" दायभाग ज्यास्त स्पष्ट पण कुष्ट शब्दांनीं ह्मणतो, कीं, शुल्क ह्मणजे बायकोला दिलेली मजुरी, अथवा तिनें न रडतांकढतां नवऱ्याच्या घरीं जावें ह्मणून दिलेला लांच.

येणेंप्रमाणें आध्यग्निक, अध्यावहनिक, आन्वदेयिक, आधिवेदनिक, सौदयिक आणि शुल्क असे सहा प्रकार मोठमोठालीं संस्कृत नांवें देऊन स्त्रीधनाचे सांगितलेले आहेत. अर्थात् लग्न होण्याच्या पूर्वीं एखाद्या कुमारिकेला देणग्या मिळाल्या तर त्या तिचें स्त्रीधन समजून ती जर कुमारिकास्थितींतच मरण पावली तर तें स्त्रीधन कोणीं घ्यावें, याविषयीं नियम असा सांगितला आहे, कीं,

आधीं तिचे सख्खे भाऊ, ते कोणी नसतील तर तिची आई, तीहि नसेल तर बाप, तोहि नसल्यास बापाचे सपिंड, त्यांच्या अभावीं आईचे सपिंड, व तेहि कोणी नसल्यास त्या कुमारिकेचे सपिंड, अशा क्रमाप्रमाणें तिच्या स्त्रीधनाचे वारस होतात.

एखादी विवाहित स्त्री मुलांबाळांना मागें ठेवून मयत होईल तर तिचें स्त्रीधन पुढें सांगितलेल्या क्रमाप्रमाणें घ्यावें. प्रथमतः, १ अविवाहित मुली; २ विवाहित पण गरीब मुली; ३ विवाहित श्रीमंत मुली; ४ मुलीची मुलगी; ५ मुलीचा मुलगा; ६ इतकेंहि कोणी नसेल तर, स्वतःचा पुत्र; ७ नंतर पुत्राचा पुत्र; ८ नंतर तिचा नवरा; ९ आणि अखेरीला तिचे सपिंड. या क्रमाप्रमाणें पहिल्याच्या अभावीं पुढच्या नंबरचा असे वारस होतात. ज्या विवाहित स्त्रीला मुलेंच नाहींत तिच्या स्त्रीधनाचा वारसा, जर तिचें लग्न ब्राह्मविवाहपद्धतीनें (ह्मणजे हल्लीं आपणामध्यें सर्व लग्नें होतात त्या पद्धतीनें) झालें असेल तर वारसा नवऱ्याकडे, व त्याच्या अभावीं, त्याच्या इतर नातेवाइकांकडे जातो. पण तिचें लग्न जर आसुरपद्धतीनें ह्मणजे राक्षस, पैशाच वगैरे पद्धतीनें झालें असेल तर तिचा वारसा आधीं आई, नंतर बाप वगैरेंकडे जातो.

शुल्काच्या वारशाचे असे नियम सांगितले आहेत, कीं, तें पहिल्यानें तिच्या सख्ख्या भावाकडे, त्याच्या अभावीं आईकडे व तीहि नसल्यास इतर स्त्रीधनाप्रमाणें जातें. याप्रमाणें स्त्रीच्या मृत्यूनंतर स्त्रीच्या निरनिराळ्या स्त्रीधनाच्या वारशाचे नियम सांगितलेले आहेत. पण हे सारे नियम तिच्या मृत्यूनंतर तिचें स्त्रीधन कोणीं घ्यावें त्यासंबंधाचे झाले; पण ती हयात असतांना स्त्रीधनावर तिचा हक्क किती आहे हा प्रश्न मुळींच राहिला. त्याबद्दल एक सररहा नियम कायद्यानें घालून टाकला आहे, कीं, फक्त सौदयिकाखेरीज इतर सर्व स्त्रीधन जर कोणाला देण्याचें स्त्रीच्या मनांत आलें, तर तिनें तें नवऱ्याच्या संमतीवांचून देणें कायदेशीर नाहीं, आणि मृत्युपत्रानें द्यावयाचें असेल तरीहि तोच निर्बंध लागू आहे. ह्मणजे उघड अर्थ झाला, कीं, बहुतेक सर्व स्त्रीधन नवऱ्याची संमति असली तरच तें त्याच्यापासून दुसरीकडे जाईल. स्त्रीची जरी कितीहि आतुर इच्छा असली, कीं, आपलें स्त्रीधन आज एकदम स्त्रियांच्या उन्नतीकरितां महिलाविद्यालयाला द्यावें, अथवा आपल्या पश्चात् तें तशाच दुसऱ्या एखाद्या सत्कारणीं लावावें—देऊळ, धर्मशाळा, विहीर, अन्नसत्र वगैरेंकडे लावून द्यावें—तर यजमानांची मर्जी असली तरच तें पुण्यकार्य तिच्या हातून घडणार हें उघड आहे. सौदयिक स्त्रीधन जर असेल तर त्याच्या संमतीची जरूरी नाहीं असा अर्थ वरच्या नियमांतून निघतो हें जरी खरें, तरी येथें अडचण अशी आहे, कीं, सौदयिक परवानगी नसतांना द्यावें असें स्पष्ट कोठें सांगितल्याचें दिसत नाहीं. दुसरी, व मुख्य अडचण अशी आहे, कीं, सौदयिक या शब्दाचा अर्थ इतका व्यापक आहे, कीं, त्यामध्यें इतर सारे प्रकार अंतर्भूत होऊं शकतील. अर्थात् स्त्रीनें तें सौदयिक ह्मणावें व नवऱ्यानें तें सौदयिक नव्हे ह्मणावें असा तंटा सुरू होणार! आणि असा तंटा सुरू असतांना यजमानांनीं एक दिवशीं धांदलीधांदलीनें येऊन "मला फारच अडचण आली आहे" असा बहाणा करून सारें एकदम उचलून न्यावें ह्मणजे भांडणाचें मूळच उपटलें!

येवढी गोष्ट निःसंशय आहे, कीं, पूर्वीच्या काळीं हीं इतक्या प्रकारचीं स्त्रीधनें खात्रीनें होतीं. त्याशिवाय हीं नाना तऱ्हेचीं नांवें आणि प्रत्येकाचे निरनिराळे वारशाचे क्रम ग्रंथांत लिहिले गेले नसावेत, हें अगदीं उघड आहे. विशेष आश्चर्याची गोष्ट सांगण्यासारखी अशी आहे, कीं, याज्ञवल्क्यस्मृतीवरील टीकाकार श्रीविज्ञानेश्वर यानें आपल्या मिताक्षरा नांवाच्या टीकेमध्यें असें स्पष्ट ह्मटलें आहे, कीं, केव्हांहि कोणच्याहि तऱ्हेनें स्त्रीकडे जें धन येतें तें सारें तिचें स्त्रीधन. पुरुषाकडून आलेलें आणि माहेरवासणीचें आणि सासुरवासणीचें असे बारीक भेद करून त्यांत स्त्रीचे हक्क कुर

उडूनकुरतडून संपुष्टांत आणणें श्रीविज्ञानेश्वराला बिलकुल मान्य नाहीं; पण स्त्रियांच्या दुर्दैवानें विलायतेंतल्या प्रिव्ही कौन्सिलला ही मिताक्षरेची न्यायी योजना नापसंत झाली. इतर बाबतींत मिताक्षरेचें साम्राज्य बहुतेक सर्व हिंदुस्तानभर मान्य करणाऱ्या प्रिव्ही कौन्सिलनें या स्त्रियांच्या बाबतींत मात्र मिताक्षरेचें उदार धोरण अगदीं अनुदारपणें अमान्य केलें हें आश्चर्य होय.

याप्रमाणें जुन्या ग्रंथांत साधकबाधक वर्णन स्त्रीधनासंबंधीं आहे. त्या सगळ्याचा इत्यर्थ आह्मीं पूर्वी सांगितलाच आहे, तो असा, कीं, एकतर हल्लीं स्त्रीला यौतक–अयौतक देणग्याच कोणी फारशा कोठें देत नाहींत, त्यामुळें स्त्रीधनाच्या नांवानें बहुतेक पूज्यच असतें; आणि दुसरें असें, कीं, जर कांहीं स्त्रीधन असलेंच तर तें केवळ तिच्या पतीच्या कदरेनें जखडलेलें असें असतें. अर्थात् वैद्यबोवांनीं श्रीमंतांनां सांगितलेल्या कांकडीप्रमाणें आजच्या स्थितीला फारसें नांव घेण्यासारखें निदान आह्मां महाराष्ट्रीयांमध्यें तरी कांहींच नाहीं हें उघड आहे. गुजराती लोकांत मात्र प्रत्येक स्त्रीच्या जन्मापासून तिच्या बापाच्या घरीं निराळें खातें घालून पहिल्या दिवसापासून तिला आलेल्या देणग्यांची रक्कम त्या खातीं जमा करितात. लग्नाच्या वेळीं तिला 'पल्लो' ह्मणून कांहीं रक्कम स्त्रीधन ह्मणून देतात, व पुढें नवऱ्याच्याहि घरीं तिला वेळोवेळीं मिळालेल्या रकमा तक्त तिच्याच खात्यांत जमा करून ठेवण्याची वहिवाट आहे. याशिवाय प्रत्येक गुजरातीबाई आपल्या रिकामपणीं जें कलाकुसरीचें वगैरे भरतकाम करते तें विकून येणारी रक्कम तिची तिला मिळून तिच्या स्वाधीन रहाते. ह्यामुळें प्रत्येक गुजराती स्त्रीजवळ कांहींना कांहीं तरी पुंजी जमलेली असते, तिचा विनियोग ती आपल्या मर्जीप्रमाणें करीत असते. इतर सर्व कामांत जशी ती नवऱ्याच्या सल्ल्यानें वागत असते तशी तिच्या स्त्रीधनाच्याहि बाबतींत ती त्याचा सल्ला घेते हें ठीकच आहे. आह्मांला अशीं उदाहरणें माहीत आहेत, कीं, नवऱ्याच्या उद्योगधंद्याला जरूर लागली तर नवरा इतर सावकारांप्रमाणें आपल्या बायकोपासूनहि कर्ज घेतो, व तिला इतरांप्रमाणें व्याजहि देतो. तेथें कोणी नवऱ्यानें जर बायकोचें स्त्रीधन लुबाडलें तर सारे सगेसोयरे त्याला नांवें ठेवतात अशी वहिवाट आहे.

येथपर्यंत पूर्वींच्या स्थितीचा विचार झाला. पण आतां यापुढें नवीननवीन प्रश्न उपस्थित होत जाणार, त्यांची वासलात कशी लावावयाची, ह्या प्रश्नाचा विचार करून सुशिक्षित स्त्रियांनीं पुढें सरसावून आपणाला अनुकूल असा कायदा करून घेण्याची खटपट केली पाहिजे. मुख्यतः स्त्रीशिक्षण वाढत जाऊं लागलें ह्मणजे स्त्रिया आपल्या श्रमानें धन मिळविण्याची तजवीज जारीनें करणार, त्या धनावर हक्क कोणाचा? एखादी स्त्री शाळामास्तरीण आहे, अगर नर्स किंवा डॉक्टरीण आहे, ती पैसा मिळवील तो कोणाचा? जर उद्यां स्त्रीला एखाद्या लॉटरीमध्यें एखादी रक्कम मिळाली, किंवा पाकशास्त्राच्या किंवा इतर कलाकुसरीच्या कामाच्या प्रदर्शनांत मोठेंसें बक्षीस मिळालें, तर त्यावर हक्क कोणाचा? अशा एखाद्या डॉक्टरणीची सर्व प्राप्ति नवऱ्यानें लुबाडून घेतली तर तिला कांहीं कायदेशीर इलाज करतां येऊं नये, असें जर कायदा ठरवील तर, लग्न तरी करून आपलें स्वातंत्र्य आपण घालवावें कीं नाहीं, हा तिला मोठा विचार पडेल; आणि लग्नें तर अशा कर्तृत्ववान् स्त्रियांनीं अवश्य करावीं अशी समाजानें योजना करणें जरूर आहे. अर्थात् लग्नानंतरहि तिच्या मिळकतीवर तिचीच मालकी कायम राखली पाहिजे. त्याचप्रमाणें तिच्या एखाद्या नातेवाइकाकडून किंवा मैत्रिणीकडून कांहीं इस्टेट तिला आली तर, तीवर तिची पूर्ण मालकी कीं नवऱ्याची, हाहि प्रश्न सोडविणें जरूर आहे. हल्लीं ह्या बाबतींत ग्रंथांचा अभिप्राय असा आहे, कीं, स्त्रीनें आपल्या बुद्धीनें किंवा श्रमानें मिळविलेल्या धनावर तिची

मालकी आहे, पण नवऱ्याच्या संमतीशिवाय पान हलूं नये, असें कात्यायन ह्मणतो. पण त्याचा अर्थ निरनिराळीं हायकोर्टें निरनिराळा करूं शकतात. मुंबई हायकोर्टानें एका खटल्यांत पुढील निकाल दिला आहे:—

कृष्णाबाईला तिच्या आईच्या आईकडून कांहीं मिळकत मिळाली होती. तिनें मरतांना वुइल केलें, कीं, सदरहू इस्टेट तिच्या दोन मावशा आवडी व पार्वती यांनां द्यावी. तिच्या मृत्यूनंतर कृष्णाबाईच्या नवऱ्यानें ती इस्टेट हिसकून घेतली ह्मणून आवडीनें त्या नवऱ्यावर दावा आणला. नवऱ्याचें ह्मणणें असें होतें, कीं, सदरहू इस्टेट आपल्या परवानगीवांचून कोणाला देण्याचा आपल्या बायकोला हक्कच नव्हता. पहिल्या कोर्टानें वादीचा ह्मणजे आवडीचा दावा बहाल केला, व डिस्ट्रिक्ट जज्जानेंहि अपीलांत तो कायम केला. पण नवऱ्यानें मुंबई हायकोर्टांत अपील केल्यावरून निकाल झाला, कीं, कृष्णाबाईच्या वुइलाला नवऱ्याची संमति नसल्यामुळें तिचें वुइल निरुपयोगी आहे. सबब आवडी व पार्वती यांनां ती इस्टेट मिळणार नाहीं. अर्थात् आवडीचा दावा रद्द केला.

या निकालाचा अर्थ असा झाला, कीं, जरी बायकोला तिऱ्हाइताकडून स्त्रीधन मिळालेलें असलें तरी तें तिला आपल्या मर्जीप्रमाणें कोणाला वुइलानें देतां येत नाहीं. कृष्णाबाईच्या शेवटच्या इच्छेप्रमाणें ती इस्टेट तिच्या मावशींनां न मिळतां ती नवऱ्यानें लाटली! मद्रास हायकोर्ट या बाबतीमध्यें ज्यास्त न्यायी आहे असें पुढील निकालावरून* दिसेल:—

यल्लाम्मल नांवाच्या स्त्रीची एक स्त्रीधनाची जमीन होती. त्या स्त्रीला दोन मुलगे, दोन विवाहित मुली, व एक अविवाहित मुलगी, अशीं मुलें असून, तिचा नवराहि हयात होता. जमीन यल्लाम्मलच्या स्वतःच्या खात्याची केलेली होती. पुढें यल्लामल मेल्यावर ती जमीन तिच्या नवऱ्यानें व दीर.नें बळकावल्यावरून तिच्या अविवाहित मुलीनें दावा आपल्या बापावर आणला, कीं, जमीन आईची स्त्रीधन असल्यामुळें बापापेक्षां माझा वारसा तिजवर ज्यास्ती आहे, सबब ती मला द्यावी. ह्मणजे हा मुलीचा आपल्या बापावर दावा होता. बापाचें ह्मणणें असें होतें, कीं, ही जमीन आमचीच आहे. हायकोर्टांत मुख्य वाद असा झाला, कीं, सदहू जमिनीचें खातें यल्लाम्मलच्या नांवें झालें असल्यामुळें ती तिचें स्त्रीधन समजावयाचें कीं काय, आणि स्त्रीधन समजल्यास वारसा लेकीकडे कीं नवऱ्याकडे? कात्यायनाचें वचन या बाबतींत असें आहे "स्त्रीनें कलाकुसरीवर जें धन मिळविलें आणि नातेवाइकांव्यतिरिक्त इतरांकडून जें तिला प्रेमामुळें प्राप्त झालें त्यावर नवऱ्याची कदर असते. बाकीचें सर्व स्त्रीधन." प्रस्तुतचें धन जरी कलाकुसरीचें नव्हे, व प्रेमामुळें मिळविलेलें असें ह्मणणें शक्य नाहीं, तरी तें स्त्रीधन आहे हें उघड आहे. आतां त्यावर मालकी कोणाची? त्या उभयतां नवराबायकोची कीं कोणाची? नवऱ्याचें असें ह्मणणें आहे, कीं, तें आपल्या कदरेंत असावयाचें असें कात्यायनाचें वचन आहे, सबब स्त्रीच्या पश्चात् फक्त आपणच मालक. परंतु हें ह्मणणें ठीक नाहीं. स्त्रीधनावर स्त्रीच्या हयातीमध्यें नवऱ्याची कदर असणें ह्मणजे नवऱ्याची मालकी नव्हे. या बाबतींत नवऱ्याचा सल्ला तिनें घेतला पाहिजे, एवढाच अर्थ आहे. इस्टेटीची मालकी फक्त तिचीच. अर्थात् तिच्या मृत्यूनंतर तिचा वारस ह्मणजे मुलगी होय. नवरा हा वारस होत नाहीं. सबब मुलीचा दावा बहाल केला.

दुसऱ्या एका खटल्यांत मद्रास हायकोर्टानें ठरविलें आहे, कीं, नवरा व बायको अशा दोघांनीं मिळून जो व्यापाराचा धंदा केला त्यांत तिचा निम्मा हिस्सा होता, तो तिच्या पश्चात् तिच्या

* इ. लॉ. रि. २१ मद्रास १००.

नवऱ्याकडे न जातां तो तिच्या स्वतःच्या वारसांकडेसच गेला. याप्रमाणें मुंबईपेक्षां मद्रास हायकोर्ट स्त्रियांनां या बाबतींत ज्यास्त न्यायी आहे असें ह्मणतां येईल. पण येवढ्यावरून हें उघड आहे, कीं, सुशिक्षित स्त्रियांनीं हा प्रश्न खूप खटपट करून आपल्या बाजूनें निकालाला लावून घेतला पाहिजे. विवाहित स्थितींत नवरा जें धन मिळवितो तें तर फक्त नवऱ्याचेंच, इतकेंच स्थापून नवरे न थांबतां, आणखी असेंहि स्थापित करूं पहात आहेत, कीं, बायकोनें स्वकष्टार्जित कांहीं मिळविलें तर तेंहि तिचें नसून आपलेंच आहे! ह्मणजे, माझें तें तर माझेंच, पण तुझेंहि माझेंच! हा असा भयंकर आप्पलपोटेपणा केवळ हिंदु पुरुषच करूं इच्छीत आहेत असें नाहीं. विलायतेंत देखील कैक वर्षें किंवा शतकें या आप्पलपोटेपणाप्रमाणें स्पष्ट कायदा होता. तेथें नवरा आपल्या बायकोचा स्वकष्टार्जित पैसा खुशाल लुबाडून घेई, आणि नवरा व बायको तेथल्या कायद्याच्या दृष्टीनें फक्त एकच व्यक्ति मानली जात असल्यामुळें, बायकोचा नवऱ्यावर दावाहि चालत नसे. पण पुढें स्त्रियांनीं फार गिल्ला करून कायदा बदलून घेतला; व आतां तेथें नवरा आपल्या बायकोचें द्रव्य हरण करूं शकत नाहीं.

हिंदुस्तानांतहि सरकारानें वरप्रमाणें नवीन कायदा केला आहे. त्यांत असें स्पष्ट सांगितलें आहे, कीं, लग्न झाल्यामुळें स्त्रीच्या धनावरची स्त्रीची मालकी नष्ट होणार नाहीं, व तशा धनामध्यें नवऱ्याला ढवळाढवळ करण्याचा अधिकार नाहीं, आणि विवाहित स्त्रीनें विद्या, कलाकौशल्य वगैरे मार्गांनीं जें द्रव्य मिळविलें तेंहि फक्त तिचें एकटीचेंच समजावें. हे कायदे इंग्रज सरकारानें इंडियन् सक्सेशन ॲक्ट, कलम ४, व मॅरिड वुइमेन्स प्रॉपर्टी ॲक्ट सन १८७४, कलम ४–५ वगैरे सगळ्या हिंदुस्तानाकरितां जरी केले, तरी, हिंदुमुसलमान व बौद्धधर्मीयांनां त्यांचे स्वतंत्र कायदे असल्यामुळें, हा इंग्लिश कायदा लागत नाहीं, असें स्पष्ट सांगितलें आहे. सदर्हू कायद्यांतच गव्हर्नरजनरलला असा अधिकार देऊन ठेवलेला आहे, कीं, जर हा कायदा हिंदु लोकांनां लावावा असें त्यांनां वाटेल तर त्यांनीं तसा जाहिरनामा काढून लागू करावा. आजपर्यंत तसा जाहिरनामा काढण्याविषयीं कोणीं आग्रह धरला नाहीं. पण आतां सुशिक्षित स्त्रियांनीं तसा गिल्ला करून सरकारकडून तसा जाहिरनामा काढविला पाहिजे. ह्मणजे कात्यायनाच्या अर्थाची विचक्षणा करीत बसण्याची जरूरच नाहींशी होईल.

ह्याप्रमाणें कायदा करून घेणें जरूर आहे. पण त्यापेक्षां ज्यास्त महत्त्वाची अशी एक बाब आहे. तीसंबंधानें कांहीं तरी कायदा करून घेणें फारच जरूर आहे. प्रत्येक लग्नांत हुंडा हा असतोच आणि तो नवऱ्याच्या मालकीचा होतो असा अनुभव आहे. त्यामुळें हुंड्याची भयंकर वाढ होत आहे, आणि मुलीकरितां इतका हुंडा देऊनहि मुलीच्या स्त्रीधनाच्या नांवानें आंवळ्याएवढें पूज्यच! अशा स्थितींत हुंड्याची रक्कम नवऱ्यानें पाहिजे तेवढी खुशाल मागावी, पण त्यांत आणखी तितकीच रक्कम नवऱ्यानें आपल्या पदरची घालावी, व हुंडा व तितकीच नवऱ्याची देणगी मिळून हुंड्याच्या दुप्पट रक्कम नवरीचें स्त्रीधन समजावें असा कायदाच करून मागितला पाहिजे. असा कायदा जर झाला तर एका धोंड्यानें दोन मोठाले पक्षी मारल्यासारखें होईल. कारण, आपण हुंडा किती घ्यावा या प्रश्नाचें उत्तर नवऱ्यामुलाला फारच विचार करून द्यावें लागेल. जेवढा ज्यास्ती मिळेल तेवढा घ्यावा असें हल्लींप्रमाणें चालणार नाहीं. कारण पांच हजार मागितले तर आपण आणखी पांच हजार तयार करून दहा हजारांची रक्कम आपल्या स्त्रीचें स्त्रीधन होईल—ह्मणजे आपणाला त्याचा फायदा रहाणार नाहीं—अशी भीति त्याच्या मनांत उत्पन्न झाली ह्मणजे, हुंडा बेतानेंच मागितला जाईल; व ज्यास्ती मागितला तरी बापाला त्याचें तितकें वैषम्य वाटणार नाहीं. कारण ती सारी रक्कम दुप्पट होऊन आपल्या मुलीची तरी नीट सोय होईल असें त्याला वाटेल. नुसतीं हुंड्याच्या विरुद्ध व्याख्यानें दिल्यानें हुंडा-

राक्षसीचा पाडाव होणार नाहीं. ह्मणून हुंड्याला दुप्पट करून स्त्रीधनाचें स्वरूप दिलें तर ती राक्षसी आपोआप मृत्युपंथाला जाऊं लागेल. निदान तिचें भीषणस्वरूप नष्ट होऊन आईबापच "हुंडा पाहिजे तर ज्यास्ती मागा" असें भावी जांवयाला सांगूं लागतील!

---

प्रकरण नववें.

## पीनल कोड.

3022

दुसऱ्या प्रकरणाच्या प्रारंभीं आह्मीं असें सांगितलें आहे, कीं, "कोणत्याहि विशिष्ट प्रसंगीं हिंदुलॉचे नियम काय आहेत, हा प्रश्न, तें कुटुंब विभक्त आहे कीं एकच आहे, या प्रश्नाच्या उत्तरावर पुष्कळसा अवलंबून असतो. एकत्र कुटुंब असलें ह्मणजे एखाद्या स्त्रीचे जे हक्क व जीं कर्तव्यें असतात त्यापेक्षां भिन्न हक्क व कर्तव्यें तें कुटुंब विभक्त असलें ह्मणजे असतात." एकत्र कुटुंब ह्मणजे काय आणि त्यांत स्त्रीची कायदेशीर स्थिति काय असते याचेंहि विवेचन त्या प्रकरणांत केलें आहे. आतां आपण कुटुंब विभक्त असतांना तिची स्थिति काय असते तें प्रथम पाहूं, व नंतर पीनल कोडाकडे वळूं.

ज्या वाचकांनीं एकत्र कुटुंब ह्मणजे काय तें नीट समजून घेतलें असेल त्यांच्या लक्ष्यांत आलेंच असेल, कीं, हिंदुसमाजांत शेंकडा नव्याण्णव कुटुंबें एकत्रच असतात. याचें कारण हिंदुलॉची पद्धतच तशी आहे. प्रत्येक हिंदु मुलगा हा जणूं काय पुढें उत्पन्न होणाऱ्या एकत्र कुटुंबरूपी वृक्षाचें बीजच होय. ज्याप्रमाणें हरळीची अगदीं वाळत आलेली एखादी मुळी आणून तिला जमिनींत घालून पाणी शिंपडलें तर पुढें हरळीच उत्पन्न व्हावयाची, त्याप्रमाणें, एक अगदीं अनाथ, भवति-भिक्षां-देहीवर पोट भरणारा, एखादा सातआठ वर्षांचा पोऱ्या कोंकणांतून घाटावर आला असला तरी, तो पुढें त्याजपासून उत्पन्न होणाऱ्या एकत्र कुटुंबाची बीच होय. आज तो अगदीं एकटा आहे, त्याला आईबाप, भाऊबहिणी वगैरे कोणी नाहींत, ह्मणून तो अगदीं विभक्तकुटुंब आहेसा दिसतो खरा; पण चार दिवसांनीं, मधुकरी खाऊन त्याला धष्टपुष्ट होऊन कोठें कारकुनी करावयाला लागल्यावर [illegible] फुटून लग्न करूं द्या, कीं, तो मालक आणि त्याची बायको त्याची आश्रित असा संबंध सुरू झाला! आणखी वर्ष दोन वर्षांनीं एखादा बचडा उत्पन्न झाला, कीं, तो बाप आणि तो बचडा अशा दोघांचें मिळून हिंदु एकत्र कुटुंब उत्पन्न झालेंच, आणि त्या बाईला एकाच्या ऐवजीं दोन मालक होऊन ती पुनः आश्रितची आश्रितच राहिली! एकटीं नवराबायको फक्त होतीं, तेव्हां फार तर निर्भेळ विभक्त कुटुंब होतें असें ह्मणतां येईल. पण त्या वेळीं त्या बाईचे हक्क ह्मणजे नवऱ्यापासून पोटगी घेऊन घरांत राहावें एवढेच! कदाचित् मूलबाळ न होतां जर तो अपघातानें वगैरे मेला तर विधवा स्त्री या नात्यानें तिनें त्याची इस्टेट विधवाधन ह्मणून उपभोगावी. जर तिनें दत्तक घेतला तर तो दत्तक मालक व हिनें पुनः पोटगी घ्यावी. जर तिनें दत्तक घेतला नाहीं तर नवऱ्याच्या दूर कोंकणांत असलेल्या पुरुष नातलगांनीं उत्तराधिकारी ह्मणून घाटावर येऊन तिजवर कुरघोडी करावी, आणि कोर्टांतून हे तिजवर असें करूं नको आणि तसें करूं नको अशा ताकिदी आणून लावाव्यात! ही काय ती त्या स्त्रीची कायदेशीर स्थिति! आतां आणखी विभक्त कुटुंबांत स्त्रीची कायदेशीर स्थिति ती काय राहिली?

एवंच काय, तर हिंदु एकत्र कुटुंबांत जी तिची स्थिति तीच जवळजवळ विभक्त कुटुंबांत तिची स्थिति. जर ती अगदीं निपुत्रिक विधवा असली तर मरेपर्यंत सर्व इस्टेट विधवाधन ह्मणून ठेवतां

येते; एकत्र कुटुंब असलें, कीं, एकदम पोटगीवर ती येऊन राहते, एवढेंच काय तें अंतर आहे, हें अगदीं स्पष्ट आहे.

याप्रमाणें हिंदुलॉप्रमाणें हिंदु स्त्रीची कायदेशीर स्थिति आहे. परंतु हिंदुलॉचा प्रभाव येथेंच थांबत नाहीं. दुसऱ्याहि कांहीं महत्त्वाच्या कायद्यांवर तो आपली स्त्रियांसंबंधीची अन्यायाची छाया पसरून देत असतो. अशा या बाबी कोणत्या आहेत तें या प्रकरणांत सांगण्याचा विचार आहे.

हिंदुस्तान इंग्रजांच्या ताब्यांत येण्यापूर्वी निरनिराळ्या राज्यांतून फौजदारी गुन्ह्यासंबंधानें निरनिराळे कायदे असत. खुद्द आमच्या हिंदुलॉमध्यें अपराध ह्मणजे फौजदारी गुन्हे कोणचे, त्यांची चौकशी कोणीं करावी, पुरावा कसा असावा आणि शिक्षा कशा द्याव्या वगैरेबद्दल कायद्याचे नियम होते. परंतु पुढें इंग्रज सरकारानें हे सर्व निरनिराळे कायदे व नियम रद्द करून त्यांच्या ऐवजीं सर्व हिंदुस्तानभर सररहा लागू होतील असे कांहीं मोठमोठाले कायदे तयार करून सुरू केले. फौजदारी गुन्हे—ह्मणजे चोरी, दरवडा, मारामारी, खून, खोटे दस्तऐवज वगैरेच्या व्याख्या करून त्यांनां शिक्षा किती कराव्या त्याविषयीं एक मोठा कायदा केला. त्याला पीनलकोड असें नांव दिलें. या पीनल कोडांत हिंदु, मुसलमान, स्त्री, पुरुष असा भेद नसून जो कोणी गुन्हेगार असेल त्याला अमुक शिक्षा करावी असे नियम घातलेले आहेत.

पीनल कोडामध्यें एक गुन्हा असा आहे, कीं, एक लग्न कायम असतां दुसरें लग्न करणें. हा गुन्हा सर्व सुधारलेल्या जगभर फार गर्हणीय मानला जातो. अनेंबी बाईशीं लावलेलें लग्न कायम असतां अनें किंवा बानें दुसरें लग्न केलें तर 'बिगमी' ह्मणजे द्विलग्नाचा गुन्हा झाला असें ह्मणून त्या गुन्हेगाराला सात वर्षांची सक्त मजुरी आणि दंड अशी शिक्षा सांगितलेली आहे. उघडच आहे, एक लग्न कायम असतां दुसऱ्याशीं लग्न लावणें ह्मणजे पहिल्या व दुसऱ्या नवरा दोन्हां इसमांनां फसविणें आहे ह्मणून इतकी कडक शिक्षा सांगितली आहे. सुधारलेल्या पाश्चात्य राष्ट्रांमध्यें हा द्विलग्नाचा गुन्हा पुरुष अथवा स्त्री यांपैकीं कोणींहि केला तरी शिक्षा होते. ह्मणजे पुरुषानें पहिली बायको जीवंत असतां दुसरीशीं लग्न लावलें तर त्यानें गुन्हा केला, आणि एखाद्या स्त्रीनेंहि पहिला नवरा जीवंत असतां दुसऱ्या पुरुषाशीं लग्न केलें तर तीहि गुन्हेगार असें ठरतें, व दोघांनांहि सारखीच शिक्षा ह्मणजे सात वर्षेंपर्यंत कैद आणि शिवाय वाटेल तितका दंड होतो.

हा नियम अगदीं रास्त व निःपक्षपाती आहे हें उघड आहे. पण तो हिंदु लोकांनां लागू करण्याच्या वेळीं मोठी अडचण उत्पन्न झाली. ती अडचण अशी, 'कीं, हिंदुपुरुषाला एके वेळीं अनेक बायकांशीं लग्नें लावण्याचा हक्क आहे असें हिंदुलॉ ह्मणतो, आणि लोकांमध्यें वहिवाट व रूढिहि तशीच आहे. अर्थात् जी सररहा रूढि आहे तिला गुन्हा कसें ह्मणतां येईल ? ह्मणून सरकारचा नाइलाज होऊन सरकारानें द्विलग्नाच्या गुन्ह्यांतून हिंदु पुरुषांनां वगळलें किंवा दुसऱ्या शब्दांनीं सांगावयाचें तर, त्यांनीं हिंदु पुरुषांनां द्विलग्नाचे अनेक गुन्हे करण्याची राजरोस परवानगी देऊन टाकली ! पण बिचाऱ्या स्त्रियांवर मात्र नवीन कायद्याचा अंमल सुधारलेल्या राष्ट्रांतल्या स्त्रियांइतका कडक रीतीनें बसून गेला ! त्यामुळें आज स्थिति अशी आहे, कीं, सुधारलेल्या राष्ट्रांच्या द्विलग्नाच्या गुन्ह्यांतून पुरुष मात्र रानटी लोकांप्रमाणें वगळले गेले, व बायका मात्र धरल्या गेल्या ! याप्रमाणें पीनल कोडाला स्त्रीपुरुषांत जो भिन्नभाव माहीत नव्हता तो आमच्या हिंदुलॉनें त्याला माहीत करून दिला. आज स्थिति अशी आहे, कीं, एखाद्या स्त्रीचा पहिला नवरा जीवंत असून ती जर दुसरें लग्न करील तर तिला मात्र सात वर्षांची शिक्षा होते. पण तोच गुन्हा तिचा नवरा अनेकदां अनेक बायकांशीं अगदीं राजरोस उजळ माथ्यानें करतो, पण त्याला तें सारें माफ आहे ! अशा रीतीनें स्त्रीजातीवर सर्वस्वी अन्याय करणाऱ्या

हिंदुलोंची दुष्ट छाया पीनलकोडावर देखील पडलेली आहे.

जो कायदा जगांतील सर्व सुसंस्कृत राष्ट्रांतल्या पुरुषांनीं मान्य केला आहे तो आह्मांला लावूं नका, आह्मांला रानटी माणसांप्रमाणें हवीं तेवढीं लग्नें करण्याची आमची मुभा कायम ठेवा, अशी विनवणी आपल्या अत्युच्च आर्यसंस्कृतीच्या बढाईखोर वल्गना करणाऱ्या आर्यपुरुषांनीं करावी, आणि ती करीत असतांना आपण लांछनास्पद मागणी करीत आहों ही जाणीव त्यांना क्षणभरहि भासूं नये, हें जेवढें आश्चर्य आहे, त्यापेक्षां जास्ती आश्चर्याची गोष्ट एखादी असेल तर ती येवढीच, कीं, पाश्चात्य संस्कृतीशीं दीडशें वर्षें ओळख झाली असूनहि अजून तो रानटी हक्क कायम ठेवण्याची आमच्या पुरुषवर्गाला हौस असावी ! दीडशें वर्षांच्या पाश्चात्य शिक्षणानें जेव्हां त्यांचे अजून डोळे उघडले नाहींत तेव्हां ते इतःपर आपोआप उघडले जाण्याची आशा धरणें केवळ व्यर्थ आहे ! अशा स्थितींत आतां हिंदु सुशिक्षित स्त्रीजनांनीं तरी पुढाकार घेऊन त्यांच्या पतिराजांवरचा रानटीपणाचा काळाकुट्ट डाग धुवून टाकण्याची खटपट करणें जरूर नाहीं काय ? आर्यस्त्रियांनीं अगदीं पुरातनकाळापासूनहि द्विलग्नाच्या गुन्ह्याबद्दल आपला तिटकारा आपल्या प्रत्यक्ष आचरणानें स्पष्ट करून दाखविलेला आहेच. परंतु आर्यपुरुष अजूनहि त्या गुन्ह्याला टाकूं इच्छीत नाहींत हें पाहून त्यांच्या काळजाचें पाणी पाणी होणें साहजिक आहे. अर्थात् यापुढें स्त्रियांनीं अतिशय मोठी खटपट करून आपल्या अत्यंत प्रिय पुरुषवर्गाला या भयंकर गुन्ह्याच्या मगरमिठींतून सोडविण्याचें श्रेय संपादन केलें पाहिजे !

आह्मांला ठाऊक आहे, कीं, आमचे पुराणमताभिमानी धर्ममार्तंड, आणि शिंगें मोडून वांसरांत शिरणारे कांहीं आधुनिक पुढारी, असा समज पसरण्याचा प्रयत्न करतील, कीं, कांहीं प्रसंगीं पुरुषांनीं द्विलग्न करणें हेंच समाजाच्या हिताचें आहे. आणखी कांहीं त्याहूनहि धूर्त ह्मणतील, कीं, हल्लीं देखील द्विलग्न करणारे अतिशय थोडेच—बहुतेक नाहीं ह्मणण्याइतकेच—असतात. पण आह्मी त्यांना असें विचारतों, कीं, जर द्विलग्नाचा प्रघात मोडत चालला आहे तर तो संबंध एकदम मोडून हा काळाकुट्ट डाग पुसण्याच्या विरुद्ध तरी तुह्मीं काय ह्मणून असावें ? विरुद्ध जर नसाल तर पीनलकोडाची तशी सुधारणा करून घेण्याला तुमची कबूली आहे काय ? "वाईट कृत्यें करण्याचीं साधनें हाताशीं असलीं ह्मणजे तीं करण्याचा अनिवार मोह उत्पन्न होत असतो" हें शेक्सपीयरचें वाक्य खरें नाहीं काय ? आमची सुशिक्षित स्त्रियांना अत्यंत आग्रहाची शिफारस आहे, कीं, त्यांनीं नवीन कायदेकौन्सिलामध्यें पीनलकोडाची ही दुरुस्ती पुढें आणावी, ह्मणजे रानटी हक्क अजून किती पुरुषांना पाहिजे आहेत तें तरी स्पष्टपणें दिसून येईल !

आतां पीनल कोडांतली आणखी एक तसलीच बाब घेऊं. बहुतेक सर्व सुधारलेल्या राष्ट्रांमध्यें व्यभिचार अथवा जारकर्म हा गुन्हा मानला आहे त्याप्रमाणें पीनल कोडांतहि तो गुन्हा धरला आहे. परस्त्रीगमन हा गुन्हा फार व्यापक स्वरूपाचा आहे. आपण अशी कल्पना करूं, कीं, इस्पिकची राजाराणी व चौकटची राजाराणी अशीं दोन जोडपीं आहेत. यांत इस्पिकराजा जर चौकटराणीशीं जाऊं लागला तर दोन स्वरूपांचें दुर्वर्तन त्याच्या हातून घडतें. पहिलें दुर्वर्तन असें, कीं, इस्पिकच्या राणीशीं ज्या त्यानें शपथा लग्नसमयीं घेतलेल्या असतात त्यांचा भंग होतो, व दुसरें दुर्वर्तन असें, कीं, चौकटच्या राणीनें आपल्या लग्नसमयीं चौकटराजाशीं ज्या शपथा घेतल्या असतात त्यांचा भंग चौकटराणीकडून इस्पिकराजा करवतो. ह्मणजे पहिला गुन्हा इस्पिकराजा आपल्या स्वतःच्या राणीविरुद्ध करतो, तर दुसरा गुन्हा तो चौकट राजाविरुद्ध करतो. पाश्चात्य संस्कृतीप्रमाणें वहिवाट अशी आहे, कीं, इस्पिकराजाच्या बदफैलीबद्दल

त्याच्याच राणीनें फिर्याद करावी आणि चौकटराजानेंहि फिर्याद करावी, आणि इस्पिकराजा व चौकटराणी या उभयतांनांहि शिक्षा व्हावी.

पण हा सरळ न्याय हिंदु लोकांनां लागू करतांना मोठी पंचाईत येऊन उभी राहिली. ती अशी, कीं, इस्पिकराजाचें इस्पिकराणीशीं जरी लग्न झालें तरी इस्पिकराजाला आणखीहि नवीन स्त्रियांशीं लग्नें करून त्यांनां इस्पिकराण्या बनविण्याची मोकळीक हिंदुलॉप्रमाणें आहे; येवढेंच नाहीं तर नवीन स्त्रियांशीं लग्नें न करतां देखील, त्यांशीं वाटेल तसा व्यवहार करण्याकरितां अंगवस्त्रें उपवस्त्रें ह्मणून ठेवतां येतात. तर मग इस्पिकराजानें इस्पिकराणीशीं आणाशपथा घेतल्या या ह्मणण्यांत तथ्यांशच राहिला नाहीं. त्यानें इस्पिकराणीकडून मात्र शपथा घेवविल्या, पण आपण स्वतः मुळींच घेतल्या नाहींत, अथवा तोंडानें घेतल्या असल्यास त्या उगीच इस्पिकराणीनें शपथा घेण्याला तिला भाग पाडावें इतक्याच लबाड हेतूनें नुसत्या फसवेगिरीनें आपण शपथांचा उच्चार मात्र केला, एवढाच खरा अर्थ होतो. अर्थात्च जर इस्पिकराजानें इस्पिकराणीशीं शपथाच घेतल्या नाहींत तर त्या मोडल्या असें कसें ह्मणतां येईल ? आज तो त्या इस्पिकराणीच्या विरुद्ध गुन्हा झाला असें तरी कसें ह्मणावें ?

एवंच, इस्पिकराजाच्या गुन्ह्याचें पहिलें स्वरूप हिंदुलोकांत मुळीं नाहींच असें स्पष्ट झालें. ह्मणून इस्पिकराणीला तकरारीला कारण घडत नसून, फक्त चौकटराजालाच फिर्यादीला कारण घडलें, असें पीनलकोडाच्या प्रवर्तकांनां मानणें भाग पडलें. हा सारा प्रताप कशाचा ? तर हिंदुलॉप्रमाणें एका स्त्रीशीं लग्न केलेल्या पुरुषाला दुसऱ्या स्त्रीशीं लग्न करण्याची, आणि नुसतेंहि परस्त्रीगमन करण्याची, पूर्ण मुभा आहे या गोष्टीचा !

मिळून, बाकी भीति इस्पिकराजाला कोणाची राहिली ? तर फक्त चौकटराजाची ! आणि तीहि चौकटराणी भ्रष्ट केल्याबद्दलची ! तसें वर्तन कोर्टांत शाबीत झालें ह्मणजे इस्पिकराजाला पांच वर्षे कैद व दंड अशी शिक्षा पीनलकोडांत सांगितली आहे.

पण एवढ्यानेंच संपत नाहीं. इस्पिकराजानें जो गुन्हा केला तो त्यानें एकट्यानेंच फक्त केला नाहीं. त्या गुन्ह्यांत त्याला कोणी मदतनीस किंवा वांटेकरी होता. तो कोण तर, चौकटराणी. ती जर सामील नसती तर इस्पिकराजाच्या हातून तो गुन्हाच होऊं शकत नव्हता. अर्थात् इस्पिकराजा व चौकटराणी या दोघांनीं मिळून गुन्हा केला, किंवा एकमेकांनीं एकमेकांनां मदत करून तो गुन्हा घडवला हें उघड आहे. आतां, कायद्याचा असा एक सर्वसाधारण नियम आहे, कीं, दोन माणसांनीं मिळून जर एक गुन्हा केला—एकानें हात धरले व दुसऱ्यानें डोकें तोडलें—किंवा दोघांनींहि घाव घालून डोकें तोडलें तर दोघेहि सारखे गुन्हेगार समजून दोघांनांहि शिक्षा होते. त्याप्रमाणें इस्पिकराजा व चौकटराणी या दोघांनीं मिळून जर गुन्हा केला तर त्या राजाप्रमाणें त्या राणीलाहि शिक्षा अलबत केली पाहिजे, हें ओघानें प्राप्त झालेंच.

ह्या सार्वत्रिक कायद्याप्रमाणें इस्पिकराजाबरोबर चौकटराणीलाहि गुन्हेगार ठरवून शिक्षा द्यावयाची कीं कसें, हा मोठा प्रश्न पीनलकोड करणाऱ्या इंग्रजसरकारापुढें दत्त ह्मणून उभा राहिला, व त्याचा समाधानकारक कसा निकाल लावावा हें मोठें कोडें त्यांनां वाटूं लागलें. चौकटराणीनें गुन्हा केला हें उघडच होतें. अर्थात् तिला देखील शिक्षा व्हावी असें स्पष्ट आहे असें त्यांचें एक मन त्यांनां सांगे; पण दुसरें त्यांचें मन त्यांनां उलट दिशेकडे ओढून नेऊं लागलें. "चौकटराणीनें गुन्हा केला खरा, पण तो कोणचा ? अर्थात् इस्पिकराजाला मदत केल्याचा. इस्पिकराजानें चौकटराजाचा जो अपराध केला त्या कामांत चौकटराणीनें त्याला मदत केली. पण मुख्य गुन्हेगार इस्पिकराजा. त्यानेंच नाना तऱ्हेची फुसलावणी दाखवून मोहकमोहक गोडगोड भाषणें बोलून त्या बिचाऱ्या

चौकटराणीला भ्रष्ट केली. त्याच्या मोहक आमिषामुळें बिचारी चौकटराणी फसली, आणि तिनें आपल्या जवळची जी अत्यंत पवित्र व मौल्यवान् वस्तु —आपलें पवित्रपण—ती इस्पिकराजाच्या स्वाधीन केली. असें पहा, कीं, तुमच्या एका लहान मुलाच्या अंगावर तुह्मी अत्यंत मोलवान् असे जडावाचे दागिने घातले आहेत व त्या पोराला चार लोकांत मोकळें सोडलें आहे. अशा समयीं एखाद्या भामट्यानें त्या अज्ञान बाळाला चार पेडे देऊन ते दागिने काढून नेले, तर त्याबद्दल तुह्मी भामट्याला शिक्षा कराल हें ठीकच आहे. पण पेढ्यांच्या लोभाला बळी पडून तें पोर त्याच्याबरोबर आडरस्त्याला गेलें, व आपल्या अंगावरचे दागिने भामट्याला घेऊं दिले, त्याबद्दल आणखी तुम्हीं त्या बाळाला शिक्षा करणें वाजवी होईल काय? अज्ञानीपणामध्यें हिंदु स्त्रिया आणि लहान बाळें यांमध्यें कितीशी तफावत असते? आपलें पावित्र्य भ्रष्ट होऊं देऊं नये एवढें जिला समजत नाहीं ती अज्ञानीच. शिवाय, हिंदुलोकांमध्यें स्त्रीला गुराढोरांपेक्षां फारसे ज्यास्ती हक्क नसतातच. अगदीं अज्ञानावस्थेंत त्यांचीं लग्नें करतात. लग्नानंतरहि त्यांचा कांहीं अपराध नसतां नवरे दुसऱ्या बायका करतात. वस्त्रें उपवस्त्रें बाळगतात, आणि त्या विवाहित स्त्रियांनां धुसफुसत कसातरी काळ कंठावा लागतो. नवऱ्यानें राजरोस दुसरीकडे चैन करीत रहावें, आणि बायकोचें पाऊल वांकडें पडलें ह्मणजे तिला फौजदारींत शिक्षा करण्याची हाव धरावी, हें आह्मांला चमत्कारिक दिसतें. ह्मणून समतेच्यापासून ज्या स्त्रिया कितीतरी खालच्या पायरीवर लोटून दिलेल्या आहेत त्यांजवर, फौजदारी शिक्षेच्या पात्रतेची आणखी जबरदस्त गोणी लादून त्यांनां आणखी खोल गाडण्यास मदत करावी असें आह्मांला वाटत नाहीं.

वरीलप्रमाणें विचारसरणीचा अवलंब करून, पीनल कोडच्या कर्त्यांनीं असें फर्माविलें आहे, कीं, चौकटराणीला मदतनीस ह्मणून आह्मीं गुन्हेगारच समजत नाहीं. फक्त इस्पिकराजाला गुन्हेगार ठरवून शिक्षा देत जाऊं; आणि ती शिक्षा कशाबद्दल, तर चौकटराजाचें नुकसान केल्याबद्दलच फक्त होय.

या पीनल कोडच्या कर्त्यांच्या निकालाचा एक मात्र फार चमत्कारिक परिणाम घडून आला आहे. तो असा, कीं, ज्या स्त्रीला मुळीं नवराच नाहीं अशीशीं इस्पिकराजानें व्यभिचार केला तर तो मुळींच गुन्हा होत नाहीं. उदाहरणार्थ, इस्पिकराजानें एखाद्या कुमारिकेशीं, अथवा विधवा स्त्रीशीं गमन केलें, तर पीनल कोडाची त्याला भीति नाहीं. कारण कुमारिकेला अजून नवराच झाला नाहीं, व विधवेचा मरून गेला आहे. अर्थात् इस्पिकराजानें कोणा पुरुषाचा अपराधच केला नाहीं!

आह्मां आर्यपुरुषांनां या साऱ्या सवलती नको आहेत असें नाहीं. त्यांनीं या सवलतीच्या विरुद्ध कोठें गिल्ला केल्याचें आढळून येत नाहीं. पण त्यांनां अतिशय राग जो आला आहे, तो चौकटराणीला गुन्हेगार ठरविण्याचें पीनल कोडानें नाकारलें त्याबद्दल! त्यांचें ह्मणणें असें, कीं, आमच्या हिंदु कल्पनांप्रमाणें चौकटच्या राणीला मदतनीस ह्मणूनच नव्हे, तर अस्सल गुन्हेगार ह्मणून देखील शिक्षा ठरवावयाला पाहिजे होती. तिला सोडून देण्याकरितां जीं कारणें पीनलकोडच्या प्रवर्तकांनीं लिहून ठेविलीं आहेत तीं आमच्या पुरुषवर्गाला अत्यंत अपुरीं व असमाधानकारक वाटतात. त्यांची आग्रहाची शिफारस अशी आहे, कीं, ही चूक आतां तरी दुरुस्त करून टाकण्यांत यावी. इतकेंच नव्हे तर जेथें जेथें आर्यपुरुषांच्या हातीं अधिकार आहे तेथें कांहीं ठिकाणीं ती चूक एकदम दुरुस्तहि केली गेली आहे! ज्या पुरुषांनीं एके वेळीं सतरा लग्नें लावावीं, शेंकडों वेश्या ठेवाव्या, आणि तेवढ्यानें जणूं काय तृप्ति होत नाहीं ह्मणून, मुंबईकलकत्त्या सारख्याहि प्रसिद्ध ठिकाणीं असलेल्या नायकिणींचा परामर्ष घेण्यास तयारी दाखवावी, त्यांनींच आपल्या राज्यांतल्या अज्ञानी स्त्रिया पुरुषांकडून भुरळ्या गेल्या तर, त्या स्त्रियांनां तुरुंगाची शिक्षा फर्मावावी

हें एक अर्वाचीन भरतखंडांतलें मोठें आश्चर्य नव्हे काय ?

परंतु आमच्या हिंदी पुरुषांनीं कितीहि जरी गिल्ला केला तरी पीनल कोडाच्या कर्त्यांनीं त्यांनां भीक घातली नाहीं. इतकेंच नव्हे तर,त्यांनीं व्यभिचार किंवा जारकर्माच्या गुन्ह्याची व्याख्याच मुळीं अशी बनवून टाकली, कीं, त्या व्याख्येप्रमाणें कोणचीहि स्त्री केव्हांहि त्या गुन्ह्यामध्यें धरतां येऊं नये. ह्मणजे त्यांनीं जारकर्माचा गुन्हा इतर गुन्ह्यांप्रमाणें पुरुष व स्त्री यांनीं करण्यासारखा नसून तो फक्त पुरुषांनांच करतां येईल असें ठरविलें. पीनल कोडांतली जारकर्माची व्याख्याच आपण येथें देऊं ह्मणजे आमचें ह्मणणें स्पष्टपणें सहज समजेल. "एखादी स्त्री दुसऱ्याची विवाहित बायको आहे असें माहीत असून जर कोणी पुरुष तिच्याशीं गमन करील, तर त्या त्याच्या कृत्याला जारकर्म असें ह्मणावें, व त्या पुरुषाला पांच वर्षेंपर्यंत साधी अथवा सक्तमजुरीची कैद, अथवा दंड, अथवा दोन्ही अशी शिक्षा द्यावी. अशा समयीं त्या विवाहित स्त्रीला मदतनीस ह्मणून शिक्षेला पात्र समजावयाची नाहीं." या व्याख्येवरून हें उघड झालें, कीं, हा गुन्हा फक्त पुरुषांचाच आहे.

या संबंधानें आह्मांला अशी भीति वाटत आहे, कीं, नवीन कायदेकौन्सिलें झालीं ह्मणजे, आमच्या आर्यपुरुषांकडून,फार वर्षें त्यांच्या अंतःकरणांत सलत असलेलें हें शल्य काढून टाकावें,व स्त्रीलाहि मदतनीस ह्मणून गुन्हेगार ठरवावी, असा जोराचा प्रयत्न होईल. त्याच वेळीं जर ज्या इतर अन्यायाच्या सवलती पुरुषांनां आहेत त्या काढून टाकण्याची पुरुषांनीं हमी घेतली व कायद्यांत दुरुस्त्या केल्या, तर स्त्रीलाहि वरप्रमाणें मदतनीस ठरवून घेण्यास स्त्रिया हरकत करणार नाहींत,अशी आमची खात्री आहे. पण "मी दहा लग्नें करीन, पण तुला मात्र दोन लग्नें करण्याबद्दल शिक्षा करीन" व "मी कुमारिकेशीं व विधवेशीं खुशाल व्यवहार करीन, पण तूं जर वांकडें पाऊल टाकलेंस तर तुला मात्र शिक्षा करीन" असला भयंकर आप्पलपोटेपणा मात्र चालूं द्यावयाचा नाहीं, असा सुशिक्षित स्त्रियांनीं निश्चय केला पाहिजे. इतकेंच नव्हे तर, सुशिक्षित स्त्रियांनींच प्रथम पुढाकार घेऊन पुरुषवर्गाच्या मलमलत्या सवलती काढून टाकणाऱ्या दुरुस्त्या अगोदर पुढें आणिल्या पाहिजेत. असे त्यांच्या तर्फे प्रयत्न न होतील तर, पीनल कोडांत आपल्या तर्फेच्या दुरुस्त्या पुरुष केव्हां हळूच पुढें आणतील, आणि पटकन् पासहि करून घेतील, तें बिचाऱ्या अज्ञानांधःकारांत लोळत असणाऱ्या स्त्रीवर्गाला कळावयाचें देखील नाहीं, आणि एकदा दुरुस्त्या पास होऊन गेल्या ह्मणजे मागून जागें होण्यांत अर्थ नाहीं हें उघड आहे.

आतां आपण आणखी एका निराळ्या तऱ्हेच्या बाबीचा ऊहापोह करून हें प्रकरण संपवूं. ती बाब अत्यंत महत्त्वाची आहे. ह्मणूनच ती जरा नाजुक असूनहि मला तिचा येथें उल्लेख करणें भाग पडत आहे. प्रथमतः कायदा असा होता, कीं, एखाद्या मुलीशीं जर अनें संबंध केला आणि ती बारा वर्षांहून लहान असली, तर तिनें त्या कृत्याला आपली संमति दिली असें कधींहि समजावयाचें नसून, त्या पुरुषानें तिजवर केवळ जबरी केली असें ठरवून, त्याला जन्मठेप काळ्यापाण्याची देखील शिक्षा द्यावी. कारण बारा वर्षें वयाहून खालच्या स्त्रीला तें कृत्य ह्मणजे काय, हें समजणें शक्यच नाहीं, असें कायदा मानतो. या सर्वसाधारण नियमाला एक अपवाद असा होता, कीं, जर ती स्त्री त्या अची विवाहित बायको असेल, तर मात्र ती दहा वर्षांची झाल्यावरोबर संमति देण्यास लायक झाली असें मानावें. ह्मणजे नवऱ्यानें बायको दहा वर्षांची झाल्यापासून खुशाल तिच्यावर नवरेपणाचा हक्क गाजविण्यास सुरुवात करावी. ही नवरेपणाला जी दोन वर्षांची सवलत प्रथमतः दिली गेली, ती चुकीची झाली असें सरकाराला वाटूं लागलें, ह्मणून त्यांनीं ती सवलत काढून नवऱ्यानेंहि स्त्री बारा वर्षांची होण्यापूर्वीं

तिच्याशीं संबंध केल्यास त्याला शिक्षा करावी असें ठरविलें. त्या वेळीं पुरुषांनीं भयंकर गिल्ला केला आणि नवऱ्याचा आपल्या आठ वर्षांच्या बायकोशींहि गमन करण्याचा हक्क आहे अशा अर्थाचीं जुन्या ग्रंथांतलीं वचनें पुढें आणलीं! पण सरकारानें तीं न जुमानतां बारा वर्षांचा "**संमतिवयाचा कायदा**" सार्वत्रिक पास केला.पण बारा वर्षें ह्मणजे कितीतरी अयोग्य वय आहे, असें वैद्यशास्त्र ठांसून सांगत आहे. सबब ती इयत्ता निदान आणखी दोनतीन वर्षांनीं वाढविण्याची खटपट, स्त्रियांनीं आपल्या कोमल अपक्व लेंकींच्या हिताकरितां करणें अत्यंत जरुर आहे. या बाबतींत वैद्यशास्त्राचें मत सर्वस्वी प्रमाण मानलें पाहिजे असा आग्रह धरणें अगदीं वाजवी नाहीं असें कोण ह्मणेल? किंबहुना पंधरासोळा वर्षांपर्यंत संमतिवयाची मर्यादा वाढवून, तेथपर्यंत लग्नें करणेंच बंद करणें हा उत्तम मार्ग होय. मुलांचीं लग्नें पंचवीसपर्यंत व मुलींचीं सोळापर्यंत जर बंद केलीं, तर दोघांचेंहि शिक्षण पुष्कळ होऊन, दोघेंहि कर्तृत्ववान् होतील, व या आमच्या आर्यभूमीची कीर्ति उज्ज्वल करतील अशी आमची खात्री आहे! ती सफल करण्यास सुशिक्षित स्त्रियांनीं आपणाकडून तयारी ठेवावी अशी सदिच्छा परमेश्वर त्यांनां देवो.

## उपसंहार.

ज्या स्त्रियांनीं प्रस्तुत पुस्तक येथवर वाचण्याची मेहरबानी केली आहे त्यांनां आतां फारच थोडी तसदी देण्याची राहिली आहे; अथवा दुसऱ्या दृष्टीनें असेंहि ह्मणतां येईल, कीं, त्यांजवर आह्मी स्वजातीच्या हिताचें संरक्षण करण्याचा बोजा पडलेला असल्याचें स्पष्टपणें दाखवून दिलें असल्यामुळें, इतःपर त्यांनां जन्मभर तसदीच घ्यावी लागणार आहे. पण त्याला आमचा केवळ नाइलाज आहे. कर्तव्य करणें हें बहुशः नेहमींच तसदीदायक असतें. ती ज्यांनां नको असेल त्यांनीं खुशाल कर्तव्यपराङ्मुख बनावें!

या पुस्तकाचा इत्यर्थ थोडक्यांत सांगावयाचा तर असें ह्मणतां येईल, कीं, हिंदुलॉप्रमाणें हल्लींच्या काळीं कुमारिका, सुवासिनी व विधवा स्त्रिया यांनां केवळ पोटगीखेरीज काडीइतका देखील हक्क नाहीं. त्यांनां जें काय पाहिजे असेल तें त्यांनीं हातीं अधिकार असलेल्या पुरुषांनां खुश करून, केवळ मेहरबानगी ह्मणून त्यांच्याकडून प्राप्त करून घ्यावें, अशी स्त्रियांची कायदेशीर स्थिति आहे! इतकी विलक्षण परावलंबीपणाची त्यांची स्थिति असेल ही गोष्ट पहिल्यानें कोणालाच खरी वाटत नाहीं. कारण हिंदुसमाजामध्यें घरोघरीं संसार करीत असलेल्या, व सणावारीं व लग्नकार्यप्रसंगीं मोलवान् वस्त्राभरणांनीं फुलून निघणाऱ्या स्त्रिया, इतक्या कवडीमोल आहेत हें प्रथमदर्शनीं कसें पटावें? कैक घरीं आपण असें पहातों, कीं, यजमानांनीं मिळवून आणलेला पगार किंवा इतर प्राप्तीचा पैसा आपल्या स्त्रीच्या हातीं दिल्यावर पुढें ते त्या पैशाला कधीं प्रत्यक्ष हात देखील लावीत नाहींत. इतकी सारी गृहव्यवस्था स्त्रियांनीं ताब्यांत आणलेली असते. दुसऱ्या कैक घरीं आपण असें पहातों, कीं, प्राप्तींतून जी काय शिल्लक टाकावयाची असेल तेवढी परस्पर बँकबुकांत जाऊन बाकीचा सारा पैसा स्त्रीच्या हातीं येतो; व आणखी कैक घरीं घरखर्चाकरितां ठोक रकम त्यांच्या हातीं येते तिची त्या पाहिजे तशी वासलात लावतात; आणि अगदींच थोड्या घरीं घरखर्चाची दगदग स्वतः पुरुष आपल्या शिरावर घेतात, आणि तीहि बहुशः बायकोच्या अंगीं तितका वकुब नसतो ह्मणूनच, व दागदागिने तर पुरुष कधींच घालीत नसून त्यांच्या भोक्त्या स्त्रियाच असतात! अशी स्थिति असतांना स्त्रियांची मालकी पोटगीपुर्ती हें विधान एकदम कसें पटावें?

आणि एका दृष्टीनें पाहिलें तर तें खरेंहि नाहीं. कारण जरी नवऱ्याला आपल्या बायकोला फक्त पोटगी देऊन घराबाहेर काढण्याचा कायदेशीर हक्क

असला, तरी त्याप्रमाणें बाहेर हाकलून दिलेल्या बायका, आपल्या काय किंवा दुसऱ्याहि कोणच्या समाजांत काय, फारशा नसतात हेंहि खरें आहे. आणि त्याचें कारण एवढेंच, कीं, स्त्रियांच्या अंगीं फार वर्षांच्या संवयीनें कांहीं विलक्षण व चमत्कारिक असे गुण व दुर्गुण खिळून बसलेले आहेत. या गुणावगुणांचा असा परिणाम झालेला असतो, कीं, स्त्री सदोदित आपलेपण विसरून जाऊन "केवळ पतीकरतांच" अशी बनलेली असते, आणि ह्मणून अर्थात्च तिचा यजमानांशीं कधीं खटका उडतांना शेजाऱ्यापाजाऱ्यांनां फारसा दिसून येत नाहीं. उघडच आहे; जो नोकर अष्टौप्रहर आपल्या धन्याच्या नोकरींत गुंतलेला असेल, व जो कधींहि त्याच्या मर्जीवांचून एक क्षणभरहि बाहेर पाऊल टाकीत नसेल, अशा नोकराला त्याचा धनी नीट वागवितो, त्याच्या हातीं आपल्या घरादाराच्या किल्ल्या देतो, व तो आजारी पडला तर त्याच्या औषधपाण्याची बरदास्त ठेवतो, असें दिसल्यास तो त्या धन्याचा मोठा चांगुलपणा समजावयाचा काय? अशा नोकरानें जन्मभर धन्याची नोकरी इमानेंइतबारें केली, व धन्यानेंहि त्याला उत्तम रीतीनें वागविलें, तर त्यांत धन्याची वाखाणणी करण्याच्या ऐवजीं, त्या नोकराचीच वाखाणणी करणें ज्यास्त सयुक्तिक होईल. परंतु नोकर हा मनुष्यप्राणी आहे, त्यानें आपल्या स्वतःच्या उन्नतीचा कांहीं विचार न करतां, केवळ दुसऱ्याच्या हुकुमाप्रमाणें रात्रंदिवस राहण्यांत त्यानें आपल्या मानवीपणाला कलंक लावला नाहीं असें मानणें मोठी चूक होईल. बायकोनें नवऱ्याच्या ओंजळीनें जन्मभर पाणी पीत रहाणें, हें नवऱ्याच्या स्वास्थ्याच्या आकुंचित दृष्टीनें त्याला फार इष्ट वाटत असेल खरें, पण त्यामुळें अर्ध्या मानवजातीच्या स्वातंत्र्याला बाध येऊन, मानवजातीची उन्नति करण्याचें काम फक्त पुरुषांवर येऊन पडतें, हा मानवीजातीचा अत्यंत भयंकर तोटा होत असतो. ही गोष्ट पुरुषमंडळी केवळ आप्पलपोटेपणामुळें विसरून जात असतात ही केवढी आश्चर्याची गोष्ट होय!

नवराबायको आनंदानें कालक्रमणा करतांना जेव्हां आपण पहातों, तेव्हां बायको आपलेपण विसरून गेली असल्यामुळेंच ही सौख्यमय गष्टी शक्य झालेली आहे हें आपल्या एकदम लक्ष्यांत रहात नाहीं. पण आपले डोळे उघडून घ्यावयाला एक थोडा उपाय आहे तो प्रत्येक स्त्रीनें पाहिजे तर करून पहावा, अशी आमची शिफारस आहे. स्त्रीनें आजपर्यंत आपणावर जो "केवळ पतीकरितांच" असा छाप मारून घेतलेला असतो त्यांत किंचित् बदल करून "केवळ पतीकरितां आणि स्त्रीजातीच्या उन्नतीकरितां" असा छाप आपणावर मारून घेऊन त्याप्रमाणें अंशतः तरी दररोज वागण्याची सुरुवात करून पहावी. उदाहरणार्थ, आपल्या मुलीलाहि आपल्या मुलाप्रमाणें कांहींतरी इस्टेटीचा भाग द्यावा असा आग्रह धरावा, आपणहि नुसती नांवाची अर्धांगी नसून अर्ध्याची खरोखरी मालकीण आहों, व आपल्या अर्ध्या मालकीच्यापैकीं कांहीं रक्कम स्वजातीच्या उन्नतीकरितां आपण दर महिन्यास खर्च करणार आहोंत, एवढें बोलण्यास तरी सुरुवात करावी, आणि काय परिणाम होतो तो पहावा. जरी पूर्वीप्रमाणेंच ती गृहकृत्यांत पूर्ण दक्ष व स्वपतिसेवापरायण अशी असली, तरी या नुसत्या बोलण्याचाच जो परिणाम होईल तो तिचे डोळे उघडण्यास समर्थ असा होईल, अशी निदान शेंकडा पाउणशें दांपत्यांसंबंधानें तरी खात्री बाळगण्यास बिलकुल हरकत नाहीं! स्त्रियांनां आमची एवढी मात्र आग्रहाची शिफारस आहे, कीं, त्यांनीं "बोले तैसी चाले" अशी कृति सुरू करतांना, आपलें बलाबल पाहूनच पाऊल टाकावें. नाहीं तर "तिचीं वंदावीं पाऊलें" असा अनुभव येण्याऐवजीं अगदीं विपरीत प्रकार अनुभवास येऊं लागण्याचा पुष्कळ संभव आहे!

हें सारें येवढा अनुभव घेतल्यानंतरच स्त्रियांनां पटेल असें ह्मणण्याचें वास्तविक प्रयोजनच नाहीं. आह्मीं मागें सांगितलेंच आहे, कीं, स्त्रियांनां आपल्या खऱ्या स्थितीची पूर्ण जाणीव असते, ही

गोष्ट त्यांच्या तोंडीं पुष्कळदां असणाऱ्या "होऊं नये कोणाची बायको" वगैरे म्हणींवरून स्पष्टच होत आहे. या पुस्तकानें त्यांनां एवढीच जाणीव होईल, कीं, आपणाला जो हरघडी अनुभव येत असतो तो एरवीं नसून त्याच्या बुडाशीं हिंदुलॉचा भरभक्कम खोल पाया आहे !

ज्या कांहीं थोड्याशा स्त्रियांनां आपल्या खऱ्या कायदेशीर स्थितीची पुरी कल्पना आली आहे, त्यांतली एक तेजस्वी स्त्री एका प्रसंगीं मनापासून दुःखाचा व संतापाचा उमाळा येऊन त्या भरांत म्हणाली "आम्हाला हक्काचं असं पोटगीवांचून कांहींच नाहीं, ज्या त्या बाबतींत आम्ही पुरुषांच्या केवळ मर्जीवर अवलंबून रहावं, अशी कष्टमय स्थिति तुम्हीं पुरुषांनीं आमची करून टाकली आहे ! पण असं वर्तन आमच्याशीं करण्यांत तुम्ही काय पुरुषार्थ करतां, तो मला कळत नाहीं. ज्याप्रमाणं तुम्ही घराबाहेर आपापल्या नायकिणींनां वागवतां त्याच्यापेक्षांहि कमी मानानं तुम्ही आम्हांला घरांत वागवीत आहांत, हें तुमच्या लक्ष्यांत येत नसेल तर नसो, पण तें आमच्या मात्र स्पष्टपणं लक्ष्यांत येत चाललं आहे ! नायकिणींनां तुमच्यापासून हक्कानं असं कांहींच मागतां येत नसून, केवळ तुमची मर्जी संभाळून तुमच्यापासून पाहिजे तें काढून घ्यावं लागत असतं, व तिथं मात्र तुम्ही आपखुशीनं उदारपणा दाखवतां; पण घरांत आम्हां तुमच्या विवाहित स्त्रियांनांहि हक्काचं असं कांहीं नसून, आम्हींहि तुमची पदोपदीं हांजीहांजी करून तुम्हाला खुष करावं. तेव्हां फक्त वापरायला तुम्ही आपले डागडागिने आम्हाला देणार ! नायकिणींनां दिलेल्याची मालकी तत्क्षणीं पूर्णपणं त्यांचीच होते; पण आम्ही मात्र नुसत्या शोभेकरितां चार दिवस तुमची मर्जी असेपर्यंत ते दागिने घालायचे, व आम्हांला मालकी मुळींच नाहीं ! त्यांनां घरांतलं कामधाम, काळजीकांटा कांहींच नाहीं; पण आम्ही मात्र कामाखालीं रात्रंदिवस वांकलेल्या, आणि तुमच्याविषयींच्या काळजीनं अर्धमेल्या झालेल्या ! आणि हें सारं कशाकरितां ? तर निवळ पोटगीकरितां ? आम्ही घरांत जेवढ्या खपतों तेवढ्यावर आम्ही छप्पन्न पोटग्या देखील मिळवूं शकूं ! पहा बरं, "**चंद्रकांत राजाची कन्या, तरुण रूपखाणी पतिव्रताही सद्गुणि शहाणी**" असून, तिचा पतिहि तिला वाखाणीत असून आणि तीहि "**मर्जी पाहुनी वागत होती बटिक जशी घरची—**" असं असूनहि, अखेरीला तिच्या नवऱ्यानं केवळ आपल्या एककल्ली स्वभावामुळं वाटेल तसे तिचे धिंडवडे केले ! हीच जर ती त्याची नायकीण असती तर कधीं तरी तिची अशी दुर्दशा तो करूं शकला असता काय ?"

भगिनींनों, वर लिहिलेले उद्गार त्या स्त्रीच्या मुखांतून जे निघाले ते केवळ तिचा अंतरात्मा अन्यायामुळें जळत होता म्हणूनच होय. पर्वताच्या उदरांत अग्नीचा लोळ उठला म्हणजे त्याला वाट मिळण्याकरितां ज्वालामुखी पर्वत बाहेर अग्नीचे लोट फेकूं लागतो त्याप्रमाणें त्या स्त्रीची स्थिति होणें साहजिक होतें. हल्लींच्या हिंदुलॉनें स्त्रीजातीवर जो भयंकर अन्याय चालविला आहे त्याचा जर निःपक्षपात बुद्धीनें कोणीहि नीट विचार करील, तर त्याच्याहि अंतःकरणांत वरच्याप्रमाणें संताप उत्पन्न होईल. यूरोपियन न्यायाधीश आणि गवर्नर हे तरी पुरुषच ना? त्यांच्याहि स्त्रियांनां पुष्कळ अंशीं अन्याय होत असतो अशी हांकाटी त्यांच्या कानावर येत असे, हें जरी खरें होतें तरी हिंदुलॉमधली स्त्रियांची स्थिति पाहून त्यांचें हृदय—पुरुषी हृदयहि—बहुशः सदोदित कळवळून जाई, म्हणूनच ते नेहमीं हिंदुस्त्रियांच्या बाजूनें संस्कृत वचनांचा अर्थ लावण्याची खटपट करीत. अशा तऱ्हेनें परक्या जातीच्या व परक्या धर्मांच्या लोकांनांहि जेथें अन्याय दिसून आल्याशिवाय रहात नाहीं, तेथें स्त्रियांनां संताप यावा यांत आश्चर्य नाहीं. जिला म्हणून हा सारा प्रकार कसा आहे तें समजूं लागेल, तिच्या अंगांतलें रक्त सळसळूं लागणारच यांत संशय नाहीं.

परंतु रक्त सळसळूं लागलें ह्मणजे जर मनुष्य वेडा होऊन देहभान विसरूं लागेल, अथवा वेडें-वांकडें बरळूं लागेल, तर त्याचा फायदा होणें तर दूरच राहून, तो स्वतः आपल्याच नाशाला कारण होत असतो, हें पक्कें लक्ष्यांत ठेवणें जरूर आहे. ज्यानें आपल्या मनाला वाऱ्यासारखें भडकूं दिलें, व जो एकदां विचार सोडून विकाराच्या स्वाधीन झाला, तो पडल्या मार्गाकडे गोलांच्या खात जाणार हें उघड आहे; ह्मणून आपण कोठें आहोंत, आपणावर मारा आजपर्यंत कोण करीत आले आहेत, आपले मित्र कोण, त्यांनां मदतनीस कोण व पुढें आपणाला काय करावयाचें आहे, व त्याचे मार्ग कोणचे, हें सारें नीटपणें ओळखून आपला कार्यक्रम आंखला पाहिजे, व त्या आंखणीच्या बाहेर धडपड करण्यांत शक्ति घालविणें ह्मणजे शक्तीचा अपव्यय होईल हें मनांत बिंबवून घेतलें पाहिजे. उदाहरणार्थ, एक स्त्री आह्मांला असें ह्मणाली, कीं, या आमच्या जुन्या श्रुति, स्मृति आणि टीका वगैरे ग्रंथ सारे बुडवून टाकले पाहिजेत, कारण त्यांच्यापाशीं आह्मावरच्या साऱ्या अन्यायाचा उगम अथवा मूळ आहे! हें ह्मणणें प्रथमदर्शनीं खरें वाटेल. पण अधिक विचार केला तर असें दिसून येईल, कीं, संस्कृत ग्रंथांवर राग करणें ह्मणजे, आज गेलीं शंभर वर्षें ज्यांच्या आधारामुळें यूरोपिअन न्यायाधीश स्त्रियांशीं दयार्द्र दृष्टि ठेवूं शकले त्या ग्रंथांनां विनाकारण दोष देणें होय. पुरातनकाळच्या महान् ऋषींनीं स्त्रीजातीसंबंधानें ठिकठिकाणीं इतकी उच्च कल्पना ग्रथित करून ठेवली आहे, कीं, त्या तपोधनांनां खरोखरीच दिव्य दृष्टि होती अशी भावना होऊन त्यांजविषयीं अत्यंत पूज्यबुद्धि उत्पन्न होते. स्त्री व पुरुष यांमध्यें अगदीं पूर्ण समता असली पाहिजे हें तत्त्व, आम्हांला पाश्चात्यांपासून शिकावयाचें नसून, तें आपणाला आपल्याच पुरातन महर्षींपासून शिकावयाचें आहे. त्या ग्रंथांतून अनेक ठिकाणीं जीं स्त्रीजातीविषयीं दुष्ट वचनें आढळून येतात तीं तेथें मूळचीं होतीं, अशी माझी मनोदेवता मला सांगत नाहीं. कोळशेविक्याचें आणि परटाचें काम अगदीं एकाच घरांत चांगलें चालणें हें जर शक्य असेल, तरच तीं दोन्ही प्रकारचीं वचनें मूळ ग्रंथांत एका ठिकाणीं असणें शक्य आहे. ज्या डोक्यांतून अर्धनारीनटेश्वराची सुंदर व उदात्त कल्पना निघाली त्याच डोक्यांतून 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' हें वाक्य निघणें केवळ अशक्य आहे. स्त्रीनें आपल्या अकलेवर संपादन केलेल्या धनावर तिचाच पूर्ण ताबा असावा हें तत्त्व अलीकडे दहावीस वर्षांत पाश्चात्यांनां दिसूं लागलें आहे, पण तें अत्यंत स्पष्टपणें श्रीयाज्ञवल्क्यादि ऋषींनीं सामान्य जनतेला आज्ञापिलेलें आहे. अशीं आणखी कैक ठळकठळक उदाहरणें दाखवितां येतील. ह्मणून जुन्या ग्रंथांवर राग धरणें फारच कृतघ्नपणाचें होईल. मध्यंतरी जीं शेंकडों वर्षें अंधाराचीं गेलीं, त्यांमध्यें मधल्या काळच्या अज्ञ पुरुषांनीं दुष्ट वचनें पुरातन ग्रंथांतरीं घुसडून दिलीं असलीं पाहिजेत. पाश्चात्य राजनीतीच्या वल्गना पोपटपंचीप्रमाणें बोलणाऱ्या अर्वाचीन महापंडितांनां देखील, सामाजिक बाबी निघाल्या ह्मणजे त्या वेळीं कुशब्द तोंडांतून काढण्यांत कशी दिकत वाटत नाहीं तें पाहिलें म्हणजे, जुन्या ग्रंथांत ही दुष्ट घुसडाघुसड मध्ययुगांत झाली असल्याचें आश्चर्य वाटेनासें होतें.

त्याचप्रमाणें हल्लींच्या पुरुषांवरहि आपल्या अन्यायाचें खापर फोडूं पहाणें चुकीचें होईल. कायदा कितीहि जरी वाईट असला तरी त्याच्या वाईटपणाचें कौतुक करणारे असे हरीचे लाल हल्लीं देखील खरोखरच फार थोडे सांपडतील. प्रत्यक्ष भांडणाचा प्रसंग आला ह्मणजे हल्लींच्या कायद्याचा फायदा घेण्याला जरी पुरुष मागें घेत नाहींत, तरी त्या वेळींहि मी फक्त जें कायदेशीर आहे तेंच मागतों आहें, असें त्यांनां उजळ माथ्यानें ह्मणतां येत असतें, हें विसरणें रास्त होणार नाहीं. मुलीला कायद्यानें जरी कांहीं हक्क नाहींत तरी, ताईच्या लग्नाकरितां वाजवीपेक्षां अंमळ ज्यास्तीच खर्च करणाऱ्या पुरुषांची संख्या हिंदी समाजांत

आयुष्यानें आहे हें कसें नाकबूल करतां येईल ! स्त्रियांशीं समदृष्टि धरण्याचा प्रघात वाढत चालला आहे ही गोष्ट अलीकडचा पंचवीसतीस वर्षांचा इतिहास लिहिणारास स्पष्टपणें नमूद करणें भाग पडेल. अशीं पुष्कळ बाजूनें सुचिन्हें दिसत असतां हल्लींच्या सर्वच पुरुषांवर जहाल जाण्यांत सुशिक्षित स्त्रियांची मोठीच चूक होईल, यांत बिलकुल संशय नाहीं.

माझी अशीं खात्री आहे, कीं, सुशिक्षित स्त्रिया जर नेटानें प्रयत्न करूं लागतील तर, दहावीस वर्षांच्या आंतच हिंदुलॉवर हल्लीं असलेले मोठमोठे डाग त्या सहज पुसून काढूं शकतील. मात्र त्यांनीं पराकाष्ठेचे परिश्रम केले पाहिजेत. सरकारानें अलीकडे असा जाहिरनामा काढला आहे, कीं, नवीन होणाऱ्या कायदेकौन्सिलांच्या निवडणुकींत, स्त्रियांनां मताधिकार देणें वा न देणें, हें हिंदी लोकांच्याच हातीं सोंपविलें आहे. अर्थात् या वेळीं स्त्रियांनीं अत्यंत खटपट करून 'व्होट'चा अधिकार आपणा स्वतःस प्राप्त करून घेतला पाहिजे, व तो मिळविल्यावर आपल्यावरचे अन्याय काढून टाकण्याचें जो कबूल करील असाच इसम कौन्सिलांत निवडून येईल अशी तजवीज ठेवली पाहिजे. एवढें जर काम त्यांनीं केलें तर, हिंदुलॉमध्यें इष्ट अशी सुधारणा हां हां ह्मणतां होऊन जाईल यांत संशय नाहीं. कौन्सिलमध्यें स्त्रियांचा खुद्द प्रवेश करून घेण्याचीहि खटपट जारीनें सुरू ठेवली पाहिजे. प्रत्यक्ष स्त्रिया कौन्सिलांत बसलेल्या असल्या ह्मणजे, त्यांच्या विरुद्ध असे कायदे पास होणें पुष्कळ कठीण होतें, हा सर्व ठिकाणीं अनुभव येईल, अशी तजवीज अगोदरपासूनच करणें फार जरुर आहे.

या प्रयत्नांपासून स्त्रियांनां पराङ्मुख करण्याविषयीं हरतऱ्हेचे प्रयत्न कांहीं कोत्या दृष्टीच्या मंडळीकडून होतील, त्यासंबंधानें येथें इशारत देणें इष्ट आहे. हे प्रयत्न पुरुषांकडून झाले तर त्यांत एवढें आश्चर्य नाहीं; पण कित्येक स्त्रियांकडूनहि ते होण्याचा संभव आहे. पुरुषांशीं समतेची अपेक्षा करणें म्हणजे महापातक आहे अशी आज कैक शतकें आमच्याकडे स्त्रियांनां शिकवणी चाललेली आहे. त्या शिकवणीचा हा सारा परिणाम आहे. कांहीं स्त्रिया असें म्हणतील, कीं, बरोबरीच्या हक्कानें थोडें मिळविण्यापेक्षां, पुरुषांपासून प्रेमानें सगळेंच मिळविण्यांत खरें स्त्रियांचें भूषण आहे, घराचा उंबरठा सोडून बाहेर खटपट करणें म्हणजे आपलें स्त्रीपण घालविणें आहे ! अशा खटपट करणाऱ्या स्त्रियांनां 'पुरुषीस्त्रिया' अगर 'पठाण' वगैरे शेलकीं विशेषणेंहि मिळण्याचा पुष्कळ संभव आहे. परंतु या साऱ्याची खरी किंमत सुशिक्षित स्त्रियांनीं ओळखली पाहिजे. ज्या बिचाऱ्यांनां जग म्हणजे काय आहे हें ठाऊकच नाहीं, उंबराच्या फळांतील किड्यांप्रमाणें उंबरठ्याच्या आंतच सारें जग आहे, व तेथें आपल्या कानीं पतिराज जें सांगतील तें मुकाट्यानें खरें मानून राहण्यांत ज्यांचा जन्म गेला असेल, त्यांनीं पोपटाप्रमाणें पतिराजांच्याच शब्दांचा पुनःपुनः उच्चार करण्यांत धन्यता मानिली तर तो त्यांचा दोष नव्हे. त्यापेक्षां त्यांच्या परिस्थितीची कींवच करणें जास्ती वाजवी होईल. त्या बिचाऱ्यांनां असें वाटत असतें, कीं, आपणामध्यें जे कायदे आहेत ते प्रत्यक्ष परमेश्वरानेंच केलेले आहेत ! अशांच्या घरोघरीं जाऊन कायद्यांचें खरें स्वरूप जर सुशिक्षित स्त्रियांनीं नीट समजून सांगितलें, आणि कायदे बदलून घेण्याचें आपल्या हातीं कसें आहें हें जर त्यांनां समजलें, तर प्रत्यक्ष शिक्षण जरी त्यांनां मिळालेलें नसलें तरी, पुष्कळशा जुन्या पिढींतल्या देखील स्त्रियांची सहानुभूति सहज मिळण्यासारखी आहे.

परंतु कांहीं स्वार्थसाधु पुरुषांकडून स्त्रियांच्या खटपटीला विशेष जोरानें हरकत येणार आहे, तिच्या भ्रामक स्वरूपाला मात्र बळी न पडण्याची स्त्रियांनीं अतिशय खबरदारी घेतली पाहिजे. हे पुरुष कोण ? तर मागच्या हजारपांचशें वर्षांत ज्यांनीं पुरातन महर्षींच्या पूज्य ग्रंथांतून दुष्ट वाक्यें ठिकठिकाणीं

घुसडून दिलीं, त्यांचेच हे हल्लींच्या काळचे अवतार होत! त्यांजकडून निरनिराळ्या तऱ्हेनें हरकती घेण्यांत येतील, नाना प्रकारचे भ्रामक कोटिक्रम लढवले जातील, आणि उपहास, थट्टा, अपशब्दांचा वर्षाव वगैरे सर्व दुष्ट अस्त्रांचा उपयोग स्त्रियांच्यावर सढळ हस्तें केला जाईल! अशा लोकांनां यत्किंचित् भीक घालावयाची नाहीं असा दृढ निश्चय पहिल्यापासून ठेवला पाहिजे. "खटनटाशीं खटनट" या रामदासांच्या उक्तीप्रमाणें त्यांच्या साऱ्या अस्त्रांवर आपलीं अस्त्रें फेंकण्यास स्त्रियांनीं तयार राहिलें पाहिजे. "आह्मी स्वराज्य मिळविण्याची खटपट करीत आहोंत, या वेळीं तुह्मी हक्क कसला मागतां? आह्मालां या वेळीं तसदी देऊं नका. स्वराज्य आह्मीं मिळविलें, कीं, बाकीच्या साऱ्या प्रश्नांचा चट्कन् आह्मीं निकाल लावूं.तोंपर्यंत स्त्रियांनीं आपलें मागणें तहकूब ठेवावें" असाहि उपदेश स्त्रियांनां होईल. परंतु हा अत्यंत मानभावी उपदेश आहे हें पक्कें लक्ष्यांत ठेवावें. "ज्या साम्राज्यांत आह्मां हिंदीजनांनां मान नाहीं त्या साम्राज्यांत आह्मांला सौख्य कसें वाटावें हें जसें तुह्मी पुरुषमंडळी यूरोपिअन लोकांनां विचारीत असतां, तसेंच, आह्मीहि तुह्मांला विचारतों, कीं, ज्या स्वराज्यांत आह्मा स्त्रियांनां केवळ काडीइतकेच हक्क असणार,असल्या तुमच्या स्वराज्याचा आह्मी तरी काय ह्मणून अभिमान मानावा? आज तुमच्या हातीं स्वराज्य नाहीं, तरी देखील तुह्मांला आमच्या हक्कांचा विचार करावयाला फुरसत नाहीं ह्मणतां, मग उद्यां तें मिळाल्यावर तर तुह्मांला फुरसत कोठून मिळणार? जेवढें आज तुमच्या हातीं इंग्रजसरकारानें दिलें आहे, त्यामध्यें स्त्रियांनां पूर्ण हक्क देऊन दाखवाल तर, आमचा कांहीं तरी विश्वास तुमच्या आश्वासनावर बसूं शकेल. पण हातांत असलेलें न देतां, नुसत्या गुळचट थापांवर जर तुह्मी आह्मांला झुलवूं पहाल,तर आतां अशा रीतीनें आह्मी फसणार नाहीं हें पक्कें लक्ष्यांत ठेवा!" असें रोखठोक उत्तर देण्याला स्त्रियांनीं शिकावयाला नको काय?

सरतेशेवटीं स्त्रियांनीं सर्व हिंदु पुरुषांपुढें हात जोडून अतिशय नम्रपणें प्रार्थना करावयाची ती अशी:—"बंधुहो! आह्मी आपल्या प्रत्यक्ष बहिणी आहोंत. ज्या हाडामासापासून तुमचे देह बनले आहेत, त्याच हाडामासापासून आम्ही देखील बनलेल्या आहोंत. तुह्मांला जशी बुद्धि आहे, तशीच आम्हालाहि आहे. तुमच्या शरीरांत शक्ति जास्त असेल, आमच्याजवळ ती थोडीशी कमी असेल, पण कदाचित् तिची जागा भरून काढण्याकरितां परमेश्वरानें आमच्या शरीरांत जास्ती काटकपणा दिलेला आहे. निदानपक्षीं, आह्मी केवळ टाकाऊ आहों,अशी जी तुह्मीं आमची अवहेलना चालविली आहेशी दिसते, तिला तरी आम्ही खास पात्र नाहीं, ही तुम्ही गांठ बांधून ठेवा. आणि राष्ट्रकार्याचें अवजड जूं तुम्हीं एकट्यानेंच घेण्याचा हव्यास धरिला आहे तो सोडून, आमच्या वांट्याचा भार आमचा आह्मांला वाहतां येईल अशी व्यवस्था करण्यास मागें घेऊं नका. आमची अशी खात्री आहे, कीं, तुमच्या व आमच्या पूर्वजांनीं आमची खरी योग्यता ओळखून तुह्मांला जो उपदेश अनेक ठिकाणीं केलेला आहे तो अगदीं रास्त आहे.

"नैसर्गिकी सुरभिणः कुसुमस्य सिद्धा
मूर्ध्नि स्थितिर्न चरणैरवताडनानि।"

—श्रीभवभूति.

हा उपदेश तुह्मांला पटून, तुम्ही कुसुमाप्रमाणें आह्मांला आपल्या मस्तकावर धारण करण्यास लागाल, यांत आह्मांला थोडी देखील शंका नाहीं. पण, ती स्थिति आजच आम्हीहि तुह्माजवळ मागू इच्छीत नाहीं. आज आह्मी एवढेंच मागत आहोंत, कीं, आह्मांला पायांखालीं तुडविण्याचें बंद करून केवळ नुसते समतेचे हक्क आह्मांला द्या. त्याविषयीं एवढी मात्र खात्री असूंद्या, कीं, तुमची इच्छा असो वा नसो, ते हक्क आह्मांला परमेश्वराच्या कृपेनें, आणि प्रेरणेनें, लौकरच मिळण्याकरितां आम्ही रात्रंदिवस श्रम करणार आहोंत! सर्व कांहीं कर्ताकरविता असा जो अर्धनारीनटेश्वर श्रीमहादेव तो तुह्मांला सद्बुद्धि देऊन स्वतःसारखें तुह्मांलाहि लौकर बनवो! तथास्तु!!"

# हिंदु स्त्रियांची कायदेशीर दुर्दशा !

[ परिशिष्ट. ]

## प्रिव्ही कौन्सिलचा एक महत्त्वाचा नवीन ठराव.

लेखक श्रीयुत कृष्णाजी केशव गोखले.

मनोरंजनांत क्रमशः प्रसिद्ध झालेली ही लेखमाला ज्या स्त्रियांनीं लक्ष्यपूर्वक वाचली आहे त्यांनां एक आनंदाची बातमी सांगण्याकरितां आज आम्ही लेखणी हातीं धरीत आहों. स्त्रियांवर हायकोर्टातल्या व प्रिव्ही कौन्सिलमधल्या यूरोपिअन् जज्जांनीं आजपर्यंत अनेक वेळां सहृदयतेनें निकाल देऊन उपकार करून ठेवले आहेत, ही गोष्ट वाचकांनां आमच्या लेखमालेवरून मशहूर असेलच. या सुंदर परंपरेला अनुसरून प्रिव्ही कौन्सिलच्या जज्जांनीं अगदीं अलीकडे एक फार उत्तम निकाल दिला आहे. त्याची आमच्या स्त्रीवाचकांनां माहिती करून द्यावी, व हिंदु स्त्रियांवर आजपर्यंत होत असलेल्या अन्यायाचें परिमार्जन करून त्यांच्या सुस्थितीला आजपर्यंत लागून राहिलेलें ग्रहण अंशतः तरी सोडविण्याचें कार्य प्रिव्ही कौन्सिलनें कसें शिताफीनें पार पाडलें आहे त्याची योग्य जाणीव स्त्रियांनां करून द्यावी व या महत् कार्याबद्दल हिंदु स्त्रियांच्या तर्फे प्रिव्ही कौन्सिलचे मनःपूर्वक आभार मानावे, असा आज आमचा हेतु आहे.

हें जें आज थोडेंसें ग्रहण सुटलें आहे तें, प्रथमदर्शनीं जरी फक्त दत्तक घेण्याच्या विधवा स्त्रियांच्या हक्काच्या बाबतींतच सुटलें असल्यामुळें फार महत्त्वाचें नाहीं असें वाटेल, तरी तशी समजूत करून घेणें फार चुकीचें होईल. केवळ स्त्रियांच्या दत्तकाच्या बाबतींतच या प्रिव्ही कौन्सिलाच्या नवीन निकालाचा परिणाम नसून त्याचा सुपरिणाम फार दूरपर्यंत पोंचणारा असा आहे, व त्यामुळें सर्व स्त्रियांनां नडणाऱ्या एका फार मोठ्या प्रश्नापर्यंत या निकालाचा पल्ला पोंचत असल्यानें सर्व स्त्रियांनीं या निकालाचा खोल अर्थ समजून घेणें अत्यंत जरूरीचें आहे.

हिंदु कुटुंबपद्धतीमध्यें एकत्र कुटुंब म्हणजे काय हें आतां पुनः सांगण्याची जरूरी नाहीं. तें आह्मी प्रस्तुत लेखमालेच्या दुसऱ्या प्रकरणांत स्पष्ट करून दाखविलेंच आहे. हिंदु कुटुंबें हीं स्त्रियांच्या हक्कांच्या दृष्टीनें पाहिलीं असतां बहुशः नेहमीं एकत्र कुटुंबेंच असतात, व हिंदुलॉला विभक्त कुटुंबाचें अत्यंत वावडें आहे ही गोष्ट वाचकांच्या ध्यानांत असेलच. थोडक्यांत असेंहि म्हणतां येईल, कीं, जर सरसकट शंभर हिंदु कुटुंबें घेतलीं तर त्यांतलीं फार तर पांचदहा विभक्त कुटुंबें असतील, पण बाकीचीं सर्व हिंदुलॉमध्यें केवळ अविभक्त म्हणजे एकत्र कुटुंबेंच आहेत असें आढळून येईल.

अशा स्थितींत दत्तक घेण्याच्या हक्कासंबंधानें स्त्रियांची स्थिति आजपर्यंत हिंदुलॉमध्यें काय होती तें आतां पाहूंया. आजपर्यंतचा हिंदुलॉ असा आहे, कीं, फक्त विभक्त कुटुंबांमध्येंच विधवा स्त्रीला आपल्या मर्जीप्रमाणें दत्तक घेण्याचा हक्क आहे. अविभक्त किंवा एकत्र कुटुंबांतल्या विधवा स्त्रीला जर दत्तक घेण्याचा प्रसंग प्राप्त झाला तर तिला तिच्या मर्जीप्रमाणें दत्तक घेतां येत नाहीं. तिनें पहिल्यानें आपल्या अविभक्त दीरमंडळीची परवानगी मागावी, व ती जर त्यांनीं मेहरबानीनें दिली तरच तिला दत्तक घेतां येतो; पण तशी जर तिला त्यांनीं परवानगी दिली नाहीं तर तिला दत्तकच घेतां येत नाहीं, असा कायदा आजपर्यंत आहे. ही गोष्ट आम्ही "हिंदु स्त्रियांची कायदेशीर दुर्दशा" या आमच्या पुस्तकांत प्रकरण ७, पृष्ठ ४०, कॉलम

२ मध्यें स्पष्ट सांगितलीच आहे. दीरांची परवानगी मागण्याची अट ठेवणें ह्मणजे मेंढीला लांडग्याकडून परवानगी आणण्यास सांगण्याइतकेंच हास्यास्पद आहे हें उघड आहे. कारण एकत्रांत असलेला आपला भाऊ जर निपुत्रिक मेला तर त्याच्या गरीब विधवेच्या तोंडाला फक्त पोटगीरूपी पानें पुसून सर्व इस्टेटीचा गड्डा, आपण जे त्या मयताचे अविभक्त भाऊ त्या आपणाकडे, अनायासें आलेला असतो. अशा स्थितींत जर आपण आपल्या विधवा भावजयीला दत्तक घेण्याची परवानगी द्यावी तर हातीं आलेली लक्ष्मी आपल्याच हातानें परत करावी लागणार! अर्थात् इतकी उदारता सहसा क्वचित्च आढळण्यांत येणार. ह्मणून परिणाम असा झाला आहे, कीं, एकत्र कुटुंबांतल्या विधवेला मुळीं दत्तकच घेण्याची बंदी होते आणि एकत्र कुटुंबें तर शेंकडा पचाण्णव असतात; त्यामुळें बहुशः फारच क्वचित् प्रसंगीं विधवांनां दत्तक घेण्याची पूर्ण मुभा राहिलेली असते.

परंतु ही जी काय थोड्याशा विभक्त कुटुंबांतल्या विधवांनां दत्तक घेण्याची स्वतंत्रता असे तीहि त्यांच्या दीरांनां खपत नसे, व विधवा भावजयीची स्वतंत्रता या बाबतींत आणखीहि नियंत्रित करण्याचे त्यांजकडून आपल्या वकिलांमार्फत निरनिराळ्या तऱ्हेनें प्रयत्न केले जात असत, हें मागें सातव्या प्रकरणांत सांगितलेंच आहे. अशाच प्रकारचा एक प्रयत्न करून पहाण्याची शक्कल कांहीं वकील-मंडळींच्या सुपीक डोक्यांतून निघाली; व ती जर साध्य झाली असती तर पूर्ण मुभा असलेल्या विधवांचें प्रमाण आणखीहि फार कमी झालें असतें, व अन्यायाचें क्षेत्र ज्यास्ती वाढलें असतें. परंतु स्त्रियांच्या सुदैवानें तो प्रयत्न अगदीं साफ फसून गेला. येवढेंच नव्हे, तर या भलत्या प्रयत्नामुळें प्रिव्ही कौन्सिलचे डोळे या अन्यायाकडे स्पष्टपणें वेधले जाऊन त्यांनीं त्या अन्यायाचें समूळच उच्चाटण करून टाकलें! हा प्रयत्न कोणच्या प्रकारचा होता त्याचें स्वरूप सांगून त्याची फसगत कशी झाली तें सांगूं, व आणखी एक पुढें पाऊल टाकून प्रिव्ही कौन्सिलनें अन्याय समूळच कसा काढून टाकला तेंहि स्पष्ट करूं. मात्र, विषय जरासा कठीण असल्यामुळें लक्ष्यपूर्वक तो समजून घेतला पाहिजे, नाहीं तर त्याचें स्वारस्य ध्यानांत येणार नाहीं, एवढा इशारा अगोदर देणें जरूर आहे.

आह्मी येथें एखादें काल्पनिक उदाहरण न घेतां मुंबई हायकोर्टांत अलीकडे घडलेल्या एका खटल्याचीच हकीगत येथें देतों. धारवाड जिल्ह्यांतील एका गांवीं भर्माप्पा नांवाचा एक हिंदु गृहस्थ आपल्या भावांशीं एकत्रांत रहात असे. तो १९०३ मध्यें मृत्यु पावला. तेव्हां मागें त्याची विधवा शिवलिंगव्वा व अज्ञान मुलगा महादेवाप्पा अशी मंडळी व त्या भर्माप्पाचे बंधु असे राहिले. महादेवाप्पानें अज्ञान असतांनाच कोणा पंचांमार्फत आपल्या चुलत्यांपासून इस्टेटीची वांटणी करून घेतली, पण त्याचें लग्न वगैरे न होतां तो स्वतः १९०७ सालीं मयत झाला. पुढें १९०९ मध्यें त्याची आई शिवलिंगव्वा इनें एक मुलगा दत्तक घेतला, पण या दत्तविधानाकरितां तिनें आपल्या दीरांची संमति किंवा परवानगी मिळविली नव्हती. इस्टेट सर्व दीरांनीं दाबून टाकली ह्मणून त्या दत्तक मुलानें त्यांजवर ह्मणजे आपल्या चुलत्यांवर दावा लावला. पहिल्या कोर्टांत मुन्सफांनीं तो दावा बहाल केला. कारण असें, कीं, महादेवाप्पा यानें एकत्रपणा मोडून विभक्तपणा केला होता. त्यानंतर त्याची आईहि विभक्त कुटुंबांतलीच विधवा झाली, व त्यामुळें तिला आपल्या विभक्त दीरांची परवानगी मिळवण्याची जरूरी राहिली नाहीं. या निकालावर दीरांनीं डिस्ट्रिक्ट कोर्टाकडे अपील केलें, व तेथें त्यांच्या तर्फेच्या वकिलानें एक नवीनच शक्कल लढविली. ती अशी, कीं, भर्माप्पा मेला तेव्हां तो बंधूंशीं एकत्र होता, अर्थात् शिवलिंगव्वा ही एकत्रांतलीच विधवा झाली. पुढें तिच्या मुलानें—महादेवाप्पानें—विभक्तपणा करून घेतला, ह्मणून त्याच्या आईची स्थिति कशी बदलेल ? ती जर एकत्रांतली

विधवा होती तर तिला केव्हांहि जरी दत्तक घ्यावयाचा प्रसंग आला तरी एकत्रांतल्या विधवेचेच नियम तिला लागले पाहिजेत.—अर्थात् तिला दत्तक घेतांना दीरांची परवानगी घेणें जरूर आहे. तशी परवानगी ज्या अर्थी तिनें घेतलेली नाहीं त्या अर्थी हा दत्तक रद्द झाला पाहिजे.

या शकलेचा खोल अर्थ वाचकांनीं नीट लक्ष्यांत घ्यावा. नवऱ्याच्या मृत्युसमयीं शिवलिंगव्वा एकत्रांतली विधवा होती खरी, पण प्रत्यक्ष दत्तक घेण्याच्या वेळीं ती विभक्तांतली विधवा होती हेंहि खरें. अशा प्रसंगीं तिला नियम एकत्राचे लावावयाचे कीं विभक्ताचे लावावयाचे, असा नाजुक प्रश्न येथें उत्पन्न झाला. दीरांच्या वकिलांचें ह्मणणें असें, कीं, ती दत्तक केव्हांहि घेवो, तिला सदोदित एकत्रांतलेच नियम लावावेत; कारण, नवऱ्याच्या मृत्यूच्या वेळीं ती एकत्रांतली विधवा होती. पुढें मुलानें विभक्तपणा केला तरी त्याचा फायदा त्याच्या आईला मिळणार नाहीं! ह्मणजे जी एकदां एकत्रांतली विधवा ती तिच्या मृत्यूपर्यंत निरंतर एकत्रांतलीच विधवा समजावी!

ही वकिलांची शक्कल डिस्ट्रिक्ट जज्जांस पसंत पडली व त्यांनीं निकाल दिला, कीं, ज्या अर्थी तिनें दिरांची परवानगी घेतलेली नाहीं त्या अर्थी हें दत्तविधान बेकायदा झालें, सबब तें रद्द आहे. याहि निकालावर त्या दत्तक मुलानें मुंबई हायकोर्टाकडे आणखी अपील केलें, व तेथें वरप्रमाणेंच उभयपक्षी वकिलांच्या तक्रारी झाल्या, आणि हायकोर्टानें ही नवी शक्कल धुडकावून टाकली. त्यांनीं असें ठरविलें, कीं, नवऱ्याच्या मृत्यूच्या वेळीं जरी ती बाई एकत्रांतली असली तरी प्रत्यक्ष दत्तक घेण्याची वेळ आली तेव्हां ती विभक्तांतली होती. तिचा मुलगा पूर्णपणें विभक्त झाला होता व तो मृत्यु पावल्यामुळें त्याची आई शिवलिंगव्वा इजकडे इस्टेट आई ह्मणून आली व त्यानंतर तिला दत्तक घेण्याचा प्रसंग प्राप्त झाला. त्या वेळीं जर एकत्रपणा असता तर इस्टेट तिच्याकडे न जातां दीराकडे गेली असती. पण विभक्त ह्मणून त्यांजकडे न जातां आईकडे ती इस्टेट गेली ह्मणून त्या इस्टेटीला दत्तक उत्पन्न करतेवेळींहि विभक्ताचेच नियम लावले पाहिजेत. अर्थात् विभक्त असलेल्या दीरांची परवानगी मागण्याचें तिला मुळींच कारण नव्हतें. सबब खालील कोर्टाचा निकाल रद्द करून मुन्सफ कोर्टाचा निकाल आम्ही कायम करतों. ह्मणजे दत्तक कायदेशीर बरोबर झाला असें ठरवितों. ( २२ मुं. लॉ. रिपोर्ट. )

याप्रमाणें वकिलांनीं काढलेल्या विलक्षण शकलेला हायकोर्टाकडून मूठमाती मिळाली, व असें ठरलें, कीं, ज्या वेळीं विधवा दत्तक घेत असेल त्या वेळीं ती विभक्तांतली असली ह्मणजे दीरांची संमति घेण्याचें कारण नाहीं. नवरा मयत झाला त्या वेळीं जरी ती एकत्रांतली असली तरी त्यांत मुद्दा नाहीं. दत्तकाच्या वेळीं ती विभक्तांतली असली ह्मणजे स्वयंसिद्ध आहे. तिनें दीरांस न विचारतां दत्तक घ्यावा.

हा निकाल मुंबई हायकोर्टानें ऑक्टोबर १९१९ मध्यें दिला. त्यावर प्रिव्हिकौन्सिलकडे अपील झाल्याचें वाटत नाहीं, आणि ह्मणून विभक्तांतल्या विधवांनां त्यांच्या नवऱ्याच्या मृत्युसमयीं तो अविभक्त होता ह्मणून निरंतर अविभक्ताचे नियम लावावे अशी शक्कल पुनः डोकें उचलणार नाहीं असें वाटण्यास आशा होती. पण तीच शक्कल अकोल्याकडील एका दाव्यांत पुनः काढली गेली व ती अपीलांत चढतचढत जाऊन अखेर खुद्द प्रिव्ही कौन्सिलपुढें जोरानें मांडण्यांत आली, व तिथेंहि त्या शकलेला पुनः मूठमाती मिळाली. त्या खटल्याची हकीगत आतां देऊं.

हा खटला अगदीं ताजा प्रसिद्ध झाला आहे. तो २४ मुं. लॉ. रीपोर्टर, पृ. ६०९ येथें त्रोटकपणें, व ४९ इं. लॉ. री. कलकत्ता, पृ. १ येथें जास्त विस्तृतपणें प्रसिद्ध झाला आहे. त्यांतली हकीगत अशी आहे, कीं, पुंडलीक व नामदेव असे दोघे भाऊ एकत्रपणें वऱ्हाडप्रांतीं अकोल्यास रहात

असत. पुंडलिकाला दोन बायका होत्या, पण पुत्र नव्हता. तो १९०५ त मृत्यु पावला. त्या समयीं त्यानें आपल्या दोघी बायका चंपाबाई व अन्नपूर्णाबाई यांना सांगितलें, कीं, माझा भाऊ नामदेव याला दोन पुत्र आहेत त्यांपैकीं थोरला पांडुरंग याला दत्तक घ्यावा. त्याप्रमाणें अन्नपूर्णाबाईच्या संमतीनें चंपाबाईनें नामदेवाच्या अनुमतीनें पांडुरंग याला दत्तक घेतला. नामदेवानें जें दत्तकपत्र या वेळीं लिहून दिलें त्यांत आजपासून पुंडलिकाच्या हिश्शाच्या इस्टेटीला हा पांडुरंग मालक झाला असें नामदेवानें लिहून दिलें. या भाषेवरून नामदेव व पांडुरंग त्या दिवसापासून विभक्त झाले असें ठरलें. पुढें पांडुरंग दोन वर्षांनीं मृत्यु पावला त्या वेळीं चंपाबाईनें नामदेवाजवळ त्याचा दुसरा मुलगा मागितला. पण त्यानें तो देण्याचें नाकारल्यामुळें तिनें १९०८ मध्यें एक तिऱ्हाइताचा मुलगा यादव नांवाचा दत्तक घेतला. परंतु नामदेव इस्टेट बळकावून बसला म्हणून यादवानें त्यावर दावा लाविला.

मुंबई हायकोर्टांतला दावा व हा दावा यांत बहुतेक हकीगत एकसारखीच होती हें वाचकांच्या ध्यानांत येईलच. तेथें फक्त महादेवाप्पा हा औरस पुत्र होता, व येथें पांडुरंग मुळांतच दत्तक होता एवढीच काय ती तफावत आहे. पण ती तफावत मुळींच महत्त्वाची नाहीं. दोन्ही ठिकाणीं मुलानेंच विभक्तपणा करून घेतला होता व त्याच्या मृत्यूमुळेंच आयांकडे इस्टेट आलेली होती. म्हणजे शिवलिंगव्वा व चंपाबाई या दोघींची स्थिति महत्त्वाच्या बाबींमध्यें अगदीं तंतोतंत एकच होती: इतकेंच नव्हे तर अकोल्याच्या प्रथम कोर्टांत धारवाडच्या प्रथम कोर्टाप्रमाणें दत्तक मुलाच्या वतीनें निकालहि देण्यांत आला होता. पुढें अकोल्यावर अपील केलें तें नागपुरच्या हायकोर्टाकडे झालें, व तेथें डिस्ट्रिक्ट जज्जाप्रमाणेंच खालच्या कोर्टाचा निकाल रद्द करून, दत्तक घेण्यास विभक्त दीरांची परवानगी यावयाला पाहिजे होती व ती घेतली नसल्यामुळें दत्तक बेकायदा झाला, सबब तो रद्द आहे, असाच ठराव झाला.

याहि निकालावर दत्तक मुलानें अपील केलें, पण तें धारवाडच्या दत्तकाप्रमाणें मुंबई हायकोर्टाकडे न होतां एकदम लंडन येथील प्रिव्ही कौन्सिलकडेसच कायद्यानें लागत असल्यामुळें एकदम तें अपील विलायतेसच लावलें गेलें. अर्थात् तेथें थोरल्या जजांपुढें मुख्य प्रश्न हा होता, कीं, जी विधवा एकदां अविभक्तांतली होती, पण जी पुढें विभक्तांतली झाली, तिनें जर दत्तक घेण्याचा प्रसंग आला तर तिला अविभक्ताचे नियम लावावयाचे, कीं, विभक्ताचे नियम लावावयाचे? नागपुरच्या कोर्टानें तर ठरवलेलें होतें, कीं, तिला अविभक्ताचे नियम लावावयाचे, व ज्या अर्थी तिनें दीरांची परवानगी मिळविली नव्हती त्या अर्थी तिचा दत्तक रद्द समजावा.

हें अपील सुनावणीला निघालें तेव्हां दत्तक मुलाच्या तर्फे प्रख्यात बॅरिस्टर सर जॉर्ज लौंड्स हे हजर झाले, व त्यांनीं तकरारी सांगतांना मुळांतच घाव घालण्यास प्रारंभ केला. त्यांनीं अशी तकरार केली, कीं, एकत्रांतल्या विधवेनें दत्तक घेतांना दीरांची परवानगी घेतल्यावांचून दत्तक घेऊं नये हें विधानच मुळीं चुकीचें व हिंदु लॉशीं विसंगत असें आहे. तिनें परवानगी घेतलीच पाहिजे असें मुंबई हायकोर्टांत १८७९ पासून 'रामजी विरुद्ध घमाऊ' या नांवाच्या निकालांत ठरलें आहे हें खरें, व त्या निकालाप्रमाणें आजपर्यंत शेंकडों दुसरे निकालहि झाले आहेत हेंहि खरें; परंतु हे सारे निकाल अगदीं चुकीचे आहेत. अलीकडे प्रिव्ही कौन्सिलनें स्पष्ट ठरविलें आहे, कीं, विधवेचा दत्तक घेण्याचा अधिकार तिला तिच्या नवऱ्यापासून मिळालेला नसून तो तिचा स्वयंभू असाच आहे व तसा जर तो अधिकार तिचा स्वयंभू आहे तर तो केव्हांहि झाला तरी स्वयंभूच राहिला पाहिजे. नवरा आपल्या भावांपासून विभक्त असला म्हणजे मात्र तो अधिकार स्वयंभू, पण तो एकत्रांत

मृत झालेला असला तर तो स्वयंभू नसून दीरांच्या मर्जीवर अवलंबून ठेवणें हें चुकीचें आहे. इस्टेट विभक्त असो, किंवा अविभक्त असो, विधवेचा दत्तकाचा अधिकार अगदीं सारखाच असला पाहिजे. पति मृत झाल्यामुळें निर्वंश होण्याची पाळी त्यावर आलेली आहे. त्या संकटांतून आपल्या नवऱ्याला मुक्त करावें,व त्याचा वंश पुढें चालू करावा,व त्याला व त्याच्या पूर्वजांनां प्रिय असलेलें पिंडोदक त्याला व त्याच्या पूर्वजांनां निरंतर मिळण्याची व्यवस्था करावी, या मुख्य हेतूनें विधवेनें दत्तक घ्यावयाचा असतो. हा हेतु पति विभक्तांत मेला म्हणजेच काय तो जरूर असतो व तो एकत्रांत मेला म्हणजे त्याची जरूरी रहात नाहीं, असें थोडेंच आहे! एकत्रांत असला तरी आणि विभक्तांत असला तरी पिंडोदक मिळण्याची त्याची इच्छा सारखीच तीव्र असणार, म्हणून तो हेतु ज्या योगानें साध्य होईल तो मार्ग धरण्यास विधवांनां पूर्ण मुभा असणें वाजवी आहे.एकत्रांत मेला एवढ्यावरून त्याला पिंडोदक मिळण्याच्या आड त्याच्या भावांनीं यावें हें गैर आहे. म्हणून एकत्रांत मेला असतां भावांची परवानगी मिळाली तरच दत्तक घ्यावा व न मिळेल तर घेऊं नये असें जें मुंबई हायकोर्टानें ठरविलें तेंच मुळीं चुकीचें आहे.

या अर्थाची तकरार म्हणजे विचारमालिका सर जॉर्ज लौंड्स यांनीं प्रिव्ही कौन्सिलपुढें मांडली. त्यांनीं असें दाखविलें, कीं, १८६८ सालीं "रखमाबाई विरुद्ध राधाबाई" या मुंबई हायकोर्टाच्या निकालांत जें काय ठरलें तें हें, कीं, नवऱ्याच्या परवानगीशिवाय आणि भाऊबंदांच्या अनुमतीवांचून हिंदु विधवेला दत्तक घेतां येतो. त्या निकालांत अविभक्त किंवा विभक्त विधवा असा मुळींच भेद केलेला नसल्यामुळें त्या निकालावरून सरसकट सर्व विधवांनां दत्तक घेण्याचा अधिकार प्राप्त झाला. त्यानंतर मुंबई हायकोर्टानें "रामजी विरुद्ध घमाऊ"च्या निकालानें १८७९ सालीं एकत्रांतल्या विधवांविषयीं तो हक्क मर्यादित म्हणजे कमी केला हें खरें, पण तसा तो कमी करण्याला संस्कृत ग्रंथांत मुळींच वचन सांपडत नाहीं किंवा कोणत्याहि टीकेमध्यें तसा आधार नाहीं, इतकेंच नव्हे तर त्यांतला बराचसा भाग प्रिव्ही कौन्सिलनें "प्रतापसिंग विरुद्ध ठाकोर" इं. लॉ. रि. ४३, मुंबई, पृष्ठ ७७८ येथें नाकबूलहि केला आहे. म्हणून विधवेला सर्वसाधारणपणानें दत्तकाचा हक्क आहे असें ठरवावें.

याप्रमाणें मुळांतच घाव घालण्याचा अटोकाट प्रयत्न केल्यानंतर सर जॉर्ज लौंड्स यांनीं आपला दुसरा बाण सोडला, कीं, प्रस्तुतच्या दाव्यांत तर हें कुटुंब विभक्तच आहे. कारण नामदेवानें जें दत्तपत्र लिहून दिलें त्यांत त्यानें पुंडलिकाच्या हिश्शाचा मालक पांडुरंग असे शब्द वापरले आहेत. अर्थात् त्या दिवसापासून पुंडलिकाचा हिस्सा तुटक करण्यांत आला हें स्पष्ट आहे.

अशा तऱ्हेनें सर जॉर्ज लौंड्स यांनीं दुबारी बंदुक वापरली होती. उलटपक्षीं डी ग्रुइथर व डुबे हे बॅरिस्टर हजर होते. पुंडलिक मयत झाला तेव्हां तो नामदेवाशीं एकत्र होता, म्हणून त्याच्या विधवेला नामदेवाच्या परवानगीवांचून दत्तक घेण्याचा अधिकार नव्हता. मागाहून तिच्या दत्तक मुलानें जरी विभक्तपणा करून घेतला असला तरी त्याचा फायदा त्याच्या आईला कसा मिळणार? शिवाय "रामजी विरुद्ध घमाऊ" हा निकाल आज पन्नास वर्षें हिंदुस्तानांत गृहित झालेला आहे तो येथेंहि मानणें जरूर आहे. अशा अर्थाची विचारसरणी त्यांनीं लौंड्सला उत्तर देतांना प्रिव्हीकौन्सिलपुढें मांडली.

अखेरीस ता. ३ जून १९२१रोजीं प्रिव्ही कौन्सिलनें आपला निकाल सांगितला. त्यांत त्यांनीं सर जॉर्ज लौंड्स यांची विचारसरणी सर्वतोपरी मान्य केली. पुंडलीक जरी नामदेवाशीं एकत्र मेला तरी पुढें नामदेवानें लिहून दिलेल्या दत्तकपत्रावरून दोन्ही शाखा विभक्त खासच झाल्या असें प्रिव्ही कौन्सिलनें ठरविलें, आणि एवढेंच ठरवून प्रिव्ही कौन्सिलला या दाव्याचा शेवट करतां आला

असता. ते असें ह्मणूं शकते, कीं, ज्या अर्थी चंपाबाई त्यापुढें विभक्त कुटुंबांतली विधवा बनली त्या अर्थी तिला पुनः दत्तक घेण्याचा प्रसंग आला असतां विभक्ताचेच नियम लागणें सयुक्तिक आहे. दत्तक घेतांना जर ती विभक्त तर विभक्ताचेच नियम लावले पाहिजेत ह्मणून दीर नामदेव याच्या परवानगीची मुळींच जरूरी नव्हती. येवढेंच ह्मणून प्रिव्ही कौन्सिलला नागपुरच्या कोर्टाचा निकाल फिरवितां आला असता.

परंतु बिचाऱ्या हिंदु विधवांच्या नशीबाला भरती यावयाची होती, व त्यांच्या सुस्थितीला लागलेलें ग्रहण अंशतः तरी सुटण्याची पाळी आली होती, ह्मणून प्रिव्ही कौन्सिलांतील जज्जांनीं सर जॉर्ज लौंड्स् यांच्या सगळ्या विचारसरणीवर निकाल दिला. खटल्याची एखादी तंगडी धरून फेंकून देण्याची जी कांहीं जजांची पद्धति असते तिजपासून अलिप्त राहून या प्रसंगीं प्रिव्ही कौन्सिलनें सर जॉर्ज लौंड्स् यांच्या प्राथमिक व मुख्य तक्रारीचा पूर्णपणें विचार करून स्पष्टपणें निकाल दिला, कीं, ही तक्रार अगदीं बरोबर आहे. महाराष्ट्र देशांतल्या हिंदु विधवांनीं दत्तक घेण्याच्या प्रसंगीं तिचा नवरा एकत्रांत मेला, कीं, विभक्तांत मेला हा प्रश्न पुढें कां यावा याचें आह्मांला योग्य कारण कोठेंच दिसत नाहीं. नवऱ्याला दत्तक पुत्र उत्पन्न करणें हें जर विधवेचें धर्मदृष्टया कर्तव्यकर्म आहे, तर तें कर्तव्य, तो विभक्त असो वा अविभक्त असो, सारखेंच बलवत्तर असणार हें उघड आहे. नवऱ्याची इस्टेट विधवेच्या हातीं आलेली असली काय, किंवा तिच्या हातीं न येतां ती एकत्रांतल्या त्याच्या भावाच्या हातीं गेली असली काय, तिच्या दत्तक निर्माण करण्याच्या कर्तव्यकर्मांत—किंवा हक्कांत अगर अधिकारांत—तफावत होण्याचें यत्किंचित् कारण नाहीं. व जरी इस्टेट तिच्याकडे आलेली नसली तरीहि तिला दत्तक घेतां येतो हें तर प्रिव्ही कौन्सिलनें पूर्वीच "प्रतापसिंग वि. ठाकूर" यांत ठरविलें आहेच.

येणेंप्रमाणें फार विस्तृत ठराव लिहून प्रिव्ही कौन्सिलनें फार व्यापक असा निकाल दिला, व "रामजी विरुद्ध धमाऊ" या निकालापासून आज पन्नास वर्षें अविभक्त कुटुंबांतल्या विधवांच्या दत्तक घेण्याच्या अधिकारावर दीरांच्या संमतीचें जें काळेंकुट्ट ग्रहण लागून राहिलें होतें तें पार सुटून गेलें. मुंबई लॉ रिपोर्टर व कलकत्ता लॉ रिपोर्ट्स या दोन्हीच्याहि संपादकांनीं हा "यादव विरुद्ध नामदेव" खटला प्रसिद्ध करतांना त्याच्या मथळ्यावर जो त्याचा सारांश अथवा मथितार्थ प्रसिद्ध केला आहे त्यांत दोघांनींहि लिहिलें आहे, कीं:—

"मुंबई इलाख्यांतील मराठा देशांत व गुजरातेंत एखाद्या विधवेला जर तिच्या नवऱ्यानें दत्तक घेण्याची स्पष्ट मनाई केलेली नसेल तर, तो एकत्र मेला असो कीं विभक्त मेला असो, आणि त्याची इस्टेट तिच्या हातीं पडली असो वा नसो,—भावाबंदांच्या संमतीवांचून दत्तक घेण्याचा तिला अधिकार आहे. "रामजी वि. धमाऊ" हा निकाल आम्ही नापसंत करतों, व "प्रतापसिंग वि. ठाकूर" हा निकाल पसंत करतों."

यावरून हें स्पष्ट आहे, कीं, याउप्पर दत्तक घेतेवेळीं विधवेनें आपल्या भावाबंदांची—मग ते एकत्र असले तरीहि—परवानगी मिळविण्याची जरूरी नाहीं. अशा रीतीनें तितक्यापुरती मेंढीची लांडग्याच्या तावडींतून प्रिव्ही कौन्सिलनें सुटका केली आहे.

हा निकाल प्रसिद्ध झाल्याला फक्त दोनच महिने झाले आहेत, पण त्यानें तेवढ्यांतच कायद्याशीं नेहमीं संबंध असणाऱ्या मंडळींत खूब खळबळ उडवून दिली आहे. स्त्रियांच्या बाजूची मंडळी आनंदित झाली आहे तर स्त्रियांच्या उलट असणारी मंडळी भयभीत झाली आहे. विशेषेंकरून ज्या दीरांनीं आपल्या मृत भावाची इस्टेट घशाखालीं लोटून आपल्या विधवा भावजयीला नुसत्या पोटगीच्या तुकड्यावर आजपर्यंत ठेवलें होतें त्यांच्या तोंडचें तर आतां पाणी पळालें आहे. कारण ती भावजय उद्यां एखाद्याला दत्तक घेऊन त्याच्या हस्तें आपणा-

वर दावा करून ढेंकर दिलेली आपल्या भाऊाची इस्टेट पुनः आपणाकडून ओकून काढणार कीं काय अशी त्यांनां विवंचना लागली आहे. ज्यांनां आजच प्रत्यक्ष नफानुकसानीचा प्रश्न नाहीं, व जे स्त्रियांच्या हक्कांविषयीं केवळ उदासीन आहेत, ते येवढेंच ह्मणताहेत, कीं, "रामजी वि. घमाऊ"चा कायदा आज पन्नास वर्षे अमल झालेला असतांना आतां इतक्या उशीरां तो मोडणें बाजवी नाहीं. उलटपक्षीं असें उत्तर त्यांनां मिळतें आहे, कीं, तो कायदा जर खरोखरी अन्यायाचा होता तर पन्नास वर्षांनीं कां होईना, पण प्रिव्ही कौन्सिलनें तो मोडण्याचें धैर्य दाखवलें हें फार चांगलें झालें. अशा प्रकारें नाना तऱ्हेनें या निकालावर टीका-प्रतिटीका होत आहेत.

ही इतकी विलक्षण खळबळ कां व्हावी याचें इंगित आमच्या वाचकांस एकदम समजणार नाहीं. त्यांनां असें वाटेल, कीं, दत्तक घेण्याचा प्रसंग घरोघर येतो असें कांहीं नाहीं, तर मग या नवीन निकालामुळें इतकी सर्वसाधारण चर्चा होण्याचें कारणच नाहीं. पण ही मोठी चूक आहे. प्रथमदर्शनीं जरी हा निकाल केवळ दत्तकापुरताच असला तरी त्याचे परिणाम फार दूरवर पोंचतात—इतके, कीं, त्यामुळें सर्वसाधारण हिंदु लॉंत एक फार महत्त्वाचा फेरफार होतो, अशी वस्तुस्थिति आहे. ती कशी तें आतां थोडक्यांत स्पष्ट करून हा लेख आटोपता घेऊं.

आमची लेखमाला ज्यांनीं वाचली आहे त्यांनां माहीतच आहे, कीं, हिंदु लॉमध्यें एकत्र कीं विभक्त या प्रश्नाला विलक्षण महत्त्व आहे. विभक्त कुटुंबांत विधवा स्त्रियांचे हक्क ज्यास्ती पण एकत्रांत पोटगीपेक्षां ज्यास्ती नाहींत. ह्मणून एखादीचा नवरा मेला, कीं, तो विभक्त होता कीं एकत्र होता हा प्रश्न अगोदर विचारणें भाग असे. कारण त्यावर तिचे हक्क थोड्याफार अंशानें अवलंबून असत. याच प्रश्नावर 'नवयुगां'त क्रमशः प्रसिद्ध झालेली आमची "एकत्र कीं विभक्त" ही कादंबरी आम्हीं लिहिलेली आहे. माधवराव व धुंड भटजी एकत्र होते असें ठरल्यामुळें सर्व इस्टेट धुंडभटजी यांच्या हातीं गेली व पार्वतीबाईच्या हातीं फक्त पोटगीरूपी करवंटी आली, हा त्या कादंबरीचा गाभा आहे. आजपर्यंत कायदा असा असे, कीं, पार्वतीबाईनां दत्तक घेण्यास धुंडभटजींची परवानगी मागावी लागे, व ती त्यांनीं दिली नाहीं ह्मणजे दत्तक घेतां येणें अशक्य होई. पण आतां जर पार्वतीबाईनां दत्तक घेण्याला कोर्टानें सदर परवानगी दिली आहे तर त्यांनां आपले पतिराज एकत्रांत वारले या गोष्टीची किंमतच नाहींशी झाली. कारण एक लहानसा मुलगा दत्तक घ्यावा व त्याच्या नांवानें धुंडभटजींवर वांटणीचा दावा लावला, कीं, धुंडभटजींच्या घशांतून माधवरावांची इस्टेट बाहेर पडलीच पाहिजे. औरस मुलगा असला ह्मणजे जशी निर्भय स्थिति असते तीच स्थिति आतां बेधडक दत्तक घेऊन आणतां येते, त्याला दीरमंडळी आडकाठी घालूं शकत नाहींत. यावरून हें उघड आहे, कीं, एकत्र कीं विभक्त या प्रश्नाचें महत्त्व आतां बिलकुल राहिलें नाहीं. असें प्रिव्ही कौन्सिलच्या निकालाचें फळ आहे.

विधवा स्त्रियांच्या मागचें हें ग्रहण अजून देखील पूर्णपणें सुटलें नाहीं असें म्हणणें भाग आहे. कारण अजूनहि त्यांनां स्वतःच्या पायांवर उभें रहातां येत नाहीं. माझ्या नवऱ्याचा अर्धा भाग या इस्टेटींत होता तो मला तुटक करून द्या असें अजूनहि विधवेला मागतां येत नाहीं. तिनें आधीं एखादा बचडा दत्तक घ्यावा, व मग त्याच्या आड उभें राहून वांटणी घ्यावी अशी अजून इकडे स्थिति आहे. बंगालमध्यें मात्र अशी दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिण्याची हिंदु स्त्रियांची स्थिति नाहीं. तेथें नवऱ्याची इस्टेट त्याच्या पश्चात् विधवेला दत्तकावांचून स्वतःच्या हक्कानें तुटक करून घेतां येते. त्याप्रमाणें इकडेहि कायदा झाला पाहिजे. बंगालमध्यें जो अधिकार स्त्रिया उपभोगीत असतां

हाहाःकार होत नाहीं तोच अधिकार महाराष्ट्र स्त्रियांनीं उपभोगण्यास आडकाठी काय म्हणून असावी? म्हणून इकडे महाराष्ट्रस्त्रियांनीं हें सारें समजून घेऊन प्रथम प्रिव्ही कौन्सिलचे आभार तर मानावेतच, पण बंगालप्रमाणें आम्हांला वांटणी मागण्याचा अधिकार पाहिजे अशीहि जोराची मागणी आमच्या कायदेकौन्सिलकडे करावी. आम्हांला सांगण्यास फार आनंद वाटतो, कीं, विचारी व न्यायी संस्थानिकांपैकीं कांहींनीं हा अधिकार आपल्या राज्यांतील स्त्रियांनां आपण होऊनच देऊन टाकला आहे. श्रीमंत महाराज संस्थान औंध, यांनीं स्त्रियांवर ही जी न्यायी सदयता दाखविली तीबद्दल ते स्तुतीस अत्यंत पात्र आहेत. त्यांच्याप्रमाणें परमेश्वर इतर संस्थानिकांनां व आमच्या मुंबईच्या लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमंडळींनां सुबुद्धि देवो.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 3022
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0003022